

# गुरुदेव रा. द. रानडे

अलाहाबाद विद्यापीठातील कारकीर्द व इतर लेख
(*Gurudev R. D. Ranade, A Glance at his Allahabad University Days and other Essays* या इंग्रजी पुस्तकातील काही लेखांचा मराठी अनुवाद )

अनुवादिका

**पद्मा कुलकर्णी**

# गुरुदेव रा. द. रानडे

अलाहाबाद विद्यापीठातील कारकीर्द व इतर लेख

(*Gurudev R. D. Ranade, A Glance at his Allahabad University Days and other Essays* या इंग्रजी पुस्तकातील काही लेखांचा मराठी अनुवाद )

अनुवादिका

**पद्मा कुलकर्णी**

२००६

पहिली आवृत्ती २००६

© प्रकाशिका २००६

**प्रकाशिका**

सौ. अश्विनी जोग व सौ. अंजली कन्नूर,

टी. एफ. १, मंदार अपार्टमेंटस्,

१०१ रेल्वे लाइन्स, सोलापूर ४१३ ००१

दूरभाष - ०२१७/२३१८२४४

**किंमत रु. ८० = ००**

यक्षनगरीतील आपल्या भांडारातून गुप्त धन पाठवून कुबेराने या पुस्तकाचा आर्थिक भार उचलला आहे.

**मुद्रक**

संप्रति ऑफसेट प्रिंटर्स

सोलापूर

# दृष्टिक्षेप

( Gurudev R.D. Ranade, a Glance at his Allahabad University Days and other Essays, या पुस्तकातील संपादकीयाचा काही भाग )

सुखदुःखमिश्रित अंतःकरणाने मी हे लिहीत आहे. गुरुदेव रामचंद्र दत्तात्रेय रानडे यांच्याबद्दल एखाद-दुसरेच वाक्य जरी लिहायचे म्हटले तरी ते आनंददायक असते. पण या वेळी त्या आनंदाला दुःखाची किनार आहे. २२/११/१९९६ रोजी बेळगावहून जगन्नाथ वासुदेव परुळेकरांचं एक पत्र माझ्या हाती आलं. १८/११/१९९६ रोजी त्यांचा धाकटा मुलगा रवींद्र देवाघरी गेल्याची कटू वार्ता त्यात होती. असला दुर्धर प्रसंग त्यांच्यावर येण्याची ही दुसरी वेळ. वीस वर्षांपूर्वी त्यांच्या राजाराम नावाच्या थोरल्या मुलाला काळाने ओढून नेले होते. आता वयाच्या ९५ व्या वर्षी हे आणखी एक दुःख कसं सोसायचं ? अलीकडे रवींद्र घरचा कारभार समर्थपणे सांभाळत होता. आपल्या मागेसुद्धा तो सगळा व्यवहार बघेल, अशी जगन्नाथरावांना आशा होती. पण नियतीला ते मान्य नव्हतं. रवींद्रच्या आकस्मिक मृत्यूने वृद्ध पित्यावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. पण गुरुदेवांच्या कृपेने ते सावरले. मुलाच्या स्मृत्यर्थ गुरुदेवांची सेवा होईलसे काहीतरी करावे असे त्यांच्या मनाने घेतले. अरविंद या त्यांच्या मधल्या मुलाकडे काही माया होती. नियोजित कामासाठी त्याने पैशांची तरतूद केली. मुलाच्या औदार्यामुळे वडिलांचा संकल्प सिद्धीला गेला.

जगन्नाथरावांना १९५० साली गुरुदेवांकडून नाम मिळाले. त्यांच्यावर नजर जाताच गुरुदेव उद्गारले, ''ह्यांच्या चेहऱ्यावरूनच दिसत आहे की हे खरे ब्राह्मण आहेत. ब्रह्म जानाति इति ब्राह्मणः । हे दीर्घायुषी होतील व काहीतरी उत्तम कामगिरी करतील.'' हे शब्द किती सार्थ ठरले, हे जगन्नाथरावांच्या जीवनपटावरून कुणालाही समजेल. गेली तीन दशके त्यांनी बेळगावच्या ॲकेडेमी ऑफ कंपॅरिटिव्ह फिलॉसॉफी ॲंड रिलिजन या संस्थेची धुरा वाहिली आहे व गुरुदेवांनी ठरवून दिलेली संस्थेची उद्दिष्टे प्रत्यक्षात आणली आहेत.

गुरुदेवांचे जीवन व त्यांची शिकवण या विषयावर रवींद्रच्या स्मरणार्थ मार्च १९९७ पर्यंत एक पुस्तक प्रसिद्ध करावं अशी इच्छा जगन्नाथरावांनी प्रकट केली. पुस्तकात शक्यतो नवीन लेख असावेत, पण जरूर लागल्यास पूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांतून काही निवडायलाही हरकत नाही, असं त्यांनी सुचवलं. गुरुदेवांच्या

अलाहाबाद येथील जीवनातल्या अप्रसिद्ध घटना जगापुढे मांडायचं मी ठरवलं. मी पूर्वी बरीच टिपणे केलेली होती. जोडीला साधक बंधुभगिनींकडून काही आठवणी मिळवल्या. त्यांपैकी ज्या कन्नड किंवा मराठी भाषांत होत्या, त्यांवर त्वरित इंग्रजी वेष चढवला. असा संच जमल्यावर लगेच डिसेंबर १९९६ मध्ये मजकुराची मांडणी करून अक्षरजुळणीच्या कामाचा श्रीगणेशा केला.

पुस्तकातील लेखांची थोडी ओळख सांगता येईल. गुरुदेवांच्या अलाहाबादच्या आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या घटनांची वास्तपुस्तही घेतली गेली नाही. आख्ख्या ३० वर्षांच्या वास्तव्याचं विहंगमावलोकन करणारं कुणीच नाही. अधिकृत दस्तऐवज नाहीत. मोजक्या लोकांकडे लहान लहान प्रसंगांच्या नोंदी आहेत, पण भाराभर चिंध्या जोडून समग्र इतिहास थोडाच उभा करता येतो ? बहुविध पैलूंनी समृद्ध असलेलं गुरुदेवांचं अलाहाबादचं जीवन बरंचसं अज्ञात होतं. विद्यापीठातील अभिलेख, सांदीकोपऱ्यात पडलेली पत्रे व त्या त्या प्रसंगी हजर असणाऱ्यांची स्मृतिचित्रे, यांची मी माझ्याजवळच्या सामुग्रीत भर घातली व पहिला लेख तयार केला. इतस्ततः विखुरलेले मोती गोळा करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यांची देखणी माळ ओवता न का येईना, निदान मोती घरंगळून जाऊ नयेत अशी इच्छा आहे.

श्री. दासो हणमंत कोल्हार यांच्या लेखात अलाहाबादला १२ ऑगस्ट १९४२ ला घडलेल्या भीषण नाट्याची हकीकत आहे. (त्या हकीकतीबद्दल आणखी दुसराही एक मतप्रवाह आहे). या लेखातला एक विशेष म्हणजे त्यात आलेली तत्त्वज्ञानाची बाळबोध व्याख्या. कोणताही मुद्दा सोपा करून सांगणे किती अवघड असते, हे कुणीही शिक्षक सांगेल. श्री. कोल्हार गुरुदेवांकडे चार वर्षे राहिले. पुढच्या आयुष्यातल्या कडूगोड प्रसंगांना तोंड देत, बिकट वाटेची वहिवाट न पडू देता, धोपटमार्गाने चालण्याचे धडे त्यांना तिथे मिळाले.

डॉ. मोहनलाल शर्मांनी, संस्कारक्षम वयात आपल्या मनाची घडण कशी होती हे सांगितले आहे. ते प्रथम गुरुदेवांकडे आले, तेव्हा परमार्थ हा हेतू धरून आले नव्हते. पुढे ते गुरुदेवांचे एकनिष्ठ भक्त झाले. हा मजकूर बेळगावच्या पाथवे टु गॉड या नियतकालिकात प्रथम प्रसिद्ध झाला होता.

नंतरचा लेख आपल्याला ८० वर्षे मागे नेतो. गुरुदेव फर्ग्युसन कॉलेजात तत्त्वज्ञान शिकवत असताना कृष्णराव वेंकटेश गजेंद्रगडकर त्यांचे विद्यार्थी होते. गुरुशिष्यांचा घनिष्ठ संबंध आला. सौ. सुचरिता श्रीकांत भागवत या कृष्णरावांच्या कन्या. त्यांनी गमतीचे प्रसंग देऊन आदर्श साधक कसा असावा हे साध्या साध्या उदाहरणांतून दाखवले आहे. हा लेख मुळात इंग्रजीतून बेळगावच्या पाथवे टु गॉड या नियतकालिकात प्रसिद्ध झाला होता.

अखेरच्या लेखात गुरुदेवांच्या जीवनातील शेवटच्या वर्षभरात घडलेल्या प्रसंगांची नोंद आहे. ही सर्व प्रसंगांची संगतवार गुंफण नाही. त्यांच्याजवळ सतत राहिलेली व्यक्तीच ते करू शकली असती. मी हजर नसताना घडलेले प्रसंग मला अज्ञातच राहणार, त्यामुळे या हकीकतीत काही पाने कोरी राहणे अटळ आहे. बऱ्याच घटना गळल्या आहेत असा इथे आक्षेप येईल, पण त्याला नाइलाज आहे. खोटंनाटं काही येऊ नये इतकीच मनीषा आहे. सत्य घटनांना पावित्र्य असतं आणि माझ्या दृष्टीनं गुरुदेवांच्या जीवनातील घटनांना पावित्र्याचं तेजोवलय आहेच आहे. त्या सत्याला धक्का लागला नाही म्हणजे झालं. समाधानाची गोष्ट अशी आहे की माझी टिपणं त्या त्या वेळी केलेली असल्याने एकतर विस्मृतीला वाव नाही व दुसरं तर सत्याचा विपर्यास होण्याचा धोका नाही. हा लेख लिहिताना अलिप्त राहायचं असं माझ्या मनानं भले ठरवलं असलं तरी आत्मस्तुती चोरपावलाने शिरण्याची भीती राहतेच. म्हणून इथं आपलीच टिमकी वाजवली आहे, असं कुणाला वाटलं तर, सहृदय वाचकांची क्षमा मागण्याखेरीज मी दुसरं काय करू शकतो ? हृदयाला भिडलेल्या घटनांचं हे एक भाबडं कथन आहे. आज चाळीस वर्षे ही रत्नं जपली आहेत. आता ती बाहेर काढली आहेत. एखाद्या रत्नपारख्याला त्यांत काही तथ्य दिसेल. कुणी नवशिका त्यांच्याकडे पाहून नाक मुरडेल ! काय होईल ते काळच ठरवणार.

सोलापूर

माघ शुद्ध तृतीया — बी. आर. कुलकर्णी

१० फेब्रुवारी १९९७

## मराठी अनुवादाबद्दल

इंग्रजी पुस्तकातील पाच लेखांचा हा अनुवाद आहे. वाचकांचा पिंड साधकाचा आहे, त्यांना घटपटादी खटपटीत रस नाही, अशी भूमिका लेखांची निवड करताना घेतली आहे. परिणामतः दोन लेख व दोन परिशिष्टे गाळावी लागली. इंग्रजी पुस्तकातले तीन लेख मुळात मराठीतूनच प्रसिद्ध झाले होते, म्हणून त्यांना जागा दिली नाही. आणखी दोन लेखांचा शब्दशः अनुवाद झालेला नसला, तरी त्यांचा आशय इतरत्र आला असल्याने ते घेतले नाहीत. राहता राहिलेल्या पाच लेखांचे हे मराठीकरण. डॉ. शिव शंकर रॉय यांच्या, दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या एका इंग्रजी लेखाचा मराठीत भावानुवाद करून तो इथे समाविष्ट केला आहे. अनेकत्वात एकत्व पाहणे या गुरुदेवांच्या जीवन-सूत्राची मनोज्ञ चिकित्सा या लेखात मिळते. अद्वैतदृष्टीचे हे रसग्रहण डॉ. रॉय यांनी गुरुदेवांच्या जीवनातले काही प्रसंग सांगून विलोभनीय केले

आहे. सौ. सुचरिता भागवत यांच्या मुळातल्या इंग्रजी लेखाचे मराठी भाषांतर त्यांनी स्वतःच करून पाठवले आहे. गुरुदेवांच्या ग्रंथसंपदेची यादी शेवटी दिली आहे. अलाहाबादला गुरुदेवांचे अनेक सहाध्यायी, विद्यार्थी किंवा चाहते होते, त्यांपैकी काहींचा उल्लेख या पुस्तकात आला आहे. या मंडळींतील ज्यांचे फोटो मिळाले ते इथे घातले आहेत.

निंबरगी संप्रदायात श्री. भाऊसाहेब महाराज यांचा नुसता 'महाराज' असा उल्लेख करण्याची प्रथा आहे. तसेच श्री. अंबुराव महाराजांना बाबा म्हटले जाते. ही दोन्ही पर्यायनामेही पुष्कळ ठिकाणी वापरली आहेत. नेम आणि सिटिंग हे दोन्ही शब्द संप्रदायात विशिष्ट अर्थाने वापरले जातात. नेम म्हणजे ध्यान. गुरुदेव हयात असताना साधकांना एकत्र बोलावत. त्यांच्या सान्निध्यात झालेली बैठक म्हणजे सिटिंग. हे दोन्ही शब्द तसेच ठेवले आहेत.

इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध होऊन आता आठाच्या वर वर्षे लोटली. या अवधीत विद्यापीठाच्या कामकाजाबद्दल मिळालेली नवीन माहिती इथे घातली आहे. त्यामुळे पहिला व शेवटचा हे दोन्ही लेख नव्या वेषात आले आहेत. रामनाथ कौल यांना गुरुदेवांनी स्वतःच्या अक्षरात लिहिलेल्या पत्राची फोटोप्रत परिशिष्टात सामावून घेतली आहे. तसेच तंतोतंत मजकूर वाचायला मिळावा म्हणून काही पत्रे छापली आहेत. गुरुदेवांविषयीच्या संशोधनाची धुनी सतत पेटलेली राहावी असे वाटत राहते.

सरकारी व विद्यापीठीय कामकाजातले कित्येक इंग्रजी शब्द त्यांच्या मराठी पर्यायांपेक्षा अधिक परिचित असतात. होता होईल तितके मराठी शब्दच वापरले आहेत आणि सोयीसाठी सुरवातीला पारिभाषिक शब्दांची सूची दिली आहे.

या कामाला डॉ. प्रभाकर शंकर सराफ, प्रा. सौ. सुधा प्रभाकर सराफ व प्रा. मालती मुकुंद जोग यांचे अनमोल साहाय्य झाले. डॉ. सच्चिदानंद महादेव परळीकर यांनी, जितक्या वेळा विचारले तितक्या वेळा, तातडीने इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय उपलब्ध करून दिले. गुरुदेवांच्या वेळी अलाहाबाद विद्यापीठात असलेल्या अनेक मंडळींचे फोटो ओळखून श्री. दा. ह. कोल्हार व प्रा. श्रीमती दीपिका कौल यांनी मोठेच उपकार केले. दीपिकाताईंनी आपल्या वडिलांचा (प्रा. रामनाथ कौल) एक उत्तम फोटोही पाठवला. ही सेवा आभारापलीकडील आहे म्हणून मौनं सर्वार्थसाधनम् ।

सोलापूर
वैकुंठ चतुर्दशी
१४ नोव्हेंबर २००५

पद्मा कुलकर्णी

# अनुक्रमणिका

पारिभाषिक शब्दावली ८

प्रा. रा. द. रानडे यांची अलाहाबाद विद्यापीठातील कारकीर्द

- प्रा. बी. आर. कुलकर्णी ११

मज हृदयीं सद्‌गुरु ।

- डॉ. शिव शंकर रॉय ५३

कह कबीर दोऊ ना मिलै ।

- दासो हणमंत कोल्हार ६५

रूप मनीं आठवावें ।

- डॉ. मोहनलाल शर्मा ७१

उत्तम गुणांचा ग्राहक ।

- सौ. सुचरिता भागवत ८२

वैकुंठा श्रीरंग बोलाविती ।

- प्रा. बी. आर. कुलकर्णी ९०

**परिशिष्टे -**

१) प्रा. रामनाथ कौल यांना पत्र ११३
२) डॉ. गंगानाथ झा यांचे ग्रंथ (अपूर्ण) ११५
३) श्री. दीक्षित यांचे पत्र ११६
४) महाराजांचे दर्शन झालेली जागा ११७
५) डॉ. अमरनाथ झा यांचे पत्र ११८
६) श्री. हृदयनाथ कुंझरू यांचे पत्र ११८
७) डॉ. कैलासनाथ काटजू यांचे पत्र ११९
८) नागपूर विद्यापीठाचे निमंत्रण ११९
९) कलकत्ता विद्यापीठाचे निमंत्रण १२०
१०) गुरुदेवांनी गंगानाथांना लिहिलेल्या पत्रातील उतारा १२१
११) अलाहाबाद विद्यापीठातील एक नाट्यमय निवडणूक १२१
१२) करबसप्पांची गोष्ट १२३
१३) जमखंडी येथील गुरुदेवांच्या भाषणाचा सारांश १२४
१४) श्री. ब्रजबासी लाल यांची हकीकत १२५
१५) गुरुदेवांच्या आजारपणाचे टिपण (काही भाग) १२७
१६) गुरुदेवांची ग्रंथसंपदा १२८

**सूची -** १३१

## पारिभाषिक शब्दावली

| | |
|---|---|
| अतिरिक्त / अपर, सचिव | Additional secretary |
| अधिव्याख्याता / व्याख्याता | Lecturer |
| अधिष्ठाता | Dean |
| अधिसदस्य | Fellow |
| अधिसभा | Court |
| अध्याय | Chapter |
| अन्तर्गळ | Hernia |
| अपर / अतिरिक्त, सचिव | Additional secretary |
| अभिलेख | Record |
| अभिलेख कक्ष | Record room |
| अभ्यासक्रम | Syllabus |
| अलंकारशास्त्र | Rhetorics |
| अविचलता | Ataraxia |
| असंवैधानिक | Unconstitutional |
| उजळणी वर्ग | Refreshers' course |
| उपकुलगुरू | Vice-Chancellor |
| उपसचिव | Deputy secretary |
| उपसंहार | Epilogue |
| कनिष्ठ अध्यापक | Tutor |
| कनिष्ठ कार्याधिकारी | Junior Proctor |
| कला /वाङ्मय, विद्याशाखा | Faculty of Arts |
| कार्यकारिणी सभा | Executive council |
| कार्यक्रमपत्रिका /कार्यसूची/विषयपत्रिका | Agenda |
| कार्यवाही सारांश | Minutes |
| कार्यसूची /कार्यक्रमपत्रिका/विषयपत्रिका | Agenda |
| कार्याधिकारी | Proctor |
| कुलगुरू | Chancellor |

| | |
|---|---|
| कुलसचिव | Registrar |
| खंडनमंडन | Dialectics |
| गुणपत्रिका | Mark sheet |
| गुरुगिरी | Gurudom |
| चर्चासत्र | Seminar |
| छात्रसंघ | Students' union |
| जनमताचा अंदाज | Opinion polls |
| जिल्हा दंडाधिकारी | District Magistrate |
| द्वितीय वर्ष परीक्षा | Intermediate examination |
| निदेशक | Director |
| नियम | Statute |
| निर्णायक मत | Casting vote |
| निवृत्तिपूर्व रजा | Furlough |
| पडघर | Out-house |
| पदभार | Charge |
| पदसिद्ध | In virtue of |
| परिसंघ | Federation |
| पाठक / प्रपाठक | Reader |
| पुतळा | Effigy |
| प्रतिनियुक्ती | Deputation |
| प्रपाठक / पाठक | Reader |
| प्रभारी / हंगामी | Officiating |
| भूतपूर्व विद्यार्थी | Alumnus |
| मनात असो वा नसो | Nolens volens |
| मंत्रीमंडळ सचिवालय | Cabinet secretariat |
| महसूल विभाग | Revenue department |
| मातृसंस्था | Alma mater |
| मिशन | Mission |
| युद्धविभाग | War department |

| | |
|---|---|
| राजदूत | Ambassador |
| राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा | National Physical Laboratory |
| लेखनिक | Amanuensis |
| लोकसेवा आयोग | Public service commission |
| वाङ्मय / कला, विद्याशाखा | Faculty of Arts |
| वाचस्पती | Ph. D. |
| वाणिज्य विद्याशाखा | Faculty of Commerce |
| विज्ञप्ती | Communique |
| विज्ञान विद्याशाखा | Faculty of Science |
| वित्तसमिती | Finance committee |
| विद्वत् सभा | Academic council |
| विषयपत्रिका /कार्यक्रमपत्रिका / कार्यसूची | Agenda |
| वैज्ञानिक तथा पारिभाषिक शब्दावली आयोग | Commission for scientific and technical terminology |
| व्यवस्थापन समिती | Syndicate |
| व्याख्याता /अधिव्याख्याता | Lecturer |
| शिष्टाचार | Protocol |
| शोधछात्र | Research scholar |
| संग्रहालय प्रबंधक | Curator |
| संलग्नता | Affiliation |
| सरकारी शल्यचिकित्सक | Civil surgeon |
| सहसंपादक | Associate editor |
| सहायक कुलसचिव | Assistant Registrar |
| सांकेतिक लिपी | Cypher |
| सुवर्णमहोत्सव | Jubilee |
| हंगामी / प्रभारी | Officiating |
| हंसगीत | Swan-song |

# १ प्राध्यापक रा. द. रानडे यांची अलाहाबाद विद्यापीठातील कारकीर्द : १९२७-१९४७

## १ उपक्रम : उत्तरेकडे प्रस्थान

२४ ऑक्टोबर १९२७. संध्याकाळचे पावणेसहा वाजले होते. पुण्याच्या डेक्कन जिमखाना टपाल कचेरीत कडकट्ट कडकट्ट झालं आणि अलाहाबादहून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी केलेली तार येऊन थडकली. ''प्रा. रा. द. रानडे यांची अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली आहे.'' एक अनुभवी उपकुलगुरू आणि ऐन उमेदीतले एक प्राध्यापक यांच्यात झालेल्या लांबलचक पत्रव्यवहाराची ही फलनिष्पत्ती होती. प्रा. रानडे १ डिसेंबर १९२७ ला अलाहाबाद विद्यापीठात रूजू झाले. हे अक्षरशः उत्तरायण होतं. भल्याबुऱ्या घटनांनी भरलेल्या कालखंडाची ही सुरवात होती. साक्षात्कारी संत अशी प्रा. रानडे यांची ओळख बहुतेकांना आहे. त्यांची 'गुरुदेव' ही प्रतिमा लोकांच्या डोळ्यांपुढे आहे. पण एक श्रेष्ठ तत्त्ववेत्ता, ही ओळख तशी कमी; जातिवंत शिक्षक म्हणून आणखी थोडी कमी; नामवंत ग्रंथकार अशी त्याहून कमी; प्रशासक म्हणून फारच कमी; त्यांच्या विद्यापीठातील जीवनाची ओळख तर अगदीच पुसट. पण ही ओळख आपल्याला हवीच हवी.

गुरुदेवांचा अलाहाबादचा आयुष्यक्रम काही वर्षे पाहण्याचे भाग्य मला लाभले. मी त्यांच्या घरी राहत होतो, तेव्हा महत्त्वाच्या घटनांची नोंद करत होतो. कागदांचे कपटे, चिठोरे क्षणशः कणशः जपत होतो. १९८१ मध्ये अलाहाबादला जाऊन पुष्कळ माहिती गोळा केली होती. १९९६ मध्ये पुन्हा एकदा अलाहाबादला जाऊन तारीखवार घटना जुळवण्याचा प्रयत्न केला. संबंधित कागदपत्रे व अभिलेख पाहण्याची परवानगी उपकुलगुरू व कुलसचिव यांच्याकडून मिळाली. विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी अस्सल अहवाल हजर केले. अभिलेख कक्षांतून हिंडण्याची व कागदपत्रे काढून पाहण्याची मुभा दिली. आज ७० वर्षांनंतरही इतका सरंजाम जमू शकला याचं समाधान झालं. माझ्या मातृसंस्थेला शतशः प्रणाम. अलाहाबादला गेल्यावर जुन्या मित्रमंडळींची भेट तर झालीच, शिवाय नव्या ओळखी झाल्या. त्यांच्याकडून लिखित आधारासह

गुरुदेवांबद्दल पुष्कळ माहिती मिळाली. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून अलाहाबादला येण्याबद्दल डॉ. गंगानाथ झा यांनी १९२७ मध्ये लिहिलेली १-२ पत्रे एका जुन्या विद्यार्थ्याने घडाघडा म्हणून दाखवली.

प्रस्तुत लेखात मला प्रा. रानडे यांच्याबद्दल मुख्यतः बोलायचं आहे. तरी इतिहास म्हटल्यावर डोळ्यांना झापडं लावून फक्त समोरचं बघून चालत नाही. जवळपासच्या प्रांतात थोडा संचार करावा लागतो. पार्श्वभूमीशिवाय आकृती उठावदार होत नाही. डॉ. गंगानाथ झा यांनी गुरुदेवांना आग्रहानं अलाहाबादला बोलावलं, इतकीच त्यांची ओळख आपल्याला आहे. तीच गोष्ट डॉ. अमरनाथ झा यांची. आपापल्या विषयांत पारंगत असून शिवाय प्रशासनातही कुशल असलेली अनेक मंडळी गुरुदेवांच्या वेळी अलाहाबाद विद्यापीठात होती. त्यांनी करून ठेवलेल्या कामाचा गुरुदेवांना खूप उपयोग झाला. १९४२ साली भारतीय जनतेने स्वातंत्र्यासाठी रणशिंग फुंकलं होतं. अलाहाबादची प्रजा गांगरून गेली होती. ती हकीकत इथे येणे अटळ आहे. त्या वेळच्या व्यक्ती, तशीच काही ठिकाणे, चरित्रे, पत्रे, अहवाल, आठवणी, फोटो, असा मालमसाला गुरुदेवांच्या तिथल्या वास्तव्याची पृष्ठभूमी आहे. कुणाच्याही प्रतिमेला ऐतिहासिक आधाराची आवश्यकता असते. म्हणून १९२७ च्या आधीच्या व १९४७ च्या नंतरच्या काही घटनांची इथे दखल घेतली आहे.

गुरुदेव अलाहाबाद विद्यापीठात १९२७ ते १९४७ असे चांगले वीस वर्षे होते. या कालखंडात व त्याच्या आधीच्या वीस वर्षांच्या कालखंडात एकदम फरक दिसतो. शाळेत व महाविद्यालयात ते चमकले होते. ते धवल यश त्यांच्या गाठी होते. तत्वज्ञान व इंग्रजी विषयांचे नामवंत शिक्षक अशी त्यांची कीर्ती दूरवर पसरली होती, एन्सायक्लोपिडिक हिस्ट्री ऑफ इंडियन फिलॉसॉफी हा प्रचंड प्रकल्प त्यांनी हाती घेतला होता. त्यांचा हा कालखंड धडपडीचा आणि धाडसाचा होता. या काळात त्यांची सदैव भ्रमंती चालू असे. ॲकेडेमी ऑफ फिलॉसॉफी ॲंड रिलिजन या संस्थेचे प्रमुख म्हणून त्यांना गावोगावी जावे लागे. शैक्षणिक संस्थांकडून व्याख्यानांची बोलावणी येत. मैसूर, बेंगळूर, बडोदा, नागपूर, वाराणसी किंवा कलकत्ता अशा लांबलांबच्या ठिकाणांपर्यंत ये-जा असे. बेळगाव किंवा धारवाडलाही भेट असे. औंध, सांगली, मिरज, जत, कोल्हापूर, कुरुंदवाड ही त्यावेळची संस्थाने जवळ होती, तिकडेही चक्कर

असे. पायाला सदैव भिंगरी लागलेली असे. या पहिल्या कालखंडात त्यांच्या नोकऱ्यांत सुद्धा उलथापालथ होत होती. १९०७ पासून दोन वर्षे ते डेक्कन कॉलेजात दक्षिणा फेलो होते. नंतर आलेल्या मोठ्या आजारामुळे १९११ पर्यंत त्यांना नोकरी स्वीकारता आली नाही. १९११ मध्ये ते इंग्रजीचे कनिष्ठ अध्यापक म्हणून फर्ग्युसन महाविद्यालयात काम करत होते. १९१३ मध्ये संग्रहालय प्रबंधक म्हणून पुन्हा डेक्कन कॉलेज. १९१४ पासून पुनश्च फर्ग्युसन कॉलेज. आता ते तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य झाले होते. प्रकृतीला पुणे मानवेना म्हणून १९२२ मध्ये त्यांची सांगलीला बदली केली गेली. १९२४ साली त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला. ते निंबाळला जाऊन राहिले. याच वर्षी त्यांनी अॅकेडेमी ऑफ फिलॉसॉफी अँड रिलिजन ही संस्था स्थापन केली.

१९२७ साली गुरुदेव अलाहाबादला गेल्यावर दुसरा कालखंड सुरू झाला. आता सगळं दृश्य बदललं. तिकडे गेल्यावर ते स्थिर झाले. ३०/१२/ १९३० रोजी रामनाथ कौल या सहकाऱ्याला त्यांनी पत्र लिहिलं आहे. '... मी कुठे बाहेर गेलो नाही. माझं तत्त्व आहे की, बरं वाटतं आहे, तोवर जागचं हलू नाही. चैन पडेनासं झालं की तिथं राहू नाही...' (परिशिष्ट १). असं वाटतं की अलाहाबादला येईपर्यंत ते बेचैन असावेत! तिथे गेल्यावर भ्रमंती थांबली. नोकरीच्या दृष्टीने पाहिले तर महाराष्ट्रातील महाविद्यालयांपेक्षा अलाहाबाद विद्यापीठातली जागा चांगलीच प्रतिष्ठेची होती. लक्ष्मीचा वरदहस्त होता. तिकडे गेल्यानंतर त्यांना पुत्ररत्नाची प्राप्ती झाली होती. त्या वेळी डॉ. गंगानाथांनी त्यांना लिहिले होते, ''तुमच्यावर कमलावराने अनंतहस्ताने अभ्युदयाचा वर्षाव केला आहे. निःश्रेयस् पाठोपाठ येतच आहे.'' या कालखंडात गुरुदेवांपुढे नवी आव्हाने व नवी आश्वासने आली. त्या वेळच्या युनायटेड प्रॉव्हिन्सेसची अलाहाबाद ही शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी होती. विविध क्षेत्रांतील कर्तबगार लोकांशी त्यांचा संबंध आला. सर तेज बहादूर सप्रू, हृदयनाथ कुंझरू, डॉ. भगवान दास, मुन्शी ईश्वर सरन वगैरे मंडळींकडे त्यांची जा ये चालू झाली. अलाहाबादच्या वास्तव्यातील सर्वांत भाग्याची गोष्ट म्हणजे प्रयागच्या पवित्र वातावरणात त्यांना आलेले उच्च अतींद्रिय अनुभव. त्यांच्या बौद्धिक व पारमार्थिक क्षेत्रांच्या कक्षा खूप रुंदावल्या. एकूणच हा कालखंड शांततेचा व


समाधानाचा ठरला. ही वीस वर्षे त्यांच्या जीवनात जशी महत्त्वाची ठरली, तशीच ती देशाच्या इतिहासातही ठरली. या वेळी राजकीय क्षेत्रात मोठीच खळबळ माजली. विद्यापीठाच्या कारभारावरही तिचे पडसाद उमटले. स्वातंत्र्याच्या चळवळीला विध्वंसक वळण लागलं. तिचा खोल व्रण विद्यापीठाच्या इतिहासावर कायम राहिला. तो व्रण उठला नसता तर किती बरे झाले असते !

अलाहाबाद विद्यापीठाला एक अव्वल दर्जा होता. ते १८८७ मध्ये स्थापन झाले.[१] त्याला पूर्वेकडचे ऑक्सफर्ड म्हणत. त्या वेळी विद्यापीठातर्फे नुसत्या परीक्षा घेतल्या जात. त्याच्याशी संलग्न असलेली महाविद्यालये, सध्याच्या उत्तर प्रदेशाचा बराचसा भाग, राजस्थान, मध्य प्रदेश व महाराष्ट्राचे एक टोक अशा विस्तृत प्रदेशात पसरली होती. १८७२ साली स्थापन झालेले म्यूर सेंट्रल कॉलेज विद्यापीठाच्या कामकाजाचे केंद्र झाले. तत्त्वज्ञान विभागात ए.ई. गफ, जॉर्ज थीबो, जे. जे. जेनिंग्ज असे दिग्गज होते. त्यांतले बहुतेकजण भाषाप्रभू होते. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास तर केला होताच, शिवाय त्या विषयाची लक्षणीय सेवा केली होती. ते आता पडद्याआड गेले असले तरी त्यांनी लिहिलेले अमोल ग्रंथ भारतातल्याच काय पण जगातल्या महाविद्यालयांच्या व विद्यापीठांच्या वाचनालयांची भूषणे म्हणून आजन्म मिरवतील. त्यांच्यानंतर तत्त्वज्ञान विभागात पी. एस. बरेल आले. पाश्चिमात्य, विशेषतः ग्रीक तत्वज्ञानावर त्यांची पकड होती. १९२२ पासून विद्यापीठाने अध्यापनाचे कार्य सुरू केले. बरेल यांना तत्त्वज्ञानाचे पहिले प्राध्यापक व विभागप्रमुख होण्याचा मान मिळाला. यानंतर या हव्याहव्याशा ठरलेल्या जागेवर डॉ. एच. एन. रँडल रुजू झाले. न्याय दर्शनाचा त्यांचा गाढा अभ्यास होता. ग्रीक, लॅटिन, जर्मन आणि संस्कृत या भाषा त्यांना अवगत होत्या. पाश्चिमात्यांची बुद्धिनिष्ठ विचारसरणी व पौर्वात्यांची आध्यात्मिकता यांचा


---

१ अलाहाबाद विद्यापीठातील तत्त्वज्ञानाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. संगम लाल पांडे म्हणतात, 'अलाहाबादला भारतातले सर्वांत जुने विद्यापीठ असून भारद्वाज ऋषी त्याचे कुलपती होते'( Materials and Motifs of the Philosophical Traditions of Allahabad University, Published by Ram Nath Kaul Library of Philosophy, University of Allahabad, 1981, P.37 ).

पान एक



अलाहाबाद विद्यापीठ



म्यूर सेंट्रल कॉलेजातील विजयनगर
सभागृहाकडे जाणारा कमानदार मार्ग

पान दोन



Ganganatha Jha

डॉ. गंगानाथ झा।

त्यांच्या ठिकाणी संगम झाला होता. या दोन विचारधारांच्या अध्ययनाचा विकास करून, त्यांत सुसूत्रता आणण्याचे कार्य, त्यांच्यानंतर या पदावर आलेल्या, प्रा. रा. द. रानडे यांनी केले. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाला पाश्चिमात्य वेषभूषा दिली आणि पाश्चिमात्य, विशेषतः ग्रीक, तत्त्वज्ञान भारतीय दृष्टिकोनातून सादर केले. अलाहाबाद विद्यापीठातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व विभागप्रमुख हे पद भूषवणारे पहिले भारतीय म्हणजे प्रा. रा. द. रानडे.

डॉ. गंगानाथ झा त्या वेळी उपकुलगुरू होते. संस्कृत भाषेचा व संस्कृत वाङ्मयाचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. भारतीय तत्त्वज्ञानात त्यांना विलक्षण गती होती. संस्कृतचे प्राध्यापक असूनही इंडियन फिलॉसॉफी कॉंग्रेसच्या वाराणशीला १९२६ साली भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष निवडले गेले. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला ही मानवंदना होती. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदान्त ही सर्वच दर्शने त्यांच्या कक्षेत होती. त्यांतल्या त्यांत मीमांसा दर्शनावरची त्यांची ग्रंथरचना आणि ठळक मीमांसा ग्रंथांचे त्यांनी केलेले इंग्रजी भाषांतर, ही प्रमाणभूत आहेत. या भारदस्त दर्शनाकडे त्यांनी लोकांचे लक्ष वेधले. त्यांच्या ग्रंथांच्या तोडीचे ग्रंथ सापडणे कठीण आहे. तरीही त्यांत आणखी सुधारणा पाहिजे असे त्यांना वाटे. २१/१२/१९२७ ला त्यांनी पुण्याच्या ओरिएंटल बुक एजन्सीच्या डॉ. एन. जी. सरदेसाईंना पत्र लिहिले होते की एक-दोन ग्रंथ सुधारण्याचा आपला विचार आहे. ते म्हणतात, 'योगसूत्रांचे व योगभाष्याचे माझे भाषांतर पोरकट दिसते आहे..... छांदोग्य उपनिषदावरील भाष्याचा अनुवाद संपूर्णच पुन्हा लिहावा लागेल...' आपलेच बरोबर आहे असा त्यांचा दुराग्रह नव्हता. मीमांसा दर्शनाची परमगती वेदान्तात आहे अशी त्यांची श्रद्धा होती. जुन्या जमान्यातल्या शास्त्रीपंडितांच्या अभ्यासाची खोली व नव्या युगातल्या विद्वानांच्या अभ्यासाची व्यापकता त्यांच्या ठिकाणी दिसते. महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापीठाचे उपकुलगुरू ही दोन्ही पदे सांभाळून त्यांनी इतके लिखाण कसे केले कळत नाही (परिशिष्ट२).

डॉ. गंगानाथ अलाहाबाद विद्यापीठाचे माजी विद्यार्थी. त्या विद्यापीठाला आकार देण्याच्या कामी, १९३१ मध्ये निवृत्त झाल्यावरही ते सक्रिय भाग घेत, हे विद्यापीठाच्या सभांचे अहवाल पाहिल्यावर लक्षात येते. आप गए दुनिया डूबी

अशी त्यांची वृत्ती नव्हती. १०/४/१९३७ रोजी उपकुलगुरू पंडित इक्बाल नारायण गुर्तू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कार्यकारिणी सभेच्या बैठकीत, तसेच ५/१०/१९३९ रोजी कला विद्याशाखेच्या अधिष्ठात्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बैठकीत त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता. ही आपली नमुन्यासाठी उदाहरणे. ते खूपशा समित्यांचे सदस्य होते व तिथे तरुण मंडळींना प्रोत्साहन देत. कुणी सल्ला विचारला तर तोही देत पण कधी त्यांनी हुकूमशाही गाजवली नाही. विद्यापीठाचा कारभार ज्या लोकशाही तंत्राने चाले, त्या पद्धतीचा ते कटाक्षाने पाठपुरावा करीत. त्यांचे विद्यार्थ्यांवर फार प्रेम होते. एकदा परकीय सत्तेच्या जुलमाविरुद्ध विद्यार्थ्यांनी असहकार केला. ते वर्गात जाईनात. सभा व निदर्शने यांना ऊत आला. सरकारने लाठीमार केला. गंगानाथांना त्याचे फार दुःख झाले. ते म्हणाले, ''विद्यार्थी मला मुलासारखे आहेत. त्यांच्यावर लाठीहल्ला करणे किंवा त्यांना घोड्यांच्या टापाखाली तुडवणे, या गोष्टी पाहण्यापेक्षा मी मरण पत्करीन. मग विद्यार्थी किती का चुकीच्या मार्गाने जाईनात.''

एकदा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे त्यांच्याशी काही कारणावरून बिनसले. विद्यार्थी त्यांना काही इजा तर करणार नाहीत ना, अशी इंग्रजीचे प्राध्यापक डी. ओझा यांना शंका आली. ''मुलांच्या घोळक्यात मिसळत जाऊ नका,'' असा त्यांनी गंगानाथांना इशारा केला. त्यावर त्या पितृतुल्य वृद्धाने उद्‌गार काढले,'' ओझा, माझ्या अमरनाथापासून मी स्वतःचं रक्षण करू शकतो का ?'' खरं आहे, विद्यार्थी त्यांना अमरनाथांसारखे प्रिय होते.

त्या वेळेच्या बुद्धिजीवी समाजाची मनःस्थिती कशी झाली होती याची झलक दाखवणारा एक वृत्तांत आहे. देशभक्तांना जुलमी राज्यकर्त्यांचा उबग आला होता पण मूग गिळून बसावं लागत होतं. ते स्पष्ट बोलण्याची संधी शोधत. २३/११/१९२९ रोजी गंगानाथांनी आग्रा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात भाषण केलं आणि भारतातल्या विद्यापीठांचा उदो उदो केला. कुलगुरू हेली चार चौघांसमोर म्हणाले की व्याख्यान अगदी विद्वत्तापूर्ण झालं. पण नंतर त्यांनी गंगानाथांना वैयक्तिक रीत्या सुनावले, ''तुम्ही ताळतंत्र सोडला आणि चांगला तडाखा दिला.'' गंगानाथांनी लगेच जबाब दिला, ''आज चाळीस वर्षं मी स्वतःला आवर घातला. आता मला स्पष्ट बोललंच पाहिजे.'' त्यांची सहनशक्ती

तुटेपर्यंत ताणली गेली होती. देशप्रेमाला बांध घालणं अशक्य झालं होतं. म्हणून भारतीय विद्यापीठांचा गौरव करणे भाग होते.


गंगानाथांचा जन्म १८७१ चा. १७ नोव्हेंबर १९४१ ला त्यांना काळाने ओढून नेले. १९२३-१९३२ या काळात ते उपकुलगुरू होते. गुरुदेवांनी गंगानाथांच्या अखेरच्या दिवसांचे एका लेखात हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. '.....आयुष्याच्या अखेरीचा पूर्ण महिना पंडितजी योगासनात बसले होते, ते बघून अचंबा वाटतो. अंतसमयी हे साधणे क्वचितच. ७० वर्षे सतत नीती आणि परमार्थ यांची कास धरलेली असल्याने त्यांना ही शक्ती आली होती... ते विदेह प्रांती जन्मले. त्यांना विदेहमुक्तीच मिळाली असणार' (हें प्रचीतीचें बोलणें, श्री. गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ आर. एस.,१९८६, पृ. ७२).

ही ज्ञानवृद्ध व तपःपूत व्यक्ती गेल्यावर श्रद्धांजलींचा वर्षाव झाला. तत्त्वज्ञानाचा अभ्यास व शिकवले जाणारे विषय ठरवणाऱ्या समितीने १८ मार्च १९४२ ला भरलेल्या सभेत गंगानाथांच्या निधनाने झालेल्या, भरून न निघणाऱ्या पोकळीचे दुःख व्यक्त करणारा ठराव मंजूर केला. 'महामहोपाध्याय गंगानाथ झा ह्या समितीचे १६ वर्षे सभासद होते. ते हजर असले की त्यांच्याकडून कामाची प्रेरणा मिळे व त्यांचे मार्गदर्शनही मिळे. त्यांच्या विद्वत्तेचा समितीला फार उपयोग होई.' बुद्धिवैभव व धर्मपरायणता यांचा संगम असलेल्या अशा या विभूतीने प्रा. रानडे यांना अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक म्हणून आग्रहाने बोलवावे, यात त्यांची गुणग्राहकता जशी दिसते, तशीच प्रा. रानडे यांची योग्यताही कळते. थोरच थोरांना ओळखू जाणोत.

दुसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे डॉ. अमरनाथ झा, एका विख्यात पित्याचे तितकेच विख्यात चिरंजीव. ९/९/१९३७ ला गुरुदेवांनी गंगानाथांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे, 'मी अधिष्ठाता पदाचा विचार केलाच तर तो अमरनाथांसाठी करीन.' झा घराणे मूळचे बिहारचे. पण ते अलाहाबादचे भूमिपुत्र ठरले. अलाहाबाद विद्यापीठाचे हे माजी विद्यार्थी असून नंतर तिथेच क्रमाने इंग्रजीचे प्राध्यापक, कला विद्याशाखेचे अधिष्ठाता व उपकुलगुरू या पदांपर्यंत पोचले. एक वेळ अशी होती की अलाहाबाद विद्यापीठ म्हणजे अमरनाथ झा आणि अमरनाथ झा म्हणजे अलाहाबाद विद्यापीठ, असं समीकरण झालं होतं. लहानपणी त्यांनी नाटकात विदूषकाचं काम केलं होतं,

पण नियतीने त्यांच्यासाठी सूत्रधाराची भूमिका राखून ठेवली होती. विद्यापीठाचे सर्व नियम व कार्यकारिणी सभेचे महत्त्वाचे निर्णय, तेही आकडेवारीसकट, यांवरील त्यांची पकड हा त्यांचा बालेकिल्ला होता. ते जात्याच शिक्षणपटू होते. विद्यार्थ्यांना घडवणं हा त्यांचा मनपसंत उद्योग होता. साहित्य, विशेषतः काव्य, खेळ, संगीत, ललितकला या सर्वांत त्यांना रुची होती. शहाणे करून सोडावे सकळ (छात्र) जन हे त्यांचे व्रत होते. ते विद्यार्थ्यांचे दैवत होते. 'मी असेपर्यंत पैसा नाही म्हणून कुणाचेही शिक्षण थांबता कामा नये. माझ्या घराचं दार रात्री बारा वाजताही उघडं आहे,' असं ते म्हणत असल्याचं एका जुन्या विद्यार्थ्याने प्रेमादराने सांगितले. हिंदू संस्कृतीचे झाडून सगळे पैलू त्यांनी हाताळले व त्यांवर आपला ठसा उमटवला. गंगानाथ झा गुरुदेवांना वडील बंधूप्रमाणे होते आणि गुरुदेव अमरनाथांना मोठ्या भावाच्या जागी होते. पुढे असं झालं की गुरुदेव निवृत्त झाल्यावर काही महिन्यांतच अमरनाथांना विद्यापीठ सोडावं लागलं. जणूकाही त्यांचा आधारच गेला. अलाहाबादला बोलावून घेऊन गंगानाथांनी गुरुदेवांवर केलेल्या उपकाराची फेड गुरुदेवांनी अमरनाथांना मदत करून केली. ईश्वरानंच हे आनृण्य गुरुदेवांच्या पदरात टाकलं. असो. अमरनाथांना विद्यापीठ का सोडावं लागलं ? 'मनुष्यमात्रावरचा किंवा संस्थांवरचा त्यांचा विश्वास एकाएकी कसा उडाला ? ज्या झऱ्यातील चैतन्याच्या जिवावर व्यवसायात किंवा समाजात ते दिमाखाने वावरले, तो जिवंत झरा कसा आटला?' असे आर. पी. बहादूर विचारतात (अमरनाथ झा, ए मेमोरिअल व्हॉल्यूम, पृ. ८६). झपाट्याने बदलणाऱ्या काळाचा विद्यापीठावर विपरीत परिणाम झाला. आर्थिक टंचाई भासू लागली व विद्यापीठाची प्रगती खुंटली. कठीण समय प्राप्त झाला आणि अमरनाथ व विद्यापीठ यांच्यामधले प्रेमरज्जूचे बंध नियतीने क्रूरपणे तोडून टाकले. त्यांच्या रोजनिशीवरून त्यांना झालेले अपार दुःख कळून येते. विद्यापीठ सोडताना त्यांची अवस्था शोचनीय झाली होती. स्वार्थी लोकांचा त्यांच्या भोवती गराडा होता पण ते सदैव एकांडे शिलेदारच राहिले. कोणत्याही गोष्टीचा क्षणभरात निर्णय घेण्याची त्यांची ख्याती होती. २/९/१९५५ रोजी मृत्यूनेही त्यांना उचलण्याचा निर्णय असाच क्षणभरात घेतला. त्या प्रसंगी अलाहाबाद विद्यापीठातले अमरनाथांचे इंग्रजी विषयाचे गुरुजी एस. जी. डन शोकाने उद्गारले, 'त्या चोराने, काळपुरुषाने, पुन्हा एकदा

पान तीन




डॉ. अमरनाथ झा

## पान चार



प्रा. रामनाथ कौल



प्रा. शफात अहमद खान

आपला इंगा दाखवला.' अखेरच्या दिवसांत अमरनाथ पाटण्याला होते. त्यांच्या मृत्यूचे गुरुदेवांना फार दुःख झाले.

अलाहाबादला त्या वेळी असणाऱ्या आणखी काही व्यक्तींचा परिचय करून घेऊ.

डॉ. ताराचंद (फोटो पान पाच) राज्यशास्त्र शिकवीत. ते विभागप्रमुख झाले. पुढे कला विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून व त्यानंतर उपकुलगुरू म्हणून निवडून आले. त्यांच्या उपकुलगुरू पदाच्या काळात गुरुदेवांना डी. लिट्. पदवी दिली गेली. ताराचंदांना नंतर मध्य आशियातील एका देशातील भारताचे राजदूत म्हणून नेमण्यात आले होते. सर शफात अहमद खान इतिहास विभागाचे प्रमुख होते. पुढे राजकारणात पडून त्यांनी खूपशी महत्त्वाची पदे भूषवली. संस्कृतचे प्राध्यापक क्षेत्रेशचंद्र चट्टोपाध्याय (फोटो पान सात) फार विद्वान होते. संस्कृत वाङ्‌मयाच्या जोडीला वेदान्त व मीमांसा तत्त्वज्ञानांचा त्यांचा अभ्यास होता. आकर्षक व्यक्तिमत्व, खडा आवाज, निर्भय वृत्ती व आत्मविश्वास म्हणजे क्षेत्रेशबाबू. तत्त्वज्ञान विभागात होणाऱ्या ख्यातनाम व्यक्तींच्या भाषणाला ते हटकून हजर असत व व्याख्यात्याला प्रश्न विचारून बेजार करत. अध्यक्ष या नात्याने गुरुदेव व्याख्यात्याच्या वतीने स्वतः उत्तरे देत. व्याख्याता सुटकेचा निःश्वास टाकी. प्रा. रामनाथ कौल या तत्त्वज्ञानाच्या सहकाऱ्यावर गुरुदेवांचे फार प्रेम होते. त्यांना ते सांभाळून घेत. अली महदी खान हे एक बहुगुणी व्यक्तित्व. हे गुरुदेवांचे विद्यार्थी पुढे 'इस्लाम धर्मातील तत्त्वज्ञान' या विषयाचे अलाहाबाद विद्यापीठात अध्यापक झाले. वेळापत्रके करण्यात ते इतके वाकबगार होते की, अली महदी खान = वेळापत्रके, असं एक समीकरण रूढ झालं होतं. एकदा जगन्नाथ लक्ष्मण साठे या गुरुदेवांच्या स्नेह्यांना युनायटेड प्राव्हिन्सेस सरकारात सचिवाची जागा मिळाली, म्हणून त्यांच्या गौरवार्थ गुरुदेवांनी अल्पोपहाराचा बेत केला. अलाहाबादमधील प्रतिष्ठित मंडळी निमंत्रित होती. अली महदींनी मिठाया व विविध खाद्य पदार्थांची कौशल्याने निवड करून पाहुण्यांची वाहवा मिळवली. गुरुदेवांच्या भोवती त्या काळात वावरणाऱ्या अशा व्यक्ती म्हणजे एक अजबखाना होता.

## २ प्राध्यापकपदी नेमणूक

डॉ. एच. एन. रँडल यांच्या निवृत्तीनंतर तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापक पदावर नेमणूक करायला योग्य अशा माणसाचा गंगानाथ दूरवर शोध घेत होते.

भारतीय तत्त्वज्ञान व ग्रीक तत्त्वज्ञान या क्षेत्रांत प्रा. रानडे यांनी केलेली भरीव कामगिरी त्यांना परिचित होती. ते एक उत्तम शिक्षक असल्याचे गंगानाथांच्या कानावर होते. १९२० नंतर गुरुदेवांनी अॅकेडेमी ऑफ फिलॉसॉफी अँड रिलिजन सुरू केल्याचं त्यांनी ऐकलं होतं. भारतीय तत्त्वज्ञानाचा कोशतुल्य इतिहास लिहिण्याच्या त्यांच्या प्रकल्पात विद्वानांचा समावेश होता. तो प्रकल्प गुरुदेवांच्या लोकसंग्रहाची व बहुश्रुततेची ग्वाही देत होता. डॉ. गंगानाथांनी गुरुदेवांशी पत्रव्यवहार सुरू केला. अलाहाबादची हवा सोसेल की नाही या गुरुदेवांच्या भीतीचे त्यांनी निरसन केले. अॅकेडेमीचे काम तुम्ही इथूनही करू शकाल असेही सांगितले. शेवटी त्यांनी लिहिलेला भाग पुन्हा पुन्हा उद्‌धृत केला जातो. ते म्हणतात, 'प्राध्यापकांची निवड करणाऱ्या समितीला तुमचं नाव सुचवायला तुमची हरकत नसल्याचे मला उलट टपाली कळवा. तुम्हाला जर मी इथे आणू शकलो, तर उपकुलगुरू म्हणून मी केलेली ती सर्वांत मोठी कामगिरी आहे, असे मी समजेन. माझी निराशा करू नका.'

६ ऑक्टोबर १९२७ ला डॉ. मोहंमद हफीज सय्यद या गुरुदेवांच्या मित्राने लिहिले की प्राध्यापकाच्या जागेसाठी काही अर्ज आले आहेत. त्यांत डॉ. एस. एन. दासगुप्ताही आहेत. परंतु उपकुलगुरूंना तुम्ही म्हणजे तुम्हीच हवे आहांत. १७ ऑक्टोबरच्या सभेत याबद्दलचा निर्णय होणार होता. गुरुदेवांनी विद्यापीठात सन्माननीय प्राध्यापक म्हणून काम करण्याचा प्रस्ताव मांडला असावा. त्यावर सय्यद लिहितात, 'सन्माननीय प्राध्यापक म्हणून काम करणे ही गोष्ट या विद्यापीठाच्या दृष्टीने अव्यावहारिक व असंवैधानिक आहे... तुम्हाला स्वतःला नको असेल तर तुम्ही तुमचा पगार अॅकेडेमीच्या खात्यात जमा करू शकता.... तुमच्या पत्राने मी भारावून गेलो. तुम्ही खरे ब्राह्मण आहात, कारण पैशापेक्षा तुम्हाला विद्‌वत्तेचे मोल जास्त आहे. तुमचा मित्र म्हणवून घेण्यात मला अभिमान वाटतो. आपल्या मातृभूमीची सेवा करण्यासाठी देवानं तुम्हाला दीर्घायू करावं.' ही खरी धर्मनिरपेक्षता. एक सच्चा मुसलमान एका सच्च्या ब्राह्मणाचं कौतुक करतो ! २५ ऑक्टोबरला सय्यदांनी गुरुदेवांना विद्यापीठा-तल्या नेमणुकीबद्दल अभिनंदनाचं पत्र पाठवलं. कार्यकारिणी सभेची बैठक १७ ऑक्टोबर ऐवजी २४ ऑक्टोबरला झाल्यामुळे नेमणुकीला आणि म्हणून अभिनंदनालाही उशीर झाल्याचं ते लिहितात. गुरुदेवांना सर्व प्रकारची मदत

करण्याची त्यांची तयारी होती, इतकंच काय, घर शोधायलाही त्यांनी सुरवात केली होती. हफीज थिऑसॉफिस्ट होते. बहुधा ते अलाहाबाद विद्यापीठात पर्शियन किंवा अरेबिक शिकवत असावेत.

विद्यापीठाचे झटपट काम बघण्यासारखे आहे. कार्यकारिणी सभेची बैठक २४ ऑक्टोबरला दुपारी १२ वाजता झाली. त्या दिवशी पुढील ठराव झाला. 'कार्यकारिणी सभेच्या ३ सप्टेंबर १९२७ रोजी भरलेल्या बैठकीत प्रा. रँडल यांच्या निवृत्तीसंबंधी ठराव झाला होता (क्रमांक २३२). त्यानुसार प्रस्तुत सभेने तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाच्या नेमणुकीबाबत निवडणूक समितीच्या शिफारशींचा विचार केला.... श्री. रा. द. रानडे, एम. ए. यांची तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून रु. ८००-५०-१२५० या वेतनश्रेणीत सुरवातीस तीन वर्षांसाठी नेमणूक करण्यात यावी.' त्याच दिवशी प्रा. रानडे यांना तार गेली. कार्यकारिणी सभेची बैठक १२ वाजता भरते काय, आलेल्या अर्जांची छाननी होऊन त्यांवर चर्चा होते काय, प्रा. रानडे यांची नेमणूक करण्याचा ठराव होतो काय आणि लगोलग ३ वाजून ५० मिनिटांनी तार जाते काय ! गुरुदेवांनी लौकर आपल्याकडे यावे म्हणून किती ही तत्परता ! हे सगळं पाहिलं तर आजची आपल्या कामाची शोचनीय अवस्था मान खाली घालायला लावते. असो. १९२७-२८ च्या विद्यापीठाच्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे, 'श्री. रा. द. रानडे यांच्या हिंदू तत्त्वज्ञानासंबंधीच्या कामाचं मोल सर्वमान्य असल्याने त्यांची डॉ. रँडल यांच्या जागी नेमणूक करण्यात आली.' त्या दिवसांत विद्यापीठाचं प्रशासन जास्त करून प्राध्यापकांच्या हातांत होतं. शिक्षकांच्या नेमणुका करणे अगर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या अडचणी सोडवणे, यांसारख्या शैक्षणिक क्षेत्रातील बाबी हा त्यांचाच प्रांत होता.

या नेमणुकीची वार्ता ऐकून गुरुदेवांच्या मित्रमंडळीत आनंदाची लाट उसळली. हे पद त्यांनी स्वीकारावंच असं सर्वांचं मत पडलं. अलाहाबादची हवा नक्की मानवेल अशी गुरुदेवांची खात्री करून देण्यासाठी रंगराव देशपांडे हे त्यांचे एक वडीलधारे मित्र[१] निंबाळहून अलाहाबादला गेले व तिथे बरेच दिवस राहिले. कमाल तापमान, किमान तापमान, सरासरीपेक्षा जास्त-कमी तापमान, दमटपणा, सूर्योदय, सूर्यास्त, पाऊस, असल्या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन त्यांनी हवामानाचा एक आराखडा तयार केला. एका वर्षातल्या प्रत्येक


१ हे पुढे मामलेदार म्हणून निवृत्त झाले.

दिवसाच्या हवामानाची ही जंत्री होती. निंबाळला गुरुदेवांच्या घरातल्या दप्तरात हे कागद अजून आहेत.

प्रा. रानडे अलाहाबादला येणार ही खबर आपल्या वडिलांकडून कळल्याबरोबर के. बी. दीक्षित या गुरुदेवांच्या एका तरुण मित्राने कानपूरहून २५ ऑक्टोबर १९२७ ला पत्र लिहून स्वतःच्या घरात राहण्याची त्यांना विनंती केली (परिशिष्ट ३). तिकडे गेल्याबरोबर कटरा विभागात गुरुदेव काही दिवस राहत होते तेच हे घर असावे. १० जानेवारी १९२८ ला ते २ बेली रोड या घरी गेले. नंतर १९४४ साली पुन्हा १० जानेवारी याच तारखेला १५ अ हेस्टिंग्ज रोड, या स्वतःच्या घरी गेले. त्याचे इतिवृत्त त्यांच्या घरी राहणाऱ्या एका विद्यार्थ्याने निंबाळला कळवले- 'सद्गुरु गुरुवर्य आतां नेमाकरितां बंगला सोडून कुठेंही जात नाहींत. 'देव सापडला नसता, हुडकत जावें लागतें पण एकदां देव सापडल्यानंतर कोठेंही जाणें नलगे,' असें गुरुदेव म्हणाले.' या नव्या घरात देवाचं अधिष्ठान आहे असा त्यांना अनुभव आला होता. एकदा द्रौपदी घाटावर ध्यानमग्न असताना, सद्गुरू भाऊसाहेब महाराज एका जागेवर उभे असलेले गुरुदेवांना दिसले (परिशिष्ट ४). त्याच जागेवर १५ अ हेस्टिंग्ज रोडवरील हा बंगला उभा राहिला. आता प्रत्येक पत्रावर हा स्थाननिर्देश हमखास होई. या रस्त्याचे नाव आता न्याय मार्ग असे झाले आहे. गुरुदेवांच्या काळात आसपासच्या सर्व प्रदेशाला द्रौपदी घाट म्हणत. गंगा जवळून वाहत होती. आज ती फार दूर गेली आहे. गुरुदेव अलाहाबादला गेल्याबरोबर त्यांचे ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी हे पुस्तक आवडल्याबद्दल पत्रं येऊ लागली. दोन पत्रांचा उल्लेख करू. इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. अमरनाथ झा हे त्या वेळी प्रभारी कुलसचिव होते. हे पुस्तक तुमच्या मूलगामी कामाची सतत आठवण देईल असे ते लिहितात (परिशिष्ट ५). २४ जानेवारी १९२८ ला भारत सेवक समाजामधील पंडित हृदयनाथ कुंझरू यांनी पुस्तक अनमोल असल्याचं मत दिलं (परिशिष्ट ६).

अलाहाबाद म्हणजे प्राचीन काळातलं प्रयागक्षेत्र. गंगा व यमुना यांच्या या संगमावर असंख्य ऋषीमुनींनी तप केले होते. त्याच्या पावन परिसरातल्या कित्येक जागा गुरुदेवांच्या ऐकान्तिक साधनाच्या देवळ्या झाल्या. मलाका ही अशीच एक जागा. आता त्याला मलाका हरहर म्हणतात. ती विद्यापीठाच्या

Allahabad University Union



खुर्चीवर डावीकडून – १ प्रा. अली महदी खान २ प्रा. एस. दत्त ६ गुरुदेव रा. द. रानडे ८ प्रा. ताराचंद
९ प्रा. पी. एस. नायडू १० प्रा. उमेश मिश्रा
उभे पुढची ओळ – ५ दादासाहेब देशपांडे १० दा. ह. कोल्हार
उभे मागची ओळ – ६ व. वा. चावरे ८ एस. जी. कुलकर्णी

पान सहा

The M.A. Group, Philosophy Department,
University of Allahabad, 1935 - 1936



खुर्चीवर डावीकडून – १ एम. यू. अहमद २ गुरुदेव ४ प्रा. ए. सी. मुखर्जी ५ प्रा. एन. सी. मुखर्जी
जमिनीवर डावीकडे – एस. एन. सराफ

वायव्येला साधारण १३ किलोमीटरवर गंगेच्या डाव्या काठावर द्रौपदी घाटासमोर आहे. डॉ. कैलासनाथ काटजू या अलाहाबादच्या वकिलांचे[१] मलाका येथे घर होते. तिथल्या पंडित बैजनाथ प्रसादांना त्यांनी कळवले की प्रा. रानडे यांना घर द्यावे व त्यांची काही गैरसोय होऊ देऊ नये (परिशिष्ट ७). हे घर नेमापुरतेच वापरले गेले. गुरुदेव आता अलाहाबादचे प्रतिष्ठित नागरिक झाले. ३० वर्षे एका संत पुरुषाचा निवास इथे होण्याचे आपल्या भाग्यरेखेत आहे असे त्या वैभवशाली नगरीला स्वप्नातही दिसले नसेल. गुरुदेवांना आता उत्तम नोकरी होती; त्यांच्या बहुविध व्यवसायांना पुरेलसं मोकळं ढाकळं घर होतं; मनांत येईल तेव्हा नेमाला जायला खूपशी ठिकाणं होती; त्यांच्या गुणांची पारख असलेली व त्यांच्या हिताला जपणारी, कर्ती सवरती माणसं होती; जन्मभर आदरभाव बाळगणारे विद्यार्थी होते आणि प्रेमाने बांधलेले सुहृद होते. ज्यूलिअस सीझरप्रमाणे गुरुदेव दिवसाचा व्यवहार व रात्रीचं चिंतन आणि नेम करायला मोकळे होते.

## ३ तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख

गुरुदेव विद्यापीठात रुजू झाले तेव्हा तत्त्वज्ञान विभागात अनुकूल चंद्र मुखर्जी, एन. सी. मुखर्जी, आशालता हलदार, जे. एन. बोस हे सहकारी होते. आणखी एक सहकारी, आर. एन. कौल, हे दीर्घ मुदतीच्या रजेवर होते. गुरुदेवांच्या कारकीर्दीत एम. यू. अहमद, अली महदी खान (फोटो पान पाच), पी. एस. नायडू (फोटो पान पाच), डॉ. एस. दत्त (फोटो पान पाच) डॉ. सी. एच. राइस, कुमारी एस. चंद्र यांच्या नेमणुका झाल्या.

विभागाचं काम सुरळीत चाले. व्यवसायबंधूंशी वागण्याची गुरुदेवांची हातोटी तिथं कामी आली. ज्याला जो विषय हवा असेल तो त्याने निवडावा, उरलेले विषय गुरुदेवांच्या वाटणीला येत. नको असलेला विषय ते कुणावर लादत नसत. अभ्यासक्रमाची वारंवार उजळणी होई व नवे विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केले जात. 'शंकराचार्यांच्या नंतरचे अद्वैतवादी' किंवा 'विज्ञानाचे तत्त्वज्ञान' अशा नव्याने सुरू केलेल्या (आणि अवघड) विषयांना कुणी वाली नसे. ते विषय मग गुरुदेव शिकवीत. त्या विषयांवरचे अभ्यासक्रमातले सगळे संदर्भग्रंथ ते वाचत. विषयांचे विभाग व पोटविभाग पाडून

---

१ हे पुढे केंद्रीय गृहमंत्री झाले.

त्यांच्या महत्त्वाप्रमाणे त्यांना किती तास द्यायचे याचे गणित करत. नंतर व्याख्यानांची विस्तृत टिपणे होत. त्यांत पौर्वात्य व पाश्चिमात्य सिद्धांतांची तुलना व तत्त्वचिंतकांच्या विचारांची चिकित्सक छाननी असे. घोकंपट्टी करून घेणाऱ्या पंतोजीसारखे पुरे ताट वाढून त्यांनी मुलांपुढे कधी ठेवले नाही. विषयाचा आराखडा व त्यावरील पुस्तके ते सांगत. जन्माच्या कर्मी एकदा करून ठेवलेल्या टिपणांवर गुजराण करणे त्यांना पसंत नसे. शिक्षण म्हणजे हडेलहप्पी नव्हे. प्रत्येकाने स्वतः विचार करून, आपल्या विषयात तरबेज होऊन, पुढील जीवनात शिक्षणाचा उपयोग करावा, आपल्या जीवनातल्या स्थानानुरूप वाटणीला आलेली कर्तव्ये देवाच्या पूजेसारखी पवित्र मानावी, काम टाळण्यासाठी परमार्थाची ढाल पुढे करू नये, असे ते सांगत. स्वतःच्या नेमाचे त्यांनी प्रदर्शन केले नाही, इतकेच नव्हे तर अलाहाबादला त्यांच्या परमार्थाचा कुणाला फारसा सुगावाही लागला नाही.

विद्यार्थ्यांबद्दल - त्यांतून गरीब विद्यार्थ्यांबद्दल - प्रेम हे त्यांचे वैशिष्टच. घरात ५-७ मुलांचा मुक्काम असे. काही महाराष्ट्रातली किंवा कर्नाटकातली, तर काही उत्तरेतली. घरी राहण्यासाठी एक छोटीशी प्रवेशपरीक्षा घेत. इंग्रजी व संस्कृतवर भर. एका विद्यार्थ्याने पुढील हकीकत सांगितली. 'जून १९४४ मध्ये मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मी निंबाळला गेलो. प्रा. रानडे हे एक नावाजलेले प्राध्यापक आहेत आणि गरीब व लायक विद्यार्थ्यांना अलाहाबादला घेऊन जाऊन त्यांच्या राहण्याची व शिक्षणाची जबाबदारी घेतात, एवढेच मला माहीत होते. मी त्यांच्या खोलीत गेल्यावर दोन वयोवृद्ध व्यक्ती दिसल्या. त्यांपैकी एक उंच, चष्मा लावलेली, शुभ्र धोतर व सदरा असा वेष असलेली व एकदम लक्ष वेधून घेणारी होती. दुसरी साधा सदरा व आखूड धोतर नेसलेली होती. रुबाबदार व्यक्तिमत्वाचे पहिले गृहस्थच विद्यापीठातील प्राध्यापक असणार असे समजून मी त्यांना एकदम नमस्कार केला. ते लगेच दुसऱ्या गृहस्थांकडे बोट दाखवून म्हणाले, ''ते प्रोफेसर रानडे आहेत, मी नाही, त्यांना नमस्कार कर.'' मला माझी चूक उमजली पण प्रा. रानडे म्हणाले, ''राहू दे, राहू दे, मला नमस्कार करायला नको.'' विद्यापीठातल्या प्राध्यापकाबद्दल मी मनात रंगवलेल्या कल्पना कुठल्या कुठे विरल्या. नंतर मला कळले की दुसरे गृहस्थ म्हणजे गुरुदेवांचे भाचे प्रा. नरहर गणेश दामले

होते. गुरुदेवांनी मला इंग्रजी, कन्नड व संस्कृतमध्ये चार चार ओळी लिहून आण म्हणून सांगितलं. मी कागद आणायला बाहेर निघालो, तेव्हा आश्रमातले एकजण म्हणाले, ''विचार करून लिही बरं का, सिनेमातलं गाणं बिणं लिहू नको.'' Truth is God and God is Truth अशी सुरवात असलेली वाक्ये मी इंग्रजीत लिहिली. कुमार वाल्मिकींच्या तोरवे रामायणातील गुलामगिरीचा धिक्कार करणारे कडवे कन्नडमध्ये लिहिले. ध्यायतो विषयान् पुंसः... व क्रोधात् भवति सम्मोहः... हे भगवद्गीतेतले दोन श्लोक संस्कृतमध्ये लिहिले. इंग्रजी लिखाणावर त्यांनी नजर टाकली. कन्नड कडवे वाचून घेतले व त्याचा अर्थ विचारला. संस्कृत श्लोक पाहून म्हणाले, ''तू इथे एक चूक केली आहेस. प्रणश्यति ऐवजी प्रणस्यति लिहिले आहेस.'' परीक्षा संपली. माझी निवड झाली असं मला वाटलं.

अवतीभोवती विद्यार्थी असलेले गुरुदेवांना आवडे. विद्यार्थ्यांना तर त्यांच्या घरी राहणे ही सुवर्णसंधीच वाटे. डॉ. इंदुप्रकाश सिंग[१] लिहितात, 'माझी तत्त्वज्ञान विभागात व्याख्याता म्हणून नेमणूक झाली. अर्थातच, विद्यार्थी असताना मी राहत असलेले गंगानाथ झा वसतिगृह मला सोडावे लागले. माझ्या काही मित्रांनी मला घरी राहायला बोलावले. पण मी सतीशचंद्र शर्मा या मित्राला म्हटले, 'प्रा. रानडे यांच्या घरी राहायला मिळेल का बघ की'. लगोलग संध्याकाळी माझी इच्छा पूर्ण झाली. खरोखर या बातमीवर माझा पटकन विश्वासही बसेना; पण मी तडक त्या सरस्वतीच्या मंदिरात बिऱ्हाड हलवले. त्यांच्या घरची शिस्त मला माहीत होती. तो एक आश्रमच होता. आम्ही सगळे जमिनीवर सतरंजीवर झोपत असू. घरातलं साधंसुधं जेवण घेत असू. जेवणाबद्दल सक्ती नव्हती. घरातलं वातावरण मंतरलेलं होतं. आपण एक सात्त्विक जीवन जगत आहोत हे समाधान असे.'

शिव नारायण सराफ (फोटो पान सहा), हा नागपूरचा मुलगा अलाहाबाद विद्यापीठात शिकायला आला होता. एकदा सकाळी तो गुरुदेवांकडे मदत मागायला आला. त्याला थांबायला सांगावे असा निरोप पाठवून गुरुदेव आपल्या कामाला गेले. पण ही गोष्ट त्यांच्या स्मरणातून गेली. निरोप

---

१ पुढे हे ब्रह्मदेशात राजदूत म्हणून गेले.

सांगणाऱ्याच्या लक्षातूनही ते गेलं. ते पोर नचिकेताप्रमाणे दुपारपर्यंत बसून राहिलं. अकस्मात् गुरुदेवांना त्याची आठवण झाली आणि त्यांनी शिव नारायणाला बोलावले. '' तू थांबला आहेस हे मी अगदीच विसरून गेलो रे. चूक झाली. तुझ्या चिकाटीचं कौतुक वाटतं. ताबडतोब माझ्या घरी राहायला ये आणि अभ्यास सुरू कर,'' ते म्हणाले. त्या गरीब मुलाला घबाड गवसले. पणतीने पणती पेटावी, तशी घरात आधीपासून असलेल्या पोरांच्या पलटणीत आणखी एकाची भर पडली. गुरुदेवांचं शिव नारायणावर विशेष प्रेम होतं. तो हुशार होता पण हात अधू असल्याने त्याला भराभरा लिहिता येत नसे. परीक्षेतल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं माहीत असूनही ती कागदावर उतरवली जात नसत. त्यामुळे तो बी.ए. च्या परीक्षेत एकदोनदा नापास झाला. त्या काळी अशा मुलांना लेखनिक देण्याची प्रथा नसावी. मग उपकुलगुरूंना गुरुदेवांनी विनंती केली की शारीरिक व्यंगाने हा मुलगा मागे पडतो आहे, त्याच्यासाठी काहीतरी करावे. त्यांना ते पटलं. शिव नारायणाला पदवी मिळाली.

गुरुदेवांचे इंग्रजीवर फार प्रेम होते. १९४६ मध्ये एकदा त्यांना एक महत्त्वाचे पत्र लिहायचे होते. लघुलिपिकार हजर नव्हते. श्री. दा. ह. कोल्हार (फोटो पान पाच) या विद्यार्थ्याला लघुलिपी येत नसूनही त्यांनी जलदपणे गुरुदेव सांगत असलेला मजकूर लिहून घेतला. गुरुदेवांनी त्यांच्या इंग्रजीवरील प्रभुत्वाची व लिखाणाच्या गतीची फार तारीफ केली. विद्यार्थ्यांना उत्तेजन द्यावे ते त्यांनीच. त्यांचे विद्यार्थी विविध क्षेत्रांत चमकले. काही वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती की दिल्लीला सरकारी कचेऱ्यांतून मोठ्या अधिकाराच्या जागी गुरुदेवांचे विद्यार्थी असत. त्यांच्याकडे कामासाठी गेले की गुरुदेवांचा विषय हटकून निघे व मग जुन्या आठवणीही निघत. आलेल्या माणसाचे काम आस्थेने होई.

गुरुदेव मुलांना सांगत की बुद्धिमत्तेपेक्षा चारित्र्याला अधिक महत्त्व आहे. त्याचा माणसाला जन्मभर उपयोग होतो. विल्यम जेम्स म्हणतो, 'भटकत राहणारा भिकारी एक तास कसा निघेल याचा विचार करतो. उडाणटप्पू एका दिवसाची काळजी करतो. अविवाहित मनुष्य एकाच व्यक्तीची बेगमी करतो. मुलाबाळांचा बाप पुढच्या पिढीची तरतूद करतो. देशभक्ताच्या कवेत संपूर्ण समाज आणि कित्येक पिढ्या येतात. तत्त्वज्ञ आणि संत मात्र अखिल मानवजातीच्या अंतिम कल्याणाकडे लक्ष ठेवून असतात,

अधिकारपरत्वे यांचा क्रम लावता येतो....' ( The Principles of Psychology, Vol. I, P. 23 ). गुरुदेव शेवटच्या वर्गात बसतात हे लिहिणे नकोच.

तत्त्वज्ञानाच्या सगळ्या शाखांत गुरुदेवांना रस होता. त्यांत डावं उजवं नव्हतं. २७ मे १९३० ला 'इस्लाम धर्मातील तत्त्वज्ञान' या विषयाच्या एका विद्यार्थ्यानं लिहिलं होतं- 'तुम्ही मनावर घेतलं नसतं तर हा विषय अभ्यासक्रमात आला नसता.' या विषयासाठी गुरुदेवांनी फार खटपट केली. अलाहाबादला रुजू झाल्यावर लगेच १९२८ मध्ये त्यांनी या विषयासाठी एक व्याख्याता नेमावा म्हणून मागणी केली होती. विद्वत् सभेने १९२९ मध्ये त्याला मान्यता दिली.

१९२० च्या सुमाराला मानसशास्त्र अजून पाळण्यात होतं. विद्यापीठांतून त्याला स्वतंत्र विषय म्हणून मान्यता मिळाली नव्हती. गुरुदेवांना मानसशास्त्रात स्वारस्य होतं. १९२९ मध्ये त्या विषयाला एक व्याख्याता त्यांनी मान्य करून घेतला होता. ते स्वतः हा विषय काही वर्षे शिकवत होते. त्या वेळी हयात असलेल्या मानसशास्त्रज्ञांची नवनवीन मतेही ते शिकवीत. पारंपारिकच नव्हे तर चालू सिद्धांतांचाही ते परामर्श घेत. मनोविश्लेषण वाद, वर्तनवाद किंवा समष्टिवाद हे त्यांच्या कक्षेत येत. सिगमंट फ्रॉइड (मृ. १९३९), जॉन ब्रॉडस वॉटसन (मृ. १९५८), मॅक्स वर्दायमर (मृ. १९४३), कूर्ट कोफ्का (मृ. १९४१) किंवा विल्यम मॅक्डूगल (मृ. १९३८) यांचे सिद्धांत त्या वेळेस परिपक्व झाले नव्हते. तरी तोपर्यंत त्यांनी मांडलेल्या मतांचा पूर्ण अभ्यास करून गुरुदेव पदव्युत्तर वर्गाला शिकवीत. १९३२-१९३६ या काळात त्यांनी समकालीन युरोपियन तत्त्वज्ञान शिकवले. गुरुदेव तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख असताना त्या विभागाने केलेल्या प्रगतीबद्दलचे अहवाल पाहण्यासारखे आहेत. एक-दोन पाहू. १९३२-१९३३ चा अहवाल म्हणतो, 'प्रा. रानडे, एम. ए. च्या पहिल्या वर्षाला ग्रीक तत्त्वज्ञान शिकवीत. त्यात व्याख्याने व चर्चासत्रे असत. दुसऱ्या वर्षाला समकालीन तत्त्वज्ञानावरील व्याख्याने व चर्चासत्रे असत. मुलांना या विषयांत फार गोडी वाटत असे. ती इतके प्रश्न विचारीत की ती प्रश्नोत्तरे ऐकताना मजा वाटे.' केव्हा केव्हा त्यांचे सहाध्यायी आजारपणामुळे किंवा निवृत्तिपूर्व रजा घेतल्यामुळे स्वतःचा अभ्यासक्रम पुरा करू शकत नसत. मग त्यांचे हे काम

गुरुदेव स्वतः जादा तास घेऊन पुरे करीत. १९३२-१९३३ आणि १९३३-१९३४ च्या अहवालांतून हा उल्लेख आहे. १९३५-१९३६ चा अहवाल चर्चासत्रांच्या वेळी दिसून येणाऱ्या मुलांच्या अभ्यासाची विशेष तारीफ करतो.

सखोल अभ्यासासाठी गुरुदेव विद्यार्थ्यांना ग्रंथसूची करून देत. ही सूची म्हणजे चिकित्सक परीक्षणच असे. ग्रंथाचे मूल्यमापन करून त्यातला दर्जेदार भाग कोणता, गौण कोणता, कोणता वाचावा, कोणता सोडावा, त्यातून काय बोध घ्यावा, हे विद्यार्थ्यांना सूचीवरून कळावे अशी त्यांची अपेक्षा असे. या संदर्भात Mysticism in Maharashtra या १९३३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या गुरुदेवांच्या ग्रंथाची सूची पाहावी. तिला त्यांनी Bibliography (ग्रंथसूची) न म्हणता, Bibliographical Note (विश्लेषणात्मक ग्रंथसूची) म्हटले आहे, यावरूनच तिचे मर्म कळावे. संस्कृत विभागातील डॉ. उमेश मिश्रांना (फोटो पान पाच), गुरुदेवांनी डॉ. गंगानाथ झा यांच्या पूर्वमीमांसेवरील पुस्तकासाठी ग्रंथसूची करायला सांगितली होती. त्याबद्दल मिश्रा म्हणतात, 'प्रा. रानडे यांनी मला मीमांसा तत्त्वज्ञानावर एक लहान ग्रंथसूची करायला सांगितली. मीमांसेवरील प्रकाशित व अप्रकाशित पाठ्यपुस्तके, त्यांवरील भाष्ये व परीक्षणे, निरनिराळ्या मासिकांतून आजपर्यंत आलेले लेख, हे सगळं जमवून ते परिशिष्ट म्हणून ग्रंथाला जोडायला सांगितलं.' हे ऐकून डॉ. गंगानाथ उद्‌गारले, ''प्रा. रानड्यांनी तुम्हाला डोंगराएवढं काम दिलं आहे.''

योगायोग म्हणजे गंगानाथांच्या या ग्रंथाला गुरुदेवांनी स्वतः प्रस्तावना लिहिली आहे. तिथले एक वाक्य डोळ्यांत अंजन घालणारे आहे- 'प्रकाशनाचे काम संगमरवरी कामापेक्षा अधिक टिकाऊ असते.' कोणत्याही संस्थेने नुसत्या इमारती उठवण्याऐवजी पुस्तके प्रकाशित केली पाहिजेत. पैशांची उधळपट्टी करून बांधलेल्या इमारतीतून काही अभ्यास झाला नाही तर बायबलच्या भाषेत त्या इमारती म्हणजे पांढरा रंग फासलेली थडगी समजावी. खरं म्हणजे अभ्यासाला किंवा संशोधनाला मोठमोठ्या इमारतींची थोडीच जरूर असते ? पेनिसिलिनचा शोध लावणाऱ्या अॅलेक्झँडर फ्लेमिंगची प्रयोगशाळा एका खोलीच्या कोपऱ्यात होती. या लहानशा खोलीत त्याचे प्रयोग, अभ्यास, चहापाणी, आल्यागेल्याची ऊठबस सगळं सगळं चाले.

नामस्मरणाच्या खालोखाल गुरुदेव तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला

महत्त्व देत. १९२९ च्या आसपास त्या क्षेत्रात एक नाट्यमय प्रसंग घडला. मेरठ महाविद्यालयाच्या प्रा. जदुनाथ सिन्हांनी प्रा. सर्वपल्ली राधाकृष्णन्‌वर वाङ्मयचौर्याचा आरोप केला. या गोष्टीला विनाकारण विकृत स्वरूप आलं आणि कुणीतरी वर्तमानपत्राला ती वार्ता पुरवली. कलकत्याच्या मॉडर्न रिव्ह्यू या नियतकालिकात पत्रे येऊ लागली. कुणी सिन्हांची बाजू घेतली तर कुणी राधाकृष्णन्‌ची. गुरुदेवांच्या तडजोड करण्याच्या वृत्तीला व तत्त्वज्ञानाबद्दलच्या प्रेमाला हा वाद सहन होईना. व्यक्तिगत हेवेदावे बाजूला सारून, आपापसात तंटा मिटवावा व शाद्बिक मारामारी बंद करावी असं त्यांना वाटे. २० मार्च १९२९ ला त्यांनी मॉडर्न रिव्ह्यूच्या संपादकांना एक पत्र लिहिलं. 'आम जनतेसमोर खुला वादविवाद सुरू झाल्यामुळे तत्त्वज्ञानाच्या पावन गंगेला गटारगंगेचं रूप आलं आहे. हा पत्रव्यवहार तुम्ही बंद केलात तर माझ्यावर अनंत उपकार होतील. तत्त्वज्ञानाच्या भूमीवर फालतू विषयांचा धुमाकूळ सुरू झालेला पाहून कुणाही शहाण्या माणसाला दुःख झाल्याविना राहणार नाही.' अखेर या दोन्ही बड्या धेंडांनी समझोता करून भांडण मागं घेतलं.

गंगानाथ झा यांनी गुरुदेवांना अलाहाबादला बोलावून घेऊन बाजी मारली होती. आता इतर विद्यापीठांमध्ये त्यांना व्याख्याने देण्यास बोलावण्यात जशीकाही अहमहमिका लागली. नागपूरहून 'राव बहादूर बापूराव दादा किनखेडे व्याख्यानमालेचे' संस्थापक एम. बी. किनखेडे यांचं पत्र आलं (परिशिष्ट ८). नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने योजलेल्या या मालेतील पहिलं पुष्प वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी गुरुदेवांनी गुंफावं अशी त्यांची मनीषा होती. हा दुग्धशर्करायोग होता. गुरुदेवांना भाऊसाहेब महाराजांकडून वैकुंठ चतुर्दशीला नाम मिळालं होतं. १९२८ साली गुरुदेवांनी ही व्याख्यानं दिली. द भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन हा त्यांच्या ग्रंथसंभाराचा मुकुटमणी ठरलेला ग्रंथ ह्या व्याख्यानांवर आधारलेला आहे. ग्रंथ तसा १९५६ मध्ये तयार होता, हे २ सप्टेंबर १९५६ ला अथणीला कृष्णाजी दासो संगोरामांना गेलेल्या पत्रावरून कळते. गुरुदेवांच्या निर्याणानंतर १९५९ साली नागपूर विद्यापीठाने हा ग्रंथ प्रकाशित केला. याला पुढे थोडा इतिहास आहे. भवन्स जर्नलचे सहसंपादक व्ही. ए. के. अय्यर हे सतत अभिजात वाङ्मयाच्या टेहळणीत असत. त्यांच्या वाचनात तो ग्रंथ आला आणि तो त्यांनी

डॉ. कन्हैयालाल माणेकलाल मुन्शींच्या नजरेला आणला. तो ग्रंथ वाचल्यावर ते इतके हर्षभरित झाले की, डॉ. रंगनाथ रामचंद्र दिवाकर यांच्या म्हणण्याप्रमाणे, मुन्शींनी नाचायचेच फक्त बाकी ठेवले. भारतीय विद्या भवनकडून नागपूर विद्यापीठाला विनंती केली गेली की नवीन आवृत्ती काढायला आम्हाला परवानगी द्या. कागदी घोडे नाचायला लागले, पण त्यातून काहीच निष्पन्न होईना. इकडे मुन्शींना धीर धरवेना. डॉ. श्रीप्रकाश त्या वेळी मुंबई प्रांताचे राज्यपाल होते, म्हणून नागपूर विद्यापीठाचे पदसिद्ध कुलगुरू होते. मुन्शींनी त्यांच्या कानांवर सर्वकाही घातलं. किल्ली फिरली. बघता बघता परवानगी येऊन दाखल झाली. भवनने १९६४ साली बुक युनिव्हर्सिटी सेरीजमध्ये ते पुस्तक छापले. त्याची चवथी आवृत्ती २००१ मध्ये निघाली. या आवृत्तीत गीतेतील वचनांची सूची, गीतेच्या बाहेरील इतर ग्रंथांमधील उद्धृतांची सूची, महत्त्वाच्या विषयांवर टीपा या गोष्टी परिशिष्टांत घातल्या आहेत.

नागपूर विद्यापीठाच्या पावलावर पाऊल टाकून कलकत्ता विद्यापीठाने २६ सप्टेंबर १९२८ ला पत्र पाठवून, 'श्रीगोपाल बसुमलिक वेदान्त व्याख्याने' देण्यास गुरुदेवांना बोलावलं (परिशिष्ट ९). ही व्याख्यानें मार्च १९२९ मध्ये झाली. वेदान्त म्हणजे भारतीय तात्त्विक विचारांची उच्चतम पातळी, सा काष्ठा सा परागतिः, आहे हे सांगण्याच्या उद्दिष्टहेतूने लिहिलेले पुस्तक, वेदान्त द कल्मिनेशन ऑफ इंडियन थॉट, १९७० मध्ये भारतीय विद्या भवनने प्रसिद्ध केले. गुरुदेवांचं जे जे लिखाण मिळेल ते सर्व प्रकाशित करायला भवनला अभिमान वाटेल असं मुन्शींनी रंगराव दिवाकरांना सांगून ठेवलं होतं. या ग्रंथाची दुसरी आवृत्ती २००१ मध्ये निघाली. ग्रंथांत वापरल्या गेलेल्या ब्रह्मसूत्रांची सूची या दुसऱ्या आवृत्तीत परिशिष्टरूपाने दिली आहे.

हे दोन्ही ग्रंथ गुरुदेवांच्या निर्याणानंतर प्रसिद्ध झाले असले तरी, त्यांच्यावर गुरुदेवांचं काम सतत चालू होतं. ते विषय सदैव त्यांच्या मनात घोळत होते. यथावकाश हे ग्रंथ आणि आपलं राहिलेलं लिखाण प्रसिद्ध करावं असा त्यांचा मानस होता. टिपणे तयार होत होती. त्यांची वारंवार उजळणी चालू होती. त्यात खंड कसा तो नव्हताच. त्यांच्या तात्त्विक भूमिकेबद्दल

बोलायचं तर ती यथाकाल परिपक्व होत होती. १९३६ मध्ये गुरुदेवांनी नमूद केले आहे की याबाबत अलाहाबाद विद्यापीठाचे आपल्यावर फार उपकार झाले आहेत. 'गेल्या काही वर्षांच्या अलाहाबादच्या वास्तव्यात माझ्या तात्त्विक विचाराची क्षितिजे विस्तृत झाली. नवी नवी चिंतनक्षेत्रे माझ्या नजरेच्या टप्प्यांत आली. सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, मानसशास्त्र किंवा धर्मतत्त्वज्ञान यांमधील आजकाल चालत असलेल्या विचारमंथनाच्या पार्श्वभूमीवर माझी स्वतःची भूमिका मला स्पष्ट कळू लागली. हळूहळू यात कसाकसा विकास होत जाईल त्याचे चित्र तत्त्वज्ञ मंडळींपुढे मांडण्याची मला परमेश्वराने शक्ती द्यावी.' परंतु मध्यंतरीच्या २० वर्षांत ते एकही पुस्तक प्रसिद्ध करू शकले नाहीत. शिकवण्याच्या व्यवसायातून तशी सवड मिळणे अशक्य होते. शिवाय आठ वर्षे कला विद्याशाखेच्या अधिष्ठातापदाची व काही दिवस उपकुलगुरुपदाची जबाबदारी त्यांच्या अंगावर पडली होती. मिस्टिसिझम इन महाराष्ट्र १९३३ मध्ये प्रसिद्ध झालं असलं तरी त्याच्या आधी ३-४ वर्षे ते तयार होतं. निवृत्त झाल्यावर सात वर्षांनी त्यांचे दोन ग्रंथ, पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर आणि परमार्थसोपान (हिंदी) बाहेर येऊ शकले.

## ४ अधिष्ठाता पदासाठी निवडणूक

जानेवारी १९३८ ते ऑगस्ट १९४५ पर्यंत गुरुदेव वाङ्मय विद्याशाखेचे अधिष्ठाता होते. हे पद उपकुलगुरूंच्या खालोखाल महत्त्वाचे असते; तितक्याच जोखमीचे असते. वाङ्मय विद्याशाखा त्या वेळेला सर्वांत मोठी होती. वाणिज्य विद्याशाखा आणि विज्ञान विद्याशाखा यांच्या अंतर्गत असलेले चारदोन विषय सोडले तर बाकी सर्वांची भरती वाङ्मय विद्याशाखेच्या खात्यात होई. या पदाच्या निवडणुकीच्या वेळी घडलेल्या काही गमती पाहण्यासारख्या आहेत.

जानेवारी १९३८ मध्ये पंडित इक्बाल नारायण गुर्टूंची उपकुलगुरु-पदाची मुदत संपत होती. अशा वेळेला सर्वांत वरिष्ठ अधिष्ठाता असलेली व्यक्ती त्या पदासाठी निवडणूक लढवीत असे. अर्थातच गंगानाथांचे चिरंजीव अमरनाथ झा यांची तिथे वर्णी लागली होती. साहजिकच अमरनाथांचे त्या वेळचे कला विद्याशाखेचा अधिष्ठाता हे पद रिकामे होणार व त्या पदासाठी निवडणूक होणार हे स्पष्ट दिसत होते. १९३७ च्या जानेवारीतच या निवडणुकीचे वारे

वाहू लागले होते. गंगानाथांनी विद्यापीठाची जोपासना केली असल्याने त्यांचे डोळे तिकडे लागले होते. त्यांना आपसातली वैमनस्ये आवडत नसत; म्हणून ज्याच्याबद्दल कुणाच्याही मनात किंतू नाही असा मनुष्य त्यांना या जागी हवा होता. कटकारस्थाने ज्यांच्या गावी नव्हती असे प्राध्यापक म्हणून गुरुदेवांची ख्याती होती. साहजिकच झा पितापुत्रांचे त्यांच्याकडे लक्ष होते. डॉ. अमरनाथांनी गुरुदेवांना निवडणुकीची काहीशी पूर्वसूचना दिली. गुरुदेव गंगानाथांना भेटले व त्यांच्यात दीर्घ चर्चा झाली. आपल्या अशक्त प्रकृतीची, तसेच ते कार्य न झेपण्याची अडचण येऊ शकते, याची गुरुदेवांनी त्यांना कल्पना दिली; पण या भेटीत काही निश्चित निर्णय झाला नाही असे दिसते. उन्हाळ्याची सुट्टी लागली आणि गुरुदेव नेहमीप्रमाणे निंबाळला गेले. अमरनाथांनी या प्रश्नाची पाठ सोडली नाही. त्यांनी निंबाळला पत्र लिहून, 'निवडणुकीला उभे राहण्याला होकार कळवा,' अशी गुरुदेवांना गळ घातली. या कळकळीच्या आणि आग्रहाच्या विनंतीला गुरुदेवांना नाही म्हणवेना. शिवाय त्यांची अशीही समजूत झाली की आज कला विद्याशाखेचे अधिष्ठाता असलेले व उद्या उपकुलगुरू होण्याची शक्यता असलेले अमरनाथ आपले नाव सुचवणार आहेत, तेव्हा दुसरे कुणी उभे राहणार नाही व निवडणूक बिनविरोध होईल. त्यांनी आपला होकार अमरनाथांना तारेने कळवला. उन्हाळ्याची सुट्टी संपल्यावर गुरुदेव अलाहाबादला आले व अधिष्ठात्याच्या पदावरील व्यक्तीची जबाबदारी कोणकोणती असते याचा अंदाज घेऊ लागले. आणि काय सांगावे, त्यांना कळले की एक जबरदस्त उमेदवार रिंगणात उतरला आहे- सर शफात अहमद खान[१], इतिहास विभागाचे प्रमुख. आता सगळ्या विभागप्रमुखांच्या डोक्यात निवडणुकीचं वेड शिरलं. गुरुदेवांनी आपलं नाव मागं घ्यावं असं आडून सुचवलं जाऊ लागलं. एक वडीलधारे प्राध्यापक गुरुदेवांकडे आले व म्हणू लागले की तुम्ही उभे राहणार याची मला कल्पनाच नव्हती, म्हणून मी सर शफात यांना वचन देऊन चुकलो आहे. त्यांनी आणखी पुस्ती जोडली, की सर शफात यांना पुष्कळांचा पाठिंबा आहे. चढाओढीत पडणं गुरुदेवांसारख्या मृदू व पापभीरू माणसाचं काम नव्हतं. ते कधी कुणाच्या विरोधात उभे राहिले नव्हते. संघर्षाची

---

१ हे पुढे राष्ट्रीय पातळीवर पुढारी म्हणून गाजले.

सगळी मुळी खणून तिला दूर करून टाकणे हे त्यांचे धोरण होते. त्यामुळे ही निवडणूक म्हणजे त्यांना एक डोकेदुखी होऊन बसली. विद्यापीठात जनमताचा अंदाज घेतला जाऊ लागला. कुणी एकाचा तर कुणी दुसऱ्याचा पक्ष बळकट आहे असे सांगत. या चुरशीच्या राजकारणाचा वीट येऊन गुरुदेवांनी गंगानाथांना ९ सप्टेंबर १९३७ ला एक लांबलचक पत्र लिहून कळवले की 'अधिष्ठाता पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतरच्या प्रशासकीय कामाच्या दृष्टीने सहकाऱ्यांमध्ये सलोख्याचे संबंध असणे फायद्याचे होईल. म्हणून पक्ष-प्रतिपक्ष करून ते पद मिळवणे बरोबर नाही. तेव्हा मी माझे नाव मागे घेतो' (परिशिष्ट १०). थोडक्यात,

सहज मिलै सो दूध सम माँगा मिलै सो पानि ।
कह कबीरा वह रक्त सम, जामें खींचातानी ।।

या दोह्याबरहुकूम गुरुदेवांचे वर्तन होते.

गंगानाथ झा असल्या युक्तिवादांनी गप्प बसणारे नव्हते. इकडे पत्र पोचलं न पोचलं, की लागलीच त्यांनी उत्तर पाठवलं. 'बिनविरोध निवडून येण्याचा आग्रह धरणे बरोबर नाही. निवडणुकीच्या वेळेला स्पर्धा असली तरी पुढच्या कामावर तिचा विपरीत परिणाम होत नसतो, ती तेवढ्यापुरतीच असते. उपकुलगुरूच्या तिन्ही निवडणुकांच्या वेळेला मला प्रतिस्पर्धी होते, पण म्हणून पुढे त्याचा काही अनिष्ट परिणाम झाला नाही. तरी या गोष्टीचा बाऊ करू नये.' पुढे ते म्हणतात, 'इथेच काय, इतर ठिकाणीही थोडं निष्ठुर धोरण ठेवलं पाहिजे. विद्यापीठाच्या दृष्टीने आजच्या परिस्थितीत सच्चा मनुष्यच अधिष्ठाता म्हणून आला पाहिजे. तुम्ही जर त्या जागेवर आला नाहीत तर विद्यापीठाचं दुर्भाग्य....... म्हणून जरा कठोर शब्दांत लिहीत आहे. समजून घ्यालच, स्थिरबुद्धिः यतचित्तात्मा च ।'

गंगानाथांकडून हा जरा कडक उपदेश आला होता. या पत्रव्यवहारातून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते की, गुरुदेव निवडून येणार अशी गंगानाथांना मनोमन खात्री असावी. पराभव झालाच तर पुढे काय असा किंचितही सूर त्यांच्या पत्रांतून नाही. पालुपद एकच, जरा ताठरपणा दाखवा. गुरुदेव धीर-गंभीर नव्हते का ? ते तर स्थितप्रज्ञ होते. मात्र प्रचार, हेवेदावे, वैरभाव वगैरे गोष्टी त्यांच्या स्वभावात नव्हत्या. शेवटचा प्रयत्न म्हणून गंगानाथांनी लिहिलं-

'विद्यापीठाला वाचवा....' याचा अर्थ असा की विद्यापीठात राजकारण शिरलं होतं.

या सुमाराला विद्यापीठाच्या रंगपटावर वेगळंच नाट्य सुरू होतं. पंडित इक्बाल नारायण गुर्तूंनी विचित्र परिस्थितीत उपकुलगुरुपदाचा राजीनामा दिला होता. लॉर्ड लोथिअन[१] यांना सुवर्णमहोत्सवाच्या समारंभासाठी मुख्य पाहुणे म्हणून त्यांनी बोलावलं होतं. ही गोष्ट विद्यार्थ्यांना बिलकूल रुचली नाही. आधीच अलाहाबादचे विद्यार्थी जिथे तिथे अग्रेसर, त्यातून दडपशाही करणाऱ्या राज्यकर्त्यांच्या प्रतिनिधीने आपल्याला उपदेश करावा हे त्यांच्या तापट वृत्तीला भावले नाही. आम्ही समारंभावर बहिष्कार घालू व निदर्शने करू, अशी त्यांनी धमकी दिली. गुर्तूंनी मुलांची नाडी ओळखली आणि आगीशी खेळ नकोच म्हणून लोथिअनना दिलेले निमंत्रण रद्द केले.

असं सांगतात की लोथिअनच्या ऐवजी पंडित मदन मोहन मालवीय यांना विनंती केली गेली. ते याच विद्यापीठाचे भूतपूर्व विद्यार्थी असून एक धुरंधर देशभक्त होते. त्या वेळच्या परंपरेप्रमाणे त्यांनी इंग्रजीत भाषणाला सुरुवात केली आणि ५-१० मिनिटे अस्खलितपणे बोलले. नंतर त्यांनी एका तासाच्या वर डौलदार हिंदीत आपले विचार मांडले. श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. मुलांना हा दुहेरी विजय मिळाला. बोलणारा नेता आपला व भाषाही आपली. पदवीदानासारख्या महत्त्वाच्या प्रसंगी हिंदीतून भाषण होण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आलं, ते आनंदाने खुळे झाले म्हणा ना ! मात्र लोथिअनना दिलेले आमंत्रण रद्द करावे लागले याचा गुर्तूंना अपमान वाटला व त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा कुलगुरूंकडे पाठवला. कार्यकारिणी सभेने २६ ऑक्टोबर १९३७ ला त्याची नोंद घेतली.

अधिष्ठाता पदाच्या निवडणुकीचे वातावरण तापतच होते. प्रा. रानडे व सर शफात यांच्यात सरळ सामना होणार हे उघड झाले. निवडणुकीचा दिवस

---

१ सर आर्थर कनिंगहॅम लोथिअन I.C.S., K.C.I.E. (Knight Commander of the Indian Empire), C.S.I. (Companion of the Star of India), हे १९३५-३७ मध्ये अपर सचिव (परिसंघ) या हुद्यावर भारत सरकारच्या सेवेत होते.

उजाडला. अगदी थोड्या मताधिक्याने प्रा. रानडे निवडून आले. असंही बोललं जात होतं की त्यांनी आपलं मत स्वतःला न देता सर शफातना दिलं. 'मी माझं मत मलाच कसं द्यायचं ?' असं म्हटल्याचं ऐकलं. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी तिथं काय काय घडलं याबद्दल एकही अहवाल मिळाला नाही. २७/१०/१९३७ रोजी वाङ्मय विद्याशाखेच्या वार्षिक सभेचा कार्यवाही सारांश म्हणतो, 'नियम ५ (१) अध्याय ५ अन्वये वाङ्मय विद्याशाखेने प्रा. रा. द. रानडे यांची अधिष्ठाता म्हणून निवड केली. प्रा. ए. एन. झा यांची मुदत १९/१/१९३८ ला संपते. त्यांच्या जागी ही निवड झाली.'

प्रा. अमरनाथ झा हे कुशल प्रशासक होते. 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार,' असे म्हणण्याचा त्यांना अनुभवसिद्ध अधिकार होता. आता ते उपकुलगुरू झाले होते. १९/१/१९३८ ला त्यांनी गुरुदेवांना पत्र लिहिले, 'अधिष्ठाता या जागेचा पदभार तुमच्याकडे सुपूर्त करताना मला फार समाधान वाटतं. विल्यम्स हे तुमचे कारकून म्हणून राहतील. त्यांची कळकळ, आस्था आणि तत्परता वाखाणण्याजोगी आहे.

'बैजनाथ हा तुमचा चपराशी मात्र त्या तोडीचा नाही. त्याच्या मनात वाईट हेतू नाही, तो कष्टाळूही आहे, पण त्याची बुद्धिमत्ता बेताची आहे. निरनिराळ्या विभागप्रमुखांशी व्यवहार करताना तुमच्या लक्षात येईल की सगळ्यांच्या अंगात शिस्त मुरलेली नाही. जरा कडक धोरण ठेवलं की ते सरळ होतील.

माझं सहकार्य केव्हाही तुम्हाला आहेच.

तुमचं काम सुरळीत व यशस्वी व्हावं अशा शुभेच्छा.....'

ते पुढे म्हणतात, 'खरोखर अधिष्ठाता या पदापर्यंत पोचलेले लोकही आपला राग आवरत नाहीत ही दुःखाची बाब आहे...'

अलाहाबाद विद्यापीठ पुरोगामी विचाराचे होते. १९३० च्या सुमाराला अभ्यासक्रमात शिवणकाम, चित्रकला, छायाचित्रण, असे वरवर फुसके वाटणारे विषय होते. व्यावसायिक शिक्षणाला जागा होती. गुरुदेवांनी अधिष्ठाता या पदाची सूत्रे हातांत घेतली तेव्हा विद्यापीठात विभागप्रमुख म्हणून बडे बडे विद्वान होते. कोणताही निर्णय घेताना त्यांची मने दुखवली जाणार नाहीत व त्यांच्या मतांची कदर केली जाईल, अशी दक्षता घेणे जरूर होते. विद्या

विनयेन शोभते, हे कित्येकदा केवळ सुभाषितच राहते. विद्यावंतानाही स्वाभिमान असतो, कधी कधी समंजसपणावर त्याची कुरघाडी होणे मनुष्यस्वभावाला धरून आहे. सगळ्यांशी जमवून घेण्याची कार्यपद्धती कठीण समयी गुरुदेवांच्या उपयोगी पडली. विभागप्रमुखांना त्यांच्या मोठ्या पदाबद्दल दबदबा असणे किंवा विद्वत्तेबद्दल आदर असणे साहजिक होते, पण यांपेक्षा गुरुदेवांच्या अध्यात्मवैभवाचे व सहृदयतेचे ते खरे भोक्ते होते.

कला विद्याशाखेमधल्या सदस्यांच्या नेमणुका करणाऱ्या समितीवर १९४१ साली गुरुदेव होते. १९४४ साली वित्त समितीचे सदस्य होते. सर गंगानाथ झा रिसर्च इन्स्टिटयूट अलाहाबादला स्थापन करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. या संस्थेच्या उद्घाटन समारंभाला ते प्रमुख वक्ते होते. गंगानाथांच्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेखनाचा त्यांनी बांधेसूदपणे आढावा घेतला. ज्ञानाच्या कक्षा वाढवण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा समर्थपणे परामर्श घेतला. त्यांच्या भाषणात जितकी व्यापकता होती तितकीच सखोलता होती. विद्यापीठात नोकरी चालू असताना किंवा निवृत्तीनंतर झालेल्या त्यांच्या दोनच जाहीर भाषणांचा उल्लेख करू. ए क्रिटिकल एस्टिमेट ऑफ सांख्य फिलॉसॉफी या विषयावर डॉ. अमरनाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली भाषण झाले. डॉक्ट्रिन ऑफ गॉड इन बादरायणाज ब्रह्मसूत्राज या भाषणाच्या वेळी त्या वेळचे उपकुलगुरू डॉ. ताराचंद अध्यक्ष होते.

दिवाळीच्या सुट्टीत खूप मंडळी नामसप्ताहासाठी अलाहाबादला जमत. त्यांत भाऊसाहेब महाराज व अंबुराव महाराज या दोघांचे शिष्य असत. दिवसभराचा कार्यक्रम असे. सकाळी ११ ते दुपारी ३ हा विद्यापीठात जाण्याचा अवधी सोडला तर बाकी सर्व कार्यक्रमांना गुरुदेव हजर राहत. स्थानिक कर्नाटक संघाचे अध्यक्ष होण्याच्या लोकांच्या विनंतीला त्यांनी नम्रपणे नकार दिला होता. त्या संघाचे अध्वर्यू डॉ. आर. एस पदकी, घरी होणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करीत. १९४४ नंतर घरी पुरंदरदासांची आराधना (पुण्यतिथी) साजरी होई. ही तिथी माघ शुद्ध पंचमीला येते. भाऊसाहेब महाराजांची पुण्यतिथी माघ शुद्ध तृतीयेला असते. दोन्ही मिळून एकच सप्ताह गुरुदेव ठेवत. कारण साधकांना, विशेषतः दुरून येणाऱ्यांना दोन वेळा येणे अवघड जाई. टपालखात्यातले एक वरिष्ठ अधिकारी

श्री. वाळवेकर[१] वाराणशीहून या एकत्रित सप्ताहाला येत. दोन्ही सप्ताह एका दिवशी करून गुरुदेव थांबले नाहीत, तर घरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयीचे व्हावे म्हणून ते हा कार्यक्रम तिथींच्या आसपास येणाऱ्या सुट्टीच्या दिवशी ठेवत. त्यांनी इतरांची सोय किती म्हणून पाहावी ? सर्वांचे नामस्मरण व्हावे हाच मुळातला हेतू होता.

असा एक सप्ताह १० फेब्रुवारी १९५१ ला झाला. दोन कन्नड पदांवर चर्चा झाली. पहिले पद जगन्नाथदासांचे दासरिगुंटे भयशोक (हरीचिया दासा नाही भयचिंता). या पदातल्या बेडिद इष्टार्थव (आपण जे मागू ते) या शब्दांऐवजी बेडदे इष्टार्थव (आपण न मागताच) हे शब्द चांगले आहेत असे गुरुदेवांचे मत. आपण जे मागतो ते देव देतो असे म्हणण्यापेक्षा आपण न मागतासुद्धा तो देतो हे म्हणणे अधिक सयुक्तिक नाही का ? दुसरे पद पुरंदर-दासांचे हरिदासर संग दोरकितु (मला संतसंगतीचा लाभ झाला) हे होते. इथे त्यांनी एक बदल सुचवला. त्यातल्या नेरवाय्तु (मदत झाली) या शब्दाऐवजी त्यांनी सफलवाय्तु (सफळ झाली) हा शब्द सुचवला. नेरवाय्तु म्हणजे गुरुकृपेची मदत झाली. सफलवाय्तु म्हणजे गुरुकृपा फळाला आली. या सूक्ष्म बदलांमुळे पदांचा भावार्थ एकदम उंचावतो.

५/२/१९४६ रोजी सकाळी ११ वाजता गुरुदेवांनी संगोराम यांना बोलावून विचारले, ''तंबुरा कसा दिसतो हो ? आणि वीणा आणि सतार कशा दिसतात ?'' दोघांचं खूप वेळ बोलणं झालं. नंतर ते म्हणाले, ''मी हे का विचारतो माहीत आहे का ? काल रात्री मला स्वप्न पडलं आणि महाराज तंबुरा घेऊन उभे असलेले दिसले.'' आपण दोन वेळा महाराजांचं कीर्तन ऐकलं आहे असंही त्यांनी पुढं सांगितलं.

एकदा महाराज व बाबा यांची पत्रे गुरुदेव वाचून घेत होते. कोणत्या तरी वाक्यावरून त्यांना रामकृष्ण गोपाळ भांडारकर[२] यांच्या प्रपन्न व प्रपित्सु

---


१ ते हुबळीचे होते. वाराणशीच्या कचेरीचे काम व्यवस्थित लावून देण्यासाठी त्यांना तिकडे पाठवले होते. गुरुदेवांचे गुरुबंधू गिरिमल्लप्पा महाराज, यांचे वाळवेकर शिष्य होते.

२ पुण्याची भांडारकर इन्स्टिट्यूट यांच्याच नावाने स्थापन झाली आहे.

या दोन शब्दांची आठवण झाली. गुरुदेवांचं भाष्य असं की प्रपन्न या वृत्तीहून प्रपित्सु ही वृत्ती श्रेष्ठ आहे. शरणमहं प्रपद्ये (मी शरण येतो) म्हणण्यात अजून स्वतःकडे कर्तृत्व राखले आहे. शरणमहं प्रपित्सु (मी शरण येण्याची इच्छा करतो) यात माझी फक्त इच्छा आहे, ती पूर्ण करणे देवाच्या हाती आहे, इतकेच नव्हे तर ही इच्छासुद्धा तोच उत्पन्न करतो असा भाव आहे. हा भाव नम्रतेचा आहे. अलाहाबादला एक प्रपित्सु संघ स्थापन करण्याचा गुरुदेवांचा मानस होता. एक ईश्वर, एक मानवता हे त्याचं ब्रीदवाक्य होतं. सदस्यांवर सत्यशोधन व सच्चरित्र ही दोन बंधने होती. सदस्य होणाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे - न्यायमूर्ती शंकर सरन, न्यायमूर्ती माथूर, डॉ. आर. एस. पदकी, पन्नालाल, हरिश्चंद्र, पंडित देवी प्रसाद शुक्ला, मनमोहन लाल, मिठूलाल शास्त्री (फोटो पान सात), डॉ. कैलासनाथ काटजू, डॉ. दस्तूर, डॉ. मोहम्मद हफीज, एन. सी. मुखर्जी, चटर्जी, प्रा. एस. के. रूद्र, डॉ. के. एस. कृष्णन्, कृष्णचंद्र श्रीवास्तव, हरिहर प्रसाद (निवृत्त न्यायमूर्ती), डॉ. बी. के. मुखर्जी, लेफ्टनंट कर्नल एन. डब्ल्यू क्लार्क, प्रा. के. आर. आर. शास्त्री, व आणखी दोन सद्गृहस्थ. हे दोघे डॉ. पदकींच्या परिचयातले होते. एकजण जॉर्ज टाउन भागात व दुसरे लुकर गंज या भागात राहत होते. या संघाच्या सभा झाल्या की नाही कल्पना नाही. अध्यात्म विद्या मंदिराची शाखा अध्यात्म परिषद् या नावाने गुरुदेवांनी अलाहाबादला काढली होती, तिच्यातच हा संघ विलीन केला असावा. अध्यात्म परिषदेच्या विद्यमाने पुष्कळ भाषणे होत असत. गुरुदेवही अनेक वेळा व्याख्याने देत.

भाऊसाहेब महाराजांच्या पुण्यतिथीच्या वेळेला निंबाळच्या साधकांना गुरुदेव एक पत्र लिहीत. एका वर्षी कोणत्या विषयावर पत्र लिहावे याचा विचार करत असताना त्यांचा तत्त्वज्ञानाचा एक विद्यार्थी आला. त्याचा अध्यात्माकडे कल होता. वय वर्षे ३८. काव्यात तो रस घेत असे. 'बन्धनों की शृंखला को तोडकर यह पार आया,' हे स्वतः रचलेले पद त्याने गुरुदेवांना दाखवले. या पदाचे शेवटचे कडवे पाहून गुरुदेवांना १९१० सालच्या एका प्रसंगाची आठवण झाली. ते महाराजांबरोबर जात असताना एका मारुतीच्या देवळात महाराजांनी मूर्तीपुढे हात जोडलेले त्यांनी पाहिले. परमार्थातली अलौकिक पातळी गाठलेल्या महाराजांनी दगडाच्या मूर्तीपुढे हात जोडलेले पाहून गुरुदेव विस्मित झाले. नंतर त्यांच्या लक्षात आले की महाराजांना त्या मूर्तीवर रूप दिसले असेल आणि त्या रूपाला त्यांनी नमस्कार

प्रयाग–विश्वविद्यालय संस्कृत परिषद् , १९५३



खुर्चीवर डावीकडून – २ मिठूलाल शास्त्री ४ गुरुदेव ५ डॉ. बाबूराम सक्सेना ६ प्रा. क्षेत्रेशचंद्र चट्टोपाध्याय

पान आठ



अलाहाबाद विद्यापीठ [illegible] विभाग

केला असेल.

अनेक लोक त्यांना भेटायला येत. सगळेच काही तत्त्वज्ञानाचे अध्ययन किंवा अध्यापन करणारे नव्हते. देवाचिया द्वारी उभा क्षणभरी, या भावनेने कित्येकजण येत. भौतिकशास्त्राचे प्राध्यापक डॉ. के. एस. कृष्णन्[१] नेहमी येत. बगलेत बरेचसे कागद कोंबलेले, जिभेवर शंकराचार्यांचे श्लोक. गुरुदेव नेमातून बाहेर येईपर्यंत ते खुशाल व्हरांड्यात बसत. 'त्यांना नेमातून उठवू नका,' असे मुलांना आवर्जून सांगत. ते संस्कृत पंडित होते. शुभ्र धोतर, लोकरी कोट, डोक्याला दाक्षिणात्य पद्धतीचा फेटा बांधलेले त्यांचे ध्यान कुणाच्याही मनांत आदर निर्माण करी. गुरुदेव आले की दोघांचे शंकराचार्यांवर मनमुराद बोलणे होई.

१९४६ मध्ये पाटणा विद्यापीठाचे डॉ. धीरेंद्र मोहन दत्त अलाहाबाद विद्यापीठाच्या एम. ए. च्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घ्यायला आले होते. आपल्या घरी उतरण्याबद्दल गुरुदेवांनी त्यांना आमंत्रण दिलं होतं. आपण केव्हा अलाहाबादला पोचू हे त्यांनी कळवलं होतं. त्याप्रमाणे एक विद्यार्थी स्टेशनवर जाऊन आला, पण डॉ. दत्त त्या गाडीने आले नाहीत, म्हणून परत आला. मध्यरात्र होऊन गेली आणि सर्वत्र सामसूम झाली. सकाळी नेमातून आल्या आल्या गुरुदेवांनी त्यांची चौकशी सुरू केली. अजून कुणी उत्तर द्यायच्या आत उघड्या ओसरीत त्यांना कुणीतरी झोपलेलं दिसलं. पाहतात तो डॉ. दत्त ! त्यांनी गुरुदेवांना आदराने नमस्कार केला. ''हे काय, तुम्ही इथं कसे झोपला आहांत ? तुमच्यासाठी वेगळ्या खोलीत पलंग, मच्छरदाणी, अशी सगळी तयारी करून ठेवली होती,'' या गुरुदेवांच्या वाक्यावर दत्त म्हणाले, ''पाटण्याहून येणारी गाडी मोगलसराईला २-३ तास उशिरा आली. माझी पुढची गाडी चुकली. मग नंतरच्या गाडीने मी अपरात्री ३ वाजता इथे पोचलो. तुम्ही नेमात असणार म्हणून तुम्हाला उठवलं नाही. इथे निवांत झोप झाली.'' गुरुदेवांना जरा कससंच वाटलं. पण दत्त हसत हसत म्हणाले, ''तुमच्या घराच्या छत्राखाली ओसरी काय किंवा खोली काय, सगळंच आरामशीर.'' ज्येष्ठ प्राध्यापक सुद्धा गुरुदेवांच्या नेमात व्यत्यय येऊ नये अशी काळजी घेत.

---

१ हे पुढे राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळेचे निदेशक झाले.

प्रा. दत्त त्यांना दिलेल्या खोलीत क्वचितच जात. बी. ए., एम. ए. चे विद्यार्थी राहत होते तिथेच त्यांचा मुक्काम असे. ते जी परीक्षा घेण्यासाठी आले होते, त्या तोंडी परीक्षेला त्यांपैकी एक दोघे बसणार होते. पण सत्राशे साठ विषयांवर गप्पा झाल्या तरी परीक्षेबद्दल कुणी चकार शब्द काढला नाही. परीक्षा घेऊन डॉ. दत्त घरी आले. गुणपत्रिका तयार करून त्यांनी त्या लिफाफ्यांतून भरल्या व त्यांवर मोहरा उठवल्या. जी मुले परीक्षेला बसली होती ती धडधडत्या छातीने लांबून सगळं बघत होती, पण कुणी तोंडातून ब्र काढला नाही. एकदाचं काम संपलं आणि बंद लिफाफे विद्यापीठाकडे रवाना झाले. एकजण धैर्य करून म्हणाला, ''सर आमच्या भवितव्यावर तुम्ही मोहर ठोकलीत तर.'' दत्त नुसते हसले. ते अस्सल गांधीवादी होते. पांढरे स्वच्छ पायघोळ धोतर, पांढरा कुडता आणि शाल या त्यांच्या वेषाखाली साधेपणा, सरळपणा, विद्वत्ता आणि सुसंस्कृतता दडलेली होती.

गुरुदेवांकडे एम. ए. च्या शेवटच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी येत. घरी राहणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी कुणीतरी त्या परीक्षेला बसलेले असे. उत्तरपत्रिका घरात उघड्यावर पडलेल्या असल्या तरी त्यांना हात लावण्याचे कुणालाही धैर्य नसे. कुलूप-किल्ल्यांचा मामला नव्हता. एकदा असाच उत्तरपत्रिकांचा मोहोरबंद गठ्ठा आला. एका विद्यार्थ्याने तो घेऊन नेहमीप्रमाणे गुरुदेवाना दिला. कर्मधर्मसंयोगाने तो विद्यार्थी त्या परीक्षेला बसला होता व त्याची उत्तरपत्रिका गठ्ठ्यात होती. गुरुदेवांनी आपल्या समोर गठ्ठा उघडायला सांगितले व ''तुझी उत्तरपत्रिका त्यातून काढ,'' अशी आज्ञा केली. गुरुदेवांनी तिचे पानन् पान पाहिले. ती निबंधाची पत्रिका असल्यामुळे लिखाण अखंड होते. मध्ये मोकळी जागा नव्हती. गुरुदेवांनी एक लाल पेन्सिल घेतली व उत्तरपत्रिकेच्या सुरवातीला व शेवटाला दोन दोन रेघा ओढल्या. मजकुराला कुलूप घालण्याची हो गुरुदेवांची अनोखी पद्धत ! उत्तरपत्रिका गठ्ठ्यात गेली व गठ्ठा जागेवर उघड्यावरच ठेवला गेला. त्या उत्तरपत्रिका तपासून झाल्यावर ज्याची उत्तरपत्रिका काढून पाहिली होती त्याला बोलावून गुरुदेव म्हणाले, ''तुझा मायावादावरचा निबंध चांगला आहे. त्यात सर्व मुद्दे आले आहेत खरे, पण मायावादातून निघणाऱ्या नैतिक अनुमानांचा तू उल्लेख केला नाहीस. मी तुला ६५ गुण दिले आहेत. तो मुद्दा आला असता तर आणखी दिले असते.''

सबंध दिवसाचा कार्यक्रम कसा असावा हे गुरुदेवांनी एका मुलाला

सांगितले होते. ध्यान- ६ तास; वर्तमानपत्रे[1] वाचणे- ३ तास; अभ्यास- ४ तास[2]; झोप- ५ तास; भजन पोथीवाचन- २ तास; इतर वैयक्तिक कार्यक्रम- ४ तास. प्रत्येक विषयाला रोज हात लावला पाहिजे असा दंडक होता.

अधिष्ठाता पदाची आठ वर्षे बघता बघता सरली. काही गलबला काही निवळ असा तो काळ गेला. १९४६ मध्ये गुरुदेव अधिष्ठाता पदावरून निवृत्त झाले. २ एप्रिल १९४६ ला कला विद्याशाखेची सभा झाली. पंडित के. चट्टोपाध्यायांनी एक ठराव मांडला व प्रा. ए. सी. बॅनर्जींनी त्याला अनुमोदन दिले. 'प्रा. रानडे आज निवृत्त होत आहेत. त्यांनी या पदावर असताना भरीव कामगिरी केली आहे. त्यांची विद्वत्ता, ऋषितुल्य वर्तन, आणि अनुपम सौजन्य यामुळे त्यांच्या कारकीर्दीत कला विद्याशाखेचे काम गुण्यागोविंदाने झाले.' सदस्यांनी केलेल्या वाक्गौरवाला गुरुदेवांनी प्रतिसाद दिला. सहकाऱ्यांनी काढलेले गोड शब्द, टाकलेला विश्वास आणि दिलेले सहकार्य यांचा उल्लेख करून त्यांनी सर्वांचे अन्तःकरणपूर्वक आभार मानले.

## ५ स्वातंत्र्यसंग्राम

या आठ वर्षांच्या काळात एक देशव्यापी लढा उभा राहिला होता. स्वातंत्र्याच्या चळवळीचा वणवा पेटला होता. देशाच्या मुक्ततेसाठी मुलांनी आपले प्राण पणाला लावले होते. मनं धुमसत होती. ठिणगी पडायचाच अवकाश होता.विद्यापीठाच्या आवारात मोक्याच्या जागी उभ्या असलेल्या डेरेदार अश्वत्थ वृक्षाखाली रोजच्या रोज सभा भरत होत्या. वन्ही तो चेतवावा रे चेतविताचि चेततो, हे ब्रीदवाक्य झालं होतं. वयोवृद्ध अश्वत्थ मूक साक्षी म्हणून उभा होता. आपल्या छायेखाली चाललेल्या खळबळीच्या दिवसांतल्या घटना प्रत्यक्ष पाहून जशाच्या तशा स्मृतीत साठवत होता. भारत छोडो चळवळीने वातावरण तंग होतं. माणसं भयग्रस्त होती. विद्यापीठातल्या हालचालीवरून बाहेर काय चाललं आहे त्याची कल्पना यावी. विद्यापीठात नुसती कुजबूज झाली तरी गावात तिचे कानठळ्या बसवणारे प्रतिध्वनी उमटत होते. एका भीषण प्रसंगाचं सावट सगळीकडं पडलं होतं. १२ ऑगस्ट १९४२ या काळ्याकुट्ट दिवशी

---

१ हा विद्यार्थी गुरुदेवांना वृत्तपत्रे वाचून दाखवी.

२ त्याला असलेल्या चार विषयांना एकेक तास.

विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीवर प्रचंड मोर्चा काढला. याची एक हकीकत अशी आहे की काँग्रेसचा झेंडा घेतलेल्या मुली पुढे होत्या आणि मुले त्यांच्यामागे होती. घोड्यांवर बसलेले पोलीस देखरेख करत होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीकडे जाणारे रस्ते बंद केले होते. पण बहादूर मुलांनी अडथळे ओलांडण्याचे ठरवले होते. मोर्चा बरखास्त करायला पोलीस सांगत होते. मुली पुढे व मुले मागे असलेली पाहून सत्तेने धुंद झालेला एक पोलीस अधिकारी खवचटपणे म्हणाला, ''पोरींना तोफेच्या तोंडी ठेवलं आहेत; तुम्ही बांगड्या भरल्या आहेत काय रे ? धाडस असलं तर पुढं या आणि बंदुकीच्या गोळ्या झेला.'' हे ऐकलं मात्र आणि वाटेतल्या लोकांना सपासप बाजूला सारून निधड्या छातीच्या लाल पद्मधर सिंगने मुसंडी मारली. काळाचा अक्राळ विक्राळ जबडा आ वासून पुढे उभा असलेला दिसत होता, पण तो वीर पुढे घुसतच होता. पोलिसांनी घालून दिलेली लक्ष्मणरेषा त्याने पार केली आणि आपली छाती त्या यमदूतांच्या पुढे उघडी करून तो गरजला, ''हा मी इथं उभा आहे, काय करायचं ते करा.'' एकच क्षण. बंदुकीची गोळी सूं सूं करत त्याच्या बुलंद छातीत घुसली... पद्मधर हुतात्मा झाला. ते पाहताक्षणी क्रोधाने उसळलेल्या विद्यार्थ्यांच्या सागराची कल्पना करणे कठीण. ते संतापाने वेडे झाले. बेजबाबदार अधिकाऱ्यांच्या अपमानकारक उद्‌गारांनी आगीत तेल पडलं. गोळीबाराच्या वर्षावात ते बावरून इतस्ततः धावू लागले. हलकल्लोळ माजला. त्या धुमश्चक्रीत कितीजणांनी प्राण गमावले आणि कितीजण जखमी झाले ते इतिहासाला ठाऊक. शहरात स्मशानशांतता पसरली.

या प्रसंगाचे सरकारच्या बाजूने केले गेलेले वर्णन विकृत आहे. त्यांच्या डोळ्यांना देशभक्त हा देशद्रोही दिसतो, शूर विद्यार्थ्यांचा मोर्चा बाजारबुणग्यांचा घोळका भासतो. टाइम्स ऑफ इंडियाच्या १४ ऑगस्ट १९४२ च्या आवृत्तीतील विज्ञप्ती पाहाः- 'मध्याह्नीला विद्यार्थ्यांच्या एका भल्यामोठ्या झुंडीशी पोलिसांच्या लहानशा तुकडीला मुकाबला करावा लागला. पोलिसांवर दगडविटांचा मारा झाल्याने त्यांना कारवाई करावी लागली... आताच्या बातमीनुसार गोळीबारात दोन माणसे मेली आहेत. कितीतरी पोलिसांना किरकोळ जखमा झाल्या... शहरात पुरेशी लष्करी कुमक आणून ठेवली आहे.' पोलिसांना झालेल्या किरकोळ जखमांचं कौतुक ! निःशस्त्र मुलांचं रक्त

सांडल्याचं सोयरसुतक नाही. नाहीतरी इतिहास जेते लोकच लिहितात व स्वतःची भलावण करतात. जितांची मतं खोटी ठरतात. नेपोलियन एकदा म्हणाला होता, 'इतिहास म्हणजे काय, सगळ्यांना मान्य होणाऱ्या थापा.' हे 'सगळे' म्हणजे जेते. गोळीबाराचे सरकारी वृत्त अशाच थापांनी भरले आहे. सरकारी वार्तेत पुढे म्हटले आहे- 'श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सखाली अटक झाली आहे, अशी असोसिएटेड प्रेसची बातमी आहे.'

लाल पद्मधर सिंगच्या[1] असीम त्यागाचं प्रतीक म्हणून या चूडारत्नाचा अर्धपुतळा अलाहाबाद विद्यापीठाच्या प्रांगणात त्या ऐतिहासिक अश्वत्थ वृक्षाजवळ एका शुभ्र चबुतऱ्यावर बसवला आहे.

१२ ऑगस्ट हा दुर्दिन उगवला होता. उपकुलगुरू डॉ. अमरनाथांनी कुलसचिवांना पत्र लिहिलं, 'गावातली चिघळलेली परिस्थिती लक्षात घेऊन कार्यकारिणी सभेने विद्यापीठ बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थांना आपापल्या घरी जाण्याचा आदेश दिला आहे. हा निर्णय सर्व वसतिगृहांना, महाविद्यालयांना आणि विभागप्रमुखांना कळवावा.' विद्यापीठातले वातावरण निवळेल अशी कल्पना होती, पण उलट ते अधिकच गढुळले. विद्यापीठ २५ ऑक्टोबरपर्यंत बंद ठेवण्यात आले. स्वातंत्र्याचा मुलांना ध्यास लागला होता. शिक्षकही त्याला अपवाद नव्हते. ३१ ऑक्टोबर १९४२ ला कार्यकारिणी सभेची तातडीची बैठक भरली. जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडून जा. क्र. १७३९/S.T. ता. २६/१०/१९४२ चे पत्र आल्याचे कुलसचिवांनी सांगितले. नियम १२९ / D.I.R. खाली विधिविभागातील के. के. भट्टाचार्यांना अटक केल्याचे ते पत्र होते. विद्यापीठात शांतता राहावी म्हणून जास्तीचे कार्याधिकारी आणि कनिष्ठ कार्याधिकारी नेमण्याचा उपकुलगुरूंना अधिकार दिला होता. कार्यकारिणी सभेच्या तातडीच्या बैठका एकामागून एक होत होत्या. एकदा तर सकाळी साडेआठ व संध्याकाळी साडेपाच अशा दोन सभा झाल्या. अलाहाबादच्या दुर्घटनेचे तपशिलवार वर्णन पायोनियर या वर्तमानपत्राच्या १४ ऑगस्टच्या अंकात पृ. ३ वर आले आहे. पायोनियर त्या वेळी लखनौहून निघत

---

१ १४/१०/१९१३ - १२/८/१९४२.

असे. पंडित नेहरू त्याचे संपादक होते.

ऑगस्ट १९४२ मधल्या या तापदायक घटनांचा गुरुदेवांच्या मनावर फार ताण पडला. ते वरिष्ठ अधिष्ठाता होते, त्यांच्यावर जबाबदारीही तशीच होती. आततायी परकीय सत्ता उलथून पाडण्याबद्दलच्या व तिच्याविरुद्ध उठाव करण्याच्या शिक्षकांच्या व मुलांच्या कल्पना भिन्न परींच्या होत्या. गुरुदेव हे सगळं पाहत होते. विद्यार्थ्यांबद्दलच्या पोटतिडिकेने त्यांच्या कल्याणासाठी ते देवाची प्रार्थना करत होते. कसलीही कडेलोटाची भूमिका घेऊ नका म्हणून बजावत होते. सबुरीचा सल्ला देणे व बाबापुता करून मुलांचे सांत्वन करणे चालूच होते. त्यांची प्रज्ञा, सहनशीलता व आध्यात्मिक शक्ती कामाला येत होती. संतप्रवृत्ती अवघड प्रसंगी हात देत होती. त्यांच्या नेमाने हे सगळे साध्य होत होते.

विद्यापीठातल्या या आपत्ती कमी झाल्या म्हणून की काय, आणखी एक भयाण वादळ तिकडं थैमान घालत होतं. जगभरातल्या शांततेला तडा गेला होता. दुसरं जागतिक महायुद्ध पेटलं होतं. १९४२ च्या अखेरीचा काळ कसोटीचा होता. २२ ऑक्टोबर १९४२ ही कत्तलची रात्र ठरली. त्या दिवशी अल् अमीन येथे घनघोर लढाई झाली. तिने युद्धाचे पारडे फिरले. प्रत्येकजण काळजीत होता. त्याबद्दल गुरुदेव इतरत्र[१] म्हणतात, '१९४२ मध्ये मी अलाहाबादला होतो जपान्यांनी कलकत्ता व विशाखापट्टणवर बॉंब टाकले होते. शत्रू कलकत्त्यापर्यंत आला तर मोगलसराई हे त्याला रोखून धरण्याचं ठाणं होतं. विद्यापीठाचा पदवीदान समारंभ दोन महिन्यांनी पुढे ढकलावा लागला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी माघ मेळा बंद केला होता, कारण मेळ्याला जमणाऱ्या लाखो लोकांवर हल्ला झाला असता तर प्रचंड जीवितहानी झाली असती. २३ डिसेंबर १९४२ ला पदवीदान समारंभ झाला. सगळ्यांच्या मनात चिंता होती. मी खोलीत चहा घेत असताना वर विमानं घिरट्या घालत होती. चहा घेण्याच्या त्या थोड्या वेळात बॉंब पडण्याची भीती वाटत होती. माझा नेम मनासारखा झाल्यावर मात्र माझी बालंबाल खात्री झाली की काही विपरीत घडणार नाही. नेम होईपर्यंत मनात धास्ती होती.' नेम हेच गुरुदेवांचं चिलखत

---

१ Pathway to God in Kannada Literature, 1989 edition, P. 40.

होतं. इतरांच्या नेमासाठी देखील जे काही करणे शक्य होते ते सर्व ते करीत असत (परिशिष्ट ११).

## ६ प्रभारी उपकुलगुरू

विद्यापीठाच्या कारकीर्दीतला शेवटचा टप्पा म्हणजे प्रभारी उपकुलगुरूचं पद. ४ ऑगस्ट १९४५ रोजी कार्यकारिणी सभेची बैठक झाली. 'सध्याचे कला विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. रा. द. रानडे यांना प्रभारी उपकुलगुरू नेमावे,' असा तिथे ठराव झाला. जबाबदाऱ्यांचं क्षेत्र रुंदावलं. समस्या दीड पटींनी वाढल्या. पाठोपाठ सभा होऊ लागल्या. प्रत्येक सभेची कार्यसूची ते साक्षेपाने वाचत. कार्यकारिणी सभा आणि विद्वत् सभा या दोन्ही त्यांतल्या त्यांत महत्त्वाच्या. लाल-निळी पेन्सिल घेऊन ते कार्यसूचीतले वेचक शब्द अधोरेखित करत. त्यामुळे सभेत निर्णय घेण्याची त्यांना तयारी करता येत असे. एखादी गुंतागुंतीची समस्या आली तर तिची ते अथपासून इतिपर्यंत कारणमीमांसा करीत, कारण कुणावरही अन्याय होऊ नये अशी त्यांची इच्छा असे. सभेचे संचालन करताना ते स्वस्थचित्त असत. आपण मध्ये काही न बोलता दुसऱ्याचे बोलणे ते ऐकून घेत. बोलणाऱ्याला आपली बाजू मांडायला मुभा देत. मध्ये बोलून त्यांची मते खोडत नसत. ते कधी रागावले नाहीत. त्यांचा आवाजही कधी चढला नाही. मग दरडावून बोलणे दूरच. शब्द तोलून मापून वापरले जात, वागणं पोक्त असे. सगळे आपलेच आहेत, परके नाहीत, अशा भूमिकेवरून ते बोलत, त्यामुळे सभा हसत-खेळत पार पडत. कुणाचं डोकं तापलं असलं तरी ते थंड होई. सभा संपवून येताना ते नेहमी आनंदात असत. इतरांचं मत स्वीकारलं गेलं तरी त्यांना खंत नसे, याचं कारण त्यांची निराग्रहवृत्ती. घरी परत येताना बरोबर असलेल्या विद्यार्थ्याला ते गीतेतील श्लोक, किंवा एखादे भक्तिपूर्ण पद म्हणायला सांगत.

१९४६ मध्ये एकदा कार्यकारिणी सभेच्या कार्यसूचीवर काही जटिल मुद्दे आले होते. सकाळी सकाळी ते सहायक कुलसचिव पंडित के. डी. तिवारी यांच्या घरी गेले. तिवारी अनुभवी असून आपल्या कामात निपुण होते. कोणताही प्रश्न असो, त्यांना त्याची सांगोपांग माहिती असे, आकडेवारी तयार असे. गुरुदेवांना त्यांच्याबद्दल विशेष प्रेम होते. उपकुलगुरू स्वतः आलेले पाहून तिवारी स्वागतासाठी धावत बाहेर आले. कार्यसूचीमधील काही बाबींबद्दल

त्यांना कोडं पडलं आहे हे तिवारींनी ओळखलं. एरवी नेमात मग्न असण्याच्या या वेळेला ते बाहेर कसे पडतील ? 'सिंहासनावर बसणाऱ्याच्या डोक्यावर टांगती तलवार असते,' या शब्दांनी त्यांनी गुरुदेवांचं स्वागत केलं. दोघेही खळखळून हसले. नंतर दोन तास त्यांचा विचार विनिमय झाला.

त्यांच्याकडे शिष्टाचार पाळण्याचं कृत्रिम बंधन नव्हतं. विद्यार्थी, शिक्षक, अधिकारीच काय, कुणालाही त्यांच्याकडे जाण्याची मोकळीक होती. भेटण्याची वेळ येणाऱ्याला सोयीची असेल ती. गुरुदेव नेमात असले तर मात्र थांबावे लागे. आलेला मनुष्य त्याला हवा तितका वेळ बसे. कधी चर्चा चाले, कधी कबीर, तुलसीदास किंवा मीराबाई यांपैकी कुणाचं तरी पद म्हटलं जाई. गुरुदेवांना हे सर्व आवडे. येणाऱ्याला वातावरण घरगुती वाटे. भजन चालू असताना ते मांडी घालून, एकात एक अडकवलेले हात मांडीवर ठेवून, 'ध्यानावस्थित-तद्गतेन-मनसा' असे एखाद्या पुतळ्याप्रमाणे निश्चल बसत.

विद्यापीठाच्या कामकाजासाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांनीच आपल्याकडे यावे अशी त्यांची अपेक्षा नसे. ते स्वतः त्यांच्याकडे जात. तत्वज्ञानाचे विभाग प्रमुख प्रा. ए. सी. मुखर्जी, अरेबिक व पर्शियन विषयाचे डॉ. ए. सिद्दिकी, यांचा त्यांत समावेश असे. उपकुलगुरू आपल्या घरी येणं ही सहकाऱ्यांना पर्वणी वाटे. मने जुळत. त्यांचं उत्स्फूर्त सहकार्य मिळे. मित्रमंडळी व चाहते यांचा मोठा परिवार त्यांच्याभोवती असे. तत्वज्ञानाच्या क्षेत्रात दिसणारी त्यांची समन्वयवृत्ती जीवनाच्या हरएक क्षेत्रात दिसून येई. ती त्यांच्या रक्तात होती. त्यांचं बोलणं लोक आदरपूर्वक ऐकत व भारावून जात. बुद्धिमत्तेचे तेज व आध्यात्मिक पातळी यांच्या मिलाफाने त्यांच्या सहवासात तृप्ती वाटे. साधेपणा, सुजाणता व पावित्र्य यांचं एक रसायन त्या मूर्तीत होतं.

आपल्या अधिकाराचा त्यांनी गवगवा केला नाही. ते अधिष्ठाता असताना घरी राहणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना अर्धनादारी देत, बाकीचे पैसे ते स्वतः भरत. ते उपकुलगुरू झाल्यावर डॉ. ताराचंद वाङ्मय विद्याशाखेचे अधिष्ठाता झाले. त्यांनीही मुलांना अर्धनादारी द्यावी असा आग्रह गुरुदेवांनी धरला नाही. ते फक्त अधिष्ठात्याकडे विद्यार्थ्यांची शिफारस करत. सवलत देणं न देणं अधिकाऱ्यांच्या हाती. ३१ ऑगस्ट १९४६ ला आपल्या एका विद्यार्थ्यासाठी त्यांनी ताराचंदांना पत्र लिहिलं, 'द्वितीय वर्षाच्या परीक्षेत त्याला पहिला वर्ग मिळाला असून, एकूण उत्तीर्ण झालेल्या मुलांत तो सतरावा आला

आहे. त्याची आर्थिक परिस्थिती वाईट आहे, म्हणून ही विशेष शिफारस.... आपण त्याचा जरूर विचार करालच.' स्वतःच्या मुखत्यारीत अमुक इतक्या लोकांना सवलत देण्याचा अधिकार उच्च पदस्थांनाही त्या वेळी नव्हता.

उपकुलगुरू म्हणून गुरुदेव विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य होते. त्या सभांचे अहवाल वाचताना मजा वाटते. कुणीही काहीही बोलावे. पुष्कळसे नियम धाब्यावर बसवले जात, तरी सभ्यतेचे उल्लंघन मात्र होत नसे. लंबीचौडी भाषणे, आक्षेप घेणे, हसणे, खिदळणे, प्रश्नोत्तरे, विनोद, टाळ्या वाजवणे, सगळं चालत असे. बऱ्याचशा सभांचे अहवाल वाचल्यानंतर लक्षात आलं की रजा देण्यासारख्या क्षुल्लक बाबी सुद्धा वरिष्ठ समितीकडे जात आणि प्रत्येक बाब साधकबाधक चर्चा होऊनच स्वीकारली जाई. गुरुदेव स्वस्थ चित्ताने सगळा खेळ बघत.

भारत सरकारच्या युद्ध विभागाकडे जेव्हा डॉ. अमरनाथांची प्रतिनियुक्ती झाली होती, तेव्हा सप्टेंबर १९४५ ते ऑगस्ट १९४६ पर्यंत गुरुदेव प्रभारी उपकुलगुरू होते. त्या वेळेचे अभिलेख सांगतात की ते पुन्हा एकदा प्रभारी उपकुलगुरू होते आणि १९ जानेवारी १९४७ पर्यंत या पदावर राहिले. अमरनाथ ऑगस्ट १९४६ ला युद्ध विभागाकडून परत आल्यावर त्यांनी आपले उपकुलगुरूचे पद पुन्हा हाती घेतले. आता १९ जानेवारी १९४७ पर्यंत तेच त्या पदावर राहायला हवे होते, कारण २० जानेवारीला नवे उपकुलगुरू आले असते. तसे डॉ. ताराचंद आलेही. पण अमरनाथांनी मध्येच आपल्या पदाचा राजीनामा दिला होता व तो शुक्रवार, २० डिसेंबर १९४६ ला विद्यापीठाच्या अधिसभेने मंजूरही केला होता. म्हणून २० डिसेंबर १९४६ ते १९ जानेवारी १९४७ पर्यंत दुसऱ्यांदा गुरुदेव प्रभारी उपकुलगुरू झाले. नंतर डॉ. ताराचंदांनी ती सूत्रे घेतली.

डॉ. अमरनाथांना विद्यापीठ सोडताना अतीव दुःख झाले. विद्यापीठाच्या अधिसभेत त्यांचं पहिलं वाक्य होतं- ''मित्रहो, तुमचा निरोप घेण्याची वेळ मुदतीच्या थोडी आधीच माझ्यावर आली आहे...'' त्यांचं संपूर्ण भाषण हळहळीनं भरलं आहे. विद्यापीठ हे त्यांचं जीवन होतं. ते तिथले अनभिषिक्त सम्राट होते. प्रत्येक दगड, प्रत्येक वीट, प्रत्येक झुडूप.... त्यांच्या ओळखीचं होतं. याच्या उलट गुरुदेवांचा प्रभाव विद्यापीठात सर्वत्र असला तरी, त्या पसाऱ्यात ते गुंतले नाहीत. त्यांना आसक्ती फक्त परमेश्वराची होती. कार्यकारिणी सभा, विद्वत सभा किंवा विद्यापीठाची अधिसभा,

या जागांची कर्तव्ये ते चोखपणे बजावीत, पण त्यांनी आपला जीव तिथे अडकवून घेतला नाही. विविध सभांचे अहवाल नजरेखालून घातल्यावर कळते की त्यांची कुणाशी वादावादी झाली नाही. अनेक बैठकींतली सुंदोपसुंदी पाहिली की हे वर्तन अधिकच उठून दिसते. तिथे गुरुदेव गौडपादांची भूमिका घेत- परस्परं विरुध्यन्ते तैरहं न विरुध्यते (कुणाचेही आपापसात कलह चालोत, आपण कुणाच्या अध्यात मध्यात नाही).

अमरनाथांच्या अध्यक्षतेखाली १९ ऑक्टोबर १९४६ रोजी कार्य-कारिणी सभेची बैठक झाली. हंगामी उपकुलगुरू म्हणून गुरुदेवांची कामगिरी लक्षणीय आहे असा अमरनाथांनी ठराव मांडला. तो सर्वानुमते स्वीकारला गेला. अलाहाबाद विद्यापीठाने गुरुदेवांची योग्यता जाणली होती. नोव्हेंबर १९४७ मध्ये झालेल्या पदवीदान समारंभात त्यांना सन्माननीय डी. लिट्. पदवी दिली गेली. श्रीमती सरोजिनी नायडू त्या वेळी राज्यपाल होत्या व म्हणून विद्यापीठाच्या पदसिद्ध कुलगुरू होत्या. त्यांच्या हातून पदवी-मिळाली. पण पदवी प्रमाणपत्र गुरुदेव तिथंच विसरून आले. याचा काय अर्थ असावा ? त्यांना 'डॉक्टर रानडे' म्हटलेलं आवडत नसे. 'प्राध्यापक रानडे' हेच प्रिय वाटे. दुसरं म्हणजे आता त्यांच्या व्यक्तित्वात आमूलाग्र बदल झाला होता. आधीच व्यावहारिक मानसन्मानांचा त्यांना हव्यास नव्हता. आता तर या उपाधींचं मोल शून्य झालं होतं. निव्वळ बौद्धिक व तात्त्विक चर्चेचा त्यांना वीट येऊ लागला होता. परमार्थाकडे त्यांचा लहानपणापासून कल होताच, आता तपोवृद्ध अवस्थेत परमेश्वराचा साक्षात्कार हेच त्यांचं सारसर्वस्व झालं होतं.

निवृत्त झाल्यावरही गुरुदेव दर वर्षी अलाहाबादला जात. त्यांना तिथला हिवाळा आवडे. मात्र उत्तरेतला कडक उन्हाळा सुरू होण्यापूर्वी ते निंबाळला परतत. अलाहाबादला आता विद्यापीठाचं नियमित काम नव्हतं. स्वतःचं संशोधन व संशोधनछात्रांना मार्गदर्शन चालू होतं. सैद्धांतिक तत्त्वज्ञानाची जागा आता संतकवींच्या वाङ्मयाने घेतली होती. अलाहाबादचा मुख्य दिनक्रम म्हणजे नेम व अभ्यास. व्याख्याने होतच असत. दिल्लीला ३, ४, ५ मार्च १९५२ रोजी त्यांची तीन व्याख्याने ठरल्याचे श्यामराव नीलकंठ (दादासाहेब) देशपांडे (फोटो पान पाच), यांनी २५/२/५२ ला सांगलीहून बाबासाहेब संगोरामांना अथणीला पत्र लिहिले होते. या व्याख्यानांच्या वेळी पदे म्हणायला अथणीहून बाबासाहेब संगोराम, तसेच

धारवाडचे गुरुराव नारायणराव देशपांडे यांना बोलावले होते. अलाहाबादला गेल्यावेळी पूर्वी- प्रमाणे भेटीला येणाऱ्यांची वर्दळ असे. या ज्ञानी सत्पुरुषाचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटे. ही मंडळी साधारणपणे संध्याकाळी येत. सगळ्यांचा दर्जा समान. विद्यार्थी किंवा शिक्षक असो, राजा किंवा रंक असो, अधिकारी किंवा सामान्य नागरिक असो, सगळे या मेळाव्यात मांडीला मांडी लावून साध्या सतरंजीवर बसत. गुरुदेवही त्यांच्यातच बसत. ते मोठ्या जोशात सर्वांशी बोलत. जणूकाही निवृत्त होण्यापूर्वीचं जीवन चालू आहे असं वाटे.

अलाहाबादला त्यांचे पारमार्थिक जीवनही फुलले. निंबाळला जुलै १९५२ मध्ये एका सिटिंगमध्ये ते म्हणाले, 'मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना असे झाले- सभा, भेटीगाठी इत्यादी गोष्टींमुळे माझा नेम व्हावा तसा होईना. महाराजांवरील श्रद्धा कमी झाली असे नव्हे, तर नेमात खंड पडू लागला. वाढ थांबली. असे हे चार वर्षे झाले. पुढे अलाहाबादला गेल्यावर मात्र देवाच्या कृपेने नोकरीचा व्याप परमार्थाच्या आड केव्हाही आला नाही. पुढे उपकुलगुरू झाल्यावरही देवाने माझ्या नेमात कधी खंड पडू दिला नाही. हे माझ्या प्रयत्नाने घडले असे नसून केवळ देवाच्या कृपेने घडले. असो.'

## ७ उपसंहार

१४ मार्च १९५७ ला गुरुदेव अलाहाबादला पोचले. २३ मार्चला तिथं झालेल्या वादळाचा त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला. चहा-दुधाबद्दल घृणा उत्पन्न झाली. आधीच कमी असलेला आहार एकदम कमी झाल्याने शक्ती भराभर गेली. पचनशक्ती काम करेना. अलाहाबादला या खेपेला सुख लागले नाही. गुळाचेही दुर्भिक्ष, मग खडीसाखर कुठली ? प्रकृती सुधारेना, म्हणून त्यांनी निंबाळला परत जायचे ठरवले. त्यांचं सूत्रच होतं ना- 'बरं वाटतं आहे तोवर जागचं हलू नाही, चैन पडेनासं झालं की तिथं राहू नाही.'' २६ एप्रिल १९५७ ला ते अलाहाबादहून निघाले. हातापायांत त्राण कसं ते उरलंच नव्हतं, त्यामुळे मोटारीतून उतरल्यावर प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी खुर्ची घ्यावी लागली. मित्रमंडळी, पूर्वीचे सहकारी, विद्यार्थी, निरोप घ्यायला अलाहाबाद स्टेशनवर आले होते. हा अखेरचा निरोप आहे, आता त्यांचे पुन्हा दर्शन होणार नाही, हे कुणाच्या स्वप्नातही आले नसेल. तत्त्वज्ञान विभागातला झाडून सगळा शिक्षकवर्ग उपस्थित होता; संशोधन करणारे विद्यार्थी होते. संस्कृत

विभागातले डॉ. बाबूराम सक्सेना (फोटो पान सात), भेटायला आले आणि मी निंबाळ आश्रमाला नक्की भेट देणार म्हणून सांगून गेले. निंबाळ एक शैक्षणिक व आध्यात्मिक केंद्र होते. गुरुदेवांच्या अभ्यासाची अप्रसिद्ध टिपणे निंबाळला असणार, ती पाहावी असाही त्यांचा उद्देश असावा.[१] गुरुदेव निघताना स्टेशनवर आलेल्या मंडळीत कला विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धीरेंद्र वर्मा होते. त्यांचं व गुरुदेवांचं खूप वेळ बोलणं झालं. वर्मांच्या बोलण्यातून आदर ओसंडत होता, गुरुदेवांच्या शब्दांतून माया पाझरत होती. वर्मा अगदी खुषीत होते आणि एखाद्या विशीतल्या तरुणासारखे तंदुरुस्त होते. १५ अ हेस्टिंग्ज रोड या गुरुदेवांच्या घराच्या बांधकामावर देखरेख केलेले संतोषकुमार मुखर्जी भेटून गेले. स्टेशनवर आलेली आणखी एक उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे पंडित देवीप्रसाद शुक्ला. अलाहाबादच्या या शेवटच्या मुक्कामात गुरुदेव जवळजवळ रोज संध्याकाळी शुक्लाजींच्या घरी जात. त्यांची व पंडितजींची मैत्री दीर्घ काळाची होती. गुरुदेवांची बुद्धिमत्ता, नीतिमत्ता व पारमार्थिक योग्यता यांबद्दल शुक्लाजींना फार आदर होता. भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची टिपणे ठेवलेल्या पेट्यांतून डोकावण्याचा त्यांना अधिकार होता. ती टिपणे तशीच झाकून पडू नयेत, जगाच्या नजरेसमोर यावीत, अशी त्यांना मोठी उत्कंठा होती. अभ्यासू लोकांच्या हातांत ती पडली आहेत, त्यांना अमाप फायदा होत आहे, पेट्या रिकाम्या झाल्या आहेत, असं चित्र आपण पाहावं असे त्यांना वाटे. त्या बंदिस्त टिपणांतून तात्त्विक सिद्धान्तांबद्दल मूलभूत विचार असणार अशी त्यांची खात्री होती. सैद्धान्तिक चर्चा, तौलनिक अभ्यास आणि साक्षात्काराच्या दृष्टिकोनातून लावलेला अर्थ

---

१ ते जरी निंबाळला येऊ शकले नाहीत तरी त्यांनी आपले वचन दुसऱ्या रीतीने पुरे केले. नव्या दिल्लीला भारत सरकारच्या वैज्ञानिक व पारिभाषिक शब्दावली आयोगाचे ते अध्यक्ष होते. त्या पदावर असताना १९७१ साली त्यांनी गुरुदेवांच्या ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी या ग्रंथाचा हिंदी अनुवाद, राजस्थान हिंदी ग्रंथ ॲकेडेमी, जयपूर या संस्थेतर्फे प्रकाशित करण्याची व्यवस्था केली. वास्तविक रामानंद तिवारी यांनी हा अनुवाद गुरुदेवांच्या सांगण्यावरून १९३५ च्या सुमाराला केला होता. त्याची छपाईही सुरू झाली होती. पण दुसरे महायुद्ध सुरू झाले. कागदाची टंचाई भासू लागली व छपाई अर्ध्यावर थांबली.

यांनी गुरुदेवांचे पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर हे पुस्तक खचून भरले आहे. शुक्लाजी त्याची पारायणे करीत आणि म्हणत, 'हे पुस्तक लिहून तुम्ही हिंदी जनतेवर महान उपकार केले आहेत. या अजोड ग्रंथाचे खरे मोल फारच थोड्यांना कळते हे दुर्भाग्य.'

आलेल्या चाहत्यांमध्ये इतिहास विभागातील प्रपाठक डॉ. गोविंद चंद्र पांडे होते.[१] त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानावरील आपले पुस्तक भेट दिले. गुरुदेवांनी शिव शंकर रॉय या आवडत्या विद्यार्थ्याला सांगितले की बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास कर आणि त्यातले महत्त्वाचे सिद्धान्त लक्षात घे. शिव शंकर रॉय यांचा भाऊ उपसचिव होता, तोही स्टेशनवर आला होता. इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. सक्सेना तसेच गुरुदेवांचे एक सहकारी रामनाथ कौल हेही हजर होते. गुरुदेव कला विद्याशाखेचे अधिष्ठाता असतानाचे त्यांचे कारकून हर्बट विल्यम्स यांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. श्रीरंजन हे आदल्या दिवशी, २५ तारखेला दुपारी येऊन गेले होते. मनमोकळ्या गप्पा झाल्या होत्या. श्री. गोविंद दास, डॉ. भगवान दास वगैरे पूर्वीच्या अलाहाबादच्या नामवंत व्यक्तींच्या व त्यांच्या वेळच्या अनेक घटनांच्या आठवणी निघाल्या होत्या. विद्यापीठाच्या कामकाजात मी लागेल ती मदत करीन असे गुरुदेवांनी श्रीरंजन यांना आश्वासन दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी आगगाडीत गुरुदेवांनी जे टिपण लिहून घेतले त्यात नोंदले आहे की, 'श्रीरंजन आता पूर्वीसारखे राहिले नाहीत, बरेच मृदू झाले आहेत, तापटपणा खूप कमी झाला आहे.'

गाडी स्टेशनात येऊन उभी राहिली. यात्रेचा शेवट झाला. गुरुदेव मुंबईला जाणाऱ्या गाडीत बसले. भेटायला आलेली मंडळी प्लॅटफॉर्मवर राहिली. आता पुन्हा पोचवायला येण्याची संधी येणार नव्हती. पण हे कुणाच्याही गावी नव्हते. गाडीची शिट्टी झाली. मागच्या ३० वर्षांच्या आठवणी घेऊन गुरुदेव निघाले. नेहमी दिसणारी दृश्ये मागे पडू लागली. झाडांच्या सावल्या लांब होऊ लागल्या. शहराच्या खुणा अस्पष्ट होऊ लागल्या. गाडीने वेग घेतला आणि ती अलाहाबादच्या सीमेच्या बाहेर पडली. गुरुदेवांनी या लाडक्या शहरावर शेवटची

---

१ हे पुढे मध्य प्रदेशातील एका विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले.

नजर टाकली. त्यांच्या बौद्धिक व पारमार्थिक जीवनावर या भूमीने पाखर घातली होती, त्याची जोपासना केली होती. गाडी धावत होती. आता अलाहाबाद खूप खूप मागं पडलं. अलाहाबादला आपण पुन्हा येणार नाही, असं त्यांना वाटलं असेल का ? त्यांच्या मनात काही विचार आले असतील का ? मौनानेच त्यांनी त्या शहराचा निरोप घेतला असेल का ? मूक शब्द असलेच तर ते काहीसे असे असतील का ? ''हे प्रयागक्षेत्रा, तुझी व माझी घनिष्ठ मैत्री जडली. पण आता ताटातुटीची वेळ आली. तुझ्या पवित्र मातीतून कर्तबगार व पुण्यवान जीव निपजोत आणि तुला वैभवाच्या शिखरावर नेऊन ठेवोत. आता

आम्ही जातो आमुच्या गावा ।
आमुचा रामराम घ्यावा'' ॥

## २ मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु ॥

(अलाहाबाद येथील अध्यात्म परिषदेच्या विद्यमाने एक सभा २२/९/१९६३ रोजी भरली होती. त्या वेळेस अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागातील प्राध्यापक शिव शंकर रॉय यांनी केलेले भाषण)

उपस्थित बंधुभगिनींनो,

माझ्यासमोर असणारे तुम्ही श्रोते भक्ती आणि जिव्हाळा यांच्या अदृश्य धाग्यांनी एकमेकांशी बांधले गेले आहांत. आपण परमार्थासाठी शिरोव्रतच[1] घेतले आहे म्हणा ना. शिवाय पूज्यपाद गुरुदेव रा. द. रानडे यांच्या कृपाशीर्वादासाठी आपण आसुसलेले आहांत.

माझे स्नेही व गुरुबंधू शा. नी. देशपांडे यांचा मी अत्यंत ऋणी आहे. आपल्याला सन्मार्गाला लावणाऱ्या सद्गुरूंचे स्मरण करून देणारे चार शब्द या कृपामंदिरात आपल्यासमोर बोलावे अशी त्यांची मला आज्ञा झाली. चर्मचक्षूंना न दिसेनात का, पण गुरुदेव नित्य आपल्या सन्निध आहेत. दुर्धर अशा संसारसागरावरील आपल्यासारख्या प्रवाशांच्या हृदयात त्यांनी प्रकाशज्योत

---

१ मुंडकोपनिषद् , ३/२/१०, या मंत्रात शिरोव्रत शब्द आला आहे. डोक्यावर अग्नी धारण करण्यासारखे कठीण कार्य करणे असा त्याचा अर्थ. शिरोव्रतात विधिपूर्वक अग्नी डोक्यावर घेतला जातो. असे दुष्कर काम ज्याला साधेल त्या श्रद्धावान् शिष्यालाच ब्रह्मविद्या द्यावी असा या उपनिषदाचा दंडक आहे. (पाहा- R.D. Ranade, A Constructive Survey of Upanishadic Philosophy, 2003 Edition, P. 232).

देशकार्यासाठीही असेच दिव्य करावे लागते, हे स्वातंत्र्यवीर सावरकर सांगत नाहीत का ? त्यांच्या या ओळी पाहा-

की घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें ।<br>
लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-मानें ॥<br>
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें ।<br>
बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥

पेटवावी, दीपस्तंभाप्रमाणे किंवा ध्रुवताऱ्याप्रमाणे आपल्याला वाट दाखवावी अशी मी त्यांची करुणा भाकतो. फक्त आपल्या एकट्यासाठीच नव्हे, तर जो जो कुणी गुरुदेवांच्या संपर्कात आला, त्या सर्वांसाठी १५ अ हेस्टिंग्ज रोड या गुरुदेवांच्या निवासस्थानी भक्तीचा दिवा तेवत ठेवून देशपांडे यांनी आपल्याला उपकृत केले आहे. आचार्य रामचंद्र दत्तात्रेय रानडे हे महाराष्ट्रात रामभाऊ रानडे या नावाने ओळखले जात हे सर्वश्रुत आहे. देशपांडे यांची गुरुदेवांवरील निष्ठा एवढी जबरदस्त होती की त्यांच्या छत्राखाली येण्यासाठी त्यांनी आपल्या कृषिशास्त्राच्या अभ्यासाला रामराम ठोकला. ते अलाहाबादला आल्यावर गुरुदेवांच्या घरातील ओसरीवर त्यांची व माझी भेट झाली. 'हे कोण ?' अशी मी गुरुदेवांजवळ पृच्छा केली. आपल्या वात्सल्यभरल्या शब्दांत गुरुदेव म्हणाले, ''साधीसुधी शेती सोडून अध्यात्मातली शेती करण्यासाठी, दूरवरून महाराष्ट्रातून हे आले आहेत बरं का.'' मी उमजलो. तरुण पिढीला आध्यात्मिक जीवनाचा लाभ व्हावा याची गुरुदेवांना इतकी ओढ होती की चांगले किफायतशीर व्यावसायिक शिक्षण घेणारा विद्यार्थी, तो रस्ता सोडून तत्त्वज्ञानासारख्या बिगरव्यावसायिक क्षेत्रात शिरला तरी तसे करण्यात काही धोका आहे किंवा नुकसान होत आहे असे त्यांच्या मनाला शिवले नाही. देशपांडे येण्याच्या आधीपासून, किंबहुना गुरुदेव अलाहाबादला आल्यापासून त्यांचे घर म्हणजे 'अधिकारपत्र न मिळालेले परमार्थमार्गावरील सैनिक'[1], किंवा साऱ्या देशभरातून आलेले तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी, यांचे एक शिबिर होते. राहणे गुरुदेवांच्या घरी, जेवणखाण व शिक्षण त्यांच्याच खिशातून. या त्यांच्या आश्रमात खंडीभर विद्यार्थ्यांचा सदोदित वावर असे. १९३९ सालापासून पाठोपाठ येणाऱ्या पोरांची रांग मी पाहत आलो आहे. जन्माला आल्यासारखं त्यांच्या दर्शनाचं भाग्य मला लाभलं ते त्या वर्षी.

गुरुदेव १९४३ साली आपल्या नव्या आश्रमवजा घरात राहायला गेले. २ बेली रोड या त्यांच्या आधीच्या घरी माझी त्यांच्याशी प्रथम भेट झाली. आता या घरात औषधे तयार करण्याचा कारखाना निघाला आहे. असो. १५ अ हेस्टिंग्ज रोड या घराचं मूळ रूप ही २ बेली रोड या घराची खरी प्रतिमा आहे.

---

१ मूळ लेखातले शब्द : Spiritual N.C.O.s (Non-Commissioned-Officers).

प्लेटोने आयडिया (वस्तूचे मूळ रूप) व तिची कॉपी (प्रतिकृती) या साधर्म्याच्या कल्पना मांडल्या आहेत. प्लेटोच्या मते प्रतिकृती व्यवहारात अनुभवाला येत असली तरी तिचे मूळ रूप व्यावहारिक जगाच्या पल्याडच्या विश्वात असते. इथं मात्र ही दोन्ही घरं ह्याच गावात उभी आहेत, अगदी तंतोतंत तेच रूप घेऊन उभी आहेत. समजा तुम्ही त्यांतलं एक घर पाहिलं आणि नंतर डोळे बांधून तुम्हाला दुसऱ्या घरात नेऊन सोडलं, तर फक्त बाहेरचा रस्ता आणि भोवतालचा परिसर वेगळा दिसेल. पण घर जसंकाही आधीचंच. खोल्यांची रचना अगदी तीच. ओसऱ्या पडव्या अगदी तश्शाच. का बरं ? प्रसंगवशात् हा प्रश्न मी गुरुदेवांना विचारला. ते थोडा वेळ स्तब्ध राहिले. नंतर म्हणाले, ‘शिव शंकर, आपल्या स्वतःच्या निर्जीव वस्तूदेखील आपलं एक अविभाज्य अंग होऊन बसत नाहीत का ? या गावात २ बेली रोड या घरापेक्षा निराळ्या बांधणीच्या घरात मला कसं बरं राहता येईल ?’ या त्यांच्या बोलण्यातून मला काय बोध झाला सांगतो. आत्मा अविकारी आहे. तिथे विविधतेची भाषा गैरलागू आहे. उलट व्यवहारात गुरफटलेल्या आपल्यासारख्या सामान्यांचं मन क्षणोक्षणी पालटणाऱ्या भपकेदार देखाव्यांच्या मागे धावत असतं. विश्वाच्या मुळाशी असलेलं एकलं एक अधिष्ठानच अनंतवेषें अनंतरूपें नटून या जगाच्या रूपानं उभं आहे हे ज्यांना कळत नाही, त्यांचं प्रेम रंग, रूप, आकार, यांच्या वैचित्र्यावर आणि नाविन्यावर असतं. मध गोळा करण्यासाठी एका फुलावरून दुसऱ्यावर बसणारी मधमाशीच जणू. पण मध (आत्मानंद) बाह्य फुलात नसून अंतरात्म्यात आहे हे त्यांच्या ध्यानात येत नाही. गुरुदेवांचा आत्मानंद अद्वैतभावात भरला होता. अद्वैत हे त्यांच्या जीवनाचं सूत्र होतं. एका पदार्थाचे सुटे सुटे घटक पाहण्यात त्यांना रस नव्हता. उलट अनेक छकलांना एकत्र गोवणारा धागा त्यांना सहज सापडे. ते एकत्वाचे उद्‌गाते होते. अखिल ब्रह्मांडात एकच चित्-तत्त्व ओतप्रोत भरलं असल्याचा ज्याला अनुभव आहे, त्याला भोवतालच्या वस्तूंच्या रंगरूपांतला भेददेखील तिरस्करणीय आणि म्हणून नकोसा वाटतो. १९२७ ते १९४३ आणि १९४३ ते १९५७ अशा कालखंडात गुरुदेव अलाहाबादला ज्या दोन घरांत राहिले त्यांची समान रचना त्यांच्या समदर्शनाची साक्षीदार आहे. मीतर या एकसारख्या घरांना एक सांकेतिक लिपी समजतो. ज्याला ती वाचता आली, त्याच्या डोळ्यांसमोर गुरुदेवांच्या अंतःकरणाचं कवाड सताड उघडलं म्हणून खुशाल समजावं. त्यांचं

तत्त्वज्ञान आणि जगाच्या पसाऱ्याकडे पाहण्याचा त्यांचा एकतत्त्ववादी दृष्टिकोन तिथं मांडून ठेवल्याप्रमाणे दिसतो. कितीतरी गोष्टींत ते प्रसंगी तल्लीन होत. त्यांतला एखादा गुण तल्लीनतेला निमित्त पुरवी. पण त्यांपैकी एकही गोष्ट त्यांचं सांगोपांग दर्शन घडवू शकत नसे. जगाच्या विशाल रंगभूमीवर विविध भूमिका वठवताना त्यांची साम्यदृष्टी उठून दिसे. बाह्य जग आत्मरूपाचा आविष्कार आहे, या त्यांच्या भूमिकेतून, अणुरेणूंहून थोकड्या व आकाशाएवढ्या व्यापक वस्तूंवर त्यांना आपल्या आत्म्याचं प्रतिबिंब दिसे. ती दोन समानधर्मी घरं त्यांच्या आत्म्याचीच दृश्य रूपे. त्यांचा राम म्हणजे आत्माराम, तोच सर्वत्र दृष्टीस पडे. त्याला क्षय नाही, त्यात काही न्यून नाही, त्याला उतरती कळा नाही. जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांत तो तोच आहे. अशा उन्मनी स्थितीत ते रंगून जात. संतसज्जनांनी आपापल्या तात्त्विक मतांनुसार, या अवर्णनीय अवस्थेचं 'वर्णन' करायला निरनिराळ्या संकल्पना मांडल्या आहेत. कुणी तुरीया[१] म्हणेल, तर कुणी चित्-तत्त्वाचं चिंतन[२] म्हणेल. कुणी या स्थितीला ईश्वरावरील ज्ञानयुक्त प्रेम[३] हे नाव देईल तर कुणी मानवातल्या देवाचं दर्शन[४] असा तिचा उल्लेख करेल. कबिरांची

---

१ मांडूक्य उपनिषदात (१.२) आत्म्याला चतुष्पात् म्हटले आहे. अवस्थात्रयीच्या पलीकडची अवस्था तुरीय, किंवा चवथा चरण. चतुर्थ या उपनिषदातील शब्दाला तुर्या किंवा तुरीया हा शब्द गौडपादाचार्यांनी वापरला असून मांडूक्यकारिकेत तुर्येवर त्यांनी दीर्घ भाष्य केले आहे.

२ मूळ लेखात आलेला Theoria हा शब्द ॲरिस्टॉटलचा आहे. त्याचा अर्थ चित्-तत्त्व. ते स्वतःचंच चिंतन करत असतं, कारण त्याच्या बाहेर काहीच नसतं. स्वतःच्या चिंतनात त्याला आनंद मिळतो. या तत्त्वाला Beatific Theoria (चिदानंद) असे गुरुदेवांनी आपल्या वेदान्तावरील पुस्तकात पृ. २१३ वर म्हटले आहे.

३ लेखातले शब्द Amor intellectualis dei (intellectual love of God) असे आहेत. हा लॅटिन वाक्प्रचार स्पिनोझाच्या तत्त्वज्ञानातील आहे. हे तार्किक ज्ञान नव्हे. स्पिनोझाच्या मते सर्वाभूती एक ईश्वर, अशी प्रचिती येणे हे खरे ज्ञान. या ज्ञानाने ईश्वराबद्दल प्रेम वाटते.

४ लेखकाने Ecce Homo हा लॅटिन शब्दप्रयोग वापरला आहे. त्याचा अर्थ Behold the Man. काटेरी मुकुट घातलेल्या व दोरखंडानी बांधलेल्या जीजस ख्राइस्टच्या संदर्भात हे शब्द येतात (सेंट जॉन, १९.५). या मानवात ईश्वराचे

सहज समाधी[१] हीच. रुडॉल्फ ऑटोचे विलक्षण-रौद्र[२], किंवा कांटचे वस्तुतत्त्वसुद्धा[३] हेच. आणखी एक विचारवंत अंतिम तत्त्वाला मन[४] म्हणतो. मन हे ईश्वरस्वरूप आहे आणि हा ईश्वर म्हणजे सर्वेश्वर[५], किंवा सर्व खल्विदं

---

दर्शन होते असे तिथे ध्वनित केले आहे.

१ कबिरांनी ईश्वराच्या साक्षात्काराने मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन 'साधो सहज समाधि भली' या पदात केले आहे. त्यांनी या स्थितीला उन्मनि रहनी म्हटले आहे. गुरुदेवांनी आपल्या Pathway to God in Hindi Literature या ग्रंथात याची चर्चा केली आहे (१९९७ आवृत्ती, पृ. २८०-२८१).

२ Mysterium Tremendum हे लेखातले लॅटिन शब्द रुडॉल्फ ऑटोचे आहेत. विलक्षण व रौद्र अशी परमतत्त्वाची दोन लक्षणे तो देतो. विलक्षण म्हणजे खरोखरी अलक्षण. परवस्तूच्या अनुभवाचे शब्दांत वर्णन होत नाही. सर्वशक्तिमान परमेश्वराचे रौद्र हेही एक अलक्षणाचे लक्षण ! या दोन्ही 'लक्षणांनी' आपण दबले जाऊन स्वतः किडामुंगी असल्यासारखी भावना मनाची पकड घेते. त्यामुळे भृत्यभाव किंवा किंकरभाव येतो. रुडॉल्फ ऑटोबद्दल गुरुदेवांना आदर असून त्याच्या The Idea of the Holy या पुस्तकावर त्यांचे प्रेम होते.

३ Noumenon हा लेखातला शब्द ग्रीक भाषेतील Nooumenon पासून आला आहे. त्यासाठी जर्मन भाषेत Ding-an-sich हा शब्दप्रयोग वापरतात. त्याचा इंग्रजी पर्याय Thing-in-Itself (वस्तुतत्त्व). Noumenon हा शब्द प्रामुख्याने कांट वापरतो. वस्तू 'दिसते तशी' (Phenomenon) व 'असते तशी' (Noumenon) असा फरक कांट करतो. वस्तुतत्त्व म्हणजे अंतिम तत्त्व. कांट हा गुरुदेवांवर त्यांच्या पहिल्या ग्रंथापासून अखेरच्या ग्रंथापर्यंत प्रभाव असणारा जर्मन तत्त्वज्ञ.

४ लेखातला शब्द Nous. ॲनॅक्झेगोरास या ग्रीक तत्त्वज्ञाने अंतिम तत्त्वासाठी हा शब्द योजला आहे. त्याच्या मते ते तत्त्व शुद्ध, बुद्ध, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान व सर्वव्यापक आहे.

५ Pantheos हा ग्रीक शब्द मूळ लेखात आहे. Pantheism (all is God) या सिद्धान्ताप्रमाणे जे काही आहे ते ईश्वर. 'जें हें आघवें मीचि आहे' (ज्ञानेश्वरी ९:३४५) ही निष्ठा.

लेखकाने वर वापरलेले सर्व शब्द अंतिम तत्त्व किंवा त्यात होणारी तल्लीनता सुचवतात.

ब्रह्म ही प्रचिती. आत्मा म्हणजे ईश्वरच; यात अखिल वस्तुजाताचा समावेश होतो. जागृतावस्थेत आत्मानंदाचा निःसंदेह अनुभव येतो, शांतीही मिळते. तिथे एकान्तीचे सुख असते; हर्षखेद व द्वैत ही मावळतात. ईश्वर म्हणजे वस्तूमधलं चैतन्य, सत्यातलं सत्य, ही जाणीव असते. तत्त्वज्ञानाचा अभ्यास म्हणजे तरी काय ? ती खऱ्या ज्ञानाची सुरवात. ब्रह्मज्ञानात होणारा चंचुप्रवेश म्हणा ना. कवणें एकें मिसें । चित्त माझ्या ठायीं प्रवेशें । असा हा प्रारंभ. वस्तूच्या वरवरच्या ज्ञानाने हा चंचुप्रवेश होत नाही, त्यासाठी विश्वाला व्यापून दशांगुळे उरलेल्या आत्मतत्त्वाचं अन्तर्ज्ञानच व्हावं लागतं. कोरडा तर्क तिथं पांगुळतो. अंतिम तत्त्वाची ओळख पटू लागली की संकेतांचा अर्थ उमगू लागतो.[१] पिंड-ब्रह्मांड यांचे ऐक्य, समग्र विश्वातले आत्मैक्य, जेव्हा मनावर बिंबतं तेव्हा संकेताचा प्रभाव, त्याची खोली, ठसा उमटवण्याचे त्याचे सामर्थ्य, लक्षात येते. ऐक्याची दृष्टी आल्याशिवाय खराखुरा पारमार्थिक अनुभव येत नाही. आणि संकेताचा अर्थ समजण्याची ज्या साधकाची तयारी नाही, त्याला बाहेरून ही दृष्टी कुणी देऊ शकत नाही. पण एकदा का संकेताचा गुह्य अर्थ उलगडण्याची गुरुकिल्ली सापडली की आत्मैक्य आरशासारखं स्वच्छ दिसायला लागतं,[२] इतकं की, 'अरे हे तर सगळं मला आधीपासूनच माहीत होतं,'[३] अशी त्याची प्रतिक्रिया होते. नव्यानं लाभलेल्या या दृष्टीचं यथार्थ वर्णन मांडूक्य उपनिषदात

---

१ व २ अंतिम तत्त्वाची ओळख पटल्यावर संकेतांचा अर्थ कळतो व संकेतांचा अर्थ उलगडल्यावर आत्मैक्य स्पष्ट होते, यांत परस्पर-कारणता आहे. दोन्ही एकमेकांची कारणे व कार्ये असून दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी चालतात. सर्वत्र एक आत्मा पाहण्याची गुरुदेवांची प्रगल्भ दृष्टी दोन घरांतील किंवा दोन नावांतील साम्य सहज टिपते. उलट सामान्य माणसाला दोन वस्तूंतील साम्यापासून (संकेतापासून) पायरीपायरीने अखिल वस्तुजाताच्या ऐक्याकडे जावे लागते. अर्थात् दोन्ही प्रक्रिया एकमेकीला साहाय्य करतात आणि दोन्ही ठिकाणी साधकाची तयारी अपेक्षित आहे.

३ हा भाग वाचताना आपण ज्ञानेश्वरी वाचत आहोत असे वाटते. पाहा :-

परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियातें आपण देखे ।<br>
देखतखेवो वोळखे । म्हणे तत्त्व हें मी ॥ (६. ३६६).

सापडतं. तिथं आत्म्याला प्रपंचोपशम, शांत, शिव, अद्वैत, चतुर्थ असं म्हटलं आहे.[1] विश्वरूपदर्शन म्हणजे तरी काय ? दृश्य पदार्थांच्या अंतरंगाचा बोध होणे, प्रत्येक गोष्ट 'बोली अरूपाचे रूप' दाखवते हे कळणे, हर एक वस्तू हा संकेत असून तो ईश्वराकडे बोट दाखवतो हे उमजणे किंवा जगातल्या कोणत्याही पदार्थाकडे देवाने पाठ फिरवली नाही अशी प्रचिती येणे, हा विश्वरूपाचा गाभा आहे.

क्षणभरात एका नवीन कल्पनेत माझी तंद्री लागली. 'झाडांना जिभा आहेत, खळखळणाऱ्या झऱ्यांत पुस्तकातलं ज्ञान आहे आणि दगडधोंड्यांत प्रवचनं साठवली आहेत (As You Like It, II. 1) या शेक्सपियरने केलेल्या वर्णनाप्रमाणे मला एक वेगळी दृष्टी लाभली व तिने माझ्या मनाचा ताबा घेतला. २ बेली रोड व १५ अ हेस्टिंग्ज रोड या थेट एकाच रचनेच्या गुरुदेवांच्या दोन घरांत माझ्या तंद्रीचं कारण मला सापडलं. दोन्ही ठिकाणी ते तितकीच म्हणजे १४ वर्षे राहिले.[2] पहिल्यात १९२९ ते १९४३ व दुसऱ्यात १९४३ ते १९५७. घरांची रचनाच काय पण तिथे राहण्याचा तंतोतंतपणाही बोलका आहे. गुरुदेवांच्या मनात ठसलेल्या सर्वभूतात्मैक्यज्ञानाचा तो एक अनपेक्षितपणे घडलेला आविष्कार होता.

---

१ मांडूक्य उपनिषद् , १.७. आत्मा प्रपंचोपशम (व्यावहारिक जाणिवा नष्ट झालेला), शांत, शिव (आनंदमय) अद्वैत, चतुर्थ (जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती या तिन्हींच्या पलीकडचा) असून त्याचाच अनुभव घेण्याचा आदेश तिथे आहे.

२ गुरुदेव २ बेली रोड या घरात १४ वर्षे व १५ अ हेस्टिंग्ज रोड या घरातही तितकीच म्हणजे १४ वर्षे राहिले हे लेखकाने अंदाजाने लिहिले आहे. गुरुदेव २ बेली रोड या घरात १० जानेवारी १९२८ ला राहायला गेले व १६ वर्षांनी पुन्हा १० जानेवारी १९४४ रोजी १५ अ हेस्टिंग्ज रोड या घरात गेले. या नव्या घरी राहायला गेल्याची बातमी प्रह्लाद हणमंत कुलकर्णी यांनी अलाहाबादहून निंबाळला जगन्नाथपंत लेले यांना १८/१/१९४४ रोजी पत्र लिहून कळवली. ते म्हणतातः 'तारीख १० रोजी संध्याकाळी, १९२८ पासून १६ वर्षे वास केलेला बंगला सोडून आम्ही सगळेजण नव्या बंगल्यात आलो'. म्हणजे राहण्यातील समानता मुदतीत नसून राहायला जाण्याच्या तारखेत आहे.

या ऐक्यदृष्टीची दोन उदाहरणे मी देणार आहे. ती देताना मी माझ्या पूर्वायुष्यात डोकावणार आहे, कारण या घटनांतून गुरुदेवांची समदृष्टी यथार्थतेने प्रकट होते. पुढे माझे गुरुदेवांशी जे आत्मीयतेचे नाते जडले त्याच्या खाणाखुणा इथे स्वच्छपणे दिसतात.

पहिला वृत्तांत १५ ऑगस्ट १९३९ चा म्हणजे उण्यापुऱ्या २४ वर्षामागचा आहे. इंग्रजी विषय घेऊन मी आग्रा विद्यापीठातून एम. ए. झालो होतो व १९४० सालच्या आय. सी. एस. परीक्षेची तयारी करावी म्हणून अलाहाबादला येऊन राहिलो होतो. माझ्याशी मैत्री असलेला माझा एक नातेवाईक भोलानाथ रॉय त्याच व्यापात गुंतला होता. अलाहाबाद विद्यापीठातून १९३९ मध्ये तो एल. एल. बी. झाला होता. मला त्याने सांगितले होते की प्रा. रानडे हे एक साक्षात्कारी पुरुष असून १४ पेक्षा जास्त वर्षे ते दिवसाकाठी पोटात जाणाऱ्या चार-आठ कप चहावर होते. गावातल्या दोन चार बड्याबड्या डॉक्टरांच्या मते वैद्यकशास्त्रासमोर हे एक कोडेच होते. शरीरशास्त्राच्या चिकित्सेच्या जोरावर या प्रकरणाचा काही उलगडा होण्यासारखा नव्हता. अशा आगळ्या वेगळ्या व्यक्तीचे दर्शन घेण्याच्या तीव्र इच्छेने १५ ऑगस्ट १९३९ ला मी त्यांच्यासमोर उभा ठाकलो. या महापुरुषाशी झालेल्या संभाषणाचा अहवालच मी आपल्यापुढे ठेवतो.

प्रा. रानडे :- तुमचं नाव काय ? तुम्ही काय करता ? तुम्ही कुठे राहता ? (एखाद्या-अर्ध्या प्रश्नावर त्यांचे कधी भागले नाही. ते प्रश्नांची सरबत्तीच करीत असत). मी म्हणालो, ''माझे नाव शिव शंकर रॉय. मी आग्रा विद्यापीठातून एम. ए. झालो आहे. आता मी आय. सी. एस. च्या परीक्षेची तयारी करीत आहे. कटरा भागात म्यूर वसतिगृहाच्या[१] समोर मी राहतो.''

---

१ अलाहाबाद विद्यापीठातले म्यूर वसतिगृह एक बडे प्रस्थ होते. उच्च श्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनाच तिथे प्रवेश मिळे. ललित कला किंवा खेळ या क्षेत्रांत चमकलेले विद्यार्थीही तिथे घेतले जात. इथले बहुसंख्य रहिवासी आय. सी. एस. सारख्या अखिल भारतीय परीक्षांतून उत्तीर्ण होत. त्यांना यासाठी तयार केले जाई. डॉ. अमरनाथ झा वर्षानुवर्षे या वसतिगृहाचे प्रमुख होते. त्यांची स्मृती म्हणून आता या वसतिगृहाचे जुने नाव बदलून त्याला अमरनाथ झा वसतिगृह हे नाव दिले आहे.

प्रा. रानडे :- छान, छान. तुम्ही भोलानाथ रॉय यांच्याबरोबर आला आहांत. आता पाहा, भोलानाथ रॉय आणि शिव शंकर रॉय म्हणजे एकच नाहीत का हो ? मला तरी तुम्हा दोघांमध्ये काही फरक वाटत नाही. आणि शिवाय, तत्त्वज्ञान हा विषय तुमच्या अभ्यासक्रमात केव्हातरी येऊन गेलेला आहे. आता तुम्ही दोघेही अलाहाबादलाच राहून तत्त्वज्ञानाचा पुढचा अभ्यास का बरं करत नाही ? तुम्ही दोघेही त्या विषयात प्राविण्य मिळवाल. भोलानाथ आणि शिव शंकर या दोन्ही नावांचा अर्थ तर एकच आहे. आणि एवढ्यावर काय झाले आहे ? तुमची दोघांची आडनावे सुद्धा एकच आहेत. आता ठरलं, तुम्ही दोघेही आजपासून माझे विद्यार्थी झालांत.

त्या वेळी भोलानाथ किंवा मी कुणीच एम. ए. च्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी त्यांच्याकडे मुळीच गेलो नव्हतो. पण या नवीन उद्भवलेल्या गुंत्यातून आम्हाला बाहेर पडता येईना. एकदा एम. ए. झाल्यावर पुन्हा एकदा त्या परीक्षेला बसण्याचा माझा काडीइतकाही इरादा नव्हता. हर्बट विल्यम्सना[१] गुरुदेवांनी हाक मारली. भोलानाथ रॉय व शिव शंकर रॉय यांना एम. ए. च्या (तत्त्वज्ञान) वर्गात नावे घालण्यासाठी प्रवेशपत्रिका घेऊन या, असे त्यांना सांगितले. अजून आमच्या प्रवेशावर शिक्कामोर्तबाचा पत्ता नव्हता. तेवढ्यातच, 'उपनिषदांतील तत्त्वज्ञान' हा विषय ते ज्या वर्गाला शिकवत होते, त्या वर्गात येऊन बसा असे त्यांनी आम्हाला फर्मावले.

आम्हा दोघांत काही फरक नाही या गुरुदेवांच्या उद्गारात मोठाच आशय भरला आहे. आम्हाला लगोलग तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी म्हणून पटावर आमची नावे घालण्याचा आग्रह धरणे फार फार सूचक होते. तो एक संकेत होता. पण त्या संकेताची मुळी आमच्यामध्ये शोधून सापडणारी नव्हती. गुरुदेवांच्या आत्मौपम्यदृष्टीने जे काही पाहिले त्यातून ती उगवली होती. दोन नावांचा समान अर्थ तो काय, पण हे साधं साम्य वैश्विक ऐकात्म्याचं प्रतीक ठरलं. त्यांनी गमतीने सारखेपणाचा उल्लेख केला अशी त्या वेळी आमची

---

१ 'हे सध्या अलाहाबाद विद्यापीठात सहायक कुलसचिव आहेत. आमचे संभाषण चालू होते त्या वेळी ते तत्त्वज्ञान विभागाच्या कचेरीत होते,' असे डॉ. रॉय या भाषणाच्या वेळी म्हणाले.

समजूत झाली. पण छे, ती गंमत नव्हती, तर तो त्यांचा स्थायिभाव होता. समानतेवर बोट ठेवून ते आपल्या अंतरात्म्यातले गुज आमच्यासमोर मांडत होते तर ! परंतु दोन भिन्न विद्यापीठांतून पदव्या घेतलेल्या आम्ही दोघा तरुणांनी त्यांच्या सांकेतिक शब्दांचा खोल अर्थ जाणलाच नाही. किंबहुना ते शब्द सांकेतिक असावेत असा पुसटसुद्धा बोध आम्हाला झाला नाही.

अभिन्नता दिसली की गुरुदेवांना आनंदाच्या उकळ्या फुटत व ते हर्षभरित होत. अशा वेळी 'छान, छान, उत्तम, उत्तम,' असा घोष त्यांच्या मुखातून बाहेर पडे. अर्थात् त्यांच्या हर्षोन्मादाची तीव्रता काय किंवा खोली काय, ती व्यक्त करण्याच्या कामी एकजात सगळे शब्द फुसके होते, पोकळ होते. यच्चयावत् पदार्थ (ते निर्जीव वस्तू असोत, की मनुष्यप्राणी असोत), केवळ रूपके, बोधचिन्हे, किंवा संकेत असून त्यांच्या बुडाशी एक सर्वव्यापी, भेदशून्य, एकजिनसी, अमर्यादित, नित्य व अविकारी चैतन्याची सत्ता आहे अशी त्यांची धारणा होती.

त्यांच्या ऐक्यदृष्टीचे दुसरे उदाहरण सांगतो. दैनंदिन व्यवहारात समोर येणाऱ्या गोष्टी आपल्या ज्ञानाचे विषय म्हणजेच ज्ञेय (जे जाणून घ्यायचे आहे ते) या स्वरूपात भेटतात. इथे विषमता अटळ आहे, कारण प्रत्येक पदार्थ वेगळा असतो. ज्ञेयाबरोबर ज्ञातेही (जाणणारे) असतात. तेही वेगवेगळे असतात. किंबहुना एक ज्ञेय व दुसरे ज्ञेय, एक ज्ञाता व दुसरा ज्ञाता, ज्ञाता व ज्ञेय, मनुष्य व ईश्वर, जग व ईश्वर सगळेच एकमेकांहून भिन्न असतात. व्यक्ती तितक्या प्रकृती. परंतु अशा विषमतेने बुजबुजलेल्या जगात वावरत असूनही गुरुदेव समानतेची जपणूक करत.

त्यांचे नामस्मरण सतत चालू असे. काही काळ ते तुर्यावस्थेत म्हणजे उन्मनी अवस्थेत असत. देशकालवर्तमान यांचे भान हरपलेल्या ध्यानावस्थेत त्यांना अपरिमित आत्मानंदाचा लाभ होई. 'इथे-तिथे', 'काल-आज' अशा स्थल व काल यांनी जखडलेल्या व्यवहारात राहणाऱ्या व त्यांच्या उन्मनी स्थितीचा गंध नसलेल्या, आमच्यासारख्यांच्या जीवनांवर या आनंदाचा प्रभाव पडे आणि मग 'भागसीण गेला । माझा सकळ विठ्ठला ।' अशी आमची स्थिती होई. अवतीभोवती असणारी माणसे पारमार्थिक योग्यतेच्या मापाने त्यांच्यापासून कैक योजने दूर होती. त्यांच्या उठण्याबसण्यातून सुद्धा

आनंदाचा स्रोत वाहत असे. अगदी क्वचित् प्रसंगी मी त्यांना रागावलेले, दुर्मुखलेले किंवा उदासीन असलेले बघितले आहे. स्वतःमध्ये काही कमतरता आहे असे वाटून स्वतःवरच रुसणे हा त्यांचा राग. उदासीनता म्हणजे देवापासून दूर जाणे. त्यांची आनंदी किंवा उदास चर्या एखाद्या वायुभार मापक यंत्रासारखी होती. प्रकृती अतिशय नाजूक पण सदैव आत्मानंदात तल्लीन. या तल्लीनतेच्या हवामानाचे मोजमाप त्याच्या चर्येवरून करता येई. काया परमार्थाला वाहिलेली, पण तिथेही केव्हा केव्हा पारमार्थिक अनुभवांची चढ उतार होत असे. परमेश्वराच्या अनुभवात तद्रूप होण्याच्या ओढीचे सातत्य, विश्वाच्या अधिष्ठानाची जवळीक, त्यांतून होणारी मी-तू पणाची बोळवण, किंवा अस्मद्-युष्मद् यांचे तादात्म्य, या अर्थी अनुभव हा शब्द मी वापरला आहे. स्वार्थाचा किंवा लोकांना दुखवण्याचा विचार जर कुणाच्या मनात आला तर तिथे मायेचा वरचष्मा होतो आणि तो अनुभवाच्या आड येतो. कुठून जरी असल्या गोष्टींचा नुसता वारा लागला तरी ते अस्वस्थ होत. स्वतःमध्ये व ईश्वरामध्ये एखादी दरी निर्माण झाली आहे अशा भावनेने त्यांच्या मुखावर खिन्न छाया पसरे. या पोकळीची जाणीव होताक्षणी त्यांच्या तोंडून 'देवा, देवा, देवा, नारायणा, नारायणा, नारायणा,' अशा हाका पाठोपाठ आणि मोठ्याने बाहेर पडत.

असं वाटतं की ते त्या रुष्ट नारायणाचा पाठलाग करत होते; 'माझ्या-समोरून जाऊ नको रे' अशी काकुळतीने विनवणी करत होते. ही तार स्वरातली आळवणी म्हणजे ईश्वराचे आनंददायक अद्भुत रूप डोळ्यांपुढून जाऊ देण्यात आपला अपराध झाला अशी देवाजवळ दिलेली कबुली होती. त्यांच्या देवा, नारायणा या हाकेवरून मीराबाईच्या जोगी मत जा, मत जा, या पदाची आठवण होते. हे आध्यात्मिक पद गुरुदेवांचे फार आवडते होते. १९४१ मध्ये मी एम. ए. च्या (तत्त्वज्ञान) शेवटच्या वर्षाला होतो. नोव्हेंबरमध्ये एकदा सकाळी संगीताची मैफल संपवून मी गुरुदेवांकडे गेलो. लहान मुलाच्या औत्सुक्याने 'मैफल कशी रंगली, कोणती पदे आवडली ?' असे त्यांनी विचारले. पंडित ओंकारनाथ ठाकूर यांनी आळवलेले, जोगी मत जा, मत जा, ही चीज माझ्या हृदयाला भिडल्याचे मी सांगितले. माझ्या त्या शब्दांसरशी त्यांच्या अंगाप्रत्यंगात एक चैतन्याची लहर सळसळली आणि दृष्टी अर्धोन्मीलित झाली. त्यांच्या त्या तशा डोळ्यांकडे पाहणे मला अतिशय आवडे. त्या

डोळ्यांपेक्षा अधिक तेजोमय आणि अधिक बोलकी कोणती तरी गोष्ट विधात्याच्या हातून घडली असेल का ? संपूर्ण जग देवात लय पावले आहे, नारायणात विरून गेले आहे, असा त्यांचा अनुभव डोळ्यांच्या त्या अर्धजागृत, निर्मळ आविर्भावामागे दडलेला असे. आत्मरतीची पहाट फुटून तिच्यातून रसरसलेली प्रभा फाके. अर्धे मिटलेले व अर्धे उघडे ते डोळे दोन गोष्टींचे द्योतक होते. झाकलेला भाग जगापासूनची पराङ्मुखवृत्ती सुचवत असे. उघडा भाग खोल खोल अंतरंगात स्फुरणाऱ्या आत्म्याच्या ऐश्वर्याशी दुवा साधत असे. रात्र व दिवस यांच्या उंबरठ्यावरच्या उषःकालच्या संधिप्रकाशाप्रमाणे, अर्ध्या मिटलेल्या पापण्या 'प्रवृत्ती आणि निवृत्ती', 'आपण आणि दुसरे' यांच्यात समन्वय साधत; 'बाह्य आणि अभ्यंतर' या द्वंद्वाच्या पार नेत. त्यांनी साक्षात्कारावर खूप लिहिले आहे; त्यांच्या दोन नयनकमळांवर मला खूपखूप लिहावेसे वाटते.. या दोन डोळ्यांनी साक्षात्काराचे जे स्वरूप स्पष्ट दाखवले, त्याला आजपर्यंतच्या अखिल संतांनी रचलेल्या साखी किंवा अभंग वाङ्मयात तोड नाही. त्या नेत्रांचे दर्शन युगानुयुगे होत राहावे आणि ते डोळे माझे नसले तरी गुरुदेवांच्या त्या डोळ्यांतून जगाकडे बघण्याची साम्यदृष्टी लाभावी अशी मला आकांक्षा आहे.

- 'आश्रम संदेश' च्या सौजन्याने.

०

## ३ कह कबीर दोऊ ना मिलै। इक लै दूजी डाल ॥

१९४२ मध्ये अजमेर बोर्डाची द्वितीय वर्षाची परीक्षा उतरल्यावर उन्हाळ्याच्या सुट्टीत मी निंबाळला गेलो. माझे मित्र श्रीनिवास जी. कुलकर्णी[1] (फोटो पान पाच), यांनी मला तिथं नेलं. मी अलाहाबादहून बी.ए. होण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्यासाठी रानडे साहेबांची मदत मागितली. मी कुठला आहे, शिक्षण किती झालं आहे, ही त्यांनी चौकशी केली. इंग्रजी वाचन व हस्ताक्षर यांची छोटीशी चाचणी घेतली. २-३ दिवसांनी वडिलांना घेऊन निंबाळला ये, म्हणून सांगितलं. विजापूरच्या कुणा प्रसिद्ध व्यक्तीची ओळख आहे का, असं विचारलं. मी लगेच काकासाहेब कारखानीस, वासुदेवराव रानडे व हणमंतराव कौजलगी यांची नावं सांगितली. तसेच धारवाडचे काँग्रेस नेते रंगराव दिवाकर, आर. एस. हुक्केरीकर आणि डी. पी. करमरकर यांचाही उल्लेख केला. धारवाडला मी कर्नाटक प्रांतीय हिंदी प्रचार सभेत हिंदी शिकत होतो, तेव्हा या मंडळींशी ओळख झाली होती. वसंत वामन चावरे[2] (फोटो पान पाच), माझ्याबरोबरच हिंदी शिकत होते. मी वडिलांना घेऊन निंबाळला गेलो. त्यांच्याशी बोलणे झाल्यावर मला अलाहाबादला नेण्याला साहेबांनी संमती दिली. मुख्य विषय तत्त्वज्ञान व त्याच्या जोडीला हिंदी व इंग्रजी भाषा निवडाव्या असे त्यांचे मत. तत्त्वज्ञानाचे नाव काढल्यावर मी बिचकलो. तो एक अवघड आणि किचकट विषय आहे असे मला वाटे. साहेब हसले. जवळचा एक कागद त्यांनी घेतला, त्याच्यावर एक त्रिकोणाची आकृती काढली आणि म्हणाले, ''या त्रिकोणाचे वरचे टोक म्हणजे ईश्वर, पायाजवळचे दोन बिंदू म्हणजे जीव व जग. ईश्वर, जीव व जग यांचा विचार, तसेच त्यांचा परस्परसंबंध यांची चर्चा म्हणजे तत्त्वज्ञान. त्यात भिण्यासारखे

---

१ हे अलाहाबादला रानडे साहेबांकडे राहून शिकत होते. त्यांचे नाव श्रीनिवास आणि लोकप्रिय नाव शिनप्पा. अलाहाबादहून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी कर्नाटकात सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी केली.

२ हे अलाहाबाद विद्यापीठातून पदवीधर होऊन मुंबई इलाख्यातील शेतकी खात्यात शिरले.

काही नाही.'' त्यांची विषय सोपा करण्याची ती रीत पाहून मला फार आनंद झाला. इंग्रजीकडे कल आहे हे पाहून ते म्हणाले, ''ठीक, ठीक मुख्य विषय इंग्रजी व जोडीला हिंदी व तत्त्वज्ञान घ्यावे.'' त्यांचं म्हणणं असं की तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने एक उच्च बौद्धिक पातळी गाठता येते. म्हणून प्रत्येक होतकरू विद्यार्थ्याने तत्त्वज्ञान शिकावेच. जीवनाची गुणवत्ता उंचावणाऱ्या तत्त्वज्ञानाची महती पुढच्या आयुष्यात माझ्या लक्षात आली. आहे काय आणि नाही काय, एखादा विषय अवघड अशी आपण उगीचच कल्पना करून बसतो.

३-४ दिवसांत साहेब अलाहाबादला जायला निघणार होते. आठवडाभरात अलाहाबादला येईन, असे मी त्यांना सांगितले. थोडे कपडे शिवून घ्यायला व पैशाची तरतूद करायला सवड हवी होती. मी दौंड मनमाड मार्गे जाऊन पुढे मुंबई कलकत्ता मेलने अलाहाबादला गेलो. गाव नवीन म्हणून शिनप्पा कुलकर्णींना मी तार केली होती. त्याप्रमाणे ते आणि अगरखेडचे केशवाचार्य ताताचार्य जहागिरदार[१] स्टेशनवर आले होते. त्यांनी मला २ बेली रोड या साहेबांच्या घरी नेले. बी. ए. च्या वर्गात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करायला मला थोडा उशीर झाला होता. पण साहेब स्वतः अधिष्ठाता होते. त्यांनी मला परवानगी दिली. दुसऱ्या दिवसापासून मी विद्यापीठात जाऊ लागलो.

मी अलाहाबादला गेल्याला उणापुरा महिना झाला असेल. स्वातंत्र्यासाठी कॉंग्रेसने उभारलेल्या लढ्याने उग्र स्वरूप धारण केले होते. टाइम्स ऑफ इंडिया, अमृतबझार पत्रिका, लीडर, ही वर्तमानपत्रं मी साहेबांना वाचून दाखवत असे. त्यांत बातम्यांच्या जोडीला महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू वगैरे राष्ट्रीय नेत्यांनी केलेली देशभक्तिपर विधाने येत असत. एकूण सगळीकडे असंतोषाच्या ज्वाला भडकल्या होत्या. कॉंग्रेसच्या चळवळीत भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांची मनगटे शिवशिवत होती. सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली आलेले मिशन निष्फळ ठरले होते. संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याचे कॉंग्रेसने ठरवले होते. १९४२ चा ऑगस्ट महिना उजाडला. कॉंग्रेस कार्यकारिणीची सभा मुंबईला होणार होती. मुंबईला जाण्याच्या आधी दोन दिवस पंडित नेहरू व आचार्य कृपलानी यांनी छात्रसंघाच्या सभागृहात

---

१ हे तेव्हा वाचस्पती पदवीची तयारी करत होते. पुढे ते मुंबईच्या एका महाविद्यालयात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक झाले.

विद्यार्थ्यांपुढे ज्वलंत भाषणे केली. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी यज्ञ सुरू झाला आहे. उठा, तुमच्या प्राणांची आहुती द्यावी लागली तरी बेहत्तर, असे त्यांनी आव्हान केले. विद्यापीठातल्या आधीच तापलेल्या वातावरणाचा पारा आणखीनच चढला. मुलांचे रक्त सळसळत होते. काँग्रेस कार्यकारिणीचा निर्णय काय होतो याच्याकडे सर्वांचे डोळे लागले होते.

९ ऑगस्ट १९४२ ला मुंबईला काँग्रेसने 'भारत छोडो' हा ऐतिहासिक ठराव केला. देशभर नेत्यांची धरपकड झाली. सगळीकडे उसळलेल्या क्षोभाचा फुगा फुटण्याच्या बेताला आला. १२ ऑगस्टला ११॥ -१२ च्या सुमाराला विद्यापीठाच्या ५००० विद्यार्थ्यांनी घसा फोडून घोषणा देत देत जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीवर मोर्चा नेला. रस्त्यावरचे लोकही त्यात आपोआप सामील झाले. छात्रसंघाचे नेते अग्रभागी होते. संघाचा अध्यक्ष लाल पद्मधर सिंग तोंडाशी होता. मोर्चाच्या रस्त्यापासून साहेबांचा बंगला जवळच होता. बाहेरचा कोलाहल ऐकून शिनप्पा आणि मी बाहेर धावलो व मोर्चात मिसळलो. पोलीस आणि सैनिक यांच्या अडवण्याला न जुमानता विद्यार्थी तार स्वरात ओरडत पावला-पावलाने जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीकडे सरकत होते. ते कचेरीच्या प्रांगणापर्यंत पोचले. घोषणा अव्याहत चालू होत्या. पोलिसांनी लाठीहल्ला केला. काही विद्यार्थी मागच्या दाराने कचेरीत शिरले आणि त्यांनी अभिलेख कक्षाला आग लावली. जिल्हाधिकारी युरोपिअन होता. त्याने गोळीबाराची धमकी दिली. विद्यार्थी तसूभरही हलले नाहीत. गोळ्यांच्या फैरी झडू लागल्या आणि मोर्चाच्या अग्रभागी असलेल्या पद्मधर सिंगला गोळी लागून तो मृत्यूचा मानकरी झाला. अनेकजण जखमी झाले. विजयालक्ष्मी पंडितांची मुलगी चंद्रलेखा हिला लागलं असं ऐकू आलं. त्या गदारोळात कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. माणसं सैरावैरा धावू लागली. केशवाचार्यांनी मला आणि शिनप्पाला मोर्चात मिसळलेलं पाहिलं होतं. ते घरी आले आणि ही गोष्ट त्यांनी साहेबांच्या कानावर घातली. लोक पांगले. आम्ही त्या दुर्दैवी घटनेची चर्चा करत घरी परतलो. एल. जी मराठे[1] जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीपर्यंत आले होते, पण ते आधीच घरी पोचले होते.

---

१ ह्यांनी अलाहाबाद विद्यापीठातून पदवी घेऊन पुढे रेवा संस्थानात महसूल विभागात नोकरी केली.

थोड्या वेळाने शिनप्पाला व मला साहेबांनी बोलावलं. घाबरत घाबरत आम्ही त्यांच्यासमोर गेलो. ते अस्वस्थ झाले होते. ते म्हणाले, ''मी ऐकलं की तुम्ही दोघे विद्यार्थ्यांच्या मोर्चात मिसळला होता, लाठीहल्ला आणि गोळीबार झाला आणि पद्मधर सिंग गोळी लागून मेला. झाली गोष्ट फार वाईट झाली. तुमच्या भावना मला समजतात. पण उतावीळपणा चालत नाही. तुम्ही मुकाट्यानं राहून शिक्षण घ्यावं म्हणून इथं आला आहांत, की राजकारणात पडायला आला आहांत, मला कळू द्या. माझं देशप्रेम तुमच्याहून कमी प्रतीचं आहे असं समजू नका. लहानपणी मी लोकमान्य टिळकांच्या जवळ होतो. त्यांच्या केसरी व मराठा या वर्तमानपत्रांशी माझा काही काळ संबंध होता. नंतर माझ्या लक्षात आलं की आपला पिंड राजकारणाचा नाही. म्हणून मी शिक्षण क्षेत्रात शिरलो व परमार्थमार्गाला लागलो. तुम्ही माझ्या घरी राहून राजकारणात भाग घेतलात तर मला अडचणीत आणाल.[२] गणित विभागाचे प्रमुख प्रा. ए. सी. बॅनर्जी यांचा मुलगा आणि मुलगी विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. त्यांनी चळवळीत भाग घेतला म्हणून बॅनर्जींच्या घराची पोलिसांनी झडती घेतली, ते तुम्हाला कळलं आहे ना ? माझ्यावर तो प्रसंग यावा असं तुम्हाला वाटतं का? शिकायचं असेल तर धडपणे राहून शिका. पण राजकारण करायचं असेल तर विजापूरला घरी परत जा. हवं तर विजापूरपर्यंतचं गाडीभाडं मी देतो.''

आम्हाला विचार करायला थोडा अवधी द्या, अशी आम्ही साहेबांना विनंती केली. आमच्यामुळे तुम्हाला मान खाली घालावी लागेल अशी गोष्ट आम्ही कधी करणार नाही असं कबूल केलं. झाल्या घटनेचा सांगोपांग विचार केला. काय निर्णय घ्यावा याचा खल केला. मी धारवाडला शिकत असताना हिंदी शिकवणाऱ्या काही शिक्षकांनी व इतरांनी शाळा-महाविद्यालये सोडून काँग्रेसच्या चळवळीत उडी घेतली होती. ते तुरुंगातही गेले होते. पुढे त्यांना नोकरीधंदा मिळणं मुश्कील झालं होतं. दरिद्री स्थितीत राहावं लागलं होतं. त्यांच्याबद्दल मला आदर होता, पण तसलं जिणं कंठायची माझी तयारी नव्हती. शिक्षण पूर्ण करून मार्गाला लागायचं, नंतर जमलं तर राजकारण, असा माझा

---

१ हे सांगणे केवळ स्वतःला त्रास होईल म्हणून नव्हते. दूरवरून आणलेल्या मुलांच्या सुरक्षिततेची गुरुदेवांवर जबाबदारी होती. शिवाय अधिष्ठात्याच्या घरी राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी कायदा मोडणे विद्यापीठाच्या दृष्टीने गैर होते.

बेत होता. ते काहीही असो. आपल्यामुळे साहेब संकटात पडू नयेत हा विचार मात्र ठाम होता. शिनप्पांशी मी सर्व गोष्टी बोललो. त्यांनाही त्या पटल्या. आम्ही साहेबांकडे परत गेलो व त्यांना सांगितलं की आम्ही मुळीसुद्धा चळवळीत पडणार नाही. अभ्यासाकडे पूर्ण लक्ष देऊ.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीसमोर झालेल्या गोळीबारानंतर विद्यापीठात विद्यार्थ्यांची उपस्थिती तुरळक व अनियमित झाली. चारदोन चारदोन विद्यार्थी आणि प्राध्यापक भेटत आणि घडलेल्या भयंकर गोष्टीबद्दल कुजबुजत. पुढं काय वाढून ठेवलं आहे याची कल्पना करत. विद्यापीठाच्या बाहेर मिजासखोर पोलिसांचा आणि उन्मत्त शिपुर्ड्यांचा खडा पहारा असे. शहरातलं वातावरण भयाण होतं. माणसं सुतकी चेहरे करून वावरत होती. बाहेर गप्प गप्प राहत असली तरी त्यांच्या मनातलं दुःख मूक आक्रोश करत होतं. साधारण ४-५ दिवस गेल्यावर पोरांनी धारिष्ट केलं आणि विद्यापीठाच्या सीमेच्या आत लहान लहान संख्येने मोर्चे काढायला सुरुवात केली. मुलं सर मॉरिस हॅलेट[१] यांचा पुतळा करून हातात घेत, हिंदी आणि उर्दू शोकगीते गात व त्या पुतळ्याला आग लावून आपला राग व्यक्त करीत. पोलीस आणि सैनिक सीमेच्या बाहेरून हे बघत असत. उपकुलगुरूंनी आत येण्यास मना केल्यामुळे राग गिळून त्यांना बाहेर हात चोळत बसावे लागे. आम्ही बाहेर आल्यावर ते आम्हाला धमक्या देत. शिनप्पा व मी गांधी टोप्या घालत असू. आमच्या विरोधाला न जुमानता पोलिसांनी त्या हिसकावून घेतल्या. त्यानंतर कित्येक महिने मी टोपीशिवाय हिंडत असे. मुलांचा राग धुमसत होता. उपकुलगुरू डॉ. अमरनाथ झा यांनी अधिसभेच्या सभागृहात सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची एक सभा बोलावली होती. त्यांनी मुलांना शांत राहण्याचे आव्हान करताच मुलं त्याची हुर्यो करू लागली. खरं तर त्यांच्याबद्दल मुलांना खूप प्रेम व आदर होता. पण सभेच्या वेळेला मुलं त्यांना बोलू देईनात. सभा उधळली. विद्यापीठ दोन महिने बंद ठेवण्यात आलं. बाहेरगावची मुलं आपापल्या गावी गेली. परिस्थिती थोडी निवळली. शहरात मात्र पोलीस व सैनिक नागरिकांच्या हालचालीवर लक्ष ठेवून होते. दिवसाउजेडी लोक बाहेर पडत, तेही अगदी जरूर पडली तरच. काम झाले की लागलीच घरी परत येत.

---

१ संयुक्त प्रांताचे राज्यपाल.

विद्यापीठ बंद असलेल्या काळात पुष्कळचे विद्यार्थी व प्राध्यापक साहेबांना भेटायला येत. शिव शंकर रॉय, रामानंद तिवारी, व्ही. एस. नरवणे, ही पीएच.डी. करणारी माणसं त्यांत होती. एस. दत्त यांच्यासारखे माजी विद्यार्थी, पी. एस. नायडू, रामनाथ कौल, एन. सी. मुखर्जी यांच्यासारखे सहाध्यायी, हेही येत. विद्यापीठातले इतर विषयांचे प्राध्यापक येत. काही आय. सी. एस. अधिकारी साहेबांचे विद्यार्थी होते, तेही येऊन चर्चा करीत. त्यांना साहेबांबद्दल नितांत आदर होता. साहेब नेमाला गेले असले व त्यांची खूप वेळ वाट पाहावी लागली तरी त्यांना काही खंत नसे.

वरच्या घटना घडून आता ५० वर्षे होऊन गेली. मला जसं आठवलं तसं मी लिहिलं आहे. साहेबांसारख्या देवमाणसाच्या सान्निध्यात येण्याची मला संधी मिळाली, हे माझं अहोभाग्य. त्या वेळेच्या आठवणी मला नेहमी दिलासा देत आल्या आहेत आणि शेवटचा श्वास घेईपर्यंत त्या तशाच दिलासा देत राहतील.

# ४ रूप मनीं आठवावें ।

गुरुदेव रानडे यांचं पहिलं दर्शन मला १९५० सालच्या मे महिन्यात झालं. हे माझं मोठंच भाग्य. मी तेव्हा अगदी तरुण म्हणजे २३ वर्षांचा होतो. त्यानंतर १९५५ पर्यंत, उन्हाळ्याच्या आणि नाताळच्या सुट्टीत मी अलाहाबादला किंवा निंबाळला जात असे. मात्र आतापर्यंत त्यासंबंधी मी काही लिहून ठेवलं नव्हतं. वास्तविक त्या आठवणींच्या अमृतबिंदूंच्या शिडकाव्याने माझं गेल्या ४३ वर्षांचं आयुष्य पोसलेलं आहे. या स्मृती काळाच्या ओघात वाहून गेल्या नाहीत, अगदी ताज्यातवान्या आहेत. आजही मी गुरुदेवांच्या सहवासात असून त्या प्रसंगांतून जात आहे असं वाटतं. या आठवणी म्हणजे वर्तमानकाळ आणि हृदयावर कोरला गेलेला भूतकाळ यांचा संगम आहे.

आधी हे कबूल करायला हवं की १९५० सालच्या मे महिन्यात मी पारमार्थिक उद्देशाने निंबाळला गेलो नव्हतो. त्या वेळी मी राजपुताना विद्यापीठात[१] संशोधन करत होतो. माझा वाचस्पती-प्रबंधाचा विषय, 'पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील अद्वैतवाद' असा होता. जोधपूरच्या जसवंत महाविद्यालयातील डॉ. विनायक हरी दाते माझे मार्गदर्शक होते. ते इंचगेरीच्या अंबुराव महाराजांचे शिष्य होते. अंबुरावांच्या निर्याणानंतर त्यांनी गुरुदेव रा. द. रानडे यांना गुरुस्थानी मानलं होतं. आपल्या विद्यार्थ्यांना आणि मित्रमंडळींना परमार्थाला लावण्याचं व्रत दात्यांनी घेतलं होतं. ते सर्वांना निंबाळला गुरुदेवांकडे पाठवीत आणि म्हणत की असा साक्षात्कारी संत हजार वर्षांतून कधीतरी जन्माला येतो. ते मला म्हणाले होते, ''हे बघ, तुला तुझ्या प्रबंधात पौर्वात्य व पाश्चिमात्य चिद्वादाचा तौलनिक अभ्यास मांडायचा आहे, तसंच साक्षात्काराच्या दृष्टीने त्यांचं मूल्यमापन करायचं आहे. या बाबतीत प्रा. रानडे यांच्या मार्गदर्शनाचे तुला अमोलिक साहाय्य होईल.'' एवंच दात्यांनी मला परमार्थासाठी नव्हे तर बौद्धिक समाधानासाठी निंबाळला पाठवलं. स्वतःच्या बुद्धिमत्तेवर विसंबणाऱ्या माझ्यासारख्या विद्यार्थ्यांचा कल बुद्धिवादाकडे होता हे त्यांनी बरोबर हेरलं होतं.

---

१ हल्लीचे राजस्थान विद्यापीठ.

मे १९५० च्या अखेरी अखेरीस मी निंबाळला गेलो. डॉ. दाते व त्यांचे कुटुंबीय आधीच तिथे आलेले होते. सिटिंगची घंटा झाली आणि सगळी मंडळी गुरुदेवांच्या नव्या घरी गोळा झाली. डॉ. दात्यांनी मला गुरुदेवांकडे नेलं आणि 'हा तत्त्वज्ञान विषयातला शोधछात्र आहे' असं सांगितलं. त्या तत्त्वज्ञ संतापुढे मी नतमस्तक झालो. शरीरप्रकृती तोळामासा असूनही त्यांच्या ठिकाणी चैतन्य सळसळत होतं. मुखावर आनंद होता. त्यांच्या तेजस्वी डोळ्यांची प्रेमळ दृष्टी माझ्यावर पडली. उदबत्त्यांची एक जुडीच्या जुडी त्यांनी लावली. तितक्यात एका नोकराने धगधगीत निखाऱ्यांचं एक पात्र त्यांच्यासमोर आणून ठेवलं. सुवासिक द्रव्ये मिसळलेली चंदनाची मूठभर पूड त्यांनी निखाऱ्यावर टाकली. बघता बघता ओसरीवर सगळीकडे सुगंध पसरला आणि सिटिंगसाठी प्रसन्न वातावरण तयार झालं. सिटिंगला अगदी साध्या विषयाने सुरवात होत असे. कधी गुरुदेव एखाद्या शिष्याचे कुशल विचारीत, कधी काकासाहेब कारखानीस ज्ञानेश्वरीवर चार शब्द सांगत, कधी कोण्या साधकाच्या फेट्याचं महाराजांच्या फेट्याशी साम्य दिसून आल्यावर जुन्या आठवणी जाग्या होत, कधी महाराजांचं पत्र वाचलं जाई, तर कधी कुणी साधक भजन म्हणे. मधून मधून गंभीर विषयांची चर्चा होई व गुरुदेवांचं त्या त्या विषयावर बोलणं होई. एकूणच चर्चेचा ओघ भक्तिभावाकडे वळे. शेवटी भजन व आरती होत असे.

संत मीराबाई मुळातल्या एक राजकन्या. त्यांचे जन्मस्थान मेडत. हे गाव जोधपूरपासून किती लांब आहे असं गुरुदेवांनी मला विचारलं. हे अंतर साधारण ८० मैल आहे असं मी सांगितलं. ''या मंडळींना मीराबाईंचे चरित्र सांग, हिंदीतूनच सांग,'' असे त्यांनी फर्मावले. वास्तविक जमलेल्या पुष्कळांना हिंदी येत नव्हते. पण ते म्हणाले, ''आता सगळ्यांनी हिंदी शिकलंच पाहिजे. एक दिवस हिंदी आपली राष्ट्रभाषा होणार हे निश्चित.'' सुदैवाने पदवी परीक्षेसाठी तत्त्वज्ञान व इंग्रजी या विषयांबरोबर मी हिंदी घेतले होते. त्यासाठी सूरदास, तुलसीदास, कबीर, मीराबाई, नानक वगैरे मध्ययुगीन संतांच्या काव्याचा अभ्यास केला होता. हा विषय डोक्यात ताजा असल्याने मला मीराबाईंचं चरित्र नीट सांगता आलं. त्या वेळी पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर या गुरुदेवांच्या नाविन्यपूर्ण ग्रंथाचा सहायक ग्रंथ, 'परमार्थसोपान' आकार घेत होता. त्यातील पदे आणि दोहे, त्यांचा गद्य अनुवाद, विस्तृत टिपणे, ठिकठिकाणी असलेलं गुरुदेवांचं भाष्य, वगैरे साहित्याची मुद्रणप्रत करण्याचं काम चालू होतं.

अनुवादाची फेरतपासणी करण्याचा गुरुदेवांचा बेत होता. जवळजवळ तीन आठवडे भीमसेन रामचंद्र कुलकर्णी[१] व प्रह्लाद कुलकर्णी[२] हे हिंदी जाणणारे त्यांचे विद्यार्थी आणि मी, सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या कामात गर्क असू. कामावर गुरुदेवांची दृष्टी असेच. सिटिंगमध्ये प्रामुख्याने तोच विषय चाले. तारुण्याच्या उंबरठ्यावर झालेल्या निंबाळच्या माझ्या पहिल्यावहिल्या भेटीतच गुरुदेवांशी इतका घनिष्ठ संबंध यावा हे माझं नशीब. कधी कधी पोरकटपणाने आणि स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या जादा अभिमानाने मी त्यांच्याशी एखाद्या शब्दाच्या अर्थाबद्दल वाद घाली. मग शब्दाचा वाच्यार्थ व त्यातला साक्षात्काराचा गाभा वेगळा असतो, हे मी कसं लक्षात घेत नाही, म्हणून ते रागावत. पण मी घाबरलो आहे असे पाहून एकदम शांत होत.

त्या तीन आठवड्यात गुरुदेव कधीतरी मला हिंदी पद म्हणायला सांगत. मी मोठ्या भक्तिभावाने पदे म्हणत असे. माझ्या गाण्याला शास्त्रीय संगीताची जोड असे. ते माझ्या गाण्याचं कौतुक करीत हे खरे पण त्याची प्रेरणा त्यांच्याकडूनच येत असावी असे माझी मनोदेवता मला सांगे. पद मी कोणत्या रागात म्हटले हे जाणून घेण्यास गुरुदेव उत्सुक असत. सोलापूरच्या डॉ. नरसिंह श्रीनिवास पारिपत्यदारांना संगीतात गती होती. त्यांना गुरुदेव राग कोणता हे विचारीत. डॉक्टर स्वतःबद्दल असे सांगत की सुरुवातीला खूप प्रयत्न करूनही त्यांना संगीताची जाण आली नाही. मग इंचगेरीला मठात जाऊन त्यांनी भाऊसाहेब महाराजांच्या समाधीजवळ धरणं धरलं आणि शास्त्रीय संगीत अवगत व्हावं अशी अश्रुपूर्ण नेत्रांनी कळवळून महाराजांची प्रार्थना केली. नंतर मात्र कुणाच्याही मदतीविना डॉक्टरांनी त्यांत प्राविण्य मिळवलं.

गुरुदेवांचं व्यक्तिमत्व बहुपदरी होतं. सिटिंगमधून त्याची एखादी झलक दिसे. उच्च पारमार्थिक पातळी, तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास, बुद्धिवैभव, शिष्यांच्या कल्याणाची तळमळ, भूतदया, लहान मुलांबद्दल ममता, राजाला शोभेल अशा भारदस्तपणाने नटलेला साधेपणा, आपले सद्‌गुरू भाऊसाहेब महाराज यांच्याबद्दलचा अपार आदर, हे त्यांचे गुण अलौकिक होते. एवढंच नाही, तर ज्यांचे वर्णन करणे कठीण, असे अनेक पैलू सिटिंगच्या वेळेला दृग्गोचर होत. तिथे आलेल्या प्रत्येक साधकाला वाटे की गुरुदेवांचे

---

१ गुरुदेव व इतर सर्वजण त्यांना बी. आर. इतक्याच नावानं ओळखत.

२ हेही प्रह्लाद एवढ्याच नावाने ओळखले जात.

आपल्यावर विशेष प्रेम आहे. जणूकाही सहाव्या इंद्रियाने ते दुसऱ्यांच्या गुणांची पारख करत व त्यांचे कौतुक करत. साहजिकच साधकाला एक प्रकारचा आत्मविश्वास वाटे. आपण एक यःकश्चित् आदमी आहोत असे ते कुणालाही भासू देत नसत, उलट त्याची अस्मिता जागी करीत.

आश्रमातला बोका सिटिंगमध्ये मधूनच डोकावे आणि म्यांव म्यांव करून भूक लागल्याचे सांगे. कितीही कामात असोत, गुरुदेव नोकराकडून दूध-भात आणवून त्याची बडदास्त ठेवत. एकदा त्याच्या पंजाला काही इजा झाली. लंगडत येऊन त्याने गुरुदेवांना पंजा दाखवला. लगेच एक औषध व कापूस आणवून या प्रतिष्ठित पाहुण्यावर उपचार केले गेले. बोका मोठा लबाड होता. सिटिंग चालू असताना तो खुशाल गुरुदेवांकडून सेवा करून घेई. लहान मुलांबद्दल गुरुदेवांना फार प्रेम होते. त्यांची दोन वर्षांची नात नंदिनी सिटिंग चालू असताना खेळकरपणे तिथे येऊन धडके व त्यांचे लक्ष वेधून घेई. ते तिच्याशी विनोदाने चार शब्द बोलत. वडिलधारे साधक अदबीने व गंभीरपणाने बोलत असताना नंदिनी गुरुदेवांना एकदम हलक्याफुलक्या पातळीवर आणत असे आणि अध्यात्माची चर्चा चालू असतानाही आजोबा गमतीने तिची एखादी खोडी काढीत.

आपल्या शिष्यांच्या भवितव्याची गुरुदेवांना नेहमी काळजी असे. बी. आर. (भाऊ) निंबरगींच्या डोळ्यांना दूरचे फार कमी दिसे. एकदा गुरुदेव म्हणाले, ''मोहनलाल, भाऊला इतक्या लहान वयात -१२ आणि -१४ नंबरचा चष्मा लागला आहे. या अधूपणाने त्याला चांगली नोकरी मिळाली नाही, तर तो काय करेल ?'' पण गुरुदेवांची त्याच्याबद्दलची आस्था फळाला आली आणि पुढे एका नामांकित महाविद्यालयात त्याला काम मिळाले असे मला नंतर कळले. त्यांच्या सगळ्या शिष्यांचं कल्याण झालं. मधुकर शंकर कुमठेकर महाराष्ट्र सरकारच्या नोकरीत शिरून उपसचिवाच्या जागेपर्यंत पोचले. बी. आर. कुलकर्णी एका महाविद्यालयात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक झाले व नंतर दिल्लीला त्यांना मंत्रिमंडळ सचिवालयात महत्त्वाचे पद मिळाले. मीही अनेक अडचणीतून जाऊन शिक्षणक्षेत्रात वर चढत गेलो. नंतर मला जोधपूर विद्यापीठात[१]

---

१ आताचे जय नारायण व्यास विद्यापीठ.

तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाची जागा मिळाली. म्हटलेच आहे-

जो साधुच्या अंकित जीव झाला ।

त्याचा असे भार निरंजनाला ॥

निंबाळला मी तीन आठवडे राहिलो. परमार्थसोपानाचं काम संपल्यावर लगेचच जोधपूरला परत जाण्याची मी गुरुदेवांना परवानगी मागितली. दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुदेव जुन्या घरात नेमाला गेले होते. त्यांनी मला तातडीने तिकडे बोलावले. मी ताबडतोब गेलो व आदराने वाकून त्यांना नमस्कार केला. चहा तयार होता. नोकराने किटलीतून माझ्या कपात सावकाश चहा ओतला. एवढ्यात आणखी १-२ दिवस मला राहता येईल का अशी त्यांनी पृच्छा केली. आज वाटतं की, मला नाम द्यावं असं त्यांच्या मनात असावं, म्हणून जाणं लांबवता येईल का, असं त्यांनी विचारलं. गणेश गोविंद ऊर्फ काकासाहेब कारखानीस किंवा गणेश विष्णू ऊर्फ काकासाहेब तुळपुळे यांच्यामार्फत गुरुदेव गुरुवारी, शनिवारी व सोमवारी नाम देत. यांच्यापैकी कुणीतरी १-२ दिवसांत येणार असावेत. पण माझं अज्ञान आड आलं, मला यातलं काही उलगडलं नाही. माझ्या इच्छेप्रमाणे मला जायला परवानगी मिळाली.

जोधपूरला गेल्यावर दात्यांनी मला विचारलं की, ''नाम देण्याची गुरुदेवांना तू विनंती केलीस का ?'' मी नाही म्हटल्यावर ते म्हणाले, ''गुरुदेव दर हिवाळ्यात अलाहाबादला जातात व द्रौपदी घाटावरच्या हेस्टिंग्ज रोडवरील आपल्या बंगल्यात राहतात. तू अलाहाबादला जाऊन नाम देण्याची त्यांना विनंती कर. तिथे तुला त्यांच्या संग्रही असलेल्या उत्तमोत्तम ग्रंथांचा उपयोग करून घेता येईल.'' १९५१ च्या फेब्रुवारीत मी अलाहाबादला गेलो. एका आठवड्यानंतर मी जोधपूरला परत जाण्याची परवानगी विचारली कारण माझी प्रकृती ठीक राहीना. निघण्यापूर्वी नाम देण्याची मी गुरुदेवांना विनंती केली, तेव्हा त्यासाठी निंबाळला ये असं ते म्हणाले.

डिसेंबर १९५२ मध्ये मला डॉ. दात्यांनी सुचवलं की गुरुदेव अलाहाबादला जाताना थोडा वेळ मुंबईत थांबतात व नाम घेण्याची इच्छा असणाऱ्यांना नाम देतात, तेव्हा तू ही संधी सोडू नको. त्याप्रमाणे मी गुरुदेवांना एक कार्ड टाकल्यावर, 'मुंबईला ये,' अशी त्यांची तार आली. ती तार म्हणजे माझी एक संपत्ती आहे. ३ जानेवारी १९५३ ला मी जयपूरहून निघून मुंबईला

डॉ. दात्यांचे मेव्हणे घाणेकर यांच्या दादरच्या घरी गेलो. ५ जानेवारीला गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणे मी सकाळी १० वाजता डॉ. रामचंद्र हरी करमरकरांकडे गेलो. थोड्या वेळाने दुसऱ्या खोलीत काकासाहेब तुळपुळे यांच्या मार्फत गुरुदेवांनी मला नाम दिले. मी गुरुदेवांबरोबर अलाहाबादला गेलो. पुढे काय करायचा विचार आहे असं त्यांनी मला विचारलं. तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होण्याची माझी इच्छा ऐकून त्यांनी माझी पाठ थोपटली व म्हणाले की शिक्षकाचा पेशा आधीच उदात्त व तत्त्वज्ञान शिकवणे अधिक श्रेष्ठ. त्यात आपला परमार्थ तर सांभाळता येतोच, शिवाय तत्त्वज्ञानासारखा अध्यात्माला पोषक विषय शिकवून पोटही भरता येतं. शेजारच्या खोलीत नेमाला बैस असं त्यांनी सांगितल्यावरून मी तिकडे सुखासन घालून बसलो. गुरुदेव खोलीत आले व माझ्या आसनाबद्दल समाधान व्यक्त करून पुढील दोहा म्हणाले -

कबिरा धारा अगम की सतगुरु दई लखाय ।

उलटि ताहि सुमिरन करो स्वामी संग मिलाय ।

दोह्याचं स्पष्टीकरण करताना त्यांनी 'स्वामी संग मिलाय' या शब्दांवर जोर दिला व पुढे म्हणाले, ''देवाच्या संगतीतच खरं नामस्मरण होतं, असा दोह्याचा अर्थ असला तरी, साधकाला सुरवातीला जेव्हा देवाचं रूप दिसत नसतं, तेव्हा त्याने भक्तिभावाने नाम घ्यावे. त्यात आत्मीयता असावी.''

अलाहाबादला मी तीन आठवडे राहिलो. गुरुदेवांच्या देखरेखीखाली परमार्थसोपानातली अलंकारशास्त्रासंबंधीची परिशिष्टे तपासणे व एकटा असताना माझा स्वतःचा अभ्यास करणे यात माझा दिवसाचा वेळ जाई. रात्री एक दोन तास गुरुदेवांचा एकट्याचा उत्साहवर्धक सहवास मिळे. दिवसा पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर या पुस्तकाचा मजकूर त्यांचे लघुलिपिकार लिहून घेत व तो टंकलिखित करून ठेवत. गुरुदेव मध्यरात्रीनंतर केव्हाही नोकराला पाठवून मला उठवत आणि तो मजकूर वाचून घेत. जिन्यावरून माडीवर गेल्यावर उजवीकडे गुरुदेवांची नेमाची खोली होती. डावीकडच्या खोलीत त्यांना जे लागेल ते देण्यास नोकर बसलेला असे. मी गुरुदेवांच्या खोलीत गेल्यावर ते म्हणत, पलीकडच्या खोलीत चहा करून ठेवला आहे, आधी चहा घे व मग इकडे ये. थंडीच्या दिवसात गरम चहाची लज्जत औरच असे. नंतर मी अगदी सावकाश त्यांना टंकलिखित मजकूर वाचून दाखवी. प्रत्येक

वाक्य ते लक्षपूर्वक ऐकत. एखादा वाक्प्रयोग किंवा शब्द त्या त्या जागी चपखल बसतो की नाही याचा विचार करत. कधीकधी भाषाशैलीबद्दल माझे मतही विचारीत. एखाद्या शिल्पकाराने डोळ्यांत तेल घालून छिन्नी व हातोडा चालवून सुंदर मूर्ती कोरावी तितक्या बारकाईने गुरुदेवांचे भाषेकडे लक्ष असलेले पाहून मला आश्चर्य वाटे. त्यांच्या या भाषेची प्रगल्भता वाचकांच्या प्रत्ययाला येतेच. त्या नितांतसुंदर शैलीतील लिखाणातला एकही शब्द इकडचा तिकडे करता येत नाही. काही बदल करायला गेलं तर त्या वाक्यातील आशय आणि धाटणी, विशिष्ट ढब आणि स्पष्टता, मुद्दा थोडक्यात मांडण्याची लकब व अर्थघनता, यांचा तोल बिघडतो. काटेकोरपणा व तंतोतंतपणा याबद्दल ते जागरूक असत. 'ज्याला तंतोतंतपणा साधत नाही त्याला आयुष्यात विशेष काही करता येत नाही,' असे ते म्हणत. ही गोष्ट लिखाणातच काय पण साध्या बोलण्यात व गंभीर चर्चेतही त्यांना हवी असे. अशाच एका मध्यरात्री गुरुदेव म्हणाले होते की जेम्स वॉर्ड हा फार श्रेष्ठ लेखक होता. त्याच्या एखाद्या लहानशा वाक्यात अर्थ ठासून भरलेला असतो. उलट जोशाया रॉइस तेवढं सांगायला पानेच्या पाने घेतो. नंतर मी ऐकलं की एका नामवंत पाश्चिमात्य विद्वानाने गुरुदेवांना वॉर्ड व राधाकृष्णन्‌ना रॉइस ठरवले होते.

मला त्यावेळेस मराठी मुळीच येत नव्हतं. हळूहळू ती भाषा समजू लागावी म्हणून गुरुदेवांनी मला नियमितपणे दासबोध आणि ज्ञानेश्वरी वाच म्हणून सांगितलं. त्यांच्या मते, 'मराठी आणि हिंदी दोघी संस्कृतच्या मुली आहेत. आईवर कुणाचं प्रेम जास्त आहे अशी जणू त्यांच्यात स्पर्धा आहे.'

गुरुदेव अलाहाबादला असले की प्राध्यापक, न्यायमूर्ती, अभ्यासक किंवा साधक ही मंडळी त्यांच्या सहवासात जास्तीत जास्त राहण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या १५ अ हेस्टिंग्ज रोड या बंगल्यात बौद्धिक आणि पारमार्थिक संवादांचे एक संमेलन भरे. त्या वेळच्या माझ्या डायरीत मालवीय कॉलेजचे प्राचार्य पंडित देवीप्रसाद शुक्ला, शा. नी. देशपांडे, त्र्यंबक कृष्ण देवळालकर, इंदु प्रकाश सिंग, थिऑसॉफिस्ट संजीवराव, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शंकर सरन, उद्योगपती कृष्णराव हणमंत कब्बूर व त्यांच्या पत्नी सोनूताई, गिरीशचंद्र शर्मा, भोजपुरी रामभजन सिंग वगैरेंची नावे आहेत. मला या विद्वानांच्या सभेत भाग घेण्याचं भाग्य तर लाभलंच, शिवाय

त्यांच्यासमोर एखाद-दुसरं भजन म्हणण्याची संधीही मिळाली. 'नैनहीन को राह दिखा प्रभु' हे भजन तर मी तीन वेळा म्हटलं आहे. ते गुरुदेवांना अतिशय प्रिय होतं. आतापर्यंतचं माझं संशोधनाचं काम दाखवायला मला गुरुदेवांनी दोनदा सांगितलं. माझी गीतेवरील टिपणं आणि काही श्लोकांवरील माझे विचार त्यांनी पाहिले. त्यांना एकदम त्या संदर्भातल्या पूर्वीच्या गोष्टी आठवल्या आणि ते म्हणाले, ''गीता माझ्या रक्तात भिनली आहे.''

मला अलाहाबादला येऊन तीन आठवडे होतात तोच मला जोधपूरहून तार आली की मी लगोलग घरी यावे. मला कारण कळेना. याच्या आधी जोधपूरहून आलेल्या पत्रांत वडिलांना पोटदुखीचा त्रास झाल्याची बातमी होती. ती ऐकून गुरुदेवांनी मला तातडीने निघायला सांगितले. वडिलांच्या पोटावर शस्त्रक्रिया झाली होती, तरी त्यांची प्रकृती ठीक होती. हे कळवल्यावर गुरुदेवांनी आनंद झाल्याचं पत्र पाठवलं. त्यात निंबरगी व निंबाळ येथील अंगारा पाठवला. तसेच निंबरगी महाराजांचे नातू नागप्पा यांच्यावर विजापूरच्या दवाखान्यात अंतर्गळासाठी शस्त्रक्रिया झाल्याचं कळवलं. माझ्या वडिलांची प्रकृती अचानक बिघडली व ते १२ फेब्रुवारी १९५३ ला देवाघरी गेले. अखेरपर्यंत ते आपल्या गुरूंचं स्मरण करत होते. देवावर भार टाकून संकटाला धैर्याने तोंड दिले पाहिजे, असं गुरुदेवांचं मला सांत्वनपर पत्र आलं.

त्या वर्षी डॉ. दाते यांच्याबरोबर नाताळच्या सुट्टीत मी निंबाळला गेलो. गुरुदेवांच्या खोलीत गेल्यावर त्यांनी स्वतः केलेल्या चहातला भरपूर चहा आम्हाला मिळाला. ही गोष्ट माझ्या स्मृतीत पक्की राहिली आहे. गुरुदेवांचं मोठेपण लहानमोठ्या गोष्टींतून दिसतं. शिष्यांपासून वेगळं राहायचं, कधीमधी त्यांना दर्शन द्यायचं, सभेत उच्चासनावर बसायचं, विक्षिप्तपणे वागायचं, असले चाळे करणाऱ्या अडक्याला तीन मिळणाऱ्या गुरूंपैकी ते नव्हते. सिटिंगमध्ये ते साधकांच्या बरोबरीने जमिनीवर बसत. गुरुगिरी त्यांना बिलकूल मान्य नव्हती. नोकराने घंटा दिली की साधक घाईघाईने नव्या घरात जमत व महाराजांच्या फोटोला नमस्कार करून जागेवर बसत. शुभ्र धोतर व साधा सदरा हा गुरुदेवांचा वेष. भाऊसाहेब महाराजांचे व अंबुराव महाराजांचे वडिलधारे शिष्य - काकासाहेब तुळपुळे, काकासाहेब कारखानीस, बाबासाहेब संगोराम, रामण्णा (रामचंद्र पांडुरंग) कुलकर्णी, मनोहरपंत

श्रीनिवास देशपांडे, वि. ह. दाते वगैरे - अवतीभोवती मोठ्या नम्रतेने बसत. सिटिंग झाल्यावर साधकाला जे समाधान लाभे त्याचे स्पष्टीकरण देणे कठीण आहे.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत सगळ्या कार्यक्रमांत मी भाग घेई. निघण्याच्या दिवशी मला गुरुदेवांनी ध्यानमंदिरात बोलावलं. काकासाहेब तुळपुळे व इतर साधक तिथे होते. परमार्थसोपानाची टंकलिखित प्रस्तावना वाचायला गुरुदेवांनी मला सांगितलं. आभार प्रदर्शनापर्यंत आल्यावर गुरुदेव काकासाहेबांना म्हणाले, ''मी शंभर लोकांचे आभार मानले आहेत.'' कुणी अगदी एवढीशी मदत केली असली तरी त्याचे आभार मानण्याचं औदार्य गुरुदेवांकडे होतं. गाडीची वेळ झाली तेव्हा ते म्हणाले, ''काळजी करू नको, आपण गाडी थांबवू शकतो.'' याच्या उलट पूर्वी एकदा मला पोचवायला ते नव्या घराच्या दारापर्यंत आले असताना भरून आलेलं आभाळ आणि पावसाची बुरबूर पाहून म्हणाले होते, ''आज तू जावेस अशी देवाची इच्छा असली तर पाऊस थांबेल, नाहीतर जाणं तुला पुढं ढकलावं लागेल.'' माझ्या लक्षात आलं की देव जे करतो तेच मानायचं असतं असं संतांचं सांगणं असलं तरी केव्हा केव्हा ते देवालाही संताच्या मर्जीप्रमाणे घटना घडवायला लावतात. अर्थात् ही आपली माझी कल्पना. या दोन गोष्टींत जो विरोधाभास दिसतो, तो संत आणि देव यांनी आपापसांत सोडवावा.

१९५४ च्या उन्हाळ्यात मी निंबाळला गेलो. मी जुलै १९५३ मध्ये वाचस्पतीचा प्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्याचा निकाल अजून कळला नव्हता. मला काळजी वाटत होती. माझ्या प्रबंधाचे परीक्षक कोण कोण आहेत हे गुरुदेवांनी विचारले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे बिकनलाल आत्रेय व हवाई युनिव्हर्सिटीचे ए. सी. मूर असे मी सांगताच ते म्हणाले, ''सी. ए. मूर बरं का, ए. सी. मूर नाही.'' मी माझी चूक दुरुस्त करत म्हटलं, ''हो, सी. ए. मूर. चार्ल्स ए. मूर.'' गंमत म्हणजे नोव्हेंबर १९५४ च्या पदवीदान समारंभाच्या फक्त १५ दिवस आधी मला विद्यापीठाची तार आली की येत्या समारंभात तुम्हाला पीएच. डी. पदवी देण्यात येईल. वर्षाच्या वर घोंगडं भिजत पडलं होतं. ते काम अचानक झालं, ही केवळ गुरुकृपा हे मी ओळखलं.

गुरुदेव हयात असताना मी निंबाळला गेल्याची अखेरची वेळ म्हणजे

डिसेंबर १९५४. मी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत राहिलो होतो. एक दिवस नव्या घराच्या माडीवर आम्ही काही मंडळी गुरुदेवांच्या संगतीत बसलो होतो. कोणत्या संदर्भात गुरुदेव बोलले, आता आठवत नाही. ते म्हणाले की नाम देण्याच्या वेळेलाच गुरू आपल्या शिष्याला सर्वकाही देऊन टाकतात. म्हणून परिस्थिती अनुकूल नसेल तर शिष्याने गुरूंना पुन्हा भेटलेच पाहिजे असे नाही. निंबरगी महाराजांची त्यांच्या गुरूंशी फक्त दोनदा भेट झाली होती.

त्याच सकाळी कुणीतरी गेल्याची गुरुदेवांना तार आल्याने त्यांना दुःख झाले होते. भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या अखेरी अखेरीचा श्लोक त्यांना आठवला. साधकाची परमार्थमार्गावर अजून धडपड चालू असतानाच त्याचा आयुष्यभानू अस्ताला गेला तर त्याची गती कोणती ?

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढः ब्रह्मणः पथि ॥३८॥

'हे महाबाहो श्रीकृष्णा ! मोहग्रस्त होऊन ब्रह्मप्राप्तीच्या मार्गात स्थिर न झाल्याने दोहोंकडून भ्रष्ट म्हणजे सुटलेला हा पुरुष फुटलेल्या ढगाप्रमाणे (मधल्या मध्येच) नाश तर पावत नाही ना ?' श्रीकृष्णांचं उत्तर सरळ आहे. गुरुदेवांनी ते सांगितलं. 'हे पार्था ! इहलोकी काय आणि परलोकी काय, अशा पुरुषाचा कधीच विनाश होत नाही. कारण कल्याणकारक कर्मे करणाऱ्या कोणत्याही पुरुषास बाबा ! दुर्गति मिळत नाही.'

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
न हि कल्याणकृत्कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति ॥४०॥

ध्यानमंदिराच्या शेजारच्या खोलीत अंबुराव महाराजांची पुण्यतिथी साजरी झाली. एका चौरंगावर त्यांचा फोटो ठेवला होता. तिथे गुरुदेव मोठ्या भक्तीने बसले होते. भाऊसाहेब महाराजांनी अंबुराव महाराजांना लिहिलेली पत्रे जुन्या साधकांनी वाचली, त्यांच्या आयुष्यातल्या अनेक गोष्टींच्या आठवणी काढल्या.

निंबाळचे ते १५ दिवस कायम आठवणीत राहण्यासारखे गेले. एकदा संध्याकाळी ५ च्या सुमाराला ध्यानमंदिरात आम्ही जेवायला बसलो असताना

गुरुदेव तिथे येऊन आमच्यामध्ये बसले. दारातून पूर्वेकडच्या विशाल क्षितिजाकडे बघत उद्गारले, ''दृश्य किती सुंदर आहे.'' मधूनमधून ते जेवणाऱ्या मंडळींकडे दृष्टी टाकत होते. भात किंवा इतर पदार्थांबाबत गुरुदेव तपशिलवार सूचना देत असत. स्वयंपाक झाल्यावर साधकांना जेवायला वाढायच्या आधी सर्व जिन्नसांवर ते नजर टाकत. आश्रमातल्या अन्नाने जेवणाऱ्यांच्या शरीरावरच काय पण नेमावरही फार अनुकूल परिणाम होई यात काय नवल ?

गुरुदेवांच्या सांगण्यावरून परमार्थसोपानाची एक प्रत मला देण्यात आली होती. तिच्यावर त्यांची स्वाक्षरी घ्यावी म्हणून मी नव्या घराच्या दारात शिरलो. मी भलत्याच वेळेला गेलो असं झालं, कारण जवळच्या खेड्यातून एक नवखा गृहस्थ आला होता. त्याच्या हातात नारळ होता, तो गुरुदेवांच्या पायावर ठेवायचा त्याने आग्रह चालवला होता. माझे शंकासमाधान करा अशी तो विनंती करत होता. ''शंकासमाधान करण्याची माझी मुळीच योग्यता नाही. तू तो नारळ महाराजांच्या फोटोपुढे ठेव व त्यांची प्रार्थना कर. मला तसले काही करता येत नाही,'' असं ते म्हणत होते. ते रागात असतानाच मी त्यांच्या दृष्टीस पडलो. मी जोधपूरला जायची परवानगी मागायला आलो आहे, असे वाटून ते एकदम तुटकपणे म्हणाले, ''मोहनलाल, तू फार लांबून आला आहेस. जायची नसती घाई करू नकोस.'' वेळप्रसंग पाहून मी एकदम माघारी वळलो. स्वाक्षरी बाजूलाच राहिली. आपल्याला सिद्धी प्राप्त आहेत असं थोतांड गुरुदेवांनी कधी माजवलं नाही. आपण भाऊसाहेब महाराजांचे एक सामान्य शिष्य आहोत असे ते मानत. डॉ. दात्यांनी अशीच एक गोष्ट मला सांगितली होती. विद्यार्थिदशेत १९२८ मध्ये ते गुरुदेवांकडे अलाहाबादला राहिले होते. एकदा विद्यापीठातले काम संपवून राधाकृष्णन् गुरुदेवांकडे जेवायला आले. जेवायला बसण्यापूर्वी गुरुदेवांनी महाराजांच्या फोटोपुढे डोके टेकवले. ''कुणाचा फोटो ?'' असे राधाकृष्णन्नी विचारल्यावरून ''ते माझे सद्गुरू आहेत,'' असे गुरुदेवांनी उत्तर दिले. जराशा अविश्वासाने राधाकृष्णन् उद्गारले, ''म्हणजे ते इतके मोठे होते ?'' गुरुदेव ठसक्याने म्हणाले, ''हो, हो, त्यांनीच मला परमार्थाची दृष्टी दिली.'' राधाकृष्णन्नी मुकाट्याने महाराजांच्या फोटोपुढे मान वाकवली.

## ५ उत्तम गुणांचा ग्राहक ।

माझ्या वडिलांचा जन्म १३ ऑगस्ट १८९६ ला झाला. त्यांच्या या जन्मशताब्दीच्या दिवशी मला गुरुदेव रा.द. रानडे यांच्यावरील त्यांच्या भक्तीची आठवण येते आणि गुरुदेवांबद्दल ते सांगत असलेल्या अनेक गोष्टी मनात तरारून येतात. श्री. गुरुदेवांच्या परीसस्पर्शाने त्यांचे सर्व आयुष्यच बदलून गेले. गुरुदेवांनी अनेक विद्यार्थ्यांना आपल्या छत्राखाली घेतले व शेवटपर्यंत त्यांचे रक्षण केले. माझे वडील असेच एक भाग्यवंत होते. त्यांना आम्ही काका म्हणत असू.

ज्या शाळेला गुरुदेव विद्यार्थी असण्याचा सन्मान प्राप्त झाला, त्याच शाळेत काकांनी शिक्षण घेतले. जमखंडीतील सर्वच विद्यार्थी गुरुदेवांना आदर्श मानत. गुरुदेव जमखंडीला आले की अनेक विद्यार्थी त्यांना भेटायला जात; त्यांत काकाही असत. आयुष्यभर त्यांनी गुरुदेवांची संगत धरली आणि हे पाहून, 'मधावर बसलेली माशी तो मध कधीच सोडत नाही,' हे गुरुदेवांचे वाक्य मला आठवते.

काकांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, त्या वेळी गुरुदेव तिथे तत्त्वज्ञान शिकवत होते. फ्रीशिप मिळवून देण्याबद्दल काकांनी गुरुदेवांना विनंती केली होती. पण फ्रीशिप मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीत त्यांचे नाव दिसले नाही, म्हणून ते गुरुदेवांकडे गेले. गुरुदेवांनी त्यांना 'काळजी करू नको' म्हणून सांगितले आणि पंधरा मिनिटांत त्या यादीत काकांच्या नावाचा समावेश झाला. नेहमीच अडचण आली की काका गुरुदेवांकडे वळत आणि आपल्या सर्वच शिष्यांसाठी गुरुदेव जसे आपले कृपारूपी सुदर्शन चक्र घेऊन धाव घेत असत, तसेच ते काकांसाठी धावून येत. काका आम्हाला सांगत की ते सुरुवातीला पुण्यात अनवाणी हिंडायचे. तेव्हा गुरुदेवांनीच त्यांना चपला वापरायला सांगितले. आपल्या जवळच्या माणसाची ते इतकी बारीकसारीक बाबतीत काळजी घेत !

गुरुदेवांची साधी राहणी, प्रेमळपणा व बुद्धिमत्ता यांचे काकांना आकर्षण होते. कॉलेजातल्या श्रेष्ठ व्यक्ती गुरुदेवांना मान देत, यामुळे काकांना त्यांच्याबद्दल भीतियुक्त आदर वाटत असे. कॉलेजात पहिल्यापासून त्यांनी गुरुदेवांशी संपर्क ठेवला होता. सत्यवंत मळेबेन्नूर नावाच्या एका मित्राचा काकांवर खूप प्रभाव होता. देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी नव्या पिढीला

शिक्षण देण्याचे महत्त्व सत्यवंताने त्यांच्या मनावर बिंबवले होते. ते दोघे एक शाळा काढणार होते. त्यासाठी पूर्वतयारी म्हणून तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे असे सत्यवंताचे मत होते. अशा तऱ्हेने काका तत्त्वज्ञानाकडे वळले आणि नंतर तत्त्वज्ञानाने त्यांना कधीच सोडले नाही. बी. ए. मध्ये ते गुरुदेवांचे विद्यार्थी झाले. काका त्यांच्या व्याख्यानांच्या फार सविस्तर नोट्स घेत. ही त्यांची सवय गुरुदेवांना आवडली. गुरुदेव आदर्श शिक्षक होते, असे काका सांगत. आदल्या दिवशी जो भाग शिकवला त्याचा व्याख्यानाच्या सुरवातीला ते आढावा घेत आणि त्या दिवशी जे शिकवले त्याचा तासाच्या शेवटी सारांश सांगत.

गुरुदेव कधीकधी निवडक विद्यार्थ्यांना घरी जेवायला बोलावत. काका त्यांतले एक होते. ते पहिल्यांदा गुरुदेवांच्या घरी गेले तेव्हा त्यांना भिंतींवर खिळ्यांना दोऱ्या लटकत असलेल्या दिसल्या. त्या दोऱ्यांच्या टोकांना काड्या व्यवस्थित बांधलेल्या होत्या. काकांना वाटले की गुरुदेव यांचा उपयोग योग प्रक्रियेसाठी करत असावेत. वस्तुतः मच्छरदाणी लावण्यासाठी ही व्यवस्था होती. त्याचप्रमाणे गुरुदेवांना भाऊसाहेब महाराजांच्या फोटोसमोर कापूर लावताना पाहून त्यांना वाटले की हे बहुतेक कुठल्यातरी ज्योतिसंप्रदायातले असावेत. काही वर्षांनी काकांनी हे गुरुदेवांना सांगितल्यावर ते खूप हसले. मग अनेकदा ते इतर साधकांसमोर काकांना ही हकीकत सांगायला लावत. नंतरच्या काळात गुरुदेव खूप मनमोकळेपणाने बोलत असत. ते काकांच्या विनोदांना मनापासून हसत. स्वतःही सर्वांना गमतीदार घटना सांगत. विद्यावंशातील गुरू आणि शिष्य यांतील हे एक विरळ नाते होते. काकांवर गुरुदेवांची विशेष मर्जी असल्याचे लोकांच्या लक्षात आले होते.

१९१७ साली पदवी घेतल्यानंतर काका मुंबईला गेले. तिथे त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. याच वेळी ते लॉ कॉलेजमध्येही शिकत होते. दोन तीन महिन्यांनी एका मित्राकडे ठेवलेले सामान न्यायला ते पुण्याला आले. पुणे स्टेशनकडून फर्ग्युसन कॉलेजकडे जात असताना त्यांनी गुरुदेवांना टांग्यातून जाताना पाहिले. काकांना पाहून गुरुदेवांनी टांगा थांबवला आणि विचारले, ''तू सध्या काय करतो आहेस ?'' काकांनी सांगितले की आपण शिक्षकाची नोकरी करत आहोत व लॉच्या टर्म्स भरत आहोत. गुरुदेवांनी त्यांना जोरात

विचारले, ''तुला वकील व्हावयाचे आहे काय ?'' काकांनी उत्तर दिले की वकील होण्याचा त्यांचा अजिबात विचार नव्हता, पण त्यांना थोडा रिकामा वेळ होता म्हणून ते वकिलीचा अभ्यास करत होते. बॉंबे युनिव्हर्सिटीच्या अनुदानातून गुरुदेव एक पुस्तक लिहीत होते. त्या कामात मदत करायला फेलो म्हणून येणार का, असे गुरुदेवांनी काकांना विचारले. एका क्षणाचाही विचार न करता काकांनी ताडकन् होकार दिला. गुरुदेवांनी त्यांना आपल्याबरोबर येण्यासाठी टांग्यात बसायला सांगितले. काका आपले सामान आणण्यासाठी गेलेच नाहीत. हा त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा क्षण होता. गुरुदेवांनी त्यांच्या मदतनिसाची निवड केली होती. पुढे काकांची गुरुदेवांवर दृढ निष्ठा जडली.

शेवटपर्यंत काका गुरुदेवांचे विद्यार्थी व मदतनीस होते. फेलो म्हणून त्यांच्याकडे जाईपर्यंत गुरुदेव त्यांना कृष्णा म्हणत. पण दुसऱ्याच दिवसापासून ते त्यांना कृष्णराव म्हणू लागले, म्हणून सर्व साधकही त्यांना कृष्णरावच म्हणत. गुरूमध्ये असलेले देवत्व आपल्या भक्ताची निवड करते आणि ऋणानुबंधाच्या गाठी पक्क्या करते. एका कर्मठ व कर्मकांडात बुडलेल्या कुटुंबातल्या सनातनी वातावरणातून काका अक्षरशः उचलले गेले आणि अंबुराव महाराजांच्या सान्निध्यात आणून ठेवले गेले. अंबुराव हे भाऊसाहेब महाराजांचे एक श्रेष्ठ शिष्य असून, ते कोणत्याही बाह्य अवडंबराशिवाय अत्यंत उत्कट पारमार्थिक आयुष्य जगत होते.

पुण्याला अध्यात्मभवनात गुरुदेवांकडे राहायला आलेले, काका हे पहिले विद्यार्थी होते. गुरुदेवांचे अंग चेपण्यापासून ते पुस्तकासाठी नोट्स तयार करण्यापर्यंत काकांनी त्यांची सर्व प्रकारे सेवा केली. गुरुदेवांबरोबरच्या आमच्या शेवटच्या भेटीत गुरुदेवांनी आम्हाला सांगितले की, 'अंग चेपून घेण्याची सवय मला कृष्णरावांनी लावली.' गुरुदेव काकांना काही लिहायला सांगत किंवा कोणत्यातरी संदर्भासाठी नोट्स तयार करायला सांगत. काही तासांनी, ते काम झाले का, असे विचारत. त्यामुळे दिलेले काम, पत्रांना उत्तरे लिहिण्याचे असो, की एखाद्या पुस्तकाचा सारांश काढण्याचे असो, ते आपल्या खोलीत गेल्यावर ताबडतोब पूर्ण करण्याची काकांना सवय लागली. त्याच वेळी काका तत्त्वज्ञान विषयात एम. ए. होण्याचा अभ्यास करत होते. एखाद्या पालकाप्रमाणे गुरुदेवांनी त्यांची काळजी घेतली. काका कुणाबरोबर गप्पा मारत बसलेले दिसले तर ते त्यांना आपल्या खोलीत जाऊन अभ्यास करायला

सांगत. काका अतिशय आज्ञाधारक होते व अत्यंत चपलतेने कामे करत. गुरुदेवांची लहानमोठी दैनंदिन कामे त्यांनी स्वतःच्या अंगावर घेतली. नंतरच्या काळातसुद्धा, गुरुदेवांचे काम करायचे असले की ते आपले वय विसरून जात व अक्षरशः एखाद्या तरुणाप्रमाणे धावपळ करून ते काम पूर्ण करत. काकांच्या शारीरिक व बौद्धिक सजगतेवर गुरुदेव नेहमीच संतुष्ट व प्रसन्न असत.

१९२० साली अतिशय आजारी पडल्यावर गुरुदेव इंचगेरीला गेले, तेव्हा काका त्यांच्याबरोबर होते. गुरुदेवांचा संप्रदाय आणि त्यांचे पारमार्थिक आयुष्य यांबद्दल त्यांना तिथे माहिती झाली. बाबा (अंबुराव महाराज), तसेच श्रीमती शिवलिंगव्वा, गिरिमल्लप्पा वगैरे भाऊसाहेब महाराजांच्या श्रेष्ठ शिष्यांची भेट होण्याचे भाग्य त्यांना लाभले. शिवलिंगव्वा काकांशी फार प्रेमळपणे वागायच्या. त्यांच्यासमोर त्या पडदा घेत नसत. शिवलिंगव्वांच्या पायांना हात लावून नमस्कार करण्याची काकांना परवानगी होती. दोघांचा पत्रव्यवहारही होता. हे सर्व थोर साधक काकांना धाकट्या भावाप्रमाणे वागवत. बाबा व गुरुदेव नेमावर किती भर देतात आणि अत्यंत शारीरिक यातना सोसतानासुद्धा गुरुदेवांची नामावर कशी अचल श्रद्धा होती, हे तिथे काकांना अनुभवायला मिळाले. गुरुदेवांच्या प्रकृतीतील आश्चर्यकारक सुधारणेचे ते साक्षीदार होते. ती सुधारणा म्हणजे एक चमत्कारच होता.

आधी गुरुदेवांना एक घासही पचत नसे. पण प्रकृती सुधारल्यावर ते थोडे थोडे जेवू लागले. काका किंवा जगन्नाथ लेले स्वयंपाक करीत, पण त्या कलेत दोघेही पूर्णपणे अनभिज्ञ होते. कोणी नातेवाईक त्यांची काळजी घ्यायला येऊ शकेल का, असे शेवटी काकांनी गुरुदेवांना विचारले. गुरुदेवांनी सांगितले की प्रवासाचा खर्च पाठवला तर त्यांची चुलत बहीण श्रीमती यमुनाबाई गोखले येऊ शकेल. लगेच यमनाक्कांना मनीऑर्डर गेली आणि त्या हजर झाल्या. श्री. पाटील नावाचा एक आचारीही नेमला आणि गुरुदेवांच्या पोटात थोडे चांगले अन्न जाऊन प्रकृती सुधारण्यास आणखी मदत झाली.

फेलो म्हणून काका १९१७ ते १९२४ असे सहा वर्षे गुरुदेवांकडे राहिले. त्याच काळात गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एम. ए. केले. चार पेपर्स व एक प्रबंध असे या परीक्षेचे स्वरूप होते. त्यांच्या प्रबंधाचा विषय

'अ‍ॅरिस्टॉटल्स क्रिटीक ऑफ प्लेटॉनिझम' असा होता. हा थोडासा कठीण विषय काकांनी इतक्या समर्थपणे हाताळला होता की त्यावर अधिक काम करून तो पीएच. डी. साठी सादर करण्याची सूचना गुरुदेवांनी केली होती.

गुरुदेवांच्या दैवी संगतीत काकांची वृत्ती एकदम पालटली. तरीही तोपर्यंत त्यांनी नाम घेतले नव्हते. एकदा त्यांचे जमखंडीचे काही मित्र बाबांकडून नाम घेण्यासाठी निंबाळहून इंचगेरीला जाणार होते. गुरुदेवांनी काकांना विचारले, ''तुम्हीही जाणार का ?'' काका म्हणाले, ''मला तुमच्याकडून नाम हवे.'' गुरुदेव काही बोलले नाहीत. तेव्हा ते कुणालाही नाम देत नव्हते. काही दिवसांनी काकांना वाटले की इंचगेरीला न जाण्यात आपली चूक झाली. म्हणून त्यांनी बाबांकडून नाम घेण्यासाठी इंचगेरीला जाण्याची गुरुदेवांकडे परवानगी मागितली. गुरुदेव म्हणाले, ''आधी का गेला नाहीत ? आता नका जाऊ.'' काकांना खूप वाईट वाटले, परंतु काही दिवसांनी गुरुदेवांनी आपणहून काकांना इंचगेरीस जाण्यास सांगितले. नाम देताना बाबांनी काकांना सांगितले, 'विठोनें शिरीं वाहिला देवराणा' ! आमचा देव 'तो' आहे'. त्यांच्या पद्धतीप्रमाणे गीतेचे पुस्तक उघडून एक श्लोक वाचायला सांगितला. काकांनी वाचलेला श्लोक होता -

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।

प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ (९.१८)

गुरुदेवांच्या बरोबर इंचगेरीला राहत असताना काकांची बाबांशी ओळख झाली होती. रोज रात्री सर्वजण झोपल्यावर बाबा आणि गुरुदेव अतिशय भक्तिभावाने महाराजांच्या गोष्टी बोलत बसत. महाराजांच्या आठवणी काढण्यात ते दंग होऊन जात. शेवटी बाबा म्हणत, 'रामराया, महाराजांवर तुझे किती प्रेम आहे ! तीन वाजले बघ. चल, आता नेमाला बसू या.' या वेळी काका तिथे बाबांसाठी पान कुटत बसलेले असत. या अद्वितीय दुर्लभ संवादाचे ते भाग्यवान श्रोते होते.

बाबांनी माझ्या आईला व तिच्या भगिनी शारक्का यांना नाम दिले. शारक्का आत्मसाक्षात्काराच्या अत्युच्च पदाला पोचल्या. खरे तर काकांच्या हृदयातच लोकांना भक्तिमार्गाला लावण्याचा स्रोत होता. या परमार्थपथावर ते अनेक व्यक्तींना आणि कुटुंबांना घेऊन गेले. गुरुदेवांचे शिष्यत्व पत्करण्यासाठी

इतरांना त्यांनी मार्गदर्शन केले, इतकेच नाही तर गुरुदेवांची सेवा करून त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी उत्तेजन दिले. त्यांना त्यात फार आनंद होई. घनश्याम शंकर (श्यामराव) कुमठेकर नेहमी काकांचे शब्द उद्‌धृत करत- 'गुरुदेवांची अशी सेवा करा की त्यांना नेमात तुमची आठवण होईल.' खरे म्हणजे गुरुदेवांना 'गुरुदेव' म्हणणारी पहिली व्यक्ती म्हणजे काका. तोपर्यंत सर्वजण त्यांना 'रामभाऊ' किंवा 'साहेब' म्हणत. गुरुदेव देव आहेत असा काकांचा दृढ विश्वास होता. ते त्यांना गुरुदेव म्हणू लागले. हा शब्द डॉ. पारिपत्यदार, कुमठेकर, नारायण रामचंद्र मसलेकर यांनी व इतरांनी उचलला.

एकदा लक्ष्मणभटजी काकांना म्हणाले की, गुरू शिष्याला पारमार्थिक अनुभव सोडून सर्वकाही देतो. काकांनी त्यांना ताबडतोब सांगितले की गुरू शिष्याला पारमार्थिक अनुभवसुद्धा देतो आणि ते स्वतः याचे जिवंत उदाहरण होते. काका इंचगेरीला होते त्या काळात साधक खूप मनमिळाऊ होते. ते पारमार्थिक अनुभवांबद्दल उघडपणे व दिलखुलासपणे बोलत. गुरुदेव काकांची वेगवेगळ्या साधकांशी ओळख करून देत आणि ते गेल्यावर त्यांचे अनुभव सांगत. नाम घेतल्यावर काकांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि मनापासून नेम करायला सुरवात केली. पण बराच काळ गेला तरी त्यांना अनुभव येईना, म्हणून ते अस्वस्थ झाले. गुरुदेवांना हे माहीत होते. त्या वर्षी निंबरगी महाराजांची पुण्यतिथी निंबरगी संप्रदायाच्या सर्व शाखांच्या साधकांनी निंबरगीला एकत्र येऊन साजरी करायचे ठरले होते. काका गुरुदेवांबरोबर तिकडे गेले. परतताना अशा पुण्यप्रद तीर्थस्थळी येऊनही व इतक्या श्रेष्ठ साधकांच्या सहवासात नेम करूनही आपले ईप्सित पूर्ण झाले नाही, याबद्दल काका खिन्न होते. त्याच क्षणी गुरुदेव म्हणाले. 'कृष्णराव बघा'. काकांनी आकाशाकडे बघितले आणि त्यांना गुरुदेवांच्या सान्निध्यात पहिला अनुभव आला. बाबांची कृपा प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यांसमोर अवतरली. इथे गुरुदेवांनी बाबांचे काम केले. बाबांच्या निर्याणानंतर त्यांचे पुष्कळ शिष्य गुरुदेवांनाच गुरुस्थानी मानत. गुरुदेवांनी काकांवर फार प्रेम केले. १९५५ मध्ये त्यांनी एका शिष्याला सांगितले की, 'माझ्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये सर्व प्रकारे उत्तम विद्यार्थी म्हणजे कृष्णराव होत'. त्या शिष्याने काकांना या अर्थाचे पत्र लिहिले होते.

गुरुदेवांना सर्व कामांत काकांनी नेहमी मदत केली. फेलो म्हणून काम

करत असतानाही गुरुदेवांना त्यांची अत्यावश्यकता जाणवत होती. पण ज्या योजनेखाली त्यांना फेलो नेमले होते, ती बंद झाली. गुरुदेवांना त्यांचे स्टेनो-टायपिस्ट शंकरराव धर्माधिकारी यांची अत्यंत गरज होती. गुरुदेव म्हणाले, ''कृष्णराव, तुम्हाला थोडे जरी टायपिंग येत असते तरी मी तुम्हालाच ठेवून घेतले असते. मला तुमची गरज आहे. पण मी दोघांना ठेवून घेऊ शकत नाही.'' काका ताबडतोब दुसऱ्या नोकरीसाठी बाहेर पडले (१९२४). पण ते कुठेही असले आणि कोणत्याही पदावर असले तरी त्यांची प्रत्येक सुट्टी गुरुदेवांबरोबर जाई; त्यांची प्रत्येक रजा गुरुदेवांसाठी होती. गुरुदेवांनी बोलावल्यावर सर्वकाही सोडून ते निंबाळला किंवा गुरुदेव असतील तिथे जात.

काकांनी १९२८ मध्ये नाशिकच्या हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेजात व्याख्यात्याची नोकरी पत्करली. त्या वेळी गुरुदेवांनी त्यांना आपली पगडी दिली व घालायला सांगितले. ''कृष्णराव, तुम्ही विठोबासारखे दिसता,'' असे म्हणून खो खो हसू लागले. परंतु काका अनमान करत असल्याचे पाहून त्यांनी ती ठेवून दिली. 'ती घ्यायला हवी होती', असे उत्तर काळात काका नेहमी म्हणायचे. गुरुदेवांनी जेव्हा त्यांच्या भविष्याबद्दल शुभेच्छा दिल्या, तेव्हा आपल्या कमी उंचीमुळे आत्मविश्वास वाटत नाही, असे काका म्हणाले. गुरुदेव जोरात म्हणाले, ''शारीरिक उंची काय बघता ? तुमचा आत्मा मोठा करा ! Make your soul great.'' काकांच्या आयुष्यात हे वाक्य सदैव पथप्रदर्शक होते.

काका उपप्राचार्य झाले होते पण जेव्हा गुरुदेवांचे काम करण्यात त्या पदाचा अडथळा येऊ लागला, तेव्हा काकांनी ते सोडून दिले. पुढे १९५४ मध्ये जेव्हा प्राचार्यपदाची संधी आली, तेव्हा गुरुदेवांनी आश्वासन दिल्यानंतरच त्यांनी प्राचार्यपद स्वीकारले. नाशिकहून निवृत्त झाल्यावर १९५६ मध्ये त्यांनी धारवाडच्या जे. एस. एस. कॉलेजात शिकवले. पुढे कर्नाटक युनिव्हर्सिटीत डॉ. आर. डी. रानडे चेअर ऑफ फिलॉसॉफी हे पद निर्माण झाले. ते पद भूषवण्याचा पहिला मान काकांना मिळाला (१९५८).

निंबाळमधील अनेक घटनांचे काका नेहमी वर्णन करीत. एकदा ते गुरुदेवांना म्हणाले, ''तुम्ही चंद्राप्रमाणे आहात.'' याचा अर्थ विचारल्यावर ते म्हणाले की ज्याप्रमाणे चंद्र आपल्याबरोबर चालतो असे प्रत्येकाला वाटते, त्याप्रमाणे निंबाळला येणाऱ्या प्रत्येकाला, गुरुदेव आपल्यावरच प्रेम करतात,

असे वाटते. वस्तुतः ते सर्वांशी सारखेच वागतात. गुरुदेव हसले. एकदा गुरुदेव काकांना काही चुकीबद्दल रागावले. नंतर म्हणाले, ''ही आजकालची तरुण मुले मी बोललो की रागावतात. तुम्ही कसे रागावत नाही ?'' उत्तरादाखल काकांनी जगन्नाथ पंडितांचा भामिनीविलासामधील एक श्लोक म्हटला-

लोकाभिरामगुणगौरवगुंफितानां । रोषोऽपि निर्मलधियां रमणीय एव ।
लोकपृणैः परिमलैः परिपूरितस्य । काश्मीरजस्य कटुताऽपि नितांतरम्या ॥

सज्जनांचा राग केशराच्या कडूपणाप्रमाणे आल्हाददायक असतो. गुरुदेवांनी स्मित केले. एकदा ते आले आणि काका नेमाला कसे बसले आहेत हे त्यांनी बघितले. ते म्हणाले, ''नेमाला असे बसले पाहिजे. अलीकडची तरुण मुले ताठ बसतात, अहंकाराने फुगलेली असतात. त्यांच्यांत काही नम्रता नसते. नेम करताना मन नम्र हवे.''

गुरुदेव सर्वांशी फार प्रेमाने वागत. प्रत्येक वर्षी पाच दिवस याप्रमाणे गुरुदेव नाशिकला आमच्याकडे १९४९-१९५५ असे सात वर्षे आले. नाशिकच्या आमच्या घरी एकदा बाबाही आले होते. गुरुदेव आले की नाशिकच्या सर्व नामधारकांना आनंद होई. एका वर्षी कुणीच नाम घेतले नाही म्हणून काकांना वाईट वाटले. पुढच्या वर्षी जवळजवळ शंभर साधकांनी नाम घेतले. आपल्या जिव्हाळ्याच्या माणसाचे समाधान करण्याची ही गुरुदेवांची पद्धत होती. ही गुरुदेवांची नाशिकला शेवटची भेट.

काका पूर्णपणे गुरुदेवांवर अवलंबून होते. त्यांची कृपा हे काकांचे अन्न होते. गुरुदेवांनाही ही एकविध भक्ती आणि संपूर्ण शरणागती माहीत होती. पुढील घटना तिथे जवळपास असलेल्या एका व्यक्तीने आम्हाला सांगितली आहे. काही साधक विनोदाने गुरुदेवांना म्हणाले, ''रामभाऊ, तुमचे कृष्णरावांवर सर्वांपेक्षा जास्त प्रेम आहे.'' गुरुदेव गंभीर झाले आणि म्हणाले, ''का असू नये ? कृष्णरावांची माझ्यावर इतकी श्रद्धा आहे की पाण्याने काठोकाठ भरलेल्या विहिरीत मी त्यांना उडी मारायला सांगितले तरी ते निःशंकपणे उडी मारतील''. गुरुदेवांवर आमची अशीच श्रद्धा असावी हीच त्यांच्या चरणी प्रार्थना !

## ६ वैकुंठा श्रीरंग बोलावितो ।

प्लेटोच्या फीडो नामक संवादात एक जादू आहे. नचिकेतापासून मनुष्यमात्राला सतावणाऱ्या अमरत्वाच्या सिद्धांताचा ऊहापोह तिथे आहेच, शिवाय प्राचीन काळी ग्रीसमध्ये घडलेल्या, 'सॉक्रेटिसचे महाप्रस्थान' या न भूतो न भविष्यति, अशा प्रसंगाचे तिथे इतके हुबेहुब चित्रण आहे की, वाचणाऱ्याच्या डोळ्यांसमोर ते घटित जिवंत होऊन उभे राहावे. एकिक्रेटस हा सॉक्रेटिसचा शिष्य ती हृदयद्रावक घटना पाहायला हजर नव्हता. म्हणून त्याने आपला मित्र फीडो याला विनंती केली की, सॉक्रेटिसच्या मृत्यूची जशीच्या तशी हकीकत मला सांग. फीडोला तरी तेच हवं होतं. तो सॉक्रेटिसचा भक्त होता आणि त्याने ते अजब चित्र डोळ्यांनी पाहिलं होतं. 'माझ्या स्वतःच्या बोलण्यानं असो किंवा आणखी कुणाचं बोलणं ऐकण्यानं असो, सॉक्रेटिसचा विषय निघाला की माझं अंतःकरण आनंदानं भरून जातं' अशा शब्दांनी फीडोने या वृत्तांतकथनाचं सूतोवाच केलं.

माझी गोष्ट काय वेगळी आहे ? गुरुदेव रानडे यांच्याबद्दल ज्यांना नितांत आदर आहे, त्यांच्यापुढे गुरुदेवांच्या अखेरच्या दिवसांचं इतिवृत्त सांगणे मला अत्यंत प्रिय आहे. जुलै १९५६ ते जून १९५७ या वर्षात त्यांच्या जीवनाचा अखेरचा टप्पा आला आहे अशी पूर्वसूचना देणाऱ्या खूप गोष्टी घडल्या. समाप्तीचा पडदा पडण्याचा क्षण मांजरपावलाने जवळ येत होता, पण कुणाला त्याची चाहूल लागली नाही. या घटना जशाच्या तशा मांडण्याचा मी प्रयत्न करत आहे. अनेकदा मी स्वतः हजर होतो. शेवटचा आठवडा तर मी निंबाळला खिळलेला होतो. ते प्रसंग चलचित्राप्रमाणे माझ्या डोळ्यांसमोर आहेत.

जुलै १९५६ ला गुरुदेवांचा अमृतमहोत्सव जमखंडीला साजरा झाला. त्यासाठी ते तिकडे गेले. त्यांनी या समारंभाला कशी मान्यता दिली हे एक कोडेच आहे. कारण असल्या गोष्टी त्यांना कधीच आवडत नव्हत्या. १९४६ मध्ये त्यांना ६० वर्षे पुरी व्हायची होती. त्या निमित्ताने त्यांच्या मित्रमंडळींनी आधी एका वर्षापासून गौरवग्रंथ काढण्याची योजना आखली होती. त्यात तत्त्वज्ञानावरचे व इतर विषयांवरचे उत्तम लेख घालावे व वाढदिवसाच्या दिवशी ग्रंथ गुरुदेवांना अर्पण करावा, असा त्यांचा मानस होता. तत्त्वज्ञान व तत्सम

अनेक विषयांचा गुरुदेवांचा कित्येक वर्षांचा अभ्यास होता आणि या क्षेत्रांतली त्यांची थोरवी सर्वमान्य होती. देशातल्या आणि बाहेरच्या काही विद्वानांचे लेख मिळवण्यासाठी या मंडळींनी कंबर कसली. कशी कोण जाणे, या गोष्टीची कुणकुण गुरुदेवांना लागली आणि त्यांनी ती योजना फेटाळून लावली. उत्साही मंडळींपैकी एकाला ते लिहितात- 'तुमच्या बेताला साजेशी माझी योग्यता नाही. जेव्हा मी काही भरीव कामगिरी करीन तेव्हा ती वेळ येईल. तुमच्या सत्काराने माझा अहंकार बेडकीसारखा फुगेल आणि पुढच्या कामाला पूर्णविराम मिळेल. गौरवग्रंथ म्हणजे वर्षानुवर्षे चालणारा सत्कार समारंभच. म्हणून सत्कार आणि गौरवग्रंथ एकदम बंद.' मित्रांची योजना बारगळली.

इतकं होऊनही काहीजण ३/७/१९४६ ला हारतुरे व मिठाया घेऊन निंबाळला गेलेच. गुरुदेवांनी कशालाही स्पर्श केला नाही. उलट ज्ञानेश्वरीवर प्रवचन करायला काका कारखानीसांना फर्मावले. एकूण रागरंग पाहून काकांनी जीवनाचे क्षणभंगुरत्व आणि भक्तीचे माहात्म्य सांगणाऱ्या ओव्या निवडून उत्तम प्रवचन केलं. सगळं तिथंच संपलं. या पार्श्वभूमीवर १९५६ साली अमृतमहोत्सवाला त्यांनी दिलेली संमती संभ्रमात टाकते. असंही असेल की त्यांचं बालपण जमखंडीला गेलं असलं तरी ३० वर्षांत ते तिथे जाऊ शकले नव्हते. पुन्हा एकदा त्या भूमीवर पाय ठेवावा असं त्यांना वाटलं असेल का ? आपल्या सुहृदांच्या उत्साहाला प्रतिसाद देऊन त्यांचं कोड पुरवावं म्हणून तर त्यांनी परवानगी दिली नसेल ? की पूर्वी जमखंडी सोडताना त्या गावाने 'पुनरागमनाय च' असं हळूच त्यांच्या कानात सांगितलं होतं ? असेलही.

अमृतमहोत्सवाचा मुख्य समारंभ ३ जुलैला होता. पुष्कळांची गौरवपर भाषणे झाल्यावर गुरुदेव उठले आणि अहो आश्चर्यम् ! त्यांनी कन्नडमधून बोलायला सुरवात केली. कन्नडमधलं हे पहिलं जाहीर व्याख्यान (परिशिष्ट १२). १०-१५ मिनिटे कन्नडमध्ये बोलल्यावर ते मराठीकडे वळले. दुर्दैवाने एखादेच वाक्य बोलून होते न होते तोच ध्वनिवर्धक यंत्रणा बंद पडली. गुरुदेवांचं भाषण तिथंच थांबलं, आता कधीच ते ऐकायला मिळणार नाही.

गुरुदेव जमखंडीला आल्यामुळे त्यांच्यावर प्रेम करणारी माणसे, महाराजांचे व बाबांचे शिष्य, त्यांचं स्वतःचं मित्रमंडळ व शिष्यमंडळ, आप्तस्वकीय, अत्यंत आनंदात होते. गुरुदेवही खुषीत होते. औपचारिक समारंभ

## ६ वैकुंठा श्रीरंग बोलावितो ।

प्लेटोच्या फीडो नामक संवादात एक जादू आहे. नचिकेतापासून मनुष्यमात्राला सतावणाऱ्या अमरत्वाच्या सिद्धांताचा ऊहापोह तिथे आहेच, शिवाय प्राचीन काळी ग्रीसमध्ये घडलेल्या, 'सॉक्रेटिसचे महाप्रस्थान' या न भूतो न भविष्यति, अशा प्रसंगाचे तिथे इतके हुबेहुब चित्रण आहे की, वाचणाऱ्याच्या डोळ्यांसमोर ते घटित जिवंत होऊन उभे राहावे. एकिक्रेटस हा सॉक्रेटिसचा शिष्य ती हृदयद्रावक घटना पाहायला हजर नव्हता. म्हणून त्याने आपला मित्र फीडो याला विनंती केली की, सॉक्रेटिसच्या मृत्यूची जशीच्या तशी हकीकत मला सांग. फीडोला तरी तेच हवं होतं. तो सॉक्रेटिसचा भक्त होता आणि त्याने ते अजब चित्र डोळ्यांनी पाहिलं होतं. 'माझ्या स्वतःच्या बोलण्यानं असो किंवा आणखी कुणाचं बोलणं ऐकण्यानं असो, सॉक्रेटिसचा विषय निघाला की माझं अंतःकरण आनंदानं भरून जातं' अशा शब्दांनी फीडोने या वृत्तांतकथनाचं सूतोवाच केलं.

माझी गोष्ट काय वेगळी आहे ? गुरुदेव रानडे यांच्याबद्दल ज्यांना नितांत आदर आहे, त्यांच्यापुढे गुरुदेवांच्या अखेरच्या दिवसांचं इतिवृत्त सांगणे मला अत्यंत प्रिय आहे. जुलै १९५६ ते जून १९५७ या वर्षात त्यांच्या जीवनाचा अखेरचा टप्पा आला आहे अशी पूर्वसूचना देणाऱ्या खूप गोष्टी घडल्या. समाप्तीचा पडदा पडण्याचा क्षण मांजरपावलाने जवळ येत होता, पण कुणाला त्याची चाहूल लागली नाही. या घटना जशाच्या तशा मांडण्याचा मी प्रयत्न करत आहे. अनेकदा मी स्वतः हजर होतो. शेवटचा आठवडा तर मी निंबाळला खिळलेला होतो. ते प्रसंग चलचित्राप्रमाणे माझ्या डोळ्यांसमोर आहेत.

जुलै १९५६ ला गुरुदेवांचा अमृतमहोत्सव जमखंडीला साजरा झाला. त्यासाठी ते तिकडे गेले. त्यांनी या समारंभाला कशी मान्यता दिली हे एक कोडेच आहे. कारण असल्या गोष्टी त्यांना कधीच आवडत नव्हत्या. १९४६ मध्ये त्यांना ६० वर्षे पुरी व्हायची होती. त्या निमित्ताने त्यांच्या मित्रमंडळींनी आधी एका वर्षापासून गौरवग्रंथ काढण्याची योजना आखली होती. त्यात तत्त्वज्ञानावरचे व इतर विषयांवरचे उत्तम लेख घालावे व वाढदिवसाच्या दिवशी ग्रंथ गुरुदेवांना अर्पण करावा, असा त्यांचा मानस होता. तत्त्वज्ञान व तत्सम

अनेक विषयांचा गुरुदेवांचा कित्येक वर्षांचा अभ्यास होता आणि या क्षेत्रांतली त्यांची थोरवी सर्वमान्य होती. देशातल्या आणि बाहेरच्या काही विद्वानांचे लेख मिळवण्यासाठी या मंडळींनी कंबर कसली. कशी कोण जाणे, या गोष्टीची कुणकुण गुरुदेवांना लागली आणि त्यांनी ती योजना फेटाळून लावली. उत्साही मंडळींपैकी एकाला ते लिहितात- 'तुमच्या बेताला साजेशी माझी योग्यता नाही. जेव्हा मी काही भरीव कामगिरी करीन तेव्हा ती वेळ येईल. तुमच्या सत्काराने माझा अहंकार बेडकीसारखा फुगेल आणि पुढच्या कामाला पूर्णविराम मिळेल. गौरवग्रंथ म्हणजे वर्षानुवर्षे चालणारा सत्कार समारंभच. म्हणून सत्कार आणि गौरवग्रंथ एकदम बंद.' मित्रांची योजना बारगळली.

इतकं होऊनही काहीजण ३/७/१९४६ ला हारतुरे व मिठाया घेऊन निंबाळला गेलेच. गुरुदेवांनी कशालाही स्पर्श केला नाही. उलट ज्ञानेश्वरीवर प्रवचन करायला काका कारखानीसांना फर्मावले. एकूण रागरंग पाहून काकांनी जीवनाचे क्षणभंगुरत्व आणि भक्तीचे माहात्म्य सांगणाऱ्या ओव्या निवडून उत्तम प्रवचन केलं. सगळं तिथंच संपलं. या पार्श्वभूमीवर १९५६ साली अमृतमहोत्सवाला त्यांनी दिलेली संमती संभ्रमात टाकते. असंही असेल की त्यांचं बालपण जमखंडीला गेलं असलं तरी ३० वर्षांत ते तिथे जाऊ शकले नव्हते. पुन्हा एकदा त्या भूमीवर पाय ठेवावा असं त्यांना वाटलं असेल का ? आपल्या सुहृदांच्या उत्साहाला प्रतिसाद देऊन त्यांचं कोड पुरवावं म्हणून तर त्यांनी परवानगी दिली नसेल ? की पूर्वी जमखंडी सोडताना त्या गावाने 'पुनरागमनाय च' असं हळूच त्यांच्या कानात सांगितलं होतं ? असेलही.

अमृतमहोत्सवाचा मुख्य समारंभ ३ जुलैला होता. पुष्कळांची गौरवपर भाषणे झाल्यावर गुरुदेव उठले आणि अहो आश्चर्यम् ! त्यांनी कन्नडमधून बोलायला सुरवात केली. कन्नडमधलं हे पहिलं जाहीर व्याख्यान (परिशिष्ट १२). १०-१५ मिनिटे कन्नडमध्ये बोलल्यावर ते मराठीकडे वळले. दुर्दैवाने एखादेच वाक्य बोलून होते न होते तोच ध्वनिवर्धक यंत्रणा बंद पडली. गुरुदेवांचं भाषण तिथंच थांबलं, आता कधीच ते ऐकायला मिळणार नाही.

गुरुदेव जमखंडीला आल्यामुळे त्यांच्यावर प्रेम करणारी माणसे, महाराजांचे व बाबांचे शिष्य, त्यांचं स्वतःचं मित्रमंडळ व शिष्यमंडळ, आप्तस्वकीय, अत्यंत आनंदात होते. गुरुदेवही खुशीत होते. औपचारिक समारंभ

एकदा संपला व ते सर्वांच्या भेटीगाठीत रमले. जमखंडीला २-३ दिवस राहण्याचा पहिला बेत होता. तो कुठल्याकुठे विरघळला. प्रेमाने भारावलेल्या परिसरातून त्यांचा पाय निघेना व त्यांनी तिथं चक्क ३ आठवडे नांगर टाकला. ही शेवटची भेट देऊन त्यांनी जमखंडीचा निरोप घेतला.

धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाकडून गुरुदेवांना कन्नड वाङ्मयातील साक्षात्कारशास्त्र या विषयावर २० व्याख्याने देण्याचे निमंत्रण आले होते. नोव्हेंबर १९५६ पर्यंत ११ व्याख्याने झाली होती. डिसेंबरच्या अखेरीस आणखी तीन व्याख्याने देण्यासाठी ते धारवाडला गेले. निवृत्त जिल्हा न्यायाधीश भाऊराव (विठ्ठल गुरुराव) जमखंडी यांच्या प्रशस्त बंगल्यात ते उतरत. २५, २६, २७ डिसेंबरला तीन व्याख्याने म्युनिसिपल सभागृहात झाली. १) कॅरॅक्टरि-स्टिक्स ऑफ सेंट्स, २) रिलेशन ऑफ सेंट्स टु गॉड, व ३) मॉरफिक, फोटिक, फोनिक अँड अदर एक्सपिरिअन्सेस, हे विषय होते. उपकुलगुरू रँग्लर दादप्पा चिंतप्पा पावटे अध्यक्ष असत. विद्यापीठाच्या विद्यमाने होणाऱ्या व्याख्यानांतील ही अखेरची व्याख्याने. उरलेली सहा व्याख्याने राहूनच गेली. या मुक्कामात गुरुदेवांनी १-२ वीरशैव मठांना भेटी दिल्या. तिथल्या स्वामींना ती अपूर्वाई वाटली. वीरशैव तत्त्वज्ञान व कन्नड संतवाङ्मय या विषयांवर काही चर्चा झाली. आपली काही कन्नड प्रकाशने गुरुदेवांना देऊन स्वामींनी त्यांना निरोप दिला.

धारवाडहून गुरुदेव हुबळीमार्गे निंबाळला निघाले. त्यांचे अगदी निकटचे शिष्य प्रह्लाद कुलकर्णी त्या वेळी बेंगळूरला सचिवालयात नोकरीला होते. धारवाडच्या व्याख्यानांना ते आले होते. बेंगळूरला जाण्यासाठी हुबळी जंक्शनहून दुसरी गाडी घेण्याच्या आधी ते गुरुदेवांच्या डब्यापाशी आले व जड अंतःकरणाने अगदी खाली वाकून त्यांनी नमस्कार केला. प्रह्लाद गेल्यावर गुरुदेव म्हणाले. ''प्रह्लादच्या मनात किती भक्ती आहे ! निघताना तो किती हळवा झाला होता, पाहिलंत ना ?''

निंबाळला येतायेता काही मित्रांच्या आग्रहावरून गुरुदेव गदगला उतरले. डॉ. एन. एच. गोडबोले यांच्या घरी राहण्याची व्यवस्था केली होती. आम्ही उणेपुरे १५ जण होतो, पण आम्हाला त्यांनी फार अगत्याने वागवले[1].

---

१ पाहुणचाराची पूर्ण जबाबदारी डॉक्टरांनी एकट्याने घेतली होती. १०/१/९७ ला गदगचे सेवानिवृत्त शिक्षक एस. बी. कुलकर्णी यांचे मला पत्र आले व त्यांनी ही गोष्ट कळवली.

२८ डिसेंबरला पूज्य स्वामी शिवानंदांच्या अध्यक्षतेखाली वीरशैव मठात संध्याकाळी गुरुदेवांचं जाहीर व्याख्यान झालं. सुरवातीला त्यांनी भाऊ निंबरगींना, 'इदे ब्रह्मज्ञान नोडिको' (हेच ब्रह्मज्ञान, बरं का), हे संतकवी शरीफ साहेबांचं पद म्हणायला सांगितलं. हे गुरुदेवांचं शेवटचं जाहीर व्याख्यान. विशेष म्हणजे व्याख्यान कन्नडमध्ये झालं. कन्नड ही गुरुदेवांच्या संप्रदायाची भाषा. ती शिकली पाहिजे असं त्यांच्या सद्गुरूंनी १९१० मध्ये होर्ती येथे बजावलं होतं. या पदात नाम व ब्रह्म यांचं ऐकात्म्य सांगितलं आहे. नाम म्हणजे ब्रह्म आणि ब्रह्म म्हणजे नाम. नामस्मरणाच्या प्रक्रियेचा उत्कर्ष कसा होतो हे इथं तीन पायऱ्यांनी दाखवलं आहे. १) साधकाला देवाच्या पायांचं दर्शन होतं. परमार्थात फार पुढे गेलेल्या साधकालाच हे शक्य होतं. २) अंतस्थातून प्रकट होणारी ऊर्मी साधकाच्या अनुभवाला येते. ३) साधक सहजपणे नामाचा उच्चार करू लागतो, ती सवय जडते. सवयीचे महत्त्व किती म्हणून सांगावं ? सवयीला आपल्या स्थायी स्वभावाच्या खालोखाल स्थान आहे असे ऐकल्यावर ड्यूक ऑफ वेलिंग्टन म्हणाला, ''छे छे. स्वभावाच्या दसपट सवय महत्त्वाची आहे.'' असो. नाम साधकाच्या रोमारोमांत भिनतं. इथंच त्याचं ईश्वराशी ऐक्य होतं. गुरूंनी दिलेल्या नामाचा सतत जप पाहिजे. तेच अखेरची गती आहे. नाम हा साधकाचा प्राण झाला पाहिजे.


धारवाडच्या स्वामींनी दिलेला पुस्तकांचा भलामोठा गठ्ठा निंबाळला नेण्यासाठी आमच्याकडे सोपवला होता. पण त्याची कुणी फारशी दखल घेतली नाही. दुसरं कुणीतरी त्याच्याकडे लक्ष देत आहे अशी प्रत्येकाची समजूत. शिवाय पुस्तकांचा गठ्ठा जाणार कुठे, त्याला कोण हात लावणार, असा एक भ्रम. वाटेत एकदोनदा गुरुदेवांनी त्याची चौकशी केली. पण तो सुरक्षित असणारच अशा खात्रीने आम्ही तपास न करता हो ला हो केलं. निंबाळला उतरलो. पुस्तकं बेपत्ता झालेली. आम्हाला धक्का बसला. पुस्तकांची वाट लागली हे कळल्यावर गुरुदेवांना फार वाईट वाटलं. ''स्वामींनी मोठ्या प्रेमाने ती भेट दिली होती की रे,'' एवढेच ते म्हणाले. आम्ही विद्यार्थी आणि नोकर सगळ्यांचीच पुस्तकं सांभाळण्याची जबाबदारी होती. वास्तविक प्रत्येकानेच लक्ष द्यायला हवं होतं. आम्ही त्या परीक्षेला उतरलो नाही. गुरुदेव रागावले नाहीत म्हणून आमचा जीव भांड्यात पडला. पण गुरुदेवांच्या कामाची हेळसांड झाली, त्या अपराधाची आज जी टोचणी आहे, तिचं काय ?

जानेवारी १९५७. महिन्याच्या सुरवातीला श्री. मधुसूदन नरहर देशपांडे, श्री. ब्रजबासी लाल व सौ. कुसुम लाल असे तिघेजण निंबाळला आले. देशपांडे व लाल दोघेही दिल्लीला पुराणवस्तुशास्त्र विभागात काम करत होते. १९५५ साली देशपांडे निंबाळला आले असताना त्यांना नाम मिळालं होतं. गुरुदेवांचा साधेपणा, निरहंकारी वृत्ती व विशेषतः त्यांची पुराणवस्तुशास्त्रातली गती यांचा त्यांच्या मनावर खोल ठसा उमटला होता. मंदिरे, स्मारके, शिल्पकृती, हे विषय गुरुदेवांच्या बोलण्यात आले होते. निंबाळजवळ असलेल्या आणि ११ व्या शतकातील समजल्या जाणाऱ्या, शंकरलिंग मंदिराचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला होता. लाल जेव्हा ४/१/५७ ला निंबाळला आले तेव्हा अनेक शंकांचं ओझं घेऊन आले होते आणि आपल्या शंकांचं निरसन व्हावं अशी त्यांची मनीषा होती. गुरुदेवांची व त्यांची भेट (किंवा लालांच्या शब्दात 'सामना') म्हणजे एक प्रश्नोत्तरांची बैठक झाली (परिशिष्ट १२). लालांच्या स्पष्टवक्तेपणाने ही भेट आगळीवेगळी झाली.

निंबाळहून ८ जानेवारी १९५७ ला लिहिलेलं गुरुदेवांचं मला पत्र आलं. प्रा. कृष्णराव गजेंद्रगडकर निंबाळला येणार होते म्हणून मलाही बोलावलं होतं. कर्नाटकातील साक्षात्कारशास्त्रावर पूर्वी दिलेल्या ११ व्याख्यानांची लवकरात लवकर जुळणी करायची होती. नुकत्याच झालेल्या तीन व्याख्यानांची मांडणी करायची होती. आणखी एक म्हणजे श्री. अरविंद व इतर विचारवंतांनी शारीरिक अमरत्वाबद्दल जिथं जिथं लिहिलं आहे ती सर्व पुस्तकं निंबाळला न्यायची होती. हेमलॉक विषाचा प्याला घेण्यापूर्वी सॉक्रेटिसने ज्या अमरत्वाच्या सिद्धांताची चर्चा केली तो गुरुदेवांना आता आठवावा हे नवलच. असो. प्रा. गजेंद्रगडकर आणि मी निंबाळला जाऊन व्याख्यानांची प्रत तयार करण्याच्या कामाला लागलो, पण ते काम पुरे होऊ शकले नाही.

यानंतर चार-पाच दिवसांतच गुरुदेव निंबरगीला गेले. निंबरगी म्हणजे त्यांचा जीव की प्राण. ते त्यांच्या परमगुरुंचे समाधिस्थान. त्यांचं काशी-रामेश्वर तेच. तिथल्या भीमरायाच्या देवळाशी निंबरगी महाराजांच्या जीवनातील अनेक घटना निगडित आहेत. निंबरगीला जाताना गुरुदेवांचा उत्साह ओसंडून जाई. ही गुरुदेवांची शेवटची निंबरगी यात्रा. या वेळेस त्यांचा फोटो घेण्याचं भाग्य कोल्हापूरच्या दत्तात्रय रामकृष्ण पाठकांना लाभलं. हा गुरुदेवांचा अखेरचा फोटो. तो फार बोलका आहे. गुरुदेव समाधिमंदिराच्या कमानीत उभे आहेत. नजर अनंतावर खिळली आहे. गाभाऱ्याकडे जाण्याच्या पायऱ्यांवर शिष्यवर्ग

## पान नऊ




भीमरायाच्या देवळाचा दक्षिण दरवाजा व नगारखाना, निंबरगी



भीमरायाची मूर्ती, निंबरगी

निंबरगी महाराजांचे मंदिर, १३ जानेवारी १९५७



Standing : Bhaurao Apte, S.H.Nagpurkar, xxx, Gurudev R.D.Ranade, Dr.V.P.Aroskar, V.B.Sabnis, M.H.Nagpurkar. M.L.Vaikunthe, R.L.Wadnap, Babasaheb Sangoram, Shrinivas Kulkarni, S.V.Raibagi, xxx.

Sitting (I row) : Krishna, Bhaurao Jamkhandi, Dr.N.S.Christian. J.V.Parulekar, Gangadharrao Deshpande, M.R.Rege.

(II row) : S.V.Masarguppi, Jagannath Lele, Appa Abhyankar. V.B.Ramdurgkar, Baba Gole, Vamanrao Kulkarni

दाटीदाटीने बसला आहे. काहीजण उभे आहेत. गंमत म्हणजे गुरू उभे व शिष्य बसलेले अशी इथे देवाघरची उलटी खूण आहे. त्या रात्री उशीरा गुरुदेव निंबाळला परत आले. ही १३ जानेवारीची गोष्ट.

या अर्थपूर्ण फोटोबद्दल पाठक म्हणतात- ''गुरुदेव निंबरगीला जाणार अशी कुणकुण लागल्याबरोबर मी निंबाळला गेलो. एक दिवस गुरुदेव घराच्या पुढच्या दाराजवळ उभे होते. तेव्हा फोटो घेण्याची मला इच्छा झाली, पण त्यांची संमती मिळाली नाही. माझा एक फोटो मी काढू देईन असा त्यांनी मला दिलासा दिला. ते निंबरगीला निघाले रे निघाले की एकजात सगळी मंडळी निघाली. बोलावण्याची कुणी वाट पाहिली नाही. जवळजवळ २०-२५ लोक होते. मोठ्या उल्हासाने ट्रकमधून सर्वजण निंबरगीला पोचले. मी भीमरायाच्या देवळात गेलो तेव्हा, 'हे देऊळ आपण पाहिले आहे व इथे नगारखान्यात आपल्याला नाम मिळाले,' असे स्वप्नात पाहिल्याचे मला आठवले. हे मी गुरुदेवांना सांगितल्यावर ते म्हणाले, ''अशा गोष्टींकडे लक्ष द्यायचे नाही. नामस्मरण करा''. निंबरगी महाराजांच्या समाधीपुढे कापूर लावून झाला. गुरुदेव बाहेर येऊन उभे राहिले व फोटो घ्यावा असे मला त्यांनी सांगितले. मंडळी भराभर गोळा झाली आणि जिथे जागा मिळाली तिथे पटापटा बसली. बाकीची उभी राहिली. गुरुदेवांबरोबर फोटोत येण्याची पर्वणी कोण सोडेल ? फोटो निघाला. गुरुदेवांनी सहजच शिष्यांकडे हात केला आणि म्हणाले, ''निंबरगी महाराज मेंढपाळ होते. त्यांनी आपल्या सगळ्या मेंढ्या सांभाळल्या.'' हे बोल गुरुदेवांना स्वतःलाही सहीसही लागू पडत नाहीत का ?[१]

''आणखी एका प्रसंगी या फोटोची गोष्ट निघाली होती. १३ मार्च १९५७ ला मी कोल्हापूरहून मुंबईला डॉ. रा. ह. करमरकरांकडे गेलो. गुरुदेव अलाहाबादला जाताना तिथे उतरले होते, तेव्हा त्यांचं दर्शन घ्यावं हा उद्देश होता. मला पाहताक्षणी त्यांनी विचारलं, ''तुम्ही इथं कसे ?'' ''काल मला

---

१ खरा मेंढपाळ आपल्या चुकलेल्या मेंढराला वाऱ्यावर सोडत नाही. तो स्वतः अंधारात, काट्याकुट्यांत जाऊन त्याला शोधून आणतो, असं जीजसचं वर्णन ए. ई. टेलरने केले आहे (द फेथ ऑफ ए मोरॅलिस्ट, खंड १, पृ. २३९).

एकदम वाटलं की आपण मुंबईला जावं. सकाळी ग्रँट रोडला बाळासाहेब (यशवंत श्रीधर) ताम्हनकरांकडे गेलो. त्यांनी मला आपण इथे असल्याचं सांगितलं, म्हणून मी आलो.'' त्यांनी निंबरगीला काढलेल्या फोटोचा अर्थ मंडळींना विचारला. कुणाकडेही उत्तर नव्हतं. मग ते स्वतःच म्हणाले,'' या लोकांच्या सेवेसाठी मी इथे उभा आहे.''[१] फोटोबद्दल बोलणे झाल्यावर गुरुदेव माझ्याकडे वळून म्हणाले, ''तुम्ही नशिबवान आहांत.'' ते ऐकून मला स्वर्ग दोन बोटं उरला. रात्री ९ वाजता गुरुदेवांना निरोप द्यायला मी स्टेशनवर गेलो. १०॥ वाजता मला कोल्हापूरहून फोन आला की, 'मुलगा आजारी आहे, ताबडतोब या.' मी निघालो हे खरं, पण माझ्या मनात भीतीचा लवलेशही नव्हता. गुरुदेवांनी मला नशिबवान म्हटल्यावर भीती कुठली ? इकडे डॉक्टरांनी मुलाची आशा सोडली होती. त्याला काही होणार नाही अशी माझी बालंबाल खात्री होती. मुलगा त्या दुखण्यातून सहीसलामत उठला.'' पाठकांना लाभलेलं हे गुरुदेवांचं अखेरचं दर्शन.

२४ जानेवारीला गुरुदेव साधकांसमवेत इंचगेरीला जाऊन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन आले. इंचगेरीची ही अखेरची यात्रा. २८/१/१९५७ रोजी भाऊ निंबरगींचं बाबासाहेब संगोरामांना पत्र गेलं, '२४ तारखेला आम्ही इंचगेरीला जाऊन आलो. महाराजांचा सप्ताह झाला की गुरुदेव अलाहाबादला जातील.' फेब्रुवारी उजाडला. भाऊसाहेब महाराजांचा गुरुदेवांच्या हयातीतला हा अखेरचा सप्ताह फार मोठ्या थाटात साजरा झाला. निंबाळला १०० च्या आसपास साधक उपस्थित होते. अल्लप्पा, कबीरसाहेब, जीवबाळप्पा संगम, लक्ष्मणभटजी, शिवप्पा मुरगोड, हणमंत अप्पाराव कुलकर्णी (कन्नूर मास्तर) हे महाराजांचे वडीलधारे शिष्य जमले होते. फेब्रुवारी जसा आला तसा गेला.

३ मार्चला भाऊ निंबरगींनी मला कळवलं की अलाहाबादला जाण्याची तयारी झाली आहे. एका आठवड्यात गुरुदेव निघतील. १२ मार्चला गुरुदेव

---

१ इथे दोन गोष्टींची आठवण होते. 'भगवद्गीतेचा निरोप सांगणारा, मी चाकर आहे', असे ज्ञानेश्वर म्हणतात. 'येथ माझें जी उरलें । पाईकपण' ॥ (ज्ञानेश्वरी, १८.१७९२). 'मी तुमचा सेवेकरी आहे,' असे जीजस ख्राइस्टने म्हटल्याचे सेंट ल्यूक, २२/२७ इथे नोंदले आहे.

निंबाळहून निघाले. १९२७ पासून ३० वर्षे निंबाळ ते अलाहाबाद प्रवास होत होता. आता ही शेवटची खेप. १४ मार्चला संध्याकाळी ते अलाहाबादला पोचले. दुसरा दिवस म्हणजे १५ मार्च किंवा इडिस ऑफ मार्च. या दिवसाला शेक्सपियरने ज्युलियस सीझर या नाटकात अपशकुनी ठरवले आहे. कारण १५ मार्च, ख्रिस्तपूर्व ४४, या दिवशी सीझरचा खून झाला. इडिस ऑफ मार्च हा वाक्प्रयोग इंग्रजी वाङ्मयात अमर झाला आहे. १५ मार्चला गुरुदेव ठीक होते, पण टपून बसलेल्या काळ्या भविष्याची पाल चुकचुकत होती, 'वैऱ्याची रात्र आहे. सावध राहा.' पण ते चुकचुकणं कुणाच्या कानावर गेलं नाही. जेमतेम आठवडाभर ते बरे होते. २३ मार्चला वादळानं धुमाकूळ घातला. निसर्गानं उग्र रूप धारण केलं आणि गुरुदेवांना दुखण्यानं घेरलं. प्रचिती मलिन होऊ लागली.

१९२० साली गुरुदेव अतिशय आजारी पडले होते. पण तेव्हा प्रचिती मलीन तर नव्हतीच, उलट शारीरिक वैकल्य असूनसुद्धा परमार्थपथावर त्यांची झपाट्यानं घोडदौड चालली होती. पुण्याला सुरू असलेला औषधोपचार सोडून ते शहर-वस्तीपासून दूर असलेल्या इंचगेरीच्या मठात जाऊन राहिले होते. या खेडेगावापर्यंत पोचायला धड रस्ता नव्हता. पुष्कळ वाट पायी तुडवावी लागे. बैलगाडी मिळणं ही चैन समजली जाई. शिवाय रस्त्यातल्या खाचखळग्यांनी हाडं खिळखिळी होत, ते निराळंच. १९२० मध्ये इंचगेरीला पारमार्थिक प्रगतीची सुचिन्हे दिसत होती. त्या प्रगतीचे द्योतक असे अन्तर्नादश्रवणाचे अनुभव येत होते. मठात अंबुराव महाराज त्यांच्या पाठीशी होते. आशादायक स्वप्नदृष्टान्त होत होते. 'मी त्याची जबाबदारी घेतलेली नाही का ?' असे महाराज अंबुरावांना सांगताना गुरुदेवांनी स्वतःच एका स्वप्नात ऐकलं होतं. स्वप्न सकाळी अंबुरावांनी ऐकलं तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेना. 'आता कसली काळजी ? तुझं रक्षण करणार असा महाराजांनी शब्द दिला आहे,' असं म्हणून त्यांनी जवळच्या लोकांना विजयाचा डंका वाजवायला सांगितला. अर्थातच त्या वेळच्या आजाराची गुरुदेवांनी तमा बाळगली नाही. पारमार्थिक अनुभवांवर त्यांची सगळी भिस्त, ते सतत वाढत होते म्हणून इतर कशाची त्यांना पर्वा नव्हती.

पण १९५७ च्या मार्चमधल्या अलाहाबादमधील आजाराच्या वेळेला या सर्व गोष्टींनी कोलांटी घेतली. २६/३/१९५७ ला मधू कुमठेकरने मला

लिहिलेल्या पत्रात गुरुदेवांच्या आजारपणाचा उल्लेख होता. 'गेले सहा दिवस ते बरे नाहीत. सर्दी, खोकला आहे. त्यामुळे नेहमीसारखा चहा घेता येत नाही.' मी याचा गंभीरपणे विचार केला नाही. गुरुदेवांना यातना होत असाव्यात पण जबरदस्त संयम असल्याने त्यांनी त्या बिनतक्रार सहन केल्या. ३ एप्रिल १९५७ च्या शकूताईंच्या पत्राने गुरुदेवांच्या आजारपणाची स्पष्ट कल्पना आली. त्यांनी लिहिलं होतं की खोकला फारच आहे व ते फार अशक्त झाले आहेत.

शुक्रवार २६ एप्रिल १९५७ ला ते २८ अप या काशी एक्सप्रेसने अलाहाबादहून निंबाळला येण्यास निघाले. गाडी अलाहाबादहून संध्याकाळी ५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ८ ला मुंबईला पोचत असे. २७ एप्रिलला गाडीत त्यांनी एक टिपण मधू कुमठेकरकडून लिहून घेतले (परिशिष्ट १४). सकाळ होती. गाडी अजून इटारसीला पोचली नव्हती. सतना स्टेशन केव्हाच गेलं होतं. सतन्याला पूर्वी गुरुदेवांना एक उच्च अतींद्रिय अनुभव आला होता. भवतारक या कन्नड संतकवीच्या शब्दात त्यांनी या अनुभवाचं वर्णन केलं आहे. 'पारमार्थिक अनुभवानंतर एक नवी सृष्टी माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली, जमिनीपासून अस्मानापर्यंत सर्वकाही निर्विकार ब्रह्मतत्त्वाने व्यापले होते.' गाडीमध्ये आता जे टिपण केलं गेलं त्याचा सूर अगदी विरुद्ध होता. याच वाटेवर आलेल्या जुन्या अनुभवाभोवती त्यांचं मन रुंजी घालत असावं. आता मात्र अलाहाबादला नुकत्या घडलेल्या अशुभ गोष्टींची नोंद करायची होती. ते म्हणतात, 'सर्व जागा व आकाश खावयास येते की काय असा भास झाला... प्रचिती मलिन होत चालली होती...' संताचा निर्याणकाळ जवळ आला आहे हे सुचवणाऱ्या काही अरिष्टांचं वर्णन योगसूत्रात (३.२२) आलं आहे. स्वतःच्या नाकाचा शेंडा न दिसणं, आकाशस्थ ज्योतीचा अनुभव न येणं वगैरेंचा उल्लेख मिळतो. गुरुदेवांच्या क्षीण प्रचितीचं अपशकुनी पाखरू इकडं तिकडं फडफडत आणि घिरट्या घालत त्यांच्या बंगल्यावर येऊन विसावलं होतं, ते कुणाला दिसलं नाही.

काशी एक्सप्रेस मुंबईला उशिरा पोचली. डॉ. करमरकर, य. श्री. ताम्हनकर आणि व्यंकटेश गोपाळ आपटे बोरीबंदर स्टेशनवर आले होते. मधू

कुमठेकरने ताम्हनकरांना कळवून ठेवले होते की गुरुदेव येणार आहेत असा गवगवा करू नका. करमरकरांनी गुरुदेवांना तपासले. ते फारच अशक्त झाले होते. नंतर २५ डाउन या मुंबई-पुणे पॅसेंजरने गुरुदेव रात्री ११ ला मुबंईहून निघाले. आतां पुन्हा ते मुंबईला येणार नव्हते. मुंबईची ही शेवटची भेट, तीही उभ्या उभ्या झालेली. सकाळी ते पुण्याला पोचले व आपली मोठी बहीण भागूअक्का दामले यांच्या घरी उतरले. तिथं घडलेली एक घटना भयसूचक होती. सिटिंगच्या वेळी गुरुदेवांनी ताम्हनकरांना मौतका डंका बजा हे पद म्हणायला सांगितले. सत्तर बरसतक घर बनाया । तैयार जब यह घर हुआ । या ओळी काहीतरी अशुभ सांगून गेल्या. सत्तर वर्षे हे मृण्मय शरीर जपलं, आता वेळ झाली. गुरुदेवांना सत्तर वर्षे झाली होती. आपल्याला बोलावणे आले असा तर अप्रत्यक्षपणे संदेश येत नव्हता ? हे पद ऐकून जमलेल्या साधकांच्या हृदयाचा एक ठोका चुकला. पुणे शहराला घडलेलं हे त्यांचं शेवटचं दर्शन. २९ एप्रिल १९५७ ला ते निंबाळला आले. १ मे रोजी सांगलीच्या राजेसाहेबांना त्यांनी अलाहाबादच्या आजारपणाची थोडक्यात हकीकत कळवली. त्यांतलं शेवटचं वाक्य भविष्यसूचक आहे. '...काळ काय काय बदल घडवून आणतो ते पाहायचं... आपलं एकमेव कर्तव्य म्हणजे देव ठेवेल तसे राहायचे आणि नामाची कास धरायची. आपण हे करू शकलो तर तो आपल्याला अंतर देणार नाही.'

अलाहाबादहून परत आल्यावर गुरुदेवांनी मला निंबाळला बोलावलं. कन्नड संत-वाङ्मयातील साक्षात्कारशास्त्रावरील प्रकरणांवरून अखेरचा हात फिरवायचा होता. मी निंबाळला गेलो. आठवडा होऊन गेला. याच कामाचा काय पण कोणत्याही अभ्यासाचा विषय त्यांनी काढला नाही. एक दिवस नेमाच्या खोलीतून ते मुख्य दाराकडे येत होते. मी जवळ गेलो आणि हिय्या करून विचारलं, ''आठवडा होऊन गेला. आपण मला ज्या कामासाठी बोलावलं आहे, ते केव्हा सुरू करायचं ?'' ते एकदम गंभीर झाले आणि उद्गारले, ''मी त्या कामाला हात लावणार नाही. तू आणि कृष्णराव काय ते पाहा.'' मला धक्का बसला आणि मी गप्प झालो. ते अजून तिथेच उभे होते. ''आणखी काही विचारायचं आहे का ?'' या त्यांच्या प्रश्नाला ''काही नाही,'' असं मी उत्तर दिलं. सॉक्रेटिसच्या धर्तीवर ते पुढं म्हणाले, ''देवाची इच्छा मानली पाहिजे. देव करेल ते प्रमाण.'' माझ्या डोक्यात काहीच प्रकाश पडला नाही. कृष्णराव

व मी अशा दोघांनी ते काम करायचं म्हणजे गुरुदेव त्यात लक्ष घालणारच नव्हते का ? अजून ६ प्रकरणं लिहायची राहिली होती त्याचं काय ? नियतीनंच असं ठरवलं होतं की हे काम कृष्णराव आणि मी यांच्याकडे यावं. गुरुदेवांच्या निर्याणानंतर हे काम पुरं करण्यासाठी कर्नाटक विद्यापीठाने डॉ. रं. रा. दिवाकर, प्रा. न. ग. दामले व प्रा. कृ. वें. गजेंद्रगडकर यांची संपादक समिती नेमली. तिथं ठरलं की कृष्णराव व मी मिळून गुरुदेवांच्या तपशिलवार टिपणांवरून उरलेली सहा प्रकरणे लिहावी. प्रकरणे १२ व १३ (द नेम ऑफ गॉड, पार्ट १ ॲन्ड २), प्रकरण १७ (क्युम्युलेटिव्ह मिस्टिकल एक्स्पिरिअन्सेस) व प्रकरण १८ (सुपर्नल एक्स्पिरिअन्स) ही कृष्णरावांनी लिहावी आणि प्रकरणे १९ व २० (इफेक्ट्स ऑफ गॉड रिअलायझेशन (पार्ट १ व २), ही प्रकरणे मी लिहावी. त्याप्रमाणे ती आम्ही नंतर लिहिली. निंबाळला त्यांच्या तोंडून आलेले शब्द एक भविष्यकथन ठरलं. त्यांचा हात त्या कामाला लागला नाही.

१६ मे १९५७ ला गुरुदेवांनी एकदम वैद्यकीय तपासणीसाठी सोलापूरला जाण्याचा बेत आखला. आगगाडी स्टेशनात येऊन उभी होती. एकजणाने पळत जाऊन ती थांबवली. मोटारीचा ड्रायव्हर जागेवर नव्हता. आंघोळीला गेला असावा. मोटारीची किल्ली त्याच्याकडे. वेळ अजिबात नव्हता. गुरुदेव मोटारीत येऊन बसले आणि ''गाडी सुरू कर'' असं मधू कुमठेकरला म्हणाले. मधूला अनेक युक्त्याप्रयुक्त्या माहीत, त्याचं प्रसंगावधानही थोर. त्याने इकडची तार तिकडे, तिकडची इकडे असं काहीतरी डोकं लढवून किल्ली नसतानाही मोटार सुरू केली व झटकन स्टेशनवर आणली. प्लॅटफॉर्म आगगाडीच्या पलीकडे होता. तेव्हा आगगाडीला प्रदक्षिणा घातल्याशिवाय तिकडे जाणे शक्य नव्हते. गुरुदेवांनी तसं केलं नाही. अतिशय अशक्तपणा असूनही ते एकदम मोटारीतून उतरले आणि कुणाला समजायच्या आत आगगाडीपर्यंत पोचले. उलट्या बाजूने पायथ्याच्या पायरीवर एक पाय ठेवून, दोन्ही दांड्यांना दोन्ही हातांनी धरून ते सरसर वर चढले ! शिटी झाली, गाडी निघाली. सोलापूरला गेल्यावर त्या वेळचे सोलापूरचे सरकारी शल्यचिकित्सक डॉ. पी. डी. खानोलकर यांनी क्ष किरणाने फोटो घेतला. छाती तपासून सांगितले की उजव्या बाजूला कोंदल्यासारखे झाले आहे. त्यानंतर जमलेल्या साधकांचा फराळ झाला. भजन व आरती झाल्यावर गुरुदेव लगेच निघाले व रात्री १॥

वाजता निंबाळला पोचले.

लिखाण वाचन बंदच होतं. गुरुदेवांची परवानगी घेऊन २१ मे रोजी मी पुण्याला जाऊन ३१ मे रोजी परत आलो. सकाळी आल्या आल्या कळलं की २३ मेच्या सुमाराला डॉ. खानोलकर क्ष किरणाचं यंत्र घेऊन निंबाळला आले व गुरुदेवांची छाती पूर्ण स्वच्छ झाल्याचं त्यांनी सांगितलं. फुफ्फुसात काही दोष नव्हता. आता तब्येत सुधारणार असं मी समजलो. मी आल्याचं कळल्यावर त्यांनी मला बोलावलं. त्यांना बरं वाटतं आहे अशा कल्पनेने मी आत गेलो, पण बघतो तो काय, ते अतिशय क्षीण दिसले. हळू आवाजात त्यांनी विचारलं, ''माझी प्रकृती कशी दिसते आहे रे ?'' खरं सांगण्याचा धीटपणा माझ्याकडे कुठं असणार ? ''आपण सुधारत आहांत,'' हे शब्द माझ्या तोंडातून येताच ते म्हणाले, ''तुला काही कळत नाही.'' आदल्या दिवशी प्रा. दामल्यांना त्यांनी हेच विचारलं होतं. ''तुमचा चेहरा उजळ आहे. मात्र एकूण तब्येत खालावली आहे,'' या त्यांच्या उत्तरावर गुरुदेव काही बोलले नव्हते.

गुरुदेवांची प्रकृती एकदम का बिघडली हे एक कोडे आहे. मी १० दिवस निंबाळला नव्हतो त्या वेळी काय काय घडलं ईश्वर जाणे !!! तर्क करता येत नाही. त्यांचे लघुलिपिकार तात्यासाहेब (दत्तात्रेय परशुराम) शिंत्रे निंबाळला होते. एकदा गुरुदेवांनी त्यांना बोलावलं होतं. मध्यरात्र उलटली होती. गुरुदेवांचा नेम झाला होता. नेहमीची पद्धत अशी की त्यांनी स्वतः चहा करायचा, आपण एकदोन घोट घ्यायचे आणि किटली भरून ज्यांना बोलावले असेल त्यांना द्यायचा. तात्यासाहेबांना बोलावल्याबरोबर आपली वही पेन्सिल घेऊन ते तडक गुरुदेवांच्या घरी गेले. तिथं गेल्यावर त्यांना कळलं की मजकूर सांगण्याचं काम तहकूब झालं आहे. ते जड अंतःकरणाने परत आले. नंतर गुंडू या नोकराकडून त्यांना कळलं की चहा करण्याचा बेत रद्द करून गुरुदेव नेमाला निघून गेले होते. गुरुदेवांचा बेत अकस्मात का बदलला कोणी सांगावे ? आता ते कधीच कळणार नाही. त्यानंतर मजकूर सांगून लिहून घेण्याचं काम पुन्हा कधीच झालं नाही. २३ मे रोजी श्री. सुरेश कृष्ण गजेंद्रगडकरांनी अथणीला बाबासाहेब संगोरामांना पत्र लिहिले व काकासाहेब तुळपुळे निंबाळला आले आहेत, तुम्हीही या असे कळवले. त्या दोघांसमोर गुरुदेवांना काय बोलायचे होते ते माहीत नाही. पण बाबासाहेब येऊ शकले नाहीत व बोलणे राहून गेले.

३१ मे रोजी दुपारी नेहमीप्रमाणे सिटिंग झाली. गुरुदेवांचे एक भाविक शिष्य डॉ. करमरकर हजर होते. आदल्या दिवशी ३०/५/१९५७ ला सुहास, ताई, माई व प्रतिभा या त्यांच्या मुलांना गुरुदेवांनी नाम दिले होते.

शनिवार, १ जून १९५७ -

डॉ. आर. व्ही. साठे, डॉ. टी. एच. तुळपुळे व डॉ. एस. एस. आजगावकर हे मुंबईचे नामांकित डॉक्टर निंबाळला गुरुदेवांना भेटायला आले. त्यांनी गुरुदेवांच्या प्रकृतीची चौकशी केली. 'त्यांना सर्व तपशील सांगा,' असे गुरुदेवांनी डॉ. पारिपत्यदारांना सांगितले. मुंबईच्या डॉक्टरांनी सर्व ऐकून घेतलं व गुरुदेवांबरोबर काही चर्चा केली. त्यांचे म्हणणे असे की, तब्येतीत दोष काही नाही पण कमालीचा अशक्तपणा आहे. शक्तिवर्धक औषधाच्या एकदोन बाटल्या समोर ठेवून अशक्तपणावर उपाय म्हणून ते घेण्याची गुरुदेवांना त्यांनी विनंती केली. किंचित् हसून व हात जोडून गुरुदेव म्हणाले, ''मला आग्रह करू नका.'' डॉक्टर मंडळींनी, '' आम्ही आपल्या इच्छेविरुद्ध जाणार नाही,'' असे म्हणून तत्काळ माघार घेतली. दुपारचे दोन वाजले होते. सिटिंग सुरू झाली. अंगात काडीइतकी शक्ती नव्हती, पण जमलेल्या साधकांना भेटायची इच्छा होती म्हणून गुरुदेव तिथे बसले. आपले गुरुबंधू कन्नूर मास्तर यांना त्यांनी पद म्हणायला सांगितले. त्यांनी कन्नड संतकवी सर्पभूषण शिवयोगींचे 'गुरुदेव नी माडिदुपकृतियनु नानु मरेयेनेंदिगू' (सद्‌गुरो, आपले उपकार मी कधीकाळी तरी विसरेन का ?) हे पद निवडलं. ''या पदाचा अर्थ सर्वांना सांग,'' या गुरुदेवांच्या आज्ञेवरून मी अर्थ सांगितला, पण तो कन्नडमध्ये सांगितला. ते एकदम म्हणाले, ''अरे, इथं सगळी मराठी बोलणारी मंडळी आहेत, अर्थ मराठीत सांगायला नको होता का ? बरं राहू दे.''[1] सिटिंगमध्ये नंतर भाऊ निंबरगींनी महाराजांची पत्रे वाचली. आरती प्रसाद होऊन साधक पांगले. आता ते सिटिंगसाठी पुन्हा कधी जमणार नव्हते. सिटिंग भूतकाळात जमा झाली. त्या घराला असलं भाग्य यानंतर लाभणार नव्हतं. असं म्हणावसं वाटतं की ही सिटिंग म्हणजे गुरुदेवांचं हंसगीत होतं.

---

१ पुढे एक महिन्यातच मी यवतमाळ येथे अमोलकचंद महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून गेलो. तिथे तत्त्वज्ञान विषय मराठीतून शिकवावा लागला. मराठीत बोलणं जरूर होतं हे गुरुदेवांचे उद्‌गार किती अर्थपूर्ण ठरले !

हंसगीत म्हणजे काय ? हंस मृत्यूपूर्वी जे अतिशय गोड गाणं गातो, ते हंसगीत. एखाद्या व्यक्तीने मृत्यूपूर्वी केलेल्या कार्यालाही हंसगीत म्हणतात. गुरुदेवांनी बोलावलेली १ जूनची सिटिंग शेवटची ठरली म्हणून तिला हंसगीत म्हणायचं. आपल्या फीडो या संवादात सॉक्रेटिस म्हणतो, 'मरणाची चाहूल लागली की जन्मभर गाणे गात राहणारा हंस मोठ्या उत्साहाने आणखीनच गोड गीत गातो. तो देवदूत म्हणून जन्माला आलेला असतो आणि आता देवाशी पुन्हा ऐक्य होणार म्हणून तो खुषीत असतो.' गंमत अशी की कन्नूर मास्तरांनी शेवटच्या सिटिंगमध्ये म्हटलेल्या पदात ऐक्याचाच विषय आहे. सद्‌गुरूंच्या अपरिमित उपकारांचं गुणगान आहे. पहिली गोष्ट म्हणजे सद्‌गुरू देवाच्या रूपाचं दर्शन घडवतात, दुसरं तर देवाशी प्रत्यक्ष संबंध आणून देतात आणि अखेर देवाशी ऐक्य साधून देऊन आनंदाचा वर्षाव करतात. अखेरीअखेरीस गुरुदेवांचे चित्त भाऊसाहेब महाराजांकडे लागले होते, हे सर्वश्रुत आहे. त्या दिवसांत नीती व परमार्थ यांनी भरलेली महाराजांची पत्रे ते पुन्हा पुन्हा वाचून घेत. सद्‌गुरूंच्या उपकारांनी देवाशी ऐक्य होते व परमानंदाचा लाभ होतो हे वर्णन करणारं हे हंसगीतच नव्हे का ? आणि ते शेवटच्या सिटिंगमध्ये झालं ही आणखी एक समयोचित घटना.

हंसगीताशी निगडित असा आणखी एक प्रसंग पूर्वी घडला होता. इथेही संताचे निर्याण व त्याचे परमेश्वरात विलीन होणे हाच विषय आहे. फीडो या संवादात सॉक्रेटिस म्हणतो, 'हंस अपोलो देवतेचे लाडके असल्याने त्यांना भविष्यकाळात डोकावता येते. परलोकातील सुखाची त्यांना आधीच कल्पना येते. म्हणून जाण्याच्या दिवशी ते फार आनंदात असतात आणि कधी नव्हे इतक्या सुरेल संगीतात मग्न असतात.' १९१४ साली जानेवारी महिन्यात गुरुदेव पुण्याला होते आणि फीडो या संवादातला हा भाग वाचत होते. दारावर टकटक झाली. दार उघडून पाहिलं तर तारवाला उभा. तार उघडली व वाचली. 'महाराज गेले.' भविष्यकाळाची पूर्वसूचना असणाऱ्या हंसाची हकीकत गुरुदेव वाचतात काय, आणि एका संताच्या निर्याणाची तार हातात पडते काय ! जणू भविष्य जाणण्याची हंसाची शक्ती सॉक्रेटिसच्या शब्दांत उतरली. या योगायोगाचा गुरुदेवांच्या मनावर फार परिणाम झालेला होता. १९५० साली हंसगीताचा हा भाग ते माझ्याकडून वाचून घेत होते. ग्रीक तत्त्वज्ञान हा विषय माझ्या एम. ए. च्या पहिल्या वर्षीच्या अभ्यासात होता.

सॉक्रेटिस त्यातच येतो. वाचता वाचता त्यांनी मला एकदम थांबवले व म्हणाले, ''या वाक्याच्या बाजूला पुस्तकात, 'महाराज गेल्याची तार आली,' असे लिहून ठेव.'' क्षणभराने ते म्हणाले, ''सॉक्रेटिस मोठा साक्षात्कारी पुरुष असला पाहिजे.'' तर अशी ही हंसगीताची महती.

संध्याकाळी कन्नूर मास्तर गुरुदेवांकडे आले आणि शेतीच्या कामासाठी म्हणून कन्नूर या आपल्या गावी जाण्याची परवानगी मागू लागले. त्यांनी जाऊ नये असे गुरुदेवांना वाटत होते. 'मी दोन दिवसांत माघारी येतो,' असे मास्तरांनी पुन्हा म्हटल्यावर गुरुदेव म्हणाले, ''हणमंतराया, तू प्रत्येक वेळेला लागलीच येतो म्हणून जातोस. पण एकदा गेल्यावर वेळेवर येत नाहीस, उशीर करतोस.'' ''या वेळेस बघा तर खरं, मी कसा हजर होतो ते,'' असे हणमंतरावांनी पुन्हा म्हटल्यावर गुरुदेव नाखुषीने, ''बरं जा,'' म्हणाले. दुसऱ्या दिवशी कन्नूर मास्तर गेले, पण परत आले ते ७ जूनला, गुरुदेवांच्या अन्त्यसंस्काराच्या वेळेला ! त्या दिवशी सकाळी कन्नूरला त्यांना निरोप गेला होता. गुरुदेवांचा व त्यांचा संबंध ५० वर्षांचा, त्यांच्याबद्दल गुरुदेवांना विशेष प्रेम होते. कन्नूर मास्तर महाराजांच्या अकरा मारूतींपैकी एक होते. महाराजांच्या आजारपणात त्यांची सेवा करण्याचं भाग्य त्यांना लाभलं होतं. आपण जाण्याच्या वेळेला मास्तर जवळ असावेत असं गुरुदेवांना वाटलं असावं, पण ते घडायचं नव्हतं.

रविवार, २ जून १९५७ -

सकाळी ६॥ वाजता गुरुदेवांचा आवडता नोकर गुंडू आमच्या खोलीत आला आणि आश्रमाच्या हिशोबाची वही घेऊन गुरुदेवांनी भाऊ निंबरगींना बोलावले आहे असे सांगू लागला. भाऊ आंघोळीला गेले होते. गुंडू पुन्हा आला व पत्रव्यवहाराचे कागद घेऊन मला बोलावले आहे असे म्हणाला. मीही खोलीत नव्हतो. तिसऱ्यांदा मधू कुमठेकरसाठी गुंडू आला. मधूही नव्हता. मी व मधू दोघेही आंघोळीला गेलो होतो. गुंडूकडून हे ऐकल्यावर गुरुदेव म्हणाले, ''एकदम तिघेही कसे गेले ? आंघोळ करायला तिघांना मिळून एकच अंग आहे का ?'' आम्ही परत आल्यावर, बोलावल्याचे कळल्यावरून भाऊ सर्व कागद घेऊन गुरुदेवांकडे गेले. मे १९५७ पर्यतचे कागद गुरुदेवांनी पाहिले. सर्व धनादेश दिले. कुणाचंही देणं राहिलं नाही, सगळं स्वच्छ झालं. मात्र याचा अर्थ कुणालाही कळला नाही. नेहमीची पद्धत अशी की गुरुदेव हाक मारतील तेव्हा जायचं.

गुंडूचा निरोप होता म्हणून मी कागद घेऊन निघालो. पण खोलीतल्या एकजणाने सांगितले की पुन्हा बोलावणे आले तरच जाणे योग्य. मी वाट बघत बसलो पण बोलावणे आले नाही. कुणाला पत्रे लिहायची होती, कुणाला काय निरोप होते, कुणाला स्मरणपत्रे पाठवायची होती किंवा नवीन विचारणा करायच्या होत्या याचा अंदाज नाही. त्यांची सेवा करण्याची शेवटची संधी मी गमावली. गुरुबंधू, मित्र, विद्यार्थी, नातेवाईक किंवा आणखी कोणी, सर्वांशी संपर्क साधायला पत्रव्यवहार हा एकच मार्ग होता. पण माझा उपयोग त्यांना झाला नाही. त्याची मनाला झालेली जखम अजून भळभळ वाहत आहे.

दुपारी १ च्या सुमाराला गुंडूने नव्या कापडाचा एक तागा डॉ. पारिपत्यदारांना दिला व त्यातून गुरुदेवांचे सहा कुडते शिवायचे आहेत असे म्हणाला. डॉक्टर अशा कामांना एका पायावर तयार असत. गुरुदेव आपल्याला सोडून जात नाहीत अशी आशा एकदम पालवली. असं दिसतं की गुरुदेवांनी साधकांचं लक्ष स्वतःच्या आजारापासून दुसरीकडे वेधलं. दोन जूनच्या रविवारपासून ६ जूनला मर्त्य शरीराचा त्याग करेपर्यंत गुरुदेवांनी जगाकडे पाठ फिरवली. पाणी घेणं थांबवलं. हलकेच बोललेला एखादा शब्द सोडला तर बोलणं बंद केलं. केव्हातरी जवळ असलेल्या माणसाच्या हातावर काय करायचं आहे ते लिहून दाखवत. शब्दांची खटपट सरली, ग्रंथाचा शेवट आला.

सोमवार, ३ जून १९५७ -

त्या वेळेच्या शिरस्त्याप्रमाणे सकाळी ६ वाजता त्यांना नेमाला जायचे होते. शक्ती म्हणून नव्हतीच. घराबाहेर आल्यावर तिथे ठेवलेल्या खुर्चीवर ते १-२ मिनिटे बसत व मग मोटारीत चढत. सोमवारी ते खुर्चीवर येऊन बसले. मोटारीचं दार अर्धवट उघडं होतं. दुष्ट वाऱ्यानं एका सपाट्यानं दार ढकललं आणि ते गुरुदेवांच्या कपाळावर आदळलं. थाडकन आवाज झाला. किती यातना झाल्या असतील, पण त्यांच्या तोंडून हूं की चूं आलं नाही. काही झालंच नसावं इतके ते शांत होते. मोटारीत बसून मग ते इंचगेरीच्या बाजूला नेमाला गेले. हे स्पष्ट झालं की ते शारीरिक दुःखाच्या पलीकडे गेले होते. शरीर त्यांचं नसल्यासारखी स्थिती आली होती. ग्रीसमधल्या एपिक्युरिअन पंथात वर्णन

केलेली अविचलता ती हीच. शरीर म्हणजे एक उत्तरीय होतं. केव्हाही काढून फेकता येईल असं.

दुपारी ३ च्या सुमाराला श्यामराव कुमठेकर व नारायणराव मसलेकर गुरुदेवांना भेटायला गेले. त्यांना एका उजळणी वर्गासाठी भुसावळला जायचे होते. गुरुदेव पूर्वेच्या खोलीत पूर्वेकडे तोंड करून टेकून बसले होते. गुरुदेवांच्या मनात होतं की त्यांनी दोघांनी निंबाळला राहावं; पुन्हा उजळणी वर्ग होईल तेव्हा आम्ही तो करू, असं सरकारी कचेरीत कळवून टाकावं. त्या दोघांनाही वाटलं की वर्ग लहानसाच आहे, तो संपवून आपण येईपर्यंत गुरुदेव बरे झालेले दिसतील. अति अशक्तपणामुळे गुरुदेवांना बोलता येत नव्हते. त्यांच्या तोंडातून मोठ्या कष्टाने 'अल्त' एवढाच आवाज बाहेर पडला असं दोघांनाही वाटलं. तो शब्द Alternative असावा असं ते समजले. पण म्हणजे तरी काय ? त्या एका शब्दाचे दोन अर्थ होऊ शकतात. Alternative म्हणजे एक तर नंतरच्या उजळणी वर्गासाठी जावे किंवा दुसरे तर दोघांपैकी एकाने जावे व दुसऱ्याने निंबाळला राहावे. ही सगळी पश्चात् बुद्धी झाली. ते दोघेही भुसावळला गेले आणि इकडे अकस्मात होणार ते होऊन गेले. प्रा. सदाशिव वामन पंडित फर्ग्युसन कॉलेजात गुरुदेव शिकवत असतानाचे त्यांचे विद्यार्थी. ते आणि मी संध्याकाळी इंचगेरीला गेलो. रात्री तिथे मुक्काम केला.

मंगळवार, ४ जून १९५७ -

सकाळी ९ च्या सुमाराला आम्ही दोघे परत आलो. इंचगेरीला महाराजांच्या समाधीपुढे कापूर लावून अंगारा आम्ही आणला होता. अंगारा घेऊन मी गुरुदेवांच्या घरी गेलो.नेमाच्या खोलीच्या बाहेरच उभा राहिलो, आत शिरण्याचा धीर होईना. इतक्यात मधू खोलीतून बाहेर आला. अंगारा त्याच्याजवळ देऊन, गुरुदेवांना दे, म्हणून त्याच्या हातावर ठेवला. माझा पाय तिथून निघेना. आमच्या खोलीत परत जाण्याची इच्छा होईना. गुरुदेव बोलावतील अशा आशेने तिथेच रेंगाळलो, पण बोलावणे आले नाही. क्षणभरात 'मधू' अशी वरच्या पट्टीत गुरुदेवांनी मारलेली हाक वातावरणाला छेदत गेली. मधू लगबगीने धावला. तो दोन अक्षरी मधू हा शब्द अजून माझ्या कानात घुमतो आहे. तोच त्यांचा ऐकलेला शेवटचा, अगदी शेवटचा आवाज. त्यांच्या मुखातून

आलेलं एकही अक्षर त्यानंतर पुन्हा कानावर आलं नाही. पाय ओढत मी आमच्या खोलीकडे परतलो. त्या संध्याकाळी मी तापाने फणफणलो.

बुधवार, ५ जून १९५७ -

सकाळी सकाळी अंथरुणातून उठतानाच मधूने मोठ्याने गळा काढला. भाऊ आणि मी गडबडून गेलो. त्याला शांत करत करत, रडायला काय झालं हे खोदखोदून विचारू लागलो. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. हुंदके देत, मध्येच थांबत, भरल्या गळ्याने, त्याने त्याचे स्वप्न सांगितले. ''स्वप्नात काय दिसलं ते बोलू शकत नाही हो. लोक गुरुदेवांना चितेवर ठेवत होते. 'नको नको, गुरुदेव आपल्याला टाकून जाणार नाहीत,' असं मी ओरडत होतो. ते दुष्ट स्वप्न मला सहन होत नाही, काय करू ?'' त्याला समजवण्यासाठी मी म्हटलं, ''मधू, अरे ते तर केवळ स्वप्न. तू चोवीस तास गुरुदेवांजवळ आहेस. त्यांची सेवा करतो आहेस. म्हणून त्यांची क्षीण प्रकृती पाहून अनिष्ट विचार तुझ्या मनात घर करून बसले आहेत. तेच तुला स्वप्नात दिसलं. शांत हो, गुरुदेवांना आता बरं वाटेल.'' त्या लावणीलुपणीच्या शब्दांनी मधूचं समाधान झालं नाही ते नाहीच. पण ते भयंकर स्वप्न ऐकूनसुद्धा माझ्या मनात कसलीही अमंगळ कल्पना आली नाही. दुपारी दोनच्या सुमाराला गुरुदेवांनी मॅग्नेशिअम सल्फेटचा एक डोस घेतला. शरीर देवाच्या स्वाधीन करण्याच्या आधी ते बाहेरूनच काय पण आतूनही स्वच्छ पाहिजे. देवाने दिलेली चादर न मळवता त्याला परत दिली पाहिजे ना ? गुरुदेवांच्या त्या कृतीचा कुणाला काही उलगडा झाला नाही. तीन वाजता गुरुदेवांनी मधूजवळ माझ्या प्रकृतीची चौकशी केली. मला ताप आला आहे हे ऐकून त्यांनी एका कपात मॅग्नेशिअम सल्फेट असलेला क्विनाइन मिक्श्चरचा एक डोस घातला आणि मधूच्या हाती माझ्याकडे पाठवला. मी तो घेतला. त्यांच्या हातून मिळणारा औषधाचा हा शेवटचा घोट आहे, हे कळलं नाही. ते अमृत आणणारा कपतरी मी जपून ठेवायला हवा होता, असं आता वाटतं. अमृतच ते, त्याच्या जिवावरच मी माझं सगळं आयुष्य कंठलं. संध्याकाळी मोटारीतून नेमाला जाताना मी त्यांना पाहिलं.

गुरुवार, ६ जून १९५७ -

सकाळी इंचगेरीच्या दिशेला गुरुदेव नेमाला गेले. इंचगेरी म्हणजे

त्यांची पंढरी. तिथे भाऊसाहेब महाराजांनी आपले सद्‌गुरू निंबरगी महाराज यांचे समाधिमंदिर बांधले आहे. त्यांचीही समाधी तिथेच आहे. अंबुराव महाराजांनी पुरं आयुष्य तिथंच घालवलं आणि परमार्थप्रसार केला. त्यांची समाधी इंचगेरीलाच आहे. होर्ती गावापर्यंत गुरुदेव गेले. नेम झाल्यावर जमलेल्यांना चुरमुरे फुटाण्यांचा प्रसाद वाटला. अलीकडे रोजच प्रसाद वाटीत, व परत येत. एक प्रश्न वारंवार मनात डोकावतो. होर्तीपर्यंत म्हणजे इंचगेरीच्या अर्ध्या वाटेपर्यंतच ते का गेले ? या दुर्धर आजारात होर्तीहून अवघ्या ११ किलोमीटरवर असलेल्या इंचगेरीला का गेले नाहीत ? मधूने एकदा नंतर सांगितले की गुरुदेव एक आरसा बरोबर नेत, त्यात बघत आणि गाडीच्या बैठकीवर आरसा धाडकन आपटीत. हा प्रकार काय आहे कुणाला समजणार? त्यांना आरशात आपलं रूप दिसत नव्हतं का ? हेही एक अरिष्ट समजतात. निर्याण जवळ आल्याचं ते एक लक्षण आहे असं म्हणतात.

दुपारी मधू आमच्या खोलीत आला व म्हणाला, ''गुरुदेवांच्या तोंडातून पुसट स्वर सुद्धा ऐकू येत नाही, हालचाल बिलकूल नाही. तुम्हाला काही प्रतिसाद मिळतो का बघा बरं.'' मी त्याच्याबरोबर गेलो. नेमाच्या खोलीत ते गादीवर निजले होते. डोकं उत्तरेकडे आणि पाय दक्षिणेकडे होते. दिशांची ही उलटापालट मला फार चमत्कारिक वाटली. खोलीच्या मध्यभागी निजण्याची त्यांची नेहमीची सवय. आता पाहिलं तर ते पश्चिमेच्या भिंतीकडे बरेचसे सरकलेले दिसले. ते पाहून कससंच झालं. त्यांच्या अंगाला हात लावून तब्येत कशी आहे ते विचारावं या मधूच्या सूचनेप्रमाणे मी थरथरत त्यांच्या हाताला स्पर्श केला. ''कसं वाटतं आहे ?'' या प्रश्नाला काही उत्तर आलं नाही, निदान मला तरी काही जाणवलं नाही. मधूला आतापर्यंत त्यांच्या सूक्ष्म हालचालींचा अर्थ उमगायला लागला होता. तो म्हणाला, ''त्यांनी तुम्हाला ओळखलं, साद दिली.'' मला काही म्हणजे काहीच सांगता येत नाही. गुरुदेवांच्या पवित्र देहाचा लाभलेला हा अखेरचा स्पर्श. तो मिळाला मधूमुळे. त्याचे उपकार कशाने तरी फिटतील का ? त्या वेळी सुद्धा माझ्या मनात काही अशुभ कल्पना आली नाही. आता असं वाटतं की मला काहीतरी बुद्धिभ्रम झाला असावा. आकलन शक्तीला ग्रहण लागलं होतं. आजूबाजूला काय चाललं होतं त्याचा अर्थाअर्थी काही संबंध लागत नव्हता. विचारशक्ती गढूळ झाली होती. डोळे उघडे असले

तरी मानसिक अंधळेपण आलं होतं. तिथल्या साधकांना काय घडत आहे हे कळलं असेलही, मला काहीच कल्पना नाही. की सगळ्यांच्या बुद्धीवर माझ्यासारखं मायेचं पटल आलं होतं ? याचीही मला काहीच कल्पना नाही.

मातोश्री काकूसाहेब हातात आमटीची वाटी घेऊन खोलीत आल्या व गुरुदेवांच्या तोंडात आमटी घालण्याचा प्रयत्न करू लागल्या. चमच्याचा स्पर्श झाल्यावर ओठांची कळत न कळत हालचाल झाली. शकूताई खोलीत शिरल्या. त्यांना शोक आवरत नव्हता. ''कापूर लावायचा का,'' असं त्यांनी गुरुदेवांना विचारलं. काही दाद आली नाही, ते पूर्ण स्तब्ध होते. उभी असलेली मंडळी गोंधळून गेली होती. ''इथं गर्दी करू नका,'' असं काकूसाहेब म्हणाल्यावर आम्ही बाहेर पडलो. त्यांनी दार बंद केलं. ५-१० मिनिटांत मोठ्याने रडत त्या बाहेर आल्या. गुरुदेवांच्या शरीराची काहीच हालचाल नाही हे पाहून त्या घाबरल्या असाव्यात. आमच्या सगळ्यांच्या गात्रांतलं बळ हरपलं. नंतर आम्हाला सांगितलं गेलं की, 'आम्ही जातो, तुम्ही सगळं सांभाळा,' असं गुरुदेवांनी त्यांना सुचवलं.

संध्याकाळचे ६॥ वाजले. संध्याछाया दाटल्या. आम्ही पुन्हा गुरुदेवांच्या खोलीत गेलो. ''पूर्वेच्या खोलीत घेऊन जायचं का ?,'' अशी काकूसाहेबांनी पृच्छा केली. काही उत्तर मिळालं नाही. निदान मला तरी तशी खात्री आहे. काकूसाहेबांनी अंथरुणाची एक बाजू धरली, मधूने दुसरी बाजू धरली आणि गुरुदेवांना पूर्वेच्या खोलीत हलवले. ८॥ वाजता सगळ्यांना निरोप आला की एकेकाने येऊन गुरुदेवांना नमस्कार करून जावा. माझी पाळी आली. मी एखाद्या निर्बुद्ध पुतळ्याप्रमाणे खाली वाकलो. एका पायावर दुसरा पाय ठेवून ते निजले होते. हे नेहमीचे नेमाचे आसन होते. चेहऱ्यावर कसलीही खळबळ किंवा अस्वस्थता दिसत नव्हती. निजानंदतृप्त होते. एकतत्त्वनाम दृढ धरलेलं होतं. तो स्वभावच झाला होता. जन्मभर इंद्रियांना नामस्मरणाचे वळण पडले होते, आता ती दुसरीकडे कशी वळतील ? श्वास संथ चालू होता. ही स्थिती पराशांतीची. निर्याणापूर्वी त्यांचं घडलेलं हे शेवटचं दर्शन. ९॥ वाजता आम्ही आमच्या खोलीत आलो. ध्यानमंदिरात रात्रीचं भजन सुरू झालं. तापाने मरगळल्यामुळे मी खोलीत झोपलो. भजनाला गेलो नाही.

१०॥ वाजता मला झोपेतून उठवत तात्यासाहेब शिंत्रे म्हणाले, ''उठा, गुरुदेव गेले.'' एका युगाचा अंत झाला.

नेहमी गुरुदेवांजवळ असणारे जवळचे साधक त्या वेळी हजर नव्हते, हा एक दैवदुर्विलासच नाही का ? ज्या अनेकांना अखेरचा निरोप घेता आला नाही, त्यांपैकी काहींना खुद्द गुरुदेवांनीच दूर पाठवलं होतं. नियतीने त्यांना बाजूला केलं. त्याचं कारण असंही असेल की, त्यांना ही ताटातूट सहन झाली नसती. काहींना नोकरीच्या कर्तव्याने ओढून नेले. आणखी काही सहजच परत गेले. त्या दिवशी खूप साधक हजर होते. पण एवढ्या जमावात असूनही गुरुदेवांची अवस्था एकाकी योग्याची होती. पर्वताच्या उच्चतम शिखरावर एकालाच जागा असते. अखेरच्या दिवसांत कृष्णराव गजेंद्रगडकर आले होते, पण ते आजारी पडले. ताप उतरेना. धारवाडला परतण्याची त्यांनी परवानगी मागितली. त्यांच्या सोबत कुणीतरी जावं अशी गुरुदेवांची इच्छा होती. नेमके त्याच वेळेला गुरुदेवांच्या आजाराची बातमी ऐकून कृष्णरावांचे मेव्हणे गुरुराव देशपांडे निंबाळला आले. त्यांच्याशी चार गोड शब्द बोलून गुरुदेवांनी कृष्णराव आजारी असल्याचं त्यांच्या कानांवर घातलं. 'त्यांना मी धारवाडला घेऊन जातो,' असं गुरुराव आपणहून म्हणाले आणि त्याप्रमाणे दोघेही गेले. ६ जूनला दोघांपैकी कुणीच नव्हते. अनेकांची अशीच समजूत होती की गुरुदेव बरे होत आहेत आणि काळजीचे काही कारण नाही. प्रा. एस. व्ही. पंडित ६ जूनला दुपारी निंबाळहून निघाले. सोलापूरहून त्यांनी रात्रीची पॅसेंजर पकडली आणि सकाळी पुणे स्टेशनवर उतरले. नेहमीच्या सवयीप्रमाणे वर्तमानपत्र विकत घेऊन उघडलं. गुरुदेव आदल्या रात्री गेले हे वाचून त्यांची मनस्थिती काय झाली असेल ?

निंबाळला गुरुदेवांच्या घरासमोर शोकमग्न शिष्यांची रीघ लागली. मधूची भीती खरी ठरली होती. त्याची सगळी शक्ती पिळून निघाली. हतबल स्थितीत गर्दीमध्ये तो कुठे हरवला होता कोण जाणे. प्रा. न. ग. दामल्यांच्या सूचनेवरून मी विजापूरला निघालो. मुंबई, पुणे, सांगली, मिरज, बेळगाव, धारवाड, हुबळी, बेंगळूर किंवा आणखी ठिकाणांच्या साधकांना आणि वर्तमानपत्रांना बातमी देणे आवश्यक होते. श्रीनिवासराव मसरगुप्पी, नामदेवराव केळकर, कृष्णराव भिडे आणि मी असे चौघे रात्रीच्या १॥ च्या गाडीने

निंबाळहून निघून पहाटे ३ वाजता विजापूरला पोचलो. गाडीतून उतरतानाच अगदी समोर बाबासाहेब संगोराम उभे दिसले. ते अथणीहून आले होते आणि निंबाळला निघाले होते. चिंताग्रस्त स्वरात त्यांनी गुरुदेवांच्या प्रकृतीची चौकशी केली. निर्याणाची बातमी सांगताच दुःखाने कळवळून ते मटकन प्लॅटफॉर्मवर बसले. तितक्यात निंबाळला जाणारी गाडी आली. त्यांना गाडीत चढवून आम्ही निघालो. गावात जाऊन मुख्य डाकघर गाठलं. फोन आणि तातडीच्या तारांनी अनेकांना ही दुःखाची वार्ता दिली. ह्याचा सगळाचा सगळा खर्च एकट्या मसरगुप्पींनी केला. रक्कम मामुली नव्हती. पण त्यांनी नंतर कधीही त्याबद्दल चकार शब्द तोंडातून काढला नाही. कुणालाही हे माहीत झालं नाही. गुरुदेवांच्या निर्याणानंतरही मसरगुप्पी, आनंदराव कोतवाल, के. ए. देशपांडे व आर. एस. आंबेकर यांनी मातोश्री काकूसाहेबांना वारसाहक्काचा दाखला मिळवून देण्याच्या कामी फार साहाय्य केले. हे निखळ निष्काम कर्म होते.

शुक्रवार ७ जून १९५७ -

चंदन, कापूर, उदबत्त्या, पांढरं कापड, वगैरे जिन्नस घेऊन आम्ही ट्रकमधून दुपारी दोनच्या सुमाराला विजापूरहून निघालो. गुरुदेवांचे शिष्य, विजापूरचे किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी रेवणसिद्धप्पा नावदगी, यांनी ट्रक दिला होता. आग्रह करून त्यांनी आमच्याबरोबर पोतंभर साखर, खोकीभरून चहा आणि दुधाची मोठी बरणी दिली. निंबाळला जमलेल्या साधकांची सोय झाली. या प्रसंगावधानाची व औदार्याची माहिती फार थोड्यांना आहे, किंबहुना कुणालाही नाही म्हटलं तरी चालेल. गुरुदेवांचा एक आवडता शिष्य मोहन मसरगुप्पी आमच्याबरोबर निंबाळला आला. नेमाच्या खोलीबाहेर गुरुदेवांचा देह दर्शनासाठी ठेवला होता. रामभाऊ कोळेकर खड्या सुरात दासबोध वाचत होते. साधकांच्या अंतःकरणात कधीही न भरून निघणारी प्रचंड पोकळी निर्माण झाली होती. पोटात दुःखाचा आगडोंब उसळला होता. गुरुदेवांसारखी विभूती पुन्हा कशी दिसणार ? जणूकाही त्यांना निर्माण केल्यावर त्यांना घडवलेली मूस देवाने फोडून टाकली होती. ५ च्या सुमाराला महाराजांच्या फोटोपुढे कापूर लावण्यात आला. गुरुदेवांची महायात्रा निघाली. हजारो माणसे जमली होती. जुन्या घराला प्रदक्षिणा घालून दिंडी निघाली. भजन सुरू होतं. मधूनच हरिनारायण गुरुनारायण असा गजर होत होता. मध्ये मध्ये थांबून आरती होई व पाऊल पुढे पडे. नव्या घरापुढच्या अंगणात यात्रा संपली. नामसंकीर्तन

सतत चालू होतं. केव्हा केव्हा जयगुरू जयगुरू असा घोष होई.

आसमंतात गुरुदेवांचे घर व ध्यानमंदिर हे दोन साधुनिवास होते. घरात त्यांचे वास्तव्य असे. ध्यानमंदिराने अगणित सिटिंग्ज पाहिल्या होत्या. गुरुदेवांच्या देहाकडे अश्रुपूर्ण नयनांनी दृष्टी टाकत व दुःखाचे कढ जिरवीत त्यांनी एकमेकांकडे पाहिले असेल आणि आपल्या मूक बोलीत एकमेकांना म्हटलं असेल, 'निंबाळच्या महापुरुषाचं निर्याण झालं. यानंतर ती सोनपावले इकडून तिकडे झरझर जाताना दृष्टीस पडणार नाहीत, कधीच नाही. आपले पंचप्राण गेले. आपण आता रिते झालो. ज्यांनी आपल्याला प्रतिष्ठा मिळवून दिली ते दिगंतराच्या प्रवासाला निघून गेले. त्यांच्या सहवासाने आपल्या भिंतींना सुगंध लाभला आहे, म्हणून ठीक. एरवी आजपासून आपण केवळ दगडविटांचे ढीग झालो असतो.'

सहा वाजायला आले. अस्थिपंजर झालेला तो पावन देह चितेवर ठेवला गेला. गुरुदेवांचे भाचे प्रा. दामले यांनी त्याच्यावर कापूर लावला. तीन पाय, दोन मस्तके, चार शिंगे व सात हात असलेला अग्निदेव आपल्या तीन पायांवर रेलून शेजारी उभा होता. मावळत्या सूर्यकिरणांत त्याची चारी शिंगे चकाकत होती. जे काही चाललं होतं त्याच्याकडे तो अधीरतेने एकटक बघत होता. त्याला आवाहन करण्याचा अवकाश, त्याने आपली दोन्ही गोमटी मस्तके मोठ्या संतोषाने डोलवली आणि पसरलेल्या साती हातांनी गुरुदेवांचा देह हर्षभराने उरी कवळला. धुराने झिरझिरीत पडदा धरला होता. त्याच्या आड अग्निनारायणाने तो पवित्र हवी स्वाहा करायला सुरवात केली. क्षणभरात पिवळ्या-लाल तेजस्वी ज्वालांनी धूर बाजूला सारला आणि घेरायला येऊ पाहणाऱ्या काळोखाला रोखून धरले. सर्व दृश्य तेजोमय झाले. वाऱ्याची दुःखीकष्टी झुळूक कापूर व चंदनाच्या सुवासाची उधळण करत होती. पंचमहाभूते पंचमहाभूतांत विलीन झाली. नामस्मरणाच्या सोनेरी पंखांवर विराजमान होऊन प्राण केव्हाच अनंतात विलीन झाला होता. तिथे मोजक्यांनाच प्रवेश असतो. अंतकाळी सत्त्वशुद्धी झाली असलेल्यानांच देवाच्या दरबाराची द्वारे खुली असतात.

सुप्रशांत सकृत्ज्योति असा अमृतबिंदू अमृतसिंधूशी एकरूप होऊन गेला.

# परिशिष्टे

## परिशिष्ट १ : प्रा. रामनाथ कौल यांना पत्र

UNIVERSITY OF ALLAHABAD

PHILOSOPHY DEPARTMENT

Allahabad 30 Dec. 1930

My Dear Kaul,

I was indeed very glad to get your letter dated 26th from Amritsar, to learn that you are doing well. I hope the change continues, so that you can [illegible] very much refreshed for continuing your work in [illegible] & other matters with renewed energy. I have not myself gone out: my maxim is — stay if you feel well; move if you feel out of sorts. In any case, I am [illegible] that [illegible] malaria [illegible] better. I am very glad indeed that the Department has in you a young rising man. I wish you every success in your future studies. As regards the review of Iqbal, do send whenever it may be possible to do so. I have already sent back the [illegible] material [illegible]. But I think that your review will not be late. If it is, it will surely find an honourable place in the next number. I think we may some day bring the Review to Allahabad. But this matter, like others, rests with the gods. [illegible] Husain. What has he been doing in Lahore? [illegible] when we meet personally.

Yours Sincerely,

R. D. Ranade

**परिशिष्ट १** मधील पत्रातील मजकूर

# University of Allahabad

Philosophy Department
Allahabad, 30 Dec. 1930.

My dear Kaul,

I was indeed very glad to get your letter dated 26th from Amritsar, and to learn that you an doing well. I hope the change continues, and that you come very much refreshed for continuing your work on Hegel and other matters, with redoubled energy. I have not my-self gone out. My maxim is – stay if you feel well; move if you feel out of sorts. In any case, I am slowly shaking off my malaria, and am better. I am very glad indeed that the Department has in you a young rising man : I wish you every success in your future studies and work. As regards the review of Iqbal, do send whenever it may be possible to do so. I have already sent back the press material to Poona; but I think that your review will not be late. If it is, it will surely find an honourable place in the next number. I think we may some day bring the Review to Allahabad, but this matter like others rests with the gods. Yes, I do remember Dr. Hasan. What has he been working on lately ? Please remember me to him, if you meet him. More when we meet personally.

Yours ever sincerely,
R. D. Ranade

## परिशिष्ट २ : डॉ. गंगानाथ झा यांचे ग्रंथ (अपूर्ण)

**A** On the Indian Philosophical Systems.

1 Khadyota, a commentary on Vātsyāyana's Nyāya-bhāṣya on which there was already a Nyāya-candra by Raghūttama.

2 Sodho Lāl Lectures on Nyāya, Allahabad, 1912-1916

3 Translation of Yogasāra-sangraha of Vijñānabhikṣu, Bombay, 1894; Madras, 1933

4 Translation of Sāmkhya-tattva-kaumudī of Vācaspati Miśra, Bombay 1896, Poona, 1934

5 Translation of Khaṇḍana-khaṇḍa-khādya, 2 volumes.

6 Translation of Advaita-siddhi of Madhusūdana Saraswati (Incomplete), Indian Thought, 1914-1917

7 Translation of Vivaraṇa-prameya-sangraha of Vidyāraṇya (of the portion left incomplete by Thibaut)

8 Translation of Nyāya-sūtra-bhāṣya with Vārtika, 4 volumes, Allahabad, 1915-1919

9 Translation of Praśastapāda-bhāṣya with Nyāya-kandalī

10 Translation of Ślokavārtika, Tantravārtika and Śābara-bhāṣya

11 Translation of Yogabhāṣya

12 Translation of Tattva-sangraha of Śāntarakṣita with commentary of Kamalaśīla, 2 Volumes

13 Text of Bhāvanā-viveka of Manḍanamiśra with commentary of Umbeka

**B** Constructive

1 Śankarācarya and his Work for the Uplift of the Country, Baroda, 1933

2 Prābhākara-school of Pūrva-mīmānsa and Philosophy of Pūrva-mīmānsa

C Side works

1 Bhakti-kallolinī - a metrical commentary on Śāṇḍilya's Bhakti-sūtra

2 Patna University Readership Lectures on Hindu Law, with sources, 2 volumes

3 Translation of Manusmṛti with Bhāṣya of Medhātithi, 8 volumes

4 Translation of Vāmana's Kāvyālankāra-sūtra-vṛtti, Allahabad, 1912

5 Kāvya-prakāśa

## परिशिष्ट ३ : श्री. दीक्षित यांचे पत्र

आर्य समाज मंदिर
मेस्टन रोड
कानपूर, २५/१०/२७

श्री. रानडे साहेब यांसी,

अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल प्रथम मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो. काल माझे वडील ही आनंदाची बातमी घेऊन अलाहाबादहून आले. त्यांच्याकडून निवडसमितीचा निर्णय मला कळला. माझ्या पत्राचं आपल्याला तसं आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. आपली थोडीफार ओळख झालेली आहे. आपण मला हाताखाली घ्यावं अशा इच्छेपोटी मी आपल्याशी पत्रव्यवहार केला होता.


गेले दोन महिने मी कानपूरला आहे. अलाहाबादला जाऊन येऊन असतो. अलाहाबाद विद्यापीठाच्या अगदी जवळ, पाच मिनिटांच्या अंतरावर आम्ही एक घर भाड्याने घेतले आहे. माझी नम्र विनंती आहे की, आपण आमच्या घरात राहावे, म्हणजे अलाहाबादला आल्याबरोबर आपली काही गैरसोय होणार नाही. आमचा काही उपयोग झाला तर माझ्या वडिलांना व मला फार समाधान होईल. आपण अलाहाबादला किती तारखेस व कोणत्या गाडीने येणार हे तारेने मला वरील पत्त्यावर कळवावे म्हणजे माझे वडील स्टेशनवर येऊन आपल्याला घरी घेऊन येतील. आमच्या विनंतीला मान द्यावा.

आपला
के. बी. दीक्षित

(असं दिसतं की यांचे वडील आर. सी. दीक्षित अलाहाबाद विद्यापीठात उपकुलसचिव होते. ते कार्यकारिणी सभेच्या बैठकीला हजर असल्याने गुरुदेवांच्या नेमणुकीचा निर्णय त्यांना लागलीच कळला).

## परिशिष्ट ४ : अलाहाबादच्या बंगल्यातल्या प्रांगणात गुरुदेवांना महाराजांचे दर्शन झालेली जागा

गुरुदेवांना महाराजांचे दर्शन झाले ती जागा बंगल्याच्या समोरील बाजूला आहे. मूळ बंगल्याचा स्थूल आराखडा पाहता येईल.




१९४४ ते १९४६ बंगल्याच्या पडघरात दादासाहेब देशपांडे, सौ. कुसुमबाई देशपांडे आणि प्रसाद व नंदा ही त्यांची दोन मुले राहत. त्यांची स्वयंपाकीण त्यांच्या स्वयंपाकघरात राही. त्याला जोडून गुरुदेवांची मोटार ठेवण्याची जागा होती. १९४९-१९५० हे एक वर्ष प्रह्लादचे आई वडील हणमंतराव कन्नूर व सौ. जानकीबाई कन्नूर पडघरात राहायला आले होते. प्रह्लाद जेवायला घरी जाई तेवढाच, बाकी सर्व वेळ गुरुदेवांकडे असे. प्रा. सीताराम जयराम जोशी व त्यांच्या पत्नी त्याच घरात राहत. १९५० नंतर कन्नूर मंडळी परत गेली. मग फक्त जोशी तिथे होते. गुरुदेवांच्या निर्याणानंतर पुन्हा दादासाहेब देशपांडे तिथे राहायला गेले होते, असे ऐकले आहे.

नोकरांच्या दोन खोल्या होत्या. एका खोलीत भगवानदीन हा विद्यापीठातल्या तत्त्वज्ञान विभागातला चपराशी व त्याची बायको बडकी राहत होते. दुसऱ्या खोलीत शीतल (माळी), त्याची बायको नन्हकी व त्यांची तीन मुले, कन्हैया, मूलचंद व लालचंद यांची वस्ती असे. बडकी व नन्हकी या बहिणीबहिणी होत्या.

पुढच्या बाजूला एक खोली होती. तिथे देवीदयाळ ब्राह्मण राही. तो गुरुदेवांच्या घरी स्वयंपाक करत असे. त्याचा मुलगा वासुदेव. देवीदयाळ म्हातारा झाल्यावर गुरुदेवांनी वासुदेवला खेड्यावरून आणले व के.डी. तिवारींना सांगून विद्यापीठाच्या कचेरीत त्याला चपराश्याची नोकरी दिली.

गुरुदेवांच्या मोटारीचा ड्रायव्हर दुलारीलाल याचे घर कटरा भागात होते.

परिशिष्ट ५ : डॉ. अमरनाथ झा यांचे पत्र

सेनेट हाऊस

अलाहाबाद, २०/१/१९२८

प्रिय प्राध्यापक रानडे,

आपल्या मौल्यवान भेटवस्तूबद्दल आभार मानावे का ? ती मिळाल्याचा फार आनंद वाटतो. मला तो ग्रंथ कितपत समजेल सांगता येत नाही, पण आपण एक मूलग्राही अभिजात ग्रंथ लिहिल्याची मला सतत जाणीव राहील.

पुन्हा एकदा आभार मानतो,

आपला

अमरनाथ झा

परिशिष्ट ६ : श्री. हृदयनाथ कुंझरू यांचे पत्र

भारत सेवक समाज

अलाहाबाद, २४/१/१९२८

प्रिय प्राध्यापक रानडे,

----आमच्या वाचनालयाला आपण आपलं पुस्तक भेट दिलं, त्याबद्दल वाटणारी कृतज्ञता शब्दांत व्यक्त करता येत नाही. हाताशी असलेल्या क्षणभंगुर जीवनातच रमणाऱ्या माझ्यासारख्यांना दूरच्या शाश्वत मूल्यांकडे पाहण्याची दृष्टी हा ग्रंथ देईल.

आपला

हृदयनाथ कुंझरू

## परिशिष्ट ७ : डॉ. कैलासनाथ काटजू यांचे पत्र

डॉ. कैलासनाथ काटजू
उच्च न्यायालय वकील
अलाहाबाद

१९ एडमनस्टन रोड
अलाहाबाद
१८/८/१९३०

प्रिय उपाध्यायजी,

अलाहाबाद विद्यापीठातील माझे मित्र प्रा. रानडे काही दिवस माझ्या मलाका येथील घरात राहतील. त्यांना मदत करावी. त्यांची काही गैरसोय होऊ देऊ नये, म्हणजे फार उपकार होतील.

आपला
के. एन. काटजू

पंडित बैजनाथ प्रसादजी,
मलाका

## परिशिष्ट ८ : नागपूर विद्यापीठाचे निमंत्रण

नागपूर, २७/१/१९२८

प्रिय रानडे,

नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने 'दि राव बहादूर बापूराव दादा किनखेडे लेक्चरशिप' या नावाने, मी एक व्याख्यानमाला सुरू करणार आहे. ही योजना सध्या विचारासाठी व संमतीसाठी नागपूर विद्यापीठ व सरकार यांच्यासमोर आहे. तिला लवकरच मंजुरी मिळण्याची आशा आहे. योजनेच्या तपशिलात शिरून आपल्याला तसदी देत नाही. मंजुरी मिळाली तर, पहिले पुष्प याच वर्षी गुंफले जावे अशी इच्छा आहे. व्याख्यात्याने कमीतकमी ३ व्याख्याने द्यावयाची असून पहिले व्याख्यान वैकुंठ चतुर्दशी (कार्तिक शुद्ध १४) रोजी होईल. व्याख्यानाचा विषय निवडायला बरीच मोकळीक आहे, पण पहिले व्याख्यान हिंदू तत्त्वज्ञानावर व्हावे असे मनोमन वाटते. पहिल्या वर्षासाठी मी आपलं नाव सुचवलं आहे. विद्यापीठाचं पत्र आलं तर आपण हे निमंत्रण स्वीकाराल का ? व्याख्यात्याला १०००=०० रुपये मानधन देण्यात येईल. शिवाय विद्यापीठाच्या संमतीने १००=०० रुपयांचे एक सुवर्णपदक देण्यात येईल. व्याख्यानांचे पुस्तक विद्यापीठ प्रसिद्ध करेल व त्यावर विद्यापीठाचा हक्क राहील. आणखी काही माहिती हवी असली तर आनंदाने पुरवीन.

आपला
एम. बी. किनखेडे

प्रा. रा. द. रानडे
पुणे

## परिशिष्ट ९ : कलकत्ता विद्यापीठाचे निमंत्रण

No. Misc. 2005 / 23

सेनेट हाऊस
२६/९/१९२८

कुलसचिव, कलकत्ता विद्यापीठ
यांजकडून

प्रति,
श्री. रा. द. रानडे, एम. ए.
तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, अलाहाबाद विद्यापीठ

महोदय,

उपकुलगुरू आणि व्यवस्थापन समिती यांच्या सूचनेवरून आपल्याला कळवण्यात येते की या विद्यापीठाच्या विद्यमाने होणाऱ्या वेदान्त तत्त्वज्ञानावरील व्याख्यानमालेत १९२८ या वर्षासाठी 'श्रीगोपाल बसुमलिक अधिसदस्य' म्हणून आपली नेमणूक झाली आहे. मानधन रुपये ४०००=०० आहे. पुढील वर्षी डिसेंबरमध्ये आपल्याला इंग्रजीत बारा व्याख्याने द्यावयाची आहेत. जगातील तत्त्वप्रणालीमधील वेदान्ताचे स्थान व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या तुलनेने वेदान्ताची थोरवी असे या व्याख्यानांचे स्वरूप राहील. सर्वसाधारणपणे व्याख्याने होऊन त्यांचे पूर्ण हस्तलिखित विद्यापीठाला सादर केल्यानंतर मानधन देण्यात येते.

नियमाप्रमाणे विद्यापीठाला ४०० प्रतींचे वितरण करावे लागते. तसेच १०० प्रती व्याख्यानांच्या संस्थापकाला द्याव्या लागतात. विद्यापीठाने प्रकाशनासाठी १०००=०० रुपयांची तरतूद केली आहे. परंतु व्याख्यात्याने स्वतःच छपाईची जबाबदारी उचलली आणि विद्यापीठाला ५०० प्रती देण्याचे कबूल केले तर विद्यापीठाकडून त्यांना १०००=०० रुपये मिळतील.

आपला नम्र सेवक
जे. सी. घोष
कुलसचिव

## परिशिष्ट १० : गुरुदेवांनी गंगानाथ झा यांना लिहिलेल्या पत्रातील एक उतारा

९/९/१९३७

---- माझा स्वभाव एकंदरीत तडजोड करण्याचा आहे. विद्यापीठाचा उत्कर्ष घडवून आणून त्याला मानाचे स्थान मिळवून देण्याची ताकद असणारी व्यक्ती फक्त प्रा. अमरनाथच आहेत. त्यांची बुद्धिमत्ता किंवा संघटन-कुशलता असे गुण पाहिल्यावर वाटते की विद्यापीठाचे नेतृत्व करायला तेच योग्य आहेत. अमरनाथ उपकुलगुरू व्हावेत आणि काही झाले तरी विद्यापीठात शांती नांदावी या इच्छेने मी अधिष्ठाता पदासाठी उभे राहण्याची सूचना मान्य केली होती. ....परंतु आता काय करावे हे मला सुचत नाही. गेल्या महिन्याभरात मला धड झोप आली नाही. रात्र रात्र विद्यापीठातील परिस्थितीच्या विचाराने पिच्छा पुरवला. सगळे काही आपल्यासारखे कर्मयोगी नसतात. कसल्याही परिस्थितीत याज्ञवल्क्यांचा जसा चित्तक्षोभ झाला नाही तसा आपलाही होत नाही. माझा पिंड फार वेगळा आहे. संकोची वृत्ती हा माझा स्वभावधर्म आहे. अधिष्ठाता पदाची जबाबदारी घेतली म्हणजे मनःशांती ढासळेल अशी मला भीती वाटते. गेल्या महिन्या दीड महिन्यात माझ्या हातून काहीही भरघोस काम झालं नाही... तेव्हा मी माझे नाव मागे घेतो...

## परिशिष्ट ११ : अलाहाबाद विद्यापीठातील एक नाट्यमय निवडणूक

उपकुलगुरूंच्या निवडणुकीतला एक किस्सा अमरनाथ झा यांच्या रोजनिशीत वाचायला सापडतो. निवडणुकीत लोकशाही होती पण तिथेही कपटनाटकाचे प्रसंग येत. द लॉ फॉसे हे अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरू होते. त्यांच्यानंतर येणाऱ्या उपकुलगुरूंची निवडणूक नोव्हेंबर १९२३ मध्ये होणार होती. १९२२ सालापासूनच हे पद कुणाला मिळावे याबद्दल गटागटांतून खल चालू झाला होता. डॉ. वियर ह्यांचा या पदावर डोळा होता. आडून आडून प्रचार सुरु होता. समज-गैरसमज होत होते. कोणाही भारतीयाला हे पद मिळू नये अशी कृष्णकारस्थाने युरोपियन लोक रचत होते, इतकेच नव्हे तर कज्जे न्यायालयात नेण्यापर्यंत मजल गेली होती. ही जागा भारतीयालाच मिळावी असे मदन मोहन मालवीयांसारख्या देशभक्तांचे प्रयत्न चालू होते. एवढ्यात आपली उपकुलगुरुपदाची मुदत संपण्यापूर्वी द लॉ फॉसे रजेवर निघून गेले. त्यांच्या रजेच्या अवधीत डॉ. गंगानाथ झा या पदावर निवडून आले. दुसऱ्या कुणाचे नाव सुचवले गेले नव्हते. २३ नोव्हेंबर १९२३ ला रीतसर निवडणूक होऊन डॉ. गंगानाथ निवडले गेले. त्यांना ७८ व डॉ. वियर यांना २५ मते मिळाली होती. डॉ. गंगानाथांची उपकुलगुरू होण्याची ही पहिली वेळ. १९२६ सालच्या निवडणुकीबद्दल

अमरनाथांच्या रोजनिशीत काही उल्लेख नाही. तेव्हाही गंगानाथच निवडून आले होते. प्रतिस्पर्धी कोण होते माहीत नाही, पण होते हे नक्की. कारण गुरुदेवांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी म्हटले आहे, 'माझ्या तिन्ही निवडणुकींच्या वेळी मला प्रतिस्पर्धी होतेच.'

नंतरची निवडणूक १९२९ सालची. पुन्हा आपले डॉ. वियर हे प्रतिस्पर्धी म्हणून उभे ठाकलेच. या निवडणुकीच्या वेळी सरकारी अधिकारी व न्यायालयातले बडे असामी यांनी उघड उघड डॉ. वियर यांच्यामागे भक्कम फळी उभी केली होती. विद्यापीठातले लोक व अन्य मंडळी यांचा गंगानाथांना पाठिंबा होता. २९ नोव्हेंबर १९२९ ला निवडणूक झाली. ही निवडणूक अतिशय अटीतटीची ठरली. गंगानाथ तिसऱ्यांदा निवडून आले. त्यांना ४० व वियरना ३९ मते पडली. युरोपियन लोकांना स्वतःच्या पक्षाच्या विजयाची खात्री असल्याने हा एक धक्काच होता. कुलगुरू हेली यांनी दोनदा मतमोजणी करून खात्री करून घेतली व मगच निर्णय जाहीर केला. पहिल्या मतमोजणीत कदाचित एखादी चूक असली तर दुसऱ्या मोजणीत ती दुरुस्त होऊन वियर विजयी होतील ही आशा सुटली नव्हती ! निवडणूक झाल्या झाल्या अमरनाथ हे गव्हर्नर हेली (ते कुलगुरू होते) यांना भेटले व त्यांनी विचारलं, ''जर दोघांचीही मते सारखी झाली असती तर तुम्ही तुमचं निर्णायक मत दिलं असतं का ?'' गव्हर्नर हेली उद्गारले, ''छे, छे, मी पुन्हा कार्यकारिणी सभेकडे हे प्रकरण नेलं असतं.'' हा नुसता निःपक्षपातीपणाचा देखावा होता. प्रत्यक्षात त्यांनी कार्यकारिणी सभेकडे न जाता वियरना निर्णायक मत देऊन टाकले असते, हे नक्की. झाकली मूठ सव्वा लाखाची.

असा अनुभव आहे की दोन भारतीयांमध्ये मतभेद असेल तर ब्रिटिश अधिकारी तथाकथित निःपक्षपातीपणा दाखवीत ! पण एक भारतीय व एक इंग्रज असेल तर त्यांचा निकाल इंग्रजाच्या बाजूने निश्चितपणे जाई. समान मते पडली असती तर गव्हर्नरने वियरनाच निर्णायक मत दिले असते असे म्हणायला जागा आहे. अगदी याच नमुन्याची एक गोष्ट लखनौ विद्यापीठात घडली होती. कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदाची निवडणूक होती. त्या पदावर पूर्वीपासून असलेले प्रा. एस. बी. स्मिथ पुन्हा उभे राहिले होते. प्रा. राधा कमल मुखर्जी त्यांचे प्रतिस्पर्धी होते. दोघांनाही १७-१७ मते मिळाली. अधिष्ठाता पदाचा अधिकार म्हणून स्मिथ निवडणुकीचे सभापती होते. त्या नात्याने त्यांनी निर्णायक मत स्वतःला दिले ! इथं या इंग्रजाला ही गोष्ट कार्यकारिणी सभेकडे पुन्हा न्यावीशी वाटली नाही. हा त्याचा निःपक्षपातीपणा ! एकच काय अशी शेकडो उदाहरणे आहेत, म्हणूनच हेली यांचे म्हणणे खरे वाटत नाही. एका मताने का होईना गंगानाथांचा जय झाला म्हणून ब्रिटिशांना चरफडत गप्प बसावं लागलं, इतकंच.

## परिशिष्ट १२ : करबसप्पांची गोष्ट

१९४५ साली निंबाळला एक मजेशीर घटना घडली. मे-जून महिन्यांत अलाहाबाद विद्यापीठाला उन्हाळ्याची सुट्टी असे. गुरुदेव तेव्हा निंबाळला येत. जुलैच्या साधारण दुसऱ्या आठवड्यात परत जात. गुरुदेव निंबाळला असताना भाऊसाहेब महाराजांची बरीचशी शिष्यमंडळी तिथे येत. सर्वजण नेमाला पक्के होते. भजनेही खूप रंगत. गुरुदेव अतिशय आनंदात असत. संध्याकाळी सगळेजण सिटिंगला आल्यावर महाराजांच्या गोष्टी निघत. त्यांचा कट्टाच्या नेमाबद्दल कटाक्ष, शिष्यांवरचे अलोट प्रेम किंवा क्षमाशीलता याबद्दल साधक आठवणी सांगत. आपली महाराजांशी भेट कशी झाली, नाम कसे मिळाले हे सांगायची साधकांना मोकळीक असे. हा कार्यक्रम अलाहाबादच्या दिनक्रमापेक्षा वेगळा असे. गुरुदेवांचा स्वतःचा अभ्यास चालू असे पण ते बराच वेळ साधक व गुरुबंधू यांच्या मेळाव्यात घालवत.

१९४५ मध्ये गुरुदेवांना मलेरिया झाला होता. एका दिवसाआड तापाची पाळी येई आणि ताप बराच चढे. ताप कमी होण्याला पंधरवड्याच्या वर दिवस लागले. एक दिवस ताप उतरला असताना गुरुदेवांचे काही वयस्कर गुरुबंधू त्यांना भेटायला आले. करबसप्पा आवटींना गुरुदेवांनी विचारले, ''करबसप्पा, मला मलेरिया का झाला असावा ?'' करबसप्पा गप्प बसले. गुरुदेवांनी त्यांचा पाठपुरावा केला. करबसप्पा आनंदी वृत्तीचे होते. गुरुदेवांशी त्यांचे वागणे सलगीचे असे. आपली मते ते परखडपणे मांडीत, कुणाच्या रागालोभाची पर्वा करत नसत. ते म्हणाले, ''आजारपणाचे कारण मला माहीत आहे पण तुम्हाला राग येईल म्हणून मी ते सांगत नाही.'' गुरुदेव पुन्हा बोलले, ''करबसप्पा, मी तुमच्यावर कधीतरी रागावेन का ? सांगा बरं कारण. मला काही वाटणार नाही.'' मनाचा धडा करून शांतपणे करबसप्पा उद्‌गारले, ''इथे आलेल्या साधकांना १२ वाजता भूक लागते हे उघड आहे. मग त्यांचं सगळं लक्ष तुमची आंघोळ केव्हा होते, नेम केव्हा संपतो, महाराजांना स्वयंपाक अर्पण करून तुम्ही साधकांची जेवणाची व्यवस्था केव्हा करता, इकडं लागतं. याला बराच वेळ लागतो. कधी कधी जेवणाला संध्याकाळ होते. भुकेने ते कासावीस होतात. हे तुमच्या आजारपणाचे कारण आहे.'' ''असं होय, करबसप्पा, असं होय ? मग उद्यापासून साधकांना मध्यान्हीला जेवायला वाढू.'' नवी व्यवस्था सुरू झाली. आठवडा उलटला. साधक व्यवस्थित जेवून वामकुक्षीसाठी आडवे होऊ लागले. अनेकदा ही वामकुक्षी संध्याकाळी ४-५ वाजेपर्यंत चालू लागली. नेम, भजन चुकू लागलं. आश्रमाच्या शिस्तीत हे बसणारं नव्हतं. तिथे साधक नेमासाठी येत, झोपेसाठी नाही. तेव्हा पुन्हा एकदा नेम व भजन झाल्यावर जेवण देण्याची प्रथा सुरू झाली. मात्र सकाळी ११ वाजता वाटीभर उसळ आणि ताक देण्याची व्यवस्था करण्यात आली,

ती पुढे बरीच वर्षे चालू राहिली.

या घटनेवरून गुरुदेवांची कितीतरी स्वभाववैशिष्ट्ये प्रकाशात येतात. एक म्हणजे निंबरगी महाराजांच्या आदेशानुसार आजारपणाचं कारण आपल्याच वर्तनात ते शोधत होते. पुढं म्हणजे करबसप्पांच्या स्पष्टोक्तीबद्दल ते त्यांच्यावर अजिबात रागावले नाहीत. करबसप्पा प्रामाणिकपणे बोलत होते. इच्छा असूनही त्यांना स्वतःलाही रिकाम्या पोटी नेम करवत नसे. त्यामुळे इतर साधकांची अडचण त्यांना समजत होती. आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांनी सांगितलेले कारण मान्य करून गुरुदेवांनी निंबाळच्या दिनक्रमात त्वरित बदल केला. जणूकाही साधकांची भूक त्यांना स्वतःलाच लागली ! अधिक विचार न करता दुपारी जेवण देणे सुरू केले. त्यांनी हट्ट धरला नाही. इथपर्यंत ठीक आहे. पण नेमाला आलेल्या मंडळींनी झोपावे हे मात्र त्यांना चालले नाही. साधकाने परमार्थासाठी काही तपाचरण केलेच पाहिजे. निंबाळला नेमासाठी येणाऱ्या साधकांना झोपा काढणे शोभण्यासारखे नव्हते. म्हणून त्यांनी पूर्वीची पद्धत पुन्हा सुरू केली. पण करबसप्पांचे म्हणणे लक्षात घेऊन सकाळी अल्पोपहाराची व्यवस्था केली. खाण्यापिण्याच्या बाबतीतले त्यांचे धोरण कडक वाटले तरी त्याच्या मागे मनुष्यमात्राची साधनमार्गावर प्रगती व्हावी हा कनवाळूपणा होता. त्यांच्या या मृदुतेला परमार्थाच्या पोलादी खांबाचा आधार होता.

करबसप्पाचा विषय निघाला आहे, म्हणून आणखी एक प्रसंग सांगता येईल. त्यांना एक मुलगा होता, तो थोडा खोडकर होता. तो अशक्त होता व शिक्षणातही त्याला फारशी गती नव्हती. मे-जूनमध्ये करबसप्पा निंबाळला येत, तेव्हा तो त्यांच्याबरोबर येत असे. नेम-भजन कशालाही तो हजर नसे. इतर मुले त्याला चिडवीत, ''बसू, तू नेमाला येत नाहीस हे बरे नव्हे.'' तो लागलीच आपला निषेध व्यक्त करी. ''मी कशाला नेमाला येऊ ? मी एकदा नाम श्वासात गुंफलं, काम संपलं. नाम आता प्रत्येक श्वासोच्छ्वासात हजर आहे. मग नेमाची जरूर काय ? तुम्ही लोकांनी तसं केलं नाही म्हणून तुम्हाला नेमाला बसावं लागतं.'' बसूच असं उत्तर देऊ जाणे ! अतिशय अवघड आणि साधकांच्या मनात सतत राहणारा प्रश्न त्याने आपल्या बालबुद्धीने चुटकीसरसा सोडवला. दुर्दैवाने हा मुलगा लहानपणीच वारला.

## परिशिष्ट १३ : जमखंडी येथील गुरुदेवांच्या भाषणाचा सारांश
### (मूळ भाषण कन्नडमध्ये)

मी डेक्कन कॉलेजात असताना तिथं पुष्कळ मित्र कन्नड बोलत. माझं बालपण जमखंडीला गेल्यामुळे मला भाषा येत होती, तिला जरा उजळा मिळाला. जमखंडीच्या भूमीला अनेक संतांनी पावन केले आहे. मंटूर व हुल्याळ ही खेडी जमखंडीजवळ

आहेत. निंबरगी महाराजांची मुलगी मंटूरला दिली होती आणि त्यांची सून हुल्याळची होती. या दोन्ही गावांना जाताना जमखंडीवरून जावे लागे. त्यामुळे ते बऱ्याच वेळा जमखंडीला येत. त्यांचे शिष्य साधुबुवा जवळच्या चिमड गावी मृत्यू पावले. त्यांची समाधी तिथे आहे. वर्षातून एकदा या समाधीचे दर्शन घेऊन यावे असे निंबरगी महाराजांनी भाऊसाहेब महाराजांना सांगितले होते. त्यानुसार निंबरगी महाराजांच्या निर्याणानंतर ३२ वर्षे भाऊसाहेब महाराज न चुकता चिमडला गेले, ते जमखंडीवरूनच. अशा या पवित्र गावी माझा जन्म झाला हे माझे भाग्य.

१९२५ साली मी प्रथम अलाहाबादला गेलो व गंगा-यमुनेचा संगम पाहिला. काल येताना कृष्णा नदी लागली, ती अगदी यमुनेसारखी दिसली. मला वाटलं मी यमुनाच पाहतो आहे. जमखंडीचा भूभाग समृद्ध आहे. पाणी भरपूर आहे. इथे लुसलुशीत केळी मिळतात. निंबाळची जमीन कोरडी व नापीक आहे.

आतापर्यंत माझ्या मित्रांनी माझ्याबद्दल सन्मानपूर्वक भाषणे करून मला उपकृत केले आहे. त्यांचा मी कसा उतराई होऊ ? आणि सगळ्यांचा नावानिशी उल्लेख तरी कसा करू ? एका इंग्रज लेखकाने म्हटल्याप्रमाणे, 'प्रत्येकाचा नामनिर्देश करणे शक्य नाही, आणि एखाद्याचाच करणे उचित नाही.' परमार्थाच्या प्रेमापोटी त्यांनी गोड शब्द काढले असं मी समजतो. मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

## परिशिष्ट १४ : श्री. ब्रजबासी लाल यांची हकीकत

१९५७ चा जानेवारी महिना. माझ्या कामानिमित्त श्री. म. न. देशपांडे व मी विजापूरला राहिलो होतो. एका सुट्टीच्या दिवशी ते निंबाळला गेले. दुसऱ्या दिवशी त्यांना आणायला मी निंबाळला गेलो. परत येताना तिथले दोन साधक आमच्या मोटारीतून आले. ते मोटारीत मागे बसले होते व त्यांचा संवाद चालू होता. एकजण म्हणाले, ''एका अमेरिकन वार्ताहराने प्रा. राधाकृष्णन्, जे. कृष्णमूर्ती आणि प्रा. रानडे यांच्याशी बातचीत करताना तिघांनाही एकच प्रश्न विचारला, 'आपण कशावर भरवसा ठेवता ?' राधाकृष्णन् व कृष्णमूर्तींनी वेगळी उत्तरे दिली, पण, 'मी नुसता भरवसा ठेवत नाही, मी प्रत्यक्ष पाहतो' असे गुरुदेव म्हणाले.''

मी त्यांचं आपसातलं बोलणं व रानडे यांचं चाललेलं गुणवर्णन ऐकत होतो. पण वर दिलेल्या उत्तराने माझ्या मनात घर केलं. मी पुन्हा निंबाळला गेलो आणि प्राध्यापक साहेबांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी लगेच संमती दिली. मी म्हणालो, ''सगळेच शिष्य आपल्या गुरूंची तोंड भरून स्तुती करतात. आपले शिष्यही त्याला अपवाद नाहीत. आपण अमेरिकन वार्ताहराला जे उत्तर दिलं असं आपले शिष्य सांगतात, ते खरं आहे का ?'' त्या वृद्धाच्या मुखावर मंदस्मित झळकलं पण

त्यांनी काही उत्तर दिलं नाही. मी जेव्हा हट्टच धरला तेव्हा त्यांनी होय म्हणून सांगितलं.

मी हुज्जत घालत राहिलो. ''पाहणे हे सकर्मक क्रियापद आहे. त्याला काहीतरी कर्म *पाहिजेच.* सुहास्य मुद्रेने त्यांनी मान डोलवली. ''मग पाहण्याची काहीतरी पद्धतही असली पाहिजे.'' ते स्तब्धच होते. मग म्हणाले, ''वाचा, वाचा, वाचनाने पुष्कळ गोष्टींचा उलगडा होतो.'' माझं समाधान झालं नाही. माझी टकळी सुरूच होती. ''आपल्या ह्या तोळा-मासा शरीराने जर आपण 'काहीतरी' (हे माझे शब्द) पाहू शकता, तर मग मी का नाही पाहू शकणार ? आपल्याप्रमाणेच मलाही शरीर आणि मन आहे.'' माझ्या या सरबत्तीची मौज वाटून त्यांनी स्मित केलं, पण बोलले मात्र काहीच नाहीत.

दुसऱ्या दिवशी आश्रमातल्या एका वडिलधाऱ्या साधकाने मला माझी इष्टदेवता कोणती हे विचारले. ''माझा देवावर विश्वास नाही आणि कोण्या एखाद्या विशिष्ट नामावर तर नाहीच नाही.'' ''काही संकट आलं तर तुम्ही देवाचं नाव घेत नाही का ?'' ''असं काही निश्चित नाही. कधी कधी मी 'या अल्ला' असंही म्हणतो.'' माझ्या उत्तराने त्यांना काय वाटले कोण जाणे !

नंतर मला सांगितलं गेलं की माझी इच्छा असेल तर मला नाम मिळेल. माझी इच्छा मला तरी कुठं माहीत होती ? हे सर्व चालू असताना माझी पत्नी सतत माझ्याबरोबर होती. मी तिचा सल्ला घेतला. तिने खूपशा शंका-कुशंका काढल्या. आम्ही पुन्हा गुरुदेवांकडे गेलो. मी तिच्या शंका गुरुदेवांना सांगितल्या. ''ती असं म्हणते की नाम घेतल्यावर जे नियम पाळावे लागतात, ते पाळले नाहीत तर गुरू रुष्ट होतील. पण मला वाटतं की जो गुरू रागाच्या आहारी जातो व त्याची आज्ञा पाळली नाही म्हणून शिष्याचे अनहित करतो, तो खरा गुरूच नव्हे. गुरुला देवाचा अवतार समजतात. देव तर परमदयाळू आहे. कोपिष्ट गुरू हा गुरूच नाही.'' माझं वादपटुत्व मी पणाला लावलं होतं. गुरुदेवांच्या चेहऱ्यावर फक्त प्रसन्न हास्य होतं. एवढंच नव्हे, तर लेकरू बोलत असलेल्या वेड्यावाकुड्या उत्तराच्या अपराधाला क्षमा केल्याचा भाव त्या सिद्धाच्या तोंडावर होता. मी पुढे म्हणालो, ''माझ्या पत्नीला आणखी एक शंका आहे. स्त्रियांनी महिन्यातले काही दिवस पूजाअर्चा करू नये अशी रीत आहे. मग आपण सांगता तसे अखंड नामस्मरण तिला कसे करता येईल ?'' ''का बरं ? त्या मुदतीत देव नाहीसा होतो का ?'' काही का असेना खडा टाकून तर पाहू, असे आम्ही दोघांनी ठरवले.

परमार्थमार्गावर आज आम्ही कुठे उभे आहोत कल्पना नाही. मात्र गुरुदेव पुन्हा भेटले तर, ''आपल्या तोळा-मासा शरीराने आपण काहीतरी पाहू शकता तर मी का पाहू शकणार नाही ?'' असे त्यांना विचारायला मी धजावणार नाही. काही

प्रगती झाली असो वा नसो, माझा अहं थोडा नरमला आहे असं म्हणायला हरकत नाही. अर्थात असं म्हणणं म्हणजे पुन्हा अहं आलाच. मला याची क्षमा मिळेल का ?

## परिशिष्ट १५ : गुरुदेवांच्या आजारपणाचे टिपण (काही भाग)

ता. १४ मार्च १९५७ रोजी रात्री अलाहाबादेस आलो. २२ तारखेपर्यंत प्रकृती बरी होती. माडीवर निजत होतो. नेम होत होता. ता. २३ रोजी सकाळी चहा घेणेचे सुमारास वीज पडून जवळच्या एका बंगल्याच्या मालकाचा मुलगा यास इजा झाली. तेव्हापासून पाऊस, storms, thunder इत्यादींची रेलचेल झाल्यामुळे प्रकृती अतिशय बिघडली. माडीवर निजल्याने गार वारे लागत असेल म्हणून खाली निजावयास आलो. एक दिवस बरे वाटले. पुढे दोन चार दिवस एकसारखा खोकला... आजपर्यंत अलाहाबादेस इतकी प्रकृती बिघडून अशक्तता आली नव्हती. इतकी प्रकृती बिघडण्याची ही पहिलीच वेळ. अलाहाबाद येथे खोकला कसा व काय म्हणून निर्माण झाला ? उलट १९५०-५१ साली तीन महिने (१५ ऑक्टोबर ५० ते २१ जानेवारी ५१ पर्यंत) निंबाळ येथे ज्या वेळी अत्यंत खोकला झाला होता त्या वेळी अलाहाबादेस आल्यावर दोन तीन महिन्यांत बरे वाटले... प्रथम पंधरा दिवस ध्यानाकडे व प्रचितीकडे मुळीच लक्ष लागत नसे. प्रचिती मलिन होत चालली होती. पंधरा पंधरा मिनिटांनी जागा होत असे. त्यानंतर रात्री थोडा नेम होत असे. परंतु प्रकृती ज्या दिवशी बिघडे त्या दिवशी मुळीच नेम होत नसे. परंतु एक गोष्ट मात्र होती. पंडित देवीप्रसाद शुक्लजींच्या घरी व आमच्या घरी दिवसातून दोन तीन वेळा ध्यानामध्ये एकेक तास मग्न होऊन बसत असे... संत्र्याबद्दल द्वेष नव्हता. अर्धे, एक, दीड व एक दिवस तीन संत्री याप्रमाणे घेतली मध्यंतरी ८-१५ दिवस संत्री घेतली नाहीत. अलाहाबादची संत्री पुण्यापेक्षा गोड. आसाम व नागपूर या दोन्हीही ठिकाणांहून संत्री अलाहाबादेस येत असत... रात्रीचे वेळी या तीन लोकांनी मदत केली नसती तर जगणे अशक्य झाले असते. रात्री १० ते १ पर्यंत अल्ली, १ ते ४ सौभाग्यवती व ४ ते ७ मधू. रात्रीतून १०-१२ वेळा जाग येत असे. उठल्याबरोबर बत्ती लावणे, मच्छरदाणी वर करणे, चूळ भरणे, कपडे बदलणे, पांघरूण बदलणे वगैरे कामी या लोकांची अत्यंत मदत होत असे. या खेपेस कॉटवर झोपणे झाले नाही. खालीच झोपत होतो. कारण कॉटवर झोपल्याबरोबर खोकल्यास सुरुवात होत असे... निंबाळ येथे काही दिवसांपूर्वी या घरातून त्या घरात जाणेचे वेळी पोट जड होऊन २-३ वेळा मध्यंतरी बसतो की काय असे वाटले. एका प्रसंगी डॉ. खानोलकर जवळ होते. Bad circulation चा दोष असल्याचे त्यांनी सांगितले... सूर्योदयापूर्वी व नंतर अलाहाबादची हवा उत्तम असे. पं. शुक्लजींचे अत्यंत प्रेम. त्याबद्दल काहीच बोलवत नाही... दररोज दुपारी मोटारीतून

जोराने जाऊन आलेवर भाजीचा रस अगर सूप घेत असे व संध्याकाळी पं. शुक्लजींच्याकडे जाऊन आल्यावर थोडाबहुत भाजीचा रस घेत असे. दुधाबद्दल व चहाबद्दल व गोड पदार्थाबद्दल अत्यंत तिटकारा. तिखट, मीठ खाण्यास हरकत नसे. सकाळी बर्फ व संध्याकाळी मधल्या खोलीतील गार पाण्याने अत्यंत उपकार केला... एक दिवस संध्याकाळी घरासमोरील उघड्या मैदानावर दहा मिनिटे नेमास बसलो असता सर्व जागा व आकाश खावयास येते की काय असा भास झाला. काही वर्षांपूर्वी त्याच्या मागील बाजूस असलेल्या एका झाडाखाली कितीतरी उचतर पारमार्थिक अनुभव आलेले होते. अलाहाबाद गाव या वर्षी अत्यंत रानटी दिसले. कोणताही जिन्नस मिळत नसे... सकाळी दूध सायीसकट पण चवदार नसे. संध्याकाळी दूध चांगले नसे. गाईचे दूध बरे असे... काल रोजी ता. २६/४/५७ शुक्रवारी रात्री स्टेशनवर थोडा चहा घेतल्यामुळे थोडी शक्ती वाटू लागली व त्यामुळे अलाहाबाद स्टेशनवर बोलावलेल्या व त्याप्रमाणे आलेल्या २०-२५ मंडळींशी पाच पाच मिनिटे तरी बोलता आले... मोटारवाला driver चांगला मनुष्य होता... पोरू मालिश करीत असे.

(ता. २७ एप्रिल १९५७ रोजी सकाळी ६ वाजता इटारसी स्टेशन येणेचे पूर्वी गाडीत).

## परिशिष्ट १६ : गुरुदेवांची ग्रंथसंपदा

1 Signs of the Times and Characteristics, by Thomas Carlyle, edited by R. D. Ranade, First Edition, 1916; Second Edition, 1917.

2 A Constructive Survey of Upanishadic Philosophy, First Edition, 1926; Second Edition, 1968; Third Edition, 1986; Fourth Edition, 2003.

3 ज्ञानेश्वरवचनामृत, First Edition, 1926; Second Edition, 1952; Third Edition, 1961; Fourth Edition, 1986; Fifth Edition, 2000.

4 तुकारामवचनामृत, First Edition, 1926; Second Edition, 1953; Third Edition, 1962; Fourth Edition, 1984; Fifth Edition, 1991; Sixth Edition, 2002.

5 रामदासवचनामृत, First Edition, 1926; Second Edition, 1963; Third Edition, 1986; Fourth Edition, 2000.

6 संतवचनामृत, First Edition, 1927; Second Edition, 1962; Third Edition, 1986; Fourth Edition, 2000.

7 The Creative Period (in collaboration with S. K. Belvalkar), First Edition, 1927; Second Edition, 1974.

8 Mysticism in Maharashtra, First Edition, 1933; Second Edition, 1961; Third Edition, 1982; Fourth Edition, 1988.

9 The Evolution of My Own Thought (Article contributed to Contemporary Indian Philosophy), First published, 1936; Reprint, 2001.

10 Introduction to Karnatak Mysticism (A Booklet), First published, 1951.

11 Pathway to God in Hindi Literature, First Edition, 1954; Second Edition, 1986; Third Edition, 1997.

12 परमार्थसोपान (हिंदी), First Edition, 1954; Second Edition, 1986; Third Edition, 1997.

13 एकनाथवचनामृत, First Edition, 1955; Second Edition, 1965; Third Edition, 1991.

14 Philosophical and Other Essays, Part I, First Edition 1956.

15 The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi and Hindi Saints, First Edition 1956.

16 The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, First Edition 1959; Second Edition, 1964; Third Edition, 1965; Fourth Edition, 1982; Fifth Edition, 2001.

17 Pathway to God in Kannada Literature, First Edition 1960; Second Edition, 1970; Third Edition, 1989; Fourth Edition, 2003.

18 ध्यानगीता, First Edition, 1961; Second Edition, 1990; Third Edition, 2002.

19 Kannada Paramartha Sopan (Kannada Script), First Edition, 1962; Second Edition, 1969.

20 परमार्थमंदिर, First Edition, 1963; Second Edition, 2002.

21 Essays and Reflections, First Edition, 1964; Second Edition, 2001.

22 Vedanta the Culmination of Indian Thought, First Edition, 1970; Second Edition, 2001.

23 Studies in Indian Philosophy, First Edition, 1986; Second (annotated) Edition, Part I, 1996.

24 हें प्रचीतीचें बोलणें, First Edition, 1986.

अधिक माहिती :

१ चारी वचनामृतांच्या (क्रमांक ३, ४, ५ व ६) प्रस्तावना एकत्र करून त्यांची स्वतंत्र बांधणी व चारी वचनामृतांतील वेचे एकत्र करून त्यांची स्वतंत्र बांधणी अशी दोन पुस्तके गुरुदेवांनी केली होती. प्रस्तावनांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी असे केले असावे. निंबाळला या प्रती आहेत.

२ १९२७ साली अलाहाबादला जाण्याच्या आधी गुरुदेवांनी अनेक स्फुट लेख लिहिले होते. डेक्कन कॉलेज क्वार्टर्ली, फिलॉसॉफिकल क्वार्टर्ली, संस्कृत रिसर्च, इंडियन फिलॉसॉफिकल रिव्ह्यू वगैरे नियतकालिकात ते प्रसिद्ध झाले होते. हेराक्लायटस हा त्यांचा गाजलेला लेख त्यांनी १९१६ मध्ये स्वतंत्रपणे छापून घेतला होता. १९२६ मध्ये त्याची दुसरी आवृत्तीही निघाली होती. कितीतरी पुस्तकांची परीक्षणे त्यांनी केली होती व विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या होत्या. असे बरेचसे लिखाण १९५६ साली फिलॉसॉफिकल अँड अदर एसेज, पार्ट १, १९६४ साली एसेज अँड रिफ्लेक्शन्स आणि १९८६ साली हें प्रचीतीचें बोलणें या तीन पुस्तकांच्या रूपाने प्रसिद्ध झाले.

# सूची


अध्यात्म परिषद्, विद्यमाने व्याख्याने ३८, ५३

अंबुराव महाराज, पुण्यतिथी ८०; नेमाबद्दल आदर ८५; गुरुदेवांना आश्वासन ९७

अलाहाबाद, पवित्र स्थान २२; नामसप्ताह ३६-३७; गुरुदेवांची शेवटची भेट ९७

अलाहाबाद विद्यापीठ, गुरुदेवांना तार ११; दर्जेदार विद्यापीठ १४; प्राचीन विद्यापीठ १४

अली महदी खान, वेळापत्रकातील नैपुण्य १९

अल्ली, गुरुदेवांची सेवा १२७

ॲनॅक्झेगोरास, मन ५७

ॲरिस्टॉटल, चिदानंद सिद्धांत ५६

आत्मानंद, पहा आत्मैक्य

आत्मैक्य, अनुभव ५८

ऑटो, विलक्षण-रौद्र ५७

इंचगेरी, गुरुदेवांचे वास्तव्य ८५, ९७; गुरुदेव व बाबा यांचे संभाषण ८६; शेवटची भेट ९६; अंगारा आणला १०६

इडिस ऑफ मार्च, अपशकुनी दिवस ९७

कन्नूर मास्तर, ईश्वराशी ऐक्य सांगणारे पद १०३; गावी गेले १०४

कबीर, सहज समाधी ५६-५७

कब्बूर कृष्णराव, अलाहाबादला जात ७७

कब्बूर सोनूताई, अलाहाबादला जात ७७

करबसप्पा, एक घटना १२३-१२४

करमरकर डॉ., गुरुदेवांची घराला भेट ७६

कांट, वस्तुतत्त्व ५७

कारखानीस काकासाहेब, नाम देणे ७५; ज्ञानेश्वरीवर प्रवचन ९१

किनखेडे, व्याख्यानांना निमंत्रण २९, ११९

कुमठेकर मधू, नोकरी ७४; गुरुदेवांची सेवा १००, १२७; वाईट स्वप्न १०७

कुमठेकर श्यामराव, शेवटची भेट १०६

कुलकर्णी प्रह्लाद, घर बदलल्याचे पत्र ५९; परमार्थसोपानाचे काम ७३; भक्ती ९२

कुलकर्णी बी. आर., परमार्थसोपानाचे काम ७३; नोकरी ७४; गुरुदेवांचा शेवटचा शब्द ऐकला १०६; गुरुदेवां-कडून औषधाचा शेवटचा घोट मिळाला १०७; गुरुदेवांचा शेवटचा स्पर्श लाभला १०८; गुरुदेवांचे शेवटचे दर्शन घडले १०९

कुलकर्णी श्रीनिवास, मोर्चात सामील ६७; राजकारण सोडले ६९

कुलकर्णी हणमंतराव, पहा कन्नूर मास्तर

कोल्हार, गुरुदेवांची भेट ६५; मोर्चात सामील ६७; राजकारण सोडले ६९

कौल रामनाथ, त्यांना पत्र १३, ११३-११४

गजेंद्रगडकर, गुरुदेवांचे विद्यार्थी ८३; फेलो म्हणून काम ८४; बाबांकडून नाम मिळाले ८६; पहिला अनुभव ८७; गुरुदेवांचे प्रेम ८९

गुरुदेव, पहा रानडे

गोडबोले डॉ., गदगला व्यवस्था ९२

गौडपाद, तुर्या ५६

चट्टोपाध्याय क्षेत्रेशचंद्र, गुरुदेवांचे सहाध्यायी १९

जमखंडी, अमृतमहोत्सव ९०-९२

जमखंडी भाऊराव, गुरुदेवांचा निवास ९२

जेम्स विल्यम, माणसांचे वर्ग २६-२७

ज्ञानेश्वरी, ५८, ९६

झा अमरनाथ, व्यक्तिमत्व १७-१९; अलाहाबाद विद्यापीठातील स्थान १७; राजीनामा १८, ४७; मृत्यूचे गुरुदेवांना दुःख १९; गुरुदेवांचे अधिष्ठाता पद ३२, ३५; विद्यापीठ बंद ठेवण्याचा निर्णय ६९

झा गंगानाथ, गुरुदेवांना पत्रे १२, २०, ३३-३४; व्यक्तिमत्व १५-१७; त्यांचे ग्रंथ १५, ११५-११६; अखेरचे वर्णन १७; गुरुदेवांचे अधिष्ठाता पद ३२-३४

ताम्हनकर, मौतका डंका पद म्हणणे ९९

ताराचंद, गुरुदेवांचे सहाध्यायी १९; उपकुलगुरुपद ४७

तुर्यावस्था, गौडपाद ५६; गुरुदेव ६२

तुळपुळे ग. वि., नाम देणे ७५

दत्त धीरेंद्र मोहन, अलाहाबाद भेट ३९-४०

दाते वि. ह., गुरुदेवांबद्दल आदर ७१; मोहनलालना नाम घेण्याचा सल्ला ७५

दामले न.ग., व्यक्तिमत्व २४; गुरुदेवांच्या पार्थिवावर कापूर लावला ११२

दिवाकर रं. रा., गुरुदेवांच्या पुस्तकांबद्दल आस्था ३०, १००

दीक्षित के. बी., गुरुदेवांना घर देणे २२, ११६

देशपांडे शा. नी., गुरुदेवांची आठवण जागी ठेवणे ५४; अलाहाबाद बंगल्यात निवास ११७

नावदगी, निष्काम सेवा १११

निंबरगी भाऊ, डोळ्यांचा अधूपणा ७४

निंबरगी, शेवटची भेट ९४; शेवटचा फोटो ९४-९६

निंबरगी महाराज, पुण्यतिथी ८७; मेंढपाळ ९५

पंडित स. वा., इंचगेरीचा अंगारा आणला १०६; अंतसमयी ताटातूट ११०

पाठक द.रा., निंबरगीचा फोटो ९४-९६

पारिपत्यदार डॉ., गायनकला आत्मसात ७३; गुरुदेवांची सेवा १०५

प्रपित्सु संघ, ३८

प्लेटो, आयडिया व कॉपी ५५; फीडो संवाद ९०

बायबल, ५६, ९६

भगवद्गीता, श्लोकांचा अर्थ ८०; गजेंद्रगडकरांना मिळालेला श्लोक ८६

भाऊसाहेब महाराज, दर्शनाची जागा २२, ११७; मूर्तीपुढे हात जोडणे ३८; निर्याण १०३

मसरगुप्पी श्रीनिवासराव, निष्काम सेवा १११

मसलेकर, शेवटची भेट १०६

मालवीय मदन मोहन, देशभक्ती ३४, १२१

मिश्रा उमेश, सूची तयार करणे २८

मुन्शी क. मा., गुरुदेवांच्या पुस्तकांबद्दल आस्था, ३०

म्यूर सेंट्रल कॉलेज, अलाहाबाद विद्यापीठाची सुरवात १४

म्यूर वसतिगृह, महत्त्व ६०

राधाकृष्णन् स., एक घटना २९; भाऊसाहेब महाराजांना नमन, ८१

रानडे काकूसाहेब, गुरुदेवांची सेवा १२७

रानडे गुरुदेव, अलाहाबादला नेमणूक ११, २१; आयुष्यातले दोन कालखंड १२-१४; व्याख्यानांना निमंत्रणे २९, ३०, ११९, १२०; तत्त्वज्ञानाचा विकास ३०-३१; अधिष्ठाता पदासाठी निवडणूक ३१-३३, ३५; गंगानाथांना पत्र ३३, १२१; सर्वांच्या नेमासाठी तळमळ ३७, ५४, १२३-१२४; अलाहाबादचा आजार ४९, ९७, ९८, १२७-१२८; अलाहाबादचा निरोप ५१-५२, ९८; अद्वैतदृष्टी ५५ पासून पुढे; उन्मनी अवस्था ५६, ६२, ६४; एकतत्त्ववाद ५६; शिष्यांची काळजी ७४; लेखनशैली ७७; स्वभावदर्शन ७८, १२१; गीतेबद्दल प्रेम ७८; गीतेतील श्लोकांचा अर्थ ८०; एकसष्टी ९०-९१; अमृतमहोत्सव ९१-९२; कन्नड व्याख्याने ९१, ९३; धारवाड व्याख्याने ९२; इंचगेरी निवास ९७; सतना येथील अनुभव ९८; कन्नड संतांवरील ग्रंथाची निरवानिरव १००; हंसगीत १०२-१०४; निर्याण ११०; ग्रंथसंपदा १२८-१३०

रॉय भोलानाथ, गुरुदेवांची भेट ६०, ६१

रॉय शिव शंकर, गुरुदेवांची भेट ५४, ६०, ६१; उन्मनी स्थितीचे दर्शन ६४

लाल पद्मधर सिंग, मोर्चाचा पुढारी ४२, ६७; मृत्यू ४२, ६७; पुतळा ४३

शफात अहमद खान, अधिष्ठाता पदासाठी निवडणूक ३२, ३४-३५

शर्मा मोहनलाल, गुरुदेवांची भेट ७१; नाम मिळाले ७६; परमार्थसोपानाचे काम ७६-७७; वडिलांचा मृत्यू ७८; वाचस्पती पदवी मिळाली ७९

शिवलिंगव्वा, थोर साधिका ८५

शुक्ला देवी प्रसाद, गुरुदेवांबद्दल आदर ५०

सक्सेना बाबूराम, गुरुदेवांच्या उपनिषदांवरील ग्रंथाचे हिंदी भाषांतर प्रसिद्ध केले ५०

संकेत (सांकेतिक लिपी), ५५, ५८, ५९, ६१, ६२

संगोराम बाबासाहेब, संगीताबद्दल चर्चा ३७

सय्यद मोहंमद हफीज, गुरुदेवांचे अभिनंदन २०

सराफ शिव नारायण, त्याला विशेष मदत २५-२६

सॉक्रेटिस, मृत्यू ९०; हंसगीत १०३; साक्षात्कारी १०४

सिन्हा जदुनाथ, एक घटना २९

स्पिनोझा, ईश्वरप्रेम ५६

स्वातंत्र्यसंग्राम, ४१ पासून पुढे, ६६ पासून पुढे

हंसगीत, १०२-१०४; अर्थ व प्रासंगिक औचित्य १०२-१०४

संतांच्या चरित्रांतून सर्वसाधारणपणे त्यांच्या लौकिक जीवनाचा आराखडा व पारमार्थिक योग्यतेचं दर्शन असतं. प्रस्तुत पुस्तकातील लेखांनी ती चाकोरी सोडली आहे; त्यांचा चेहरामोहरा वेगळाच आहे. गुरुदेव रा. द. रानडे यांच्या प्रशासकीय कारकीर्दीची झलक इथे नव्याने आपल्यासमोर येते. गुरुदेवांच्या अद्वैतदृष्टीचे विश्लेषण मनोवेधक आहे. या आत्मौपम्यभावामुळे त्यांचं देवावरचं प्रेम अखिल जीवजाताच्या प्रेमात रूपांतरित झालं होतं (Theo–philanthrophy), याची सतत जाणीव होत राहते. त्यांच्या अखेरच्या दिवसांचं चित्रण हृदयाला हात घालतं. मंगलाचरणाच्या वेळी हे पुस्तक आपल्याला गंगा व यमुना यांच्या संगमाच्या क्षेत्राला घेऊन जाते आणि समाप्तिसंकल्पाच्या प्रसंगी अमृतबिंदू व अमृतसिंधू यांच्या संगमाशी पोचवते.